

# कर्नाटक

RFFBK-0021859
विषय भू. प्रचार
सं. क. 583

एन. एस. रामचन्द्रय्या

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ७ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

- 4 JAN 1976
10 DEC 1978
31 JAN 1979
3 FEB 1980
13 SEP 1981
30 SEP 1981
8 JUL 1982
20 MAR 1986

[क्र. मा. प.]

भारत देश आणि लोक

# कर्नाटक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22859
REFBK-0021859

# कर्नाटक

एन. एस. रामचन्द्रय्या

अनुवाद

प्रा. म अ. करदीकर

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नयी दिल्ली

सप्टेंबर 1975 ( शके 1897 )

© एन एस रामचन्द्रय्या, 1972

रु 12 75

KARNATAK ( *Marathi* )

वितरक
**पॉप्युलर प्रकाशन**
35 सी, ताडदेव रोड, मुंबई 400 034 डब्ल्यू बी

प्रकाशक सचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए–5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली 110 016.
मुद्रक सयद इस्हाक, सगम प्रेस लि , 17–ब कोथरूड, पुणे 411 029

## ऋणनिर्देश

कर्नाटक परिचय केंद्र, नवी दिल्ली आणि अखिल भारतीय हस्तकला मंडळ, नवी दिल्ली यानी या पुस्तकातील छायाचित्रे छापण्याची परवानगी दिली याबद्दल लेखक त्यांचा अत्यंत कृतज्ञ आहे

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | भूविभाग | १ |
| २ | कर्नाटकातील लोक व भाषा | १५ |
| ३ | राजकीय इतिहास | २१ |
| ४. | साहित्यिक इतिहास | ५२ |
| ५. | कन्नड गद्यशैली | ९४ |
| ६ | सास्कृतिक इतिहास | १२१ |
| ७ | उपसहार | १६३ |


मुखपृष्ठावरील छायाचित्र कडग उत्सव, बगलोर

# १ भूविभाग

## ऐतिहासिक सिंहावलोकन

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत एक स्वतंत्र राष्ट्र बनले भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० पासून लागू झाली आंध्र प्रदेश या नव्या प्रजासत्ताकाने निर्माण केलेले पहिले एकभाषिक राज्य होय (१९५३) २९ डिसेंबर १९५३ ला राज्य-पुनर्रचना-मंडळ (हे फाझलअली मंडळ अथवा एस् आर सी म्हणूनही प्रसिद्ध आहे) नेमले गेले व त्या मंडळाने संयुक्त कर्नाटक प्रांत बनविण्याची सूचना केली एस आर. सी च्या सूचना समाविष्ट केलेले विधेयक संमत करण्यात येऊन ३१ ऑगस्ट १९५६ ला त्याला राष्ट्रपतींची मान्यताही मिळाली लोकसभेच्या या विधीनुसार, १ नोव्हेंबर १९५६ ला, या नव्या राज्याची औपचारिक रीत्या स्थापना भारताच्या राष्ट्रपतींनीच केली

कर्नाटकात पुढील एकोणीस जिल्हे आहेत

१ जुन्या मैसूरमधील नऊ जिल्हे (१) मैसूर, (२) बंगलोर, (३) कोलार, (४) तुमकुर, (५) चित्रदुर्ग, (६) शिमोगा, (७) हस्सन, (८) चिक्कमगळूर आणि (९) मंड्या ('ब' वर्गीय संस्थान)

२ मद्रासमधील दोन जिल्हे (१) बेल्लारी व (२) दक्षिण कानडा

३ मुंबईमधील चार जिल्हे (१) बेळगाव, (२) धारवाड, (३) विजापूर आणि (४) उत्तर कानडा

४ हैदराबादमधील तीन जिल्हे (१) बेदर, (२) गुलबर्गा आणि (३) रायचूर

५ कूर्ग ('क' वर्गीय संस्थान)

## भौगोलिक स्थान

कर्नाटक भारतीय द्वीपकल्पाच्या नैर्ऋत्येकडील प्रदेशात मध्यभागी वसले आहे पूर्व रेखांश ७४° व ७८° आणि उत्तर अक्षांश ११° व १८° यामध्ये ते पसरले आहे कर्नाटकाचे क्षेत्रफळ १,९२,२०४ चौरस किलोमीटर असून त्याची लोकसंख्या

२,३५,८६,७७२ (१९६१ च्या जनगणनेनुसार)[1] आहे त्या राज्याच्या सीमावर पश्चिमेस केरळ, अरबी समुद्र व गोवा, उत्तरेस महाराष्ट्र, पूर्वेस आंध्र प्रदेश व तामिळनाडू आणि दक्षिणेस तामिळनाडू येतात

## प्राकृतिक भूगोल

प्राग्द्राविड अथवा मूलद्राविड भाषा बोलणारे लोक या पृथ्वीवरील सर्वांत प्राचीन रहिवाश्यांपैकी होत असे म्हणतात भूतकाळात डोकावणारी आपली स्वप्ने आगस्त्य आणि आंजनेय यांच्यापर्यंत जाऊन भिडतात भौगोलिक दृष्टया कर्नाटकाने तीन प्राकृतिक भूभाग व्यापले आहेत समुद्रतीरावरील पट्टा, सह्याद्रीच्या रांगा आणि दक्षिणेकडचे पठार कन्नड भाषेत ते अनुक्रमे पश्चिम करावली, माळनाड आणि मैदान म्हणून प्रसिद्ध आहेत

कर्नाटकाची भूपृष्ठरचना बव्हशी त्या राज्याच्या भूगर्भरचनेचे प्रतिबिंबच होय सह्याद्रीच्या रांगा सदाहरित अरण्यानी आच्छादिलेल्या असून त्या १८०० मीटरापर्यंत चढत गेल्या आहेत अरबी समुद्राकडे त्या एकदम उतरतात आणि अशा प्रकारे पठार व तीरावरील प्रदेश यांच्यामध्ये एक नैसर्गिक भित बनून राहतात तीराकडे जाण्यालाही चार घाटातून प्रवेशमार्ग आहेत सुब्रह्मण्य घाट, चारमाडी घाट, शिराडी घाट आणि विख्यात अगुंबे घाट पश्चिम घाटाच्या रांगा बंगालच्या उपसागराकडे हळूहळू उतरत जातात कृष्णा व कावेरी या दोन प्रमुख नद्या ज्यातले पाणी वाहून नेतात, तो हा पठारी प्रदेश या पठाराची सरासरी उंची समुद्रसपाटीपासून जवळजवळ ६०० मीटर आहे

कर्नाटक हा भारतीय द्वीपकल्पाचा एक भाग असून, ते द्वीपकल्प म्हणजे एक प्राचीन पठार आहे स्मरणापलीकडील काळापासून त्यावर वारा व पाणी यांचा भडिमार होत आला आहे त्याचे डोंगर व खोरी यांचे खोदकाम या विघटक शक्तीनीच केलेले आहे नद्यानी चालवलेली धूप आणि सामान्यत तिच्या अनुषंगानेच घडून येणारा त्या नद्यांच्या पाण्याखाली भिजणाऱ्या खोऱ्याच्या उंचसखलपणातील पालट यांमुळे शिवसमुद्रम आणि जोग (२६० मीटर) यासारखे कित्येक धबधबे निर्माण झाले आहेत हे धबधबे म्हणजे मानवाच्या निसर्गावरील प्रभुत्वाला एक आव्हानच होय जलविद्युत्केंद्राची स्थापना करून कानडी जनतेने त्याला प्रतिसादही दिला

---

1 १९७१ च्या जनगणनेतील लोकसंख्येच्या तात्पुरत्या आकड्यानुसार या राज्याची लोकसंख्या २,९२,६३,३३४ आहे

भगवान श्रीरंगांची निवासस्थाने म्हणून विख्यात असलेली तीन बेटे कावेरी नदीने निर्माण केली आहेत श्रीरंगपट्टण म्हणजे आदिरंग, शिवसमुद्रम हा मध्यरंग आणि तिसरा श्रीरंग या नावाचा तामिळनाडूत आहे गगनचुक्की व भारचुक्की हे कावेरीचे दोन फाटे वेगवान आणि तुटक प्रपाताच्या स्वरूपात जवळजवळ ८० मीटर खोल कोसळतात

अत्यंत प्राचीन, टणक आणि स्फटिकमय खडकाचा बनला असल्याकारणाने, भूगर्भशास्त्रदृष्टचा कर्नाटक प्रदेश स्थिरनिश्चल आहे भूकंप व भूस्खलन यासारख्या नैसर्गिक आपत्तींच्या भयापासून हे राज्य जवळजवळ मुक्तच आहे

## भूगर्भाचा इतिहास

भूगर्भशास्त्र आणि खाणकाम याचा सर्वांत प्राचीन शासकीय विभाग बाळगून असल्याचा अभिमान कर्नाटकाला मिरवता येतो या राज्याची, विशेषत आर्थिक दृष्टचा महत्त्व पावलेल्या प्रदेशाची भूगर्भरचना बारकाईने अभ्यासिली गेली आहे कर्नाटकाचा जवळजवळ तीनचतुर्थांश भाग अतिप्राचीन खडकाचा (अर्कियन-भूयुगारंभकालीन) बनलेला असून, ते खडक दोनशे कोटी वर्षांहून जुने असावेत अशी अटकळ आहे हे खडक इतके प्राचीन आहेत आणि त्याच्यात रासायनिक व भौतिक दृष्टचा इतके पराकाष्ठेचे परिवर्तन घडून आले आहे की त्यानी आपले बरेचसे मूळ वैशिष्टच गमावलेच आहे या राज्याचा एकचतुर्थांश भाग त्या मानाने अर्वाचीन अशा, गाळापासून बनलेल्या खडकानी व्यापलेला आहे ते कर्नूल आणि कडप्पा प्रस्तरमालेत मोडतात डेक्कन ट्रॅप नावाचे, साडेबारा ते साडेतेरा लक्ष वर्षां-इतके प्राचीन असे ज्वालामुखीतील लाव्हा रसाच्या प्रवाहापासून बनलेले थराथराचे खडकही त्या राज्यात आहेत ते भाग निर्माण झाल्यापासून फारसे पालटलेले नाहीत अलीकडच्या काळातले, दहा लाख वर्षांहून कमी प्राचीन असे गाळाचे अथवा वाळूचे काही पट्टेही सागरतीरी आढळतात

### भूगर्भातील घडामोडींचे सार

कर्नाटक प्रदेशाची भूगर्भशास्त्रीय उत्क्रांती काळाच्या उलट गतीने आपल्याला तमोयुगीन गर्तेपर्यंत नेऊन सोडते संरक्षक आवरणाच्या विभागाचे अस्तित्व पृथ्वीच्या कवचाच्या जन्मकाळाइतके प्राचीन आहे आमचे सर्वांत प्राचीन खडक बहुधा आदि-कालीन द्रवरूप गाऱ्याचे घनीभवन होऊन बनले असावेत द्वीपकल्पीय स्तरपट्ट

यांच मूळ अग्निजन्य खडकावर नाना प्रकारच्या परिवर्तक प्रक्रिया होऊन सिद्ध झाले आहेत पुढे, तीनशे कोटी वर्षांपूर्वी परिरक्षक आवरणाचे क्षेत्र समुद्राखाली बुडाले आणि दाट धारवाडी गाळाचे थर त्यावर साचत गेले या गाळाच्या मूळ कारणासबंधी कल्पना अजून अनिश्चितच आहेत जे निकटवर्ती भूभाग नंतरच्या काळात समुद्राच्या तळात गेले त्यावरून कदाचित् तो गाळ वहात आला असावा धारवाडी गाळाचे थर बसण्याची प्रक्रिया ५० कोटी वर्षे चालू राहिली नंतर त्यांना चुण्या पडून ते समुद्राच्या पृष्ठभागावर उचलले गेले अशी चक्री घडामोड लागोपाठ तीनदा घडली भूगर्भशास्त्रीय उत्क्रांतीच्या इतिहासाचा दुसरा अध्याय जवळजवळ २४० कोटी वर्षांपूर्वी चालू झाला या वेळी क्लोजपेट कणाश्म मधेच शिरू लागले यानंतरच्या प्रदीर्घ काळात मोठीशी भूगर्भशास्त्रीय घडामोड घडलीच नाही पुढे, जवळजवळ १४० कोटी वर्षांमागे उत्तर कर्नाटकाचे काही भाग आणखी एकदा समुद्राखाली बुडून त्यावर कलादगी आणि भीमा मालिकेतले गाळ साचू लागले केंब्रियनपूर्वकालीन गाळाचे हे थर साचल्यानंतर जवळजवळ ७० कोटी वर्षे फिरून एकदा सारे काही सामसूम राहिले या अवधीत द्वीपकल्पीय पट्टिताश्म आणि धारवाडी गाळाचे खडक यांचे सातत्याने विघटन होत गेले पुढे साधारणपणे ७२ कोटी वर्षांपूर्वी चामुंडी कणाश्माच्या अग्निजन्य रसाचा त्या खडकातून शिरकाव होण्याची गौण घडामोड होऊन गेली शेवटची भूगर्भशास्त्रीय घडामोड झाली १३ कोटी वर्षांपूर्वी त्या वेळी पृथ्वीच्या कवचातील मोठाल्या भेगांमधून दक्षिण स्तम्भाश्म ज्वालामुखी लाव्हाचे लोट वाहू लागले या लोटाचे उत्तरेकडील जिल्ह्यांतले त्या आधीच्या खडकावर नुसतेच आवरण चढले आणि या घटनेबरोबरच कर्नाटकाच्या भूगर्भशास्त्रीय उत्क्रांतीची परिपूर्ती झाली गेल्या बारा कोटी वर्षांत चालू असलेली स्थित्यंतरे म्हणजे अनुक्रमे वारा व पाणी यांनी चालवलेली खडकांची मोडतोड व धूप एवढीच त्यांनी मात्र येथील वैशिष्ट्यपूर्ण भूपृष्ठरचना नष्ट करून तिच्यात कंटाळवाणा तोच तोपणा आणि बत्थडपणा आणण्याचे कार्य अव्याहतपणे चालवले आहे

'काळाइतके विपुल दुसरे काहीच नसते।'

## ऋतुमान व पाऊसपाणी

कर्नाटकाचे ऋतुमान सर्वसाधारणपणे समधात असून स्थानिक फेरफार घडून येतात ते समुद्राचे सान्निध्य, समुद्रसपाटीपासून उंची आणि पर्जन्यमान यासारख्या भौगोलिक कारणामुळे सागरतीरावरील प्रदेशातले हिवाळे सुखोष्ण असून, उन्हाळे ऊष्ण व दमट असतात आणि नैर्ऋत्येकडील पावसाळी वाऱ्यामुळे तेथे जूनपासून

सप्टेंबरपर्यंत सपाटून पाऊस पडतो सरासरी पर्जन्यमान तर ३०० सें मी पर्यंत असते

पठारी प्रदेशात पर्जन्याचे मान सह्याद्रीपासून असलेल्या अतराच्या व्यस्त प्रमाणात असते अगुम्बेमध्ये पाऊस इतका सपाटून पडतो की कधीकधी तो जागतिक उच्चांकही प्रस्थापित करतो चिक्कमगळूरला सरासरी २०० से मी पाऊस लाभतो, तर पूर्वेस १२० कि मी अतरावर असलेल्या चित्रदुर्गमध्ये तो ६० से मी हूनही कमी भरतो

एखादा कोणी पूर्वेकडून पश्चिमेच्या प्रवासास निघाला, तर पाऊस प्रचड प्रमाणा-वर वाढत जात असलेला त्यास दिसून येईल उदाहरणार्थ, शिमोग्याला सरासरी २०० से मी पाऊस पडतो, जवळजवळ ६५ किलोमीटर पश्चिमेस असलेल्या तीर्थहळ्ळीला तो याच्या चौपटीवर जातो, व पश्चिमेला जवळ जवळ १०० किलो-मीटर अतरावर असलेल्या अगुम्बे येथे तर तो याच्या दसपट होतो

कमी अनुकूल ऋतुमान असलेल्या राज्यातून उन्हाळ्यापुरते रहिवाशी आकृष्ट करणारी स्थळे कर्नाटकात आहेत नदी आणि केम्मनगुडी ही गिरिविहाराची ठिकाणे खूप लोकप्रिय झालेली आहेत या सदर्भात मेर्कारा आणि बेळगाव याचाही उल्लेख करायला हवाच निकटवर्ती सस्थानांच्या पूर्वीच्या राजांनी बेळगावात उन्हाळी राजवाडे बांधले आहेत हस्सन तर गरीब लोकाची उटी म्हणून प्रसिद्ध आहे

सर्वांत मानाचे स्थान बगलोरला लाभले आहे ऋतुमान हेच या राजधानीचे प्रमुख आकर्षण म्हणता येईल ती मुळी वातानुकूलित नगरी म्हणूनच ओळखली जाते आशियावरील चर्चासत्रास आलेल्या अमेरिकन प्रतिनिधिमडळाच्या नेत्याने आभाराचे भाषण करताना म्हटले, "नगराध्यक्ष, ऋतुमानावर नियत्रण ठेवलेत म्हणून मी आपले आभार मानतो!" बगलोरला आपल्या वाटणीचा पाऊस हिवाळी व उन्हाळी, दोन्ही पावसाळी वाऱ्यांपासून मिळतो त्याला लाभणारा हिवाळी पावसाचा, ऑक्टोबर ते जानेवारीपर्यंतचा, वाटा कधीकधी अधिकही भरत असेल त्यामुळे धूळ खाली बसून वातावरणात उत्साहवर्धक गारवा आणि सुखद ऊब भरून राहते उभ्या वर्षभर ऋतुमान असे आल्हाददायक असते

बनवासी देशाची ख्याती सर्वांत प्राचीन कन्नड राजघराण्याच्या काळापर्यंत पोहोचते आदि पपानी ती अजरामर करून ठेवली आहे

**"आरकुशविट्टोड नेनेवुदेन्नामनम बनवासीदेशम।"**

इतर राष्ट्राच्या नागरिकत्वाचा मोह असूनही, या कवीला मायभूमीचीही ओढ आहे जन्मभूमीपासून दूर असताना बनवासीमधील देखावे, गध आणि नाद याचे

स्मरण त्याला झाल्याविना रहात नाही कारण सुसंस्कृत संवेदनक्षमतेला आवाहन करणाऱ्या साऱ्या घटकाचे सारतत्त्वच त्याला तेथे गवसले होते पार्थिव आनंदोत्कर्षाचा तो परमोच्च बिंदूच म्हणायला हवा **'संसारसारसर्वस्वफलम् ।'**

"बनवासीचे नागरिक होण्यासाठी एखाद्याला विशेष प्रकारचे पुण्य जोडावे लागते इतराना मात्र तेथे कोकिळ किंवा मधमाशी म्हणून जन्माला येण्यासाठी प्रार्थना तेवढी करता येईल !" या कवीने गाइलेल्या स्तुतिस्तोत्राच्या सत्यतेला एका आधुनिक फ्रेंच इतिहासकारानेही दुजोरा दिला आहे "पृथ्वीच्या पाठीवरील, निसर्गाजवळ असलेले मानवाला देण्याजोगे सर्वांत सुंदर वसतिस्थान कर्नाटकातील सपाट प्रदेशानी पुरवले आहे !"

## पर्जन्यमानानुसार विभाग

पावसाच्या प्रमाणाच्या अनुरोधाने जिल्ह्याचे पुढीलप्रमाणे गट पाडायला हवेत

१ भरपूर पावसाचा विभाग (२०० सें मी हून अधिक)

उत्तर व दक्षिण कानडा, कूर्ग, शिमोगा, चिक्कमगळूर आणि हस्सन व मैसूर जिल्ह्याचे पश्चिम भाग

२ मध्यम पावसाचा विभाग (६० सें मी हून अधिक व २०० सें मी हून कमी)
बंगलोर, बेळगाव, बेदर व धारवाड

३ कमी पावसाचा विभाग (६० सें मी हून कमी)
विजापूर, बेल्लारी, गुलबर्गा, चित्रदुर्ग, रायचूर, तुमकूर आणि कोलार जिल्हे

यावरून हे उघड दिसते की या राज्याच्या अर्ध्याहून अधिक भागाला शेतीसाठी पाणीपुरवठ्याच्या कोणत्या ना कोणत्या तरी कृत्रिम पद्धतीवर विसबून राहावे लागते

तिसऱ्या योजनेच्या अंती कर्नाटकातील ओलिताखाली आलेल्या भूमीचे क्षेत्रफळ जवळजवळ ३० लाख एकर होते हे म्हणजे लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या भूमीच्या केवळ दहा टक्के होय १९८० च्या अतापर्यंत साधारणत ८० लाख एकर भूमी ओलिताखाली येऊन, २५ टक्क्याचे राष्ट्रीय लक्ष्य गाठले जाईल अशी आशा आहे

यशस्वीपणे पार पाडलेल्या अनेक कार्यभागामुळे, विशेषत सार्वजनिक सेवा, शिक्षण आणि प्रशासन या क्षेत्रातील कर्तृत्वामुळे, जुने मैसूर राज्य, रामराज्य म्हणून ओळखले जाऊ लागले होते कृष्णराजसागराचे नाव प्रत्येकाच्या ऐकण्यात

आहेच मंड्या साखर-कारखाना हे त्याच्या अनेक अंतिम फलितांतले एक असून जलविद्युत्निर्मिती हे तर त्याचे एक गौण कार्य होय

## वनस्पतिसृष्टी व प्राणिसृष्टी

कर्नाटक हा शब्द कोणकोणत्या विभिन्न प्रकारांनी व्युत्पन्न झालेला असण्याची शक्यता आहे याचे वर्णन आर नरसिंहाचार यांनी केले आहे त्यातला एक असा 'कम्मितु नाडु' यानुसार 'कन्नड'चा अर्थ 'सुगंधित देशाची भाषा' असा होतो गीते व कथा यातून विख्यात झालेल्या चंदनाच्या वनांनी आणि कमळांच्या तळ्यांनी समृद्ध असलेल्या या देशाला हे नाव समर्पकच आहे

लक्ष्मणाला पुनरुज्जीवन देण्यासाठी संजीवनी शोधताना हनुमानाने उभा चंद्रद्रोण पर्वत धुंडाळला होता कर्नाटकच्या पुष्पसंपदेत श्वेतमल्लिका, सोनचाफा, लाल गुलाब आणि जांभळी पदरी यांचा अंतर्भाव होतो आंब्यासाठी तर कर्नाटक निरंतर ख्याती पावलेले आहे—'मगई' शब्द द्राविडी आहे हापुस या जातीचा प्रसार कदाचित पोर्तुगीजांनी केला असेलही, त्यांचे विजयनगरच्या सम्राटाशी व्यापारी संबंध होतेच पण आंब्याच्या स्थानिक जातीही रसाळ आणि स्वादिष्ट आहेत पंपाच्या मते, 'ज्या भूमीला आंबा, मल्लिका आणि कोकिळेचे संगीत यांचा अभिमान मिरवता येतो, तिला प्रत्यक्ष देवाचीच समृद्धी लाभली असे म्हणता येईल हे चित्र पूर्ण करायचे तर आपल्याला सदाहरित अरण्ये, पाचूसारखे हिरवेगार माळ आणि सूर्यप्रकाशाने तेजाळलेले समुद्राकाठचे प्रदेश यांची जोड द्यायला हवी कर्नाटकाची प्राणिसृष्टीही काही कमी वैशिष्ट्यपूर्ण नाही तिथली रानेही हत्ती आणि गवा रेडा यांची तर वसतिस्थानेच—महिषमंडळे—होती सांबर, हरिण, रानडुक्कर, अस्वल व ससा यासारख्या छोट्या श्वापदांचेही तेथे वैपुल्य असे पक्ष्यांच्या वृंदगानाने सायंकाळचे आकाश निनादून जाई साऱ्या पक्ष्याहून अधिक ठळकपणे झळकणारा पिसारा लाभलेल्या मोराचाही त्यात समावेश असे या वनस्पतिभक्षक प्राण्यांची संख्या वाढत जाऊन त्यांनी पिकांची नासाडी करू नये म्हणून निसर्गाने कित्येक मांसभक्षक पशूही उत्क्रांत केले होते—जसे वाघ, चित्ता आणि बिबळ्या

मानवाच्या विकासशील संस्कृतीची प्रवृत्ती नेहमीच निसर्गाचा समतोल ढळवण्या-कडे असते. अलीकडच्या काळात वरच्यावर होणारी अनावृष्टी किंवा अकालवृष्टी यांना मानवाने अनिर्बंधपणे चालवलेली अरण्यसंपदेची नासधूस कारणीभूत झाली असू शकेल असेही म्हणणारे काही लोक आहेत अकिंचन तर नेहमीच आमच्या

बाजूचे असतात पण दुर्दैव एवढेच की एकदा विनष्ट झालेली पुष्पसृष्टी आणि प्राणि-सृष्टी फिरून पुनरुज्जीवित कधीच करता येत नाही

शासनाने प्रसिद्ध केलेली आकडेवारीही वरील दृष्टिकोनाला दुजोरा देते. भारताच्या एकूण भौगोलिक क्षेत्रातले वीस टक्के क्षेत्र अरण्याच्छादित आहे कर्नाटकात हे प्रमाण १८ टक्के आहे पण अरण्यविषयक राष्ट्रीय धोरणानुसार तर अरण्याच्छादित भाग एकूण क्षेत्रफळाच्या एकतृतीयांशपेक्षा कमी असता कामा नये

आपली जगलसपदा अक्षय आहे या सिद्धांताचा फुगा आता फुटून चुकला आहे जगलातील उत्पादनावर आधारलेल्या उद्योगधद्याची वाढ, ओलितासाठी बधारे बांधल्यामुळे अरण्याचे विस्तृत प्रदेश पाण्याखाली बुडून जाणे आणि सरपण व बांध-कामाचे लाकूड यांची निरतर वाढत जाणारी मागणी, ही जगलाच्या ऱ्हासाची काही कारणे होत दुसऱ्या जागतिक युद्धाच्या अवधीत झालेला जगलसपदेचा अनिर्बंध उच्छेद ही स्थानिक शासनाच्या अधिकाराबाहेरील घटना होती पण स्थलपरिवेश सुरक्षित आणि अप्रदूषित राखायलाच हवा याची उत्तम जाणीव आजच्या राज्य-शासनाला आहे म्हणूनच अरण्यनिर्मितीच्या अनेक योजना मान्य केल्या गेल्या असून प्राण्यांसाठी कित्येक अभयारण्येही स्थापन करण्यात आली आहेत

## रानांची विभागणी

सह्याद्रीच्या निकटवर्ती प्रदेशात घनदाट अरण्ये असावीत अशी अपेक्षा सहजच असू शकते सदाहरित जगलाच्या कडेकडेने झाडी आणि चदनाचे वृक्ष आढळतात अधिकाधिक पूर्वेकडे जात आपण दक्षिण पठाराच्या अनावृष्टीयुक्त भागात पोहोचलो म्हणजे मात्र नुसते उघडेबोडके डोगर आणि रूक्ष माळ आढळतात

**आर्द्र व रूक्ष अरण्ये :**

कर्नाटकात असलेले अरण्याचे हे दोन प्रकार तेथील दोन नैसर्गिक विभागांच्या अनुषगानेच बनलेले आहेत आर्द्र अरण्ये माळनाड विभागात आढळतात, तर रूक्ष जगले मैदानी प्रदेशात विभिन्न क्षेत्रातील नानाविध उपजातीच्या वनस्पतीची वाढ त्या त्या भागातील भूपृष्ठरचनेवरही अवलबून असते

आर्द्र अरण्ये सह्याद्रीच्या दोन्ही बाजूस आढळून येतात सदाहरित जगले समुद्रसपाटीपासून ९०० ते २००० मीटर उचीवर असलेल्या प्रदेशात दिसतात या प्रकारच्या रानाचे मुख्य पट्टे कूर्ग, हस्सन, चिक्कमगळूर, शिमोगा, मैसूर, उत्तर कानडा आणि दक्षिण कानडा या ठिकाणी आढळतात ही जगले म्हणजे बांधकामाचे

लाकूड पुरविणाऱ्या वखारीच होत अगदी भरपूर पाऊस आणि त्याच्या जोडीला ऊष्ण व दमट ऋतुमान यामुळेच या व इतर कमी महत्त्वाच्या झाडांची भरमसाट वाढ होत असते वर्षाच्या बऱ्याचशा अवधीत वातावरण बाष्पसपृक्त झालेले असते आणि दाट वाढलेल्या झाडोऱ्यामुळे सूर्यप्रकाश तर क्वचितच भूपृष्ठापर्यंत पोहोचतो

वनस्पतीची विभिन्न उचीपर्यंत वाढ हे या जगलाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे ज्या जातीच्या वनस्पतींना सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते त्या उचच उच वाढत जाऊन ४५ मीटर उची गाठतात त्यामुळे त्याचे शेंडे सूर्यप्रकाश ग्रहण करण्यास अनावृत राहतात मोठाल्या झाडाच्या मांडवाखालची लहानसर झाडे काळोखातही वाढू शकतात भूमीलगतच्या पातळीवर मोठाली झुडपे आहेत वृक्षांचे बुधे शेवाळ, नेचे आणि आर्किड यांनी आच्छादलेले असतात घाटातल्या पावसाळी रानाना सोसाटयाच्या वाऱ्याचा मारा सोसावा लागतो नैर्ऋत्य पावसाळी वाऱ्याच्या दिशेवरच हे घाट आडवे खडे असल्या कारणाने वर्षातले जवळजवळ सात महिने सोसाटयाचा वारा वहातच असतो मेघजड वारे घाटाच्या खडया भिताडाला भिडले की ते थेट शिखरावर चढतात आणि मग चांगल्याच सपाटयाने खाली धाव घेतात हा सोसाटयाचा आघातच झाडांची खुरटी वाढ, पानाच्या आकाराची लहानखुरी चण आणि आखूड फाद्याच्या खुटावर होणारी पानफूट याना कारणीभूत होत असतो भर दुपारच्या, विशेषत वृष्टिहीन महिन्यातील दुपारच्या, उन्हाचाही झाडांच्या वाढीवर विदारक परिणाम होतो अशा प्रदेशात उन्हाचा भाजाकार आणि सोसाटयाचे वारे यामुळे झाडाची वाढ खुटून जाते

बाबा बुदन गिरीच्या आणि बिलिगिरी रगन रागेच्या डोगरमाथ्यावर काही विशेष प्रकारची रानें आहेत येथे जगले आढळतात ती ११०० मीटरहून अधिक उचीवर त्याचे सर्वसाधारण स्वरूप वर वर्णन केलेल्या जगलासारखेच असते भेद इतकाच की समशीतोष्ण ऋतुमानात वाढणाऱ्या जातीची व ऊष्ण कटिबधातील अरण्यात फोफावणाऱ्या जातीची त्यात सरमिसळ झालेली असते ज्या खोऱ्यातून निरतर जलप्रवाह वहात असतात तेवढयापुरतीच येथील झाडांची वाढ मर्यादित असते प्रवाहापासून दूर अतरावर आणि अधिक उचीवर मात्र गवताळ डोंगरमाथे आहेत

घाटाच्या पूर्वेकडील बाजूस वाढणाऱ्या अरण्यात कधीकधी सदाहरित व पानझडी जातीच्या वृक्षाची सरमिसळ साग व बाबू याच्यात झालेली असते पूर्वनिर्दिष्ट क्षेत्राहून प्रवेशाला अधिक सुलभ असल्यामुळे हा विभाग वन्य सपदेचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा ठरतो

रूक्ष अरण्ये केवळ तुटपुंज्या पावसाच्या विभागापुरतीच सीमित आहेत कधी-कधी न्हास होत होत त्याचे रूपांतर नुसत्या खुरट्या झाडोऱ्याच्या रानात होते, आणि सामान्यत दाटीवाटीने एकत्र उगवणाऱ्या त्यातील झाडाचा लहानसर आकार आणि त्यांची अधिक मोकळीचाकळी पखरण यामुळे ती आगळीवेगळी दिसतात येथे जीवनार्थ सघर्ष असतो तो घटक रोपट्यांचा परस्पराशी नसून, साऱ्याचा मिळून विपरीत व प्रतिकूल अशा भौतिक परिस्थितीविरुद्ध असतो वर्षातील बहुतेक काळ प्रखर सूर्याचा भडिमार सोसणाऱ्या मातीत उगवलेली ही रोपे ऋतु-मानाच्या कोरडेपणामुळे खुरटून जातात आणि त्याचा चौफेर विस्तार क्वचितच होतो अनावृष्टीतही टिकाव धरणाऱ्या, काटेरी व कुसळाच्या अशा कित्येक वैशिष्टय-पूर्ण जाती येथे आढळतात रानातले वणवेदेखील त्या झाडाच्या फार उच वाढीला उत्तम प्रकारे आळा घालतात ही राने विशेषेकरून चित्रदुर्ग, बेल्लारी आणि गुलबर्गा जिल्ह्यांत आढळतात आजमितीला या क्षेत्रात अगदीच थोडी उद्भिज्जसपदा बाकी उरली आहे जी काही राने वाढतात ती केवळ टेकड्याच्या रांगापुरतीच मर्यादित असून, नवीन घुसखोराना त्यात आक्रमणाला भरपूर वाव मिळतो एवढ्या अर्थाने ती विमुक्त आहेत त्याचे रूप नेहमीच उजाड व उदास दिसते आणि वर्षातल्या उकाड्याच्या महिन्यात तर त्यावर पानेच नसतात या सरळसपाट माळांचा आकारहीन कटाळवाणेपणा गोलाकार डोगरामाथ्यामुळे काय कमी होईल तेवढाच

**बाधकामाचे लाकूड,**

जगली व आगरी साग दक्षिण व उत्तर कानडा, शिमोगा, चिक्कमगळूर, आणि मैसूर या भागातील घनदाट अरण्यात आढळू शकतो काकनकोटी साग ही त्यातली सर्वोत्कृष्ट जात होय या झाडाच्या गाभ्यात एक प्रकारचे उग्र वासाचे तेल असते व त्यामुळे वाळवीला प्रतिबध होतो यामुळेच बाधकामाची सामग्री म्हणून सागाला वाढते मोल लाभते त्याचे लाकूड हलके, बळकट आणि मऊ असते घासून उठल्या-वर त्यावर एक प्रकारची मनोहर सोनेरी झाक चढते पूर्वीच्या काळात नावा बाधण्यासाठी मैसूरच्या सागाला एवढी मोठी मागणी असे यात नवल नाही सागाची बांधकामाचे लाकूड म्हणून उपयोग करण्याजोगी पूर्ण आकारमानापर्यंत वाढ होण्यासाठी शभर वर्षे लागतात म्हणून बैलगाड्यातून अथवा हत्तीच्या सहाय्याने बाधकामोपयोगी लाकडाच्या वखारीत वाहून नेण्यासाठी साग तोडण्यावर नियत्रण घालण्याची व्यवस्था केलेली आहे महत्त्वाच्या दृष्टीने सागाखालोखाल शिसवाचा क्रमांक लागतो पण बाधकामाचे लाकूड म्हणून मात्र ते उपयोगात आणता येत नाही, कारण ते अतिशय जड असते घरातील लाकडी वस्तू बनविण्यासाठी मात्र ते फारच उपयुक्त ठरते सामाजिक इतिहासकारांच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या एका गोष्टीचा निर्देश या सदर्भात करायला हवा एक काळ असा होता की या

राज्यातील बहुतेक लोकाना भोजनपीठे व सुखासनाचा सच याचे वैभव गर्वाने मिरवता येत नसे आता मात्र त्या अगदी अत्यावश्यक वस्तू होऊन बसल्या आहेत पण या लाकडावरच्या कामाचे सुतार मात्र अजूनही केरळ आणि तामिळनाडू राज्यातूनच आयात करावे लागतात

चदनासबधी सागण्याजोगी गोष्ट अगदीच निराळी आहे चदनी लाकडाच्या तेलाचे एकाधिकार मैसूरकडे चालत आलेले आहेत चदनी लाकडापासून तेल काढण्याचे दोन यात्रिक घाणे आहेत, एक मैसूरला आणि दुसरा शिमोग्याला विदेशी चलन मिळविण्यासाठी हे तेल हा काजूसारखाच एक मोलाचा पदार्थ आहे या राज्याच्या जगलजन्य उत्पन्नातले एकदशाश उत्पन्न चदनी तेलाच्या विक्रीपासून मिळते

सगळेच लाकूड तेल काढण्यासाठी पिळले जाते असे नाही मैसूर आणि बगलोर येथील कला व हस्तव्यवसायविभाग आणि सोरबा व सागर येथील कलावत त्या लाकडाचा उपयोग सर्व प्रकारचे कोरीव काम केलेल्या नवलपरीच्या वस्तूसाठीही करतात अशा प्रकारच्या हस्तिदतातील जडावाच्या आणि चदनी लाकडातील कोरीव कामाच्या कौशल्याची परपरा येथे सातत्याने टिकून आहे

लोकसंख्येची वाढ आणि औद्योगीकरणाचा वाढता वेग यापायी कोळसा व रद्दा यांना प्रचंड मागणी असते त्यामुळे निलगिरी वृक्ष हा वनपुर्नर्निर्माण योजनेचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे कारण त्याचे मऊ लाकूड कृत्रिम रेशमी धागा (रेयॉन) बनविण्यासाठी उत्कृष्ट रद्दा पुरवू शकते बाबूचाही रद्दा भद्रावती व दडेली येथे कागदाच्या निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर खपत असतो लाकडी कोळशाचा उपयोग घरगुती आणि औद्योगिक दोन्ही कामांसाठी केला जातो

अनेक कार्यभागासाठी उपयोगी पडणाऱ्या वृक्षाच्या दोन जाती गाठाळ दिडिग आणि जड मट्टी या होत दिडिगापासून उत्कृष्ट लाकडी कोळसा निर्माण होतो आणि त्याला सरपण म्हणूनही विशेष मोल आहे मट्टीच्या फळचा नाल्यावर पूल बांधण्यासाठी वापरतात विजेचे खाब, लोहमार्गाखालचे लाकडी पाट, इत्यादी बनविण्यासाठीही त्या वापरता येतात

तुमकुर जिल्ह्यातील देवरायण दुर्ग अरण्यात देवदार किंवा सीडर नावाचे झाड असते त्याच्या ठायी मधुर सुगध आणि आकर्षक रेषांचा पोत एकत्र आढळतात, पण बांधकामासाठी वापरण्याच्या दृष्टीने मात्र ते अतिशय ठिसूळ व म्हणून व्यर्थ ठरते ते सरपण म्हणून मात्र चागले उपयोगी पडते

कर्नाटकाच्या जगलातून आढळणाऱ्यांतली ही विशेष उपयुक्त झाडे होत जगलाचे

अनेक अप्रत्यक्ष उपयोगही याच्या जोडीला होतातच उदा मातीची धूप थांबवणे, ऋतुमानाचे नियत्रण करणे आणि मातीतील ओलावा टिकवून ठेवणे

सह्याद्रीच्या उतारावर आणि खोऱ्यांमधून अनेक मसाल्याचे पदार्थ आणि आगरी पिके आढळून येतात कॉफी, चहा, मिरी, वेलदोडे, सुपारी आणि नारळ ही त्यातली सर्वांत महत्त्वाची या सदर्भात राज्य व केंद्र शासन यांच्या प्रातिनिधिक यत्रणानी हाती घेतलेल्या नाना प्रकारच्या उपक्रमांचा उल्लेख करायलाच हवा उदा रबराचे व काजूचे मळे आणि 'सिपो' अथवा राज्यशासनाचे एतद्देशीय औषधी वनस्पतीचे उद्यान

अरण्यातील गौण उत्पादनात मध, लाख, डिंक आणि साली याचा अतर्भाव करता येईल हत्तीचे सुळे, वाघाची कातडी, गवे रेडे व हरणे याची शिंगे आणि मगरीची व अन्य सरपटणाऱ्या प्राण्याची टणक कातडी या वस्तूही विदेशी चलन मिळवून देतात

## वन्य प्राणिसंरक्षण

विनष्ट होण्याच्या कडचावर असल्यासारख्या दिसणाऱ्या प्राण्याच्या जातींचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने अलीकडे विविध योजना समत करून घेतल्या आहेत. सुप्रसिद्ध बदीपूर-श्वापद-अभयारण्य ५७ चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर पसरलेले आहे मुथोडी श्वापद अभयारण्याने १५८ चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापले आहे. रगन थिट्टू पक्षी अभयारण्य श्रीरगपट्टणजवळ, कावेरी नदीतील एका बेटावर वसलेले आहे दडेली श्वापद अभयारण्याचे क्षेत्रफळ १८७ चौ कि मी आहे कूर्गमध्ये नगरहोळे श्वापद अभयारण्याने १३ चौ कि मी व्यापले आहेत पशुधन आणि वृक्षसपदा याचा विनाश करायला नव्हे तर त्यांचे कोडकौतुक करण्यासाठी प्रवाशांना उत्तेजन देण्यात येते वन्य प्राण्याच्या दुर्मिळ जातीचे सरक्षण व्हावे म्हणून नवे वैधानिक उपायही विचाराधीन आहेत

## नद्या व टेकड्या

कर्नाटकाच्या तीन नैसर्गिक विभागाची स्वत ची अशी आगळी वैशिष्ट्ये आहेत उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत पसरलेल्या सह्याद्रीने समुद्रतीरावरील चिचोळा पट्टा पसरत गेलेल्या सपाटयापासून अलग केला आहे तो जलविभागाजवळ म्हणून उपयोगी पडतो पूर्वेस बगालच्या उपसागराकडे वाहणाऱ्या नद्या स्वाभाविकच अरबी समुद्राला मिळणाऱ्या नद्यापेक्षा अधिक लाबीच्या आहेत

सागरतीरावरील प्रदेश ३२० किलोमीटर लाब असून उत्तर कानडात त्याची रुदी १३ ते ३२ किलोमीटर आणि दक्षिण कानडात ४८ ते ६४ किलोमीटर आहे काळी नदी, गगावती-बेडती, ताद्री व शरावती या उत्तर कानडाच्या मुख्य नद्या होत त्यांपैकी शरावती सर्वांत कमी लाबीची असली तरी जलविद्युत केंद्राचे मूळ ठिकाण बनलेल्या प्रचड जोग धबधब्यामुळे ती विख्यात झाली आहे डोंगरातील लाल मुरमाड माती, ताड, सुपारी व केळी याच्या हिरव्यागार पर्णसभाराला पार्श्वभूमीच्या रूपाने उठाव देते दूर अतरावर झगमगणाऱ्या आणि सूर्यास्ताचे रम्योज्ज्वल दर्शन घडविणाऱ्या समुद्राची जोड लाभल्यामुळे खोऱ्यामधून विसावलेली सुगधित भातशेते जणू मनोज्ञ दृश्यपटच उलगडत जातात दक्षिण कानडातील नेत्रवतीच्या काठावरील धर्मस्थळ हे ठिकाण पुरातन काळापासून यात्रास्थान बनलेले आहे

सागरतीरी निवाऱ्याची अनेक बदरे आहेत तीरालगत वाहतूक करणाऱ्या बाष्पनौकेतून मुबई ते मगळूर प्रवास करता येतो परतु जून ते सप्टेंबर या पावसाळी महिन्यात मात्र ही सोय उपलब्ध नसते कारवार, भटकळ, अकोला, होनावर, कुदापूर, मालपे आणि मगळूर या बदराना आजही महत्त्व लाभलेले आहे आधुनिक बाष्पनौकाना सामावून घेण्याजोग्या मुबई आणि मार्मगोवा (मडगाव) या बदरांचा झपाट्याने विकास झाल्यामुळे कर्नाटकाच्या सागरतीरावरील बदराचे महत्त्व कमी झाले आहे परतु अरबस्तान, इराण, इजिप्त, ग्रीस व रोम या देशाशी व्यापार चालवणाऱ्याच्या अगदी पुरातन काळापासून तो थेट विजयानगर साम्राज्या अत होईपर्यंतच्या काळातील मोठ्यातल्या मोठ्या जहाजांना नांगर टाकण्याजोगी सोय त्या बदरात उपलब्ध होऊ शके मगळूर बदरयोजना पूर्ण होत आली आहे राष्ट्रीय राजमार्गांची वाढ आणि हस्सन-मगळूर लोहमार्गाची निर्मिती यांमुळे या जिल्ह्याच्या जुन्या वैभवाचे पुनरुज्जीवन होईल अशी अपेक्षा आपण बाळगू या

सह्याद्रीच्या रागा उत्तरेस बेळगाव ते दक्षिणेस मैसूरपर्यंत पसरलेल्या आहेत पूर्व घाटाला मिळून त्या एक त्रिकोणाकृती प्रदेश बनवितात निलगिरीमधील दोड्डा-बेट्टा (मोठा डोगर) २ ५ कि मी उचीचा आहे राज्याच्या अतर्भागातील मुल्लिअण गिरी, बाबा बुदन डोगर आणि कुद्रे मुख ही शिखरे १ ८ कि मी पेक्षाही उच आहेत हा प्रदेश म्हणजे हत्ती, वाघ आणि गवा रेडा याचे वसतिस्थान होय या क्षेत्रातील अनुपभुक्त जगलात अत्यत उच अशा वृक्षाच्या विविध जाती आहेत त्यांचा उपयोग अजून करून घ्यावयाचा राहिलाच आहे पूर्व उतरणीवरील जवळ-जवळ ३२ किलोमीटर लाबीपर्यंत सागाचे व चदनाचे वृक्ष आढळून येतात

पठारी प्रदेश पूर्वेकडे उतरत जातो तेथील नद्या सह्याद्रीच्या शिखरावर उगम पावून बगालच्या उपसागराकडे वहात जातात उदा कावेरी कूर्गमधील ब्रह्मगिरी

(तळ कावेरी) वर उगम पावते तुगा आणि भद्रा याचा उगम चिक्कमगळूर जिल्ह्यात होतो कुडली या नावाने ओळखला जाणारा त्याचा सगम शिमोगा जिल्ह्यात होतो. सरतेशेवटी आध्र प्रदेशातल्या कुर्नूलजवळ तुगभद्रा कृष्णेला मिळते घटप्रभा व मलप्रभा याही कृष्णेच्या महत्त्वाच्या उपनद्या आहेत या साऱ्या मिळून भूमी ओलिताखाली आणण्याची अफाट क्षमता बाळगून आहेत हॉसपेटजवळचे तुगभद्रा धरण आतरराज्यीय सहकार्याचे उत्कृष्ट उदाहरण होय

उत्तरेकडील सपाट भूमीतील माती काही विशेष प्रकारची असून तेथे पिकेही वैशिष्टचपूर्ण येतात कापूस, गहू, ज्वारी आणि कडधान्ये याना उपयुक्त अशी कपाशीची काळी माती तेथे आहे उलट, मैदानी प्रदेशाच्या दक्षिणेकडील अर्धभागात रागी, भात व गळिताची धान्ये याना योग्य अशी पिंगट रगाची माती आहे

ऐतिहासिक दृष्टचा, चालुक्य, राष्ट्रकूट आणि विजयानगर सम्राटांच्या राजवटीत तुगभद्रेच्या उत्तरेकडील भूभाग म्हणजे राजवैभवाचा प्रदेश होता एकट्या होयसाळाची राजधानी तेवढी या पवित्र नदीच्या दक्षिणेला होती बाकी सरस्वतीदेवीने आपले मुख्य वसतिस्थान दक्षिणेकडे हलविले ते विजयनगरच्या पाडावानतरच

कपिला (कबिनी), हेमवती आणि लक्ष्मणतीर्थ या आपल्या उपनद्यासह कावेरी नदी मैदानी प्रदेशातील पाणी वाहून नेते अर्कवती आणि पिनाकिनी यांसारख्या काही नद्याना केवळ त्या त्या स्थानापुरतेच महत्त्व लाभले आहे

कावेरी कदाचित भारतातली सर्वांत अधिक धरणे बाधलेली नदी असावी तिचा उगम कर्नाटकात असला तरी ती समुद्राला मिळते तामिळनाडूत या पवित्र नदीच्या पाण्याचा एक थेंबदेखील वाया जाणार नाही अशी काळजी दोन्ही राज्ये घेत असतात

भात आणि ऊस याच्या शेताना जलसिंचनाची आवश्यकता भासते परतु या प्रदेशातील मुख्य अन्नधान्य रागी हे मात्र पावसावरच पोसते मैदानी प्रदेशाच्या दक्षिण भागात भुईमूग आणि इतर तेलबिया याचेही पीक विपुल प्रमाणावर येते हरभरा आणि मूग यासारख्या सहज पिकणाऱ्या कडधान्याच्या लागवडीसाठीही येथील माती योग्य आहे

कर्नाटकाच्या मातीचा उल्लेख करताना आपण तिथे बोलल्या जाणाऱ्या नानाविध उपभाषाचेही स्मरण ठेवणे इष्ट ठरेल कोकणपट्टीत तुळू व कोकणी, कूर्गमध्ये कोडगू, उत्तरेकडे आर्यभाषीय शब्दांची सरमिसळ असलेली कानडी आणि दक्षिणेस द्राविडवशोत्पन्न शब्दाचे मिश्रण झालेली कानडी, पालटत जाणाऱ्या मातीच्या रगाप्रमाणेच बोलीतील शब्दयोजना आणि उच्चारातला आघात हीदेखील प्रत्येक पन्नास मैलागणिक पालटत जातात

# २. कर्नाटकातील लोक व भाषा

## जाती व जमाती

वंशशास्त्र आणि सांस्कृतिक उत्क्रांती या विषयाच्या विद्यार्थ्याला कर्नाटक प्रदेशात असामान्य आणि मनोवेधक आकर्षकता आढळून येते पौर्वात्य संस्कृतीची दक्षिण भारतातल्या इतकी जोपासना दुसरी कोठेच झालेली नाही भारतात घडून आलेल्या वांशिक आक्रमणाचा शिरकाव कर्नाटक इतक्या दूरवरही झाला होताच आणि भौगोलिक स्थानामुळे कर्नाटकला वंशशास्त्रदृष्ट्याही विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे कर्नाटकचा वांशिक इतिहास केवळ उत्तरेद्वाराचा निर्णित झालेला असणे शक्य असल्यामुळे तो महान भारतीय उपखंडाच्या वांशिक इतिहासाशी निगडित झालेला आहे कर्नाटक वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीचे आकलन करण्याचे सामर्थ्य आपल्याला समग्र भारताच्या सर्वसाधारण इतिहासाच्या ज्ञानाद्वाराच मिळू शकेल अशोक व चंद्रगुप्त यांपासून तो थेट मराठे, विजापुरी, मोगल व ब्रिटिश यापर्यंत प्रत्येकाचे व्यावहारिक हितसंबंध कर्नाटकाची सदिच्छा टिकविण्यात गुंतलेले होते आणि त्यातल्या प्रत्येकाने कर्नाटकच्या कर्नाटकी संस्कृतीच्या एकूण विकासात आपापल्या वाट्याची भरही घातलेली आहे (एल के ए आय्यर, १९०३)

कर्नाटक हे एक संमिश्र राज्य आहे कन्नड ही या प्रदेशाची भाषा आहे परंतु इतर गौण भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्याही उपेक्षणीय मुळीच नाही १९६१ च्या शिरगणतीनुसार तेलगू, उर्दू, तमिळ आणि हिंदी या भाषा बोलणाऱ्यांची संख्या कन्नड मातृभाषा असलेल्यांच्या संख्येच्या जवळजवळ निम्मी होती आर्य भाषांचे मनोज्ञ मिश्रण आपणास येथे आढळून येते इंग्रजी, पर्शियन, तिबेटी आणि इतर परकी भाषा बोलणाऱ्यांची संख्या सतत वाढतच चालली आहे जे जे म्हणून कर्नाटक पाहुणचाराच्या अपेक्षेने येतात त्या साऱ्यांचे कर्नाटक मोकळ्या मनाने स्वागत करतो तिबेटी शरणार्थींच्या पुनर्वसनासाठी कर्नाटकने दोन वसाहती स्थापन केल्या हे सुप्रसिद्ध आहे दक्षिण आफ्रिकेतून परत येऊन फिरून स्वदेशी स्थायिक झालेल्या लोकांची पस्तीस कुटुंबे बंगलोरमध्येच राहू लागल्याचेही आता निश्चित-पणे समजले आहे लंकेतून स्वदेशी परत येणाऱ्या एका तुकडीच्या स्वागतासाठी कर्नाटक सध्या सिद्धता करीत आहे

## आदिवासी

दक्षिणेकडील राजे आणि उत्तरेकडील आक्रमकाच्या लाटा याना आलटून पालटून जयपराजय देणाऱ्या लढायांपायी आज असा एकही जनसमूह राहिलेला नाही की जो छातीठोकपणे उभा राहून ही भूमी माझी आहे, असे म्हणू शकेल एके काळी असा समज होता की तोडा लोक हेच देशाच्या या विभागातले आदिवासी होत कारण, ते कानडीचीच एक उपभाषा बोलतात पण त्याच्या अवयवाची ठेवण ठळकपणे आर्यवशीयच आहे

मैसूर व कूर्ग या जिल्ह्यांतल्या अरण्यात राहणाऱ्या कुरुबाचे (जेनु कुरुब आणि बेट्टद कुरुब याचे, कुरी कुरुबाचे नव्हेत) अवयव निग्रो धर्तीचे आहेत ते प्रत्येक गोष्टीत आदिकालीन आहेत आजही ते खाद्य पदार्थ नुसते गोळाच करणारे, शिकारी व भटक्या वृत्तीचेच राहिले आहेत त्यांनी झोपडचा बाधल्याच तर त्याही पुढे जाळूनच टाकायच्या असतात आणि मग पुढल्या वर्षासाठी नवे वसतिस्थान धुडीत फिरायचे असते

ते शेती करतात पण नुसता एक पूरक उद्योग म्हणूनच शेत नागरण्याऐवजी (तक्कल) ते एक प्रकारच्या बांबूच्या भाल्याने त्याचा पृष्ठभाग खरवडतात धान्याची कणसे तेवढी ते कापून घेतात आणि उरलेली धाटे गोळा करण्याची मोकळीक शेजारच्या गावकऱ्याना देतात कारण, त्याच्याजवळ गुरेढोरे नसल्याने त्याना चाऱ्याचा काहीच उपयोग नसतो

आता आतापर्यंत त्याचा वेष आणि खाणेपिणे अत्यत साधेसुधे असे पुरुष नुसत्या कमरेच्या सुडक्यावर सतुष्ट असत रागीच्या पिठाचा शिजविलेला उडा आणि जोडीला मिठाचा खडा हेच त्यांचे मुख्य जेवण असे त्याला जोड दिली जाई बायकांनी गोळा केलेल्या कदमुळाची आणि पुरुषानी पारध केलेल्या पक्ष्याच्या व लहान लहान श्वापदाच्या मासाची रहात असलेल्या भूमीत त्यानी काही थोडी सागाची रोपे लावली म्हणजे त्याची परतफेड म्हणून शासन त्याना उभ्या अरण्यप्रदेशात मुक्तपणे भटकण्याची मोकळीक देई

पूर्वीच्या काळी जेनू कुरुब लोक बव्हशी थारेपालटाची शेती आणि मध गोळा करणे इत्यादीवरच उपजीविका चालवीत पण आता त्यातल्या बहुतेकानी आपला परपरागत व्यवसाय सोडून दिला असून ते पोटाला लागणारा पैसा रानातून दैनिक वेतनावर काम करून मिळवितात शासकीय योजना कार्यवाहीत आणण्यात त्या मानाने बेट्टद कुरुबाना अधिक यश लाभले आहे त्याच्या आर्थिक परिस्थितीतही भरीव सुधारणा झाली आहे

आता हे कार्य समाजकल्याण विभागाने आपल्या हाती घेतले आहे या आदिवासी जमातींना सुसस्कृत करण्यासाठी त्यांनी कित्येक योजना आखल्या आहेत हे मात्र लक्षात ठेवायला हवे की सस्कृतीच्या आनुषगिक गुणांहून तिच्यातले दुर्गुण आत्मसात करणे अधिक सोपे असते कदाचित अल्पावधीतच हे कुरुब न्याहारीसाठी उप्पिटु (उपमा) आणि कॉफी मागू लागतील, आपल्या अक्षरओळखीचा उपयोग निनावी आवेदने लिहिण्यासाठी करू लागतील आणि रिकामपणचा वेळ चित्रपटगृहांत घालवू लागतील कदाचित झाडाच्या पानात वळलेल्या बिडयाऐवजी ते सिगरेटीही ओढायला शिकतील परतु भयानक चढाओढीच्या आणि शीघ्र गतीने पालटत जाणाऱ्या या जगातले बौद्धिक कौशल्य जोडण्याच्या किती तरी आधी ते आपल्या हातातल्या कलाकुसरीला मुकण्याची भीती मात्र निश्चितच आहे तीस वर्षांपूर्वी या जमातीच्या हातात अनेक प्रकारच्या कलाकुसरी होत्या, उदा मलूसारख्या आदिकालीन अवजाराने बाधकामाचे लाकूड रधणे, टोपल्या विणणे, वेतावर कोरीव काम करणे, इत्यादी

## कुर्गी लोक

कुर्गी लोक भारतातला एक वैशिष्ट्यपूर्ण वर्ग आहे त्याच्या भौगोलिक स्थानापायी जुन्यापुराण्या जगातील चालीरीतींना चिकटून राहण्यास त्याना उत्तेजनच मिळाले ते वृत्तीने युयुत्सू असून ते स्वातत्र्याचे भोक्ते आहेत ब्रिटिश राज्यातील सामान्य नागरिकाला आग ओकणारी शस्त्रे बाळगण्यास शस्त्रबदीच्या (आर्म्स ॲक्ट) कायद्याने बदी केलेली होती, परतु मैसूरच्या युद्धातील निष्ठेची परतफेड म्हणून कुर्गी लोकांना मात्र ती बाळगण्याचा विशेष अधिकार देण्यात आला होता मृगया व सैनिकी व्यवसाय यात ते सर्वोत्कृष्ट ठरतात भारत स्वतत्र झाल्यानतर अल्पावधीतच दोन कुर्गी व्यक्ती–जनरल करिअप्पा आणि जनरल थिमय्या भारतीय सेनेतील सर्वोच्च पदावर आरूढ व्हावयाचे कारण तरी हेच

सणासुदीच्या प्रसगी कुर्गी लोक परपरागत वेष धारण करतात धार्मिक विधीत कोडगू व सस्कृत या दोन्ही भाषांचा उपयोग करावा लागतो आज सहस्रावधी वर्षे त्याच्या चालीरीतीचे सस्कृतीकरण होत आलेले आहे अलीकडे अलीकडे पाश्चात्यी-करणाचाही प्रभाव त्याच्यावर पडू लागला आहे त्यामुळे भाषा, वेष व खानपानाच्या सवयी यात कुर्गी लोकाच्या ठायी पूर्व आणि पश्चिम यांचा मनोज्ञ सगम दृग्गोचर होतो आर्यांच्या देवताची स्थानिक रूपे–केत्रप्पा व अय्यप्पा–यांची ते पूजा करतात ते तीर्थक्षेत्राना जातात, पवित्र नद्यांत स्नान करतात आणि पूर्वजाची पण पूजा करतात कावेरीचा उगम हे त्यातले सर्वांत पवित्र ठिकाण होय त्याला दक्षिणगगा म्हणतात प्राचीन आख्यायिका आणि पुराणे यामधील शूर वीर व ऋषिमुनी

याच्याशीही कूर्ग निगडित झालेला आहे 'कावेरी महात्मे' हा स्कन्द पुराणाचाच भाग आहे कावेरीची एक उपनदी, लक्ष्मणतीर्था हिचा उगम कूर्गमधेच होतो सप्तर्षीमुळे ब्रह्मगिरी पावन झाला आहे

**विविध जनसमूह**

राजकीय वातावरण निरतर पालटत असतानादेखील, मराठे, आध्रप्रदेशीय, तमिळी व मल्याळी या आपल्या निकटवर्ती शेजाऱ्यांशी कर्नाटकाचे लोक जिव्हाळ्याचा व परस्परउपकारक असा सबध राखून आहेत उदा आद्य शकराचार्यांनी आपल्या मुख्य मठातला एक शृगेरीस स्थापन केला रामानुजाचार्यांचा तळ कित्येक वर्षे मेळुकोटे येथे पडला होता त्यानी आपल्या समवेत श्रीवैष्णव पथी भक्तांची अनेक कुटुबेही आणली होती 'सकेती' या नावाने ओळखला जाणारा तामिळी उपभाषा बोलणारा त्याचा एक गट आहे तामिळनाडूमधील शेनकोट्टा नावाच्या एका ठिकाणाहून स्थलांतर करून ते कर्नाटकात आले इतर गटाची नावेही अशीच त्याच्या मूळ ठिकाणाची द्योतक आहेत. उदा 'बदगनाडू' म्हणजेच उत्तरेकडून आलेले लोक

ओक्कलिगानी आपली पृथगात्मता सहस्रावर वर्षे टिकवून ठेविली आहे (काव्यात ते या भूमीचे पुत्र किंवा नेगिला योगी म्हणूनही उल्लेखिले जातात ) तळकड येथील गगवशाच्या काळापासून ते एक स्वतत्र जमात म्हणून राहात आहेत

एके काळी ज्यांची गणना गुन्हेगार जमात म्हणून केली जात होती ते वोड्डा लोक मुळात ओरिसातून आलेले असल्याची, तसेच लमाणी लोक सतराव्या शतकातील मराठ्याच्या आक्रमक सेनेच्या तळामागून हिंडत असत याची आणि हैदर अलीने तिगळा नावाच्या माळी जमातीला तामिळनाड सोडून बगलोरात येऊन स्थायिक होण्यास आणि अशा मार्गाने लाल बागेची आखणी करण्यास उत्तेजन दिल्याचीही ऐतिहासिक प्रमाणे उपलब्ध आहेत

वायनाड सीमेवरील लोकसख्येच्या दबावामुळे कित्येक मल्याळी कुटुबेही स्थलातर करून कर्नाटकात स्थायिक झाली आहेत केरळातले व्यापारी (व्यारी), उपाध्ये आणि आगरी काम करणारे याना कूर्ग आणि दक्षिण कानडा या भागात नेहमीच चांगल्या प्राप्तीची कामे मिळत आली आहेत या भागात बोलल्या जाणाऱ्या कन्नड भाषेवर दक्षिणेकडील शेजाऱ्याच्या भाषिक प्रवृत्तीचा बराच परिणाम झाला आहे बगलोरात स्थापन करण्यात आलेल्या शासकीय उद्योगामुळेही केरळातील सहस्रावधी कसबी कामगार आकृष्ट झाले आहेत स्थलातर करून या राज्यात स्थायिक झालेल्या मल्याळी-भाषिक लोकांची सख्या निश्चितपणे वाढल्याचे पुढील शिरगणतीत आढळून येईल असे भाकित नि शकपणे करता येते

## लोकसंख्येची प्रवृत्ती

कर्नाटक राज्याचे क्षेत्रफळ १९२,२०४ चौ कि मी आहे १९७१ च्या शिरगणतीतील तात्पुरत्या आकड्यानुसार तेथील लोकसंख्या २९,२६३,३३४ आहे तात्पर्य १९६१–७१ या दशकात ५,६७६,५६२ इतक्या व्यक्ती वाढल्या आहेत २४ ३१ % लोक नागरी क्षेत्रात राहतात १९६१ मध्ये हाच आकडा २२ ३३ होता नागरीकरणाच्या वाढत्या प्रवृत्तीचा हा निर्देशांकच होय

लाखावर लोकसंख्या असलेली सहा नवी नगरे निर्दिष्ट केली गेली आहेत यामुळे त्यांची संख्या आता अकरावर आली आहे बंगलोर, हुबळी, धारवाड, बेळगाव, गुलबर्गा, बेल्लारी, दावणगिरी, विजापूर, शिमोगा आणि भद्रावती

कर्नाटक राज्याची लोकसंख्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ५ ३४ % आहे या दृष्टीने त्या राज्याचा क्रमांक आठवा लागतो परंतु लोकवस्तीच्या दाटपणाच्या दृष्टीने मात्र ते पंधराव्या क्रमांकाचे राज्य आहे केरळ (५४८), तामिळनाडू (३१६), आंध्र प्रदेश (१५७) आणि कर्नाटक (१५३) या चार दाक्षिणात्य राज्यातले ते सर्वांत कमी दाट लोकवस्तीचे होय क्षेत्रफळाच्या दृष्टीने त्याचा क्रम सहावा येतो दाक्षिणात्य राज्यातले ते दुसऱ्या क्रमांकाचे विस्तृत राज्य ठरते आंध्र प्रदेश सर्वांत अधिक विस्तृत असून केरळ सर्वांत कमी विस्ताराचे आहे

वाढीचा वेग जिल्ह्यानुसार निरनिराळा आहे बंगलोर जिल्ह्यात लोकवस्तीचा दाटपणा ४१८ आहे तर उत्तर कानडात तोच ८३ आहे मागील शतकाच्या जवळ जवळ दुप्पट भरणारा ३३ ६२ % हा वाढीचा वेग बंगलोरच्या औद्योगिक विकासाचा परिणाम म्हणावा लागेल उत्तर कानडा बव्हंशी अरण्याचे क्षेत्र आहे गुलबर्ग्यातील वाढीच्या वेगात झालेली प्रगती ही दळणवळणाच्या साधनांतील सुधारणा आणि इतर विकासात्मक कार्ये यांचे फलित होय मध्यवर्ती शासनाने चालविलेल्या अनेक शिक्षणसंस्थांसह स्थापन झालेल्या नवीन विद्यापीठीय उपनगरामुळे मैसूर नगरीच्या लोकसंख्येत भर पडली आहे तुंगभद्रा धरण पूर्ण बांधून झाल्यानंतर रायचूर जिल्हा भरघोस शेतकी विकासाचे क्षेत्र बनून गेला आहे एका दशकात लोकसंख्येतली वाढ १५ % वरून एकदम २८ % वर चढली याची कारणे म्हणजे शेतकी कामकऱ्यांचा लोंढा आणि दळणवळण व क्रयविक्रयाची व्यवस्था यात झालेली प्रगती ही होत मंड्या जिल्ह्यातील भरघोस शेतीविकास कार्यक्रमही श्रमिकांना आकृष्ट करीत आहे दक्षिण कानडातील लोकसंख्येच्या वाढीला मंगळूर-बंदर प्रकल्प आणि हस्सन-मंगळूर लोहमार्ग योजना या गोष्टी कारणीभूत झाल्या असाव्यात

मंड्या जिल्ह्याची काही वेगळीच वैशिष्टचे आहेत अवघ्या एका दशकाच्या अवधीत मंड्या नगरीची लोकसंख्या दुपटीवर जाऊन तिला मोठ्या नगराची

प्रतिष्ठा देण्यात आली मंड्या जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण कूर्गच्या (४४ ३५ %) निम्म्याच्या आसपास आहे समग्र राज्याचे शेकडा प्रमाण ३१ ५४ असून गेल्या दशकातील आकड्याहून ते जवळ जवळ ६ % नी अधिक आहे साक्षरतेच्या दृष्टीने कूर्ग, दक्षिण कानडा आणि बंगलोर या जिल्ह्यांनी पहिले तीन क्रमांक पटकावलेले आहेत मंड्या, रायचूर, बेदर व गुलबर्गा यांचा अनुक्रम सरतेशेवटी लागतो हैदराबाद व कर्नाटक या क्षेत्रातील मागासपणाला काही कारणे तरी आहेत पण मंड्याचेही स्थान मालिकेत शेवटाकडे यावे ही गोष्ट मात्र विस्मयजनकच होय

शिरगणतीच्या प्रतिवृत्तातील आणखी एका विधानाकडे आपल्या शिक्षण-तज्ज्ञांनी काळजीपूर्वक लक्ष पुरविणे अगत्याचे ठरते "साक्षरतेच्या प्रमाणाच्या दृष्टीने भारताची राज्ये व केंद्रशासित प्रदेश यांत कर्नाटक प्रांताचा क्रम चौदावा लागतो ही वस्तुस्थिती काहीशी नवलाचीच वाटते कारण, उच्च शिक्षण आणि प्रौढांचे शिक्षण या दोहोंतही हे आदर्श राज्य आघाडीवर होते आर्थिक समृद्धी आणि सांस्कृतिक प्रगती यांत कसलाच परस्परसंबंध नसावासे दिसते "

शिरगणतिकार्याच्या संचालकांनी नोंदलेल्या आणखी काही लक्षणीय सत्यस्थिती अशा दक्षिण कानडात स्त्रीपुरुषांचे गुणोत्तर सर्वांत अधिक (१०६१) आहे, तर बंगलोर जिल्ह्यात ते सर्वांत कमी (९१२) आहे बंगलोर हे भारतातील मोठ्या नगरातील सातव्या क्रमांकाचे नगर होय

# ३ राजकीय इतिहास

प्राचीन ठिकाणाच्या अलीकडील उत्खननाने असे सिद्ध केले आहे की नव्या पाषाण-युगातील मानव दक्षिण द्वीपकल्पाच्या काही भागात रहात असे मस्की व ब्रह्मगिरी या ठिकाणी सापडलेल्या अवजाराना आणि प्रागैतिहासिक कलाकृतीना कर्ब-१४ हा निकष लावल्यावर असे आढळून आले की त्याचा सभाव्य काळ ख्रि पू २००० असावा परतु इतिहासपूर्व काळाचे अधिक सुस्पष्ट चित्र प्राप्त होण्याच्या दृष्टीने मात्र अधिक सशोधन होणे अगत्याचे आहे

ऐतिहासिक काळापर्यंत येऊन ठेपल्यावर मात्र प्राचीन इतिहासाची पुनर्रचना करण्याची साधने सख्येने आणि वैविध्यानेही वाढू लागतात राष्ट्रीय घडामोडीत कर्नाटकाने बजावलेला कार्यभाग लहानसहान नसून राष्ट्रीय सस्कृतीतही त्याने भरपूर भर घातलेली आहे ही सत्यस्थिती सुविख्यात आहे सम्राट आणि विजेते दीर्घ काळा-पूर्वीच जग सोडून गेलेले असले, तरी त्यानी आपल्या मागे चिरस्थायी स्मारके करून ठेविली आहेत बायबलच्या जुन्या सहितेत या प्रदेशाचा निर्देश आहे असे सागतात की आपले सुप्रसिद्ध मदिर बाधण्यासाठी सॉलोमनने मैसुरातून चदनाची आयात केली होती महाभारतात कर्नाटकाचा नावाने उल्लेख केलेला आढळतो नुसत्या शिलालेखांपुरतेच बोलावयाचे तर कर्नाटक हे सर्वांत समृद्ध राज्यांत गणले जाते परतु स्वत च्या महान कार्यांचा सुस्पष्ट असा निर्देश आपल्या पूर्वजानी मुळीच करून ठेवलेला नाही याचा मात्र खेदच होतो इतिहासाची पुनर्रचना करण्याजोगा पुरावा विभिन्न प्रकारचा असतो पुरातन स्मारकाचे उत्खनन, शिलापट्ट आणि ताम्रपत्रे यावरील लेखांचा शोध घेऊन त्याच्या लिपीचे सशोधन, अवजारे, भाडीकुडी आणि अन्य कलाकृती याचा अभ्यास आणि उत्खननात वेळोवेळी सापडलेल्या नाण्या-वरून मिळणारा पुरावा विद्येच्या या सर्व शाखाना आता सुसूत्र अध्ययनविषयाची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे

श्रवणबेळगोळाचा सबध अशोकाचा आजा चद्रगुप्त मौर्य याच्याशी जोडणारा (इ पू तिसरे शतक) अर्धेतिहासिक पुरावा उपलब्ध आहे उत्तर कर्नाटकाच्या कित्येक भागांत अलीकडे सापडलेल्या अशोकाच्या घोषणालेखावरून ते प्रदेश अशोकाच्या साम्राज्याचे घटक असल्याचे निर्विवादपणे सिद्ध झाले आहे. असेही सागतात की त्याने धर्मविजयार्थ आपले सास्कृतिक प्रतिनिधि कर्नाटकात पाठविले

होते कन्नड लिपी ब्राह्मी लिपीतूनच उत्क्रांत झालेली आहे वरील अभिलेखाची भाषा प्राकृत आहे कन्नड व प्राकृत यांचा परस्परावर झालेला परिणाम सिद्ध करणारा पुरावाही आहे

टोलेमी या ग्रीक भूगोललेखकाने (इ स दुसरे शतक) कर्नाटकातील अनेक स्थळाचा उल्लेख केला आहे बदामी, माल्ये व इडी 'हलमिडी शासन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ४५० इ स मधील सर्वांत जुन्या कानडी शिलालेखामुळेही प्राक्कन्नड भाषेच्या स्वरूपावर बराच प्रकाश पडला आहे 'कविराजमार्ग' राजा नृपतुगाच्या आश्रयाखाली लिहिला गेलेला काव्यशास्त्रावरील ग्रथ (इ स नववे शतक) हाच कानडीतला सर्वांत जुना उपलब्ध ग्रथ होय तेथून पुढे ब्रिटिशाच्या आगमनापर्यंत कन्नड राजवशांची एक परपरा होऊन गेली मानवी कर्तृत्वाच्या सर्वच क्षेत्रात त्यानी वैशिष्ट्यपूर्ण कार्य करून दाखविले आणि आपली कीर्ती तीनही समुद्राच्या पलीकडे पसरून दिली कन्नड लोक काही नेहमीच सुखासीन, घरबसे आणि नकर्ते अशा जातीचे लोक नव्हते त्याचे राजे जगदेकमल्ल, इरिवबेडग, चक्रवर्ती आणि परमेश्वर या पदव्याचे यथार्थ अधिकारी होते एके काळी विंध्याच्या दक्षिणेकडील भूमीचे ते सार्वभौम राजे होते विंध्य ओलाडून उत्तरेकडील सम्राटांचा पराभव करणाऱ्या सम्राटाचीही उदाहरणे आहेत

वारवार उद्भवणाऱ्या अतर्गत यादव्या, सतत नव्याने ओढवणारी परकी आक्रमणाचे थैमान आणि सुसूत्र इतिहासाचा अभाव यामुळे इतिहासकालातल्याही ऐतिहासिक घडामोडीचे चित्र काहीसे घोटाळ्यात टाकणारे असणे अपरिहार्यच आहे एकाच लढाईतले दोन्ही प्रतिपक्षी निर्णायक विजय आपल्यालाच मिळाल्याचे प्रतिपादन करू लागतात तेव्हा तर हा घोटाळा अधिकच गुतागुतीचा होऊन बसतो. यावरून एवढेच दिसून येते की गेल्या १५०० वर्षांत कर्नाटकावर सत्ता गाजवणाऱ्या कमीत कमी सहा तरी राजघराण्यांचा उदय, अपकर्ष आणि अस्त यांच्याशी निगडित असलेल्या अफाट सामग्रीच्या वस्तुनिष्ठ अध्ययनासाठी विद्वानाच्या गटानी स्वत ला वाहून घेण्याची निकड आहे

राजकीय इतिहासातील प्रमुख घडामोडींचे निवेदन, सास्कृतिक घटकावर भर देण्याची काळजी घेऊन करण्याचा प्रयत्न आता करता येईल कारण, दुष्टाना शासन, सज्जनाचे रक्षण आणि धर्माचा पुरस्कार करण्यास आपण निरतर बाधलेले आहोत असेच कर्नाटकाचे प्राचीन राज्यकर्ते मानीत असत त्यानी राज्य केले ते अशा वेळी की जेव्हा आज आहे त्याहून धर्मश्रद्धा अधिक प्रबळ होती त्यामुळे धार्मिक घटका-पासून ऐहिक घटक अलग करणे सोपे जात नाही कर्नाटकाने अनेक धर्मांना आसरा दिला—बौद्ध, जैन, इस्लाम व ख्रिश्चन हिंदूधर्माच्या तीन महान आचार्यांपैकी

एकाची–मध्वाचार्यांची–तर कर्नाटक ही जन्मभूमीच होती शकराचार्य व रामानुज या उरलेल्या दोघानीही, अनुक्रमे केरळ व तामिळनाडू येथे जन्मलेले असूनही, कर्नाटक हेच आपल्या धर्मविजयाचे प्रमुख ठाणे बनविले होते या भूमीत नादणाऱ्या धर्मांच्या अनेकत्वातूनच वैशिष्ट्यपूर्ण समस्या उद्‌भवल्या धार्मिक सहिष्णुता अथवा सर्वधर्मसमन्वय याच्या आधारे तेथील लोकानी त्या कशा सोडविल्या याची उद्‌बोधक कथा मनाचा वेध घेणारी आहे मदिरे बाधणे आणि साम्राज्ये स्थापणे ही कार्ये हातात हात घालून वाटचाल करीत मदिर तर सास्कृतिक जीवनाचे केद्रच बनून गेले होते

घटनानुक्रम (इ स च्या पहिल्या शतकापासून १९५६ पर्यंत)

दोन सहस्र वर्षांहून अधिक काळाचा अविच्छिन्न इतिहास कर्नाटकाला लाभलेला आहे त्याच्या राजकीय इतिहासाला कित्येक उत्कर्षापकर्षांचे दर्शन घडले यात नवल नाही राजघराण्यातील पालट म्हणजेच राज्याच्या भौगोलिक सीमातही तदनुरूप परिवर्तन आलेच एकामागून एक आलेल्या राजानी आपल्या राजधान्या उभ्या दक्षिण भारतातील निरनिराळ्या ठिकाणी स्थापन केल्या होत्या बनवासी, तळकाड, बदामी, मालखेड, कल्याण, हळेबीड, केळदी, श्रीरगपट्टण, मैसूर व बगलोर. कुतल, पुन्नाट, महिषमडळ आणि कोकण यासारखे या राज्याचे निरनिराळे भाग गीते व कथा यातून विख्यात झाले आपण कर्नाटकचे सम्राट असल्याची घोषणा करणाऱ्या बदामी येथील चालुक्याच्या सार्वभौम सत्तेखालीच हे सारे भाग पहिल्याप्रथम सुसघटित झाले भाषिक देशनिष्ठा सर्वस्वी आधुनिक अशी कल्पना आहे कर्नाटक तर नेहमीच एक सयुक्त (बहुभाषिक) राज्य होते आपण अष्टभाषाविशारद आणि चतु समयसरक्षक आहोत याचा तेथील राज्यकर्ते अभिमान बाळगीत त्याचे प्रजाजन निरनिराळ्या भाषा बोलत आणि ते निरनिराळ्या धर्मांचे अनुयायी असत

या प्रदीर्घ काळात या विस्तृत प्रदेशातील निरनिराळ्या भागांवर कित्येक राजवशानी राज्य केले त्यात छोटे राजे, मोठे राजे व सम्राट याचा अतर्भाव असे त्यांचा इतिहास सामग्र्याने सांगू गेल्यास ती कथा कटाळवाणीच होईल कर्नाटकावर राज्य करून गेलेल्या राजवशाचा कालानुक्रम पुढीलप्रमाणे निर्दिष्ट करता येईल.

| | |
|---|---|
| इ स चे पहिले ते तिसरे शतक | सातवाहन |
| इ स चे तिसरे ते सहावे शतक | कदब व तळकाडचे गग |
| इ स चे सहावे ते आठवे शतक | बदामीचे चालुक्य |
| इ स चे आठवे ते दहावे शतक | राष्ट्रकूट |

| | |
|---|---|
| इ स चे दहावे ते बारावे शतक | कल्याणचे चालुक्य (मधे अल्प काळ कलचुरी) |
| इ स चे बारावे ते चौदावे शतक | तुगभद्रेच्या उत्तरेला यादव<br>तुगभद्रेच्या दक्षिणेस होयसाळ |
| इ स चे चौदावे ते सोळावे शतक | विजयनगर सम्राट<br>विजयनगर राजवटीच्या आरभीच्या काळात तुगभद्रेपलीकडे बहामनी सुलतान आणि त्यामागून विजापूरचे सुलतान |
| इ स चे सतरावे ते अठरावे शतक | तुगभद्रेच्या दक्षिणेस-मैसूरचे वोडियार आणि केळदीचे नायक १७६१–१७९९ हैदरअली व टिपू सुलतान यांचा काळ. तुगभद्रेच्या उत्तरेस मैसूरच्या काही भागावर मराठ्यानी राज्य केले |
| इ स १८००–१९४७ | ब्रिटिश राज्य |

**सातवाहन राजे**

या राजाची सत्ता विंध्य पर्वताच्या उत्तरेस व दक्षिणेस अशा दोहीकडच्या प्रदेशावर होती शिलालेख व नाणी यावरून सातवाहनांची ठाणी कर्नाटकामध्येही असल्याचा पुरावा मिळतो चद्रवल्लीतले उत्खनन आणि तळगुडा शिलालेख यामुळे या राजवशावर बराच प्रकाश पडतो अलीकडेच डॉ शेषाद्री यांना गुलबर्ग्याजवळ सातवाहनांच्या आणखी एका ठिकाणाचा शोध लागला आहे त्याच्या प्राथमिक प्रतिवृत्तातली काही वाक्ये आपणास येथे उद्धृत करता येतील "दुर्गेच्या मदिरात उठावाचे काही शिलापट्ट सापडले आहेत एके काळी ते बौद्ध स्तूपाच्या छतासाठी वापरले जात ते खि पू पहिल्या शतकापासून ते इ स च्या तिसऱ्या शतकापर्यंतच्या कालावधीतले आहेत निश्चितपणे सातवाहन धर्तीवर असलेल्या या उठावाच्या शिलापट्टांमुळे कर्नाटकी कलेच्या इतिहासात एक नवे प्रकरण अनावृत होते या उठावाच्या शिलापट्टांविषयी आधीच्या कालनिर्णयाला त्यातल्या काहीवरील शिलालेखांच्या प्राकृत भाषेच्या अभ्यासातून दुजोरा लाभतो या खेड्याजवळ दोन भलीमोठी टेकाडे आहेत त्याच्या पोटात कदाचित बौद्ध स्तूप सामावलेले असतील या टेकाडाच्या उत्खननाने कर्नाटकातील घराचे शिल्प तसेच तेथील बौद्ध धर्माचा इतिहास यावर खूपच प्रकाश पडू शकेल


खिस्ती शकाच्या प्रारभीच्या वर्षांत कर्नाटकाच्या बहुतेक भागांवर सातवाहनांचे राज्य होते या भागावर राज्य करणारी नतरची प्रमुख घराणी म्हणजे



चित्र १ एकाच दगडात खोदून बनवलेली म्हैसूर येथील चामुंडी टेकडीवरील महाकाय नंदीची प्रतिमा


चित्र २ दरिया दौलत – श्रीरंगपट्टणमधील टिपूच्या वाड्याची प्रतिकृती.






चित्र २  घुमट – हैदरअली व टिपू सुलतान याचा श्रीरंगपट्टण येथील मकबरा.

चित्र ४  बंगलोर येथील एक मनोहर उद्यान – लालबाग





चित्र ५ मैसूरच्या भूतपूर्व महाराजांचे निवासस्थान **विजेच्या** दिव्यानी देदीप्यमान राजवाडा



उत्तरेकडे वैजयती (बनवासी) येथील कदब आणि दक्षिणेकडे तळकडचे गग बदामी (वातापी) येथील चालुक्याच्या उदयाने कदबाना ग्रहण लागले आणि गग राजे चालुक्याचे माडलिक बनले चालुक्यामागून राष्ट्रकूट उदयास आले आणि मग त्यानाही कल्याणच्या उत्तरकालीन चालुक्यांनी पदच्युत केले गग राजांनी या दोन्ही सत्तांचे मडलिकत्व टिकवले आणि इ स च्या दहाव्या शतकापर्यंत गगावदीस राज्य केले

त्यानतर मधेच पचवीस वर्षे कल्याणला कलचुरींचे राज्य आले त्यानी ११६८ इ स त चालुक्याचे सिंहासन जिंकले होते चालुक्यानी आपले राज्य परत जिंकून घेतले, पण लवकरच त्याच्या साम्राज्याचा अत झाला बाराव्या शतकाच्या अती उत्तरेकडे यादव घराण्याचा आणि दक्षिणेस होयसाळाचा उदय झाला इस्लामी आक्रमणाने या दोन्ही राज्याचा विनाश करून १३३६ मध्ये विजयनगरच्या उदयाला वाव दिला तुगभद्रेच्या दक्षिणेस या राजांनी राज्य केले उत्तरेकडे बहामनी राज्ये होती

विजयनगर येथील बलाढ्य साम्राज्याच्या विनाशानतर केळदीच्या व मैसूरच्या राजानी डोकी वर काढली उत्तर कर्नाटकात मराठ्याची व विजापूरच्या सुलतानाची सत्ता होती टिपू धारातीर्थी पडल्यानतर कर्नाटकची राजसत्ता ब्रिटिशाच्या हाती गेली जुने मैसूर वोडियाराना परत केले गेले आणि ईशान्य प्रदेशातील काही जिल्ह्यांवर राज्य करण्याची मोकळीक निजामाला देण्यात आली (टिपूच्या पित्याने मैसूरच्या राज्याचा विस्तार करून राजधानी श्रीरगपट्टणला नेली होती) १८१८ त उत्तर कर्नाटक ब्रिटिशाच्या आधिपत्याखाली आला

पित्याच्या पूर्वजाद्वारा आपला वश एखाद्या देवतेपर्यंत किंवा एखाद्या आख्यायिकेच्या पराक्रमी नायकापर्यंत नेऊन भिडविण्याची आर्यांना हौस असे गोत्राच्याही रूपाने सात महर्षींचाच गौरव केलेला आहे परतु सातवाहनाच्यात मात्र एक विलक्षण रीत होती त्या राजांची नावे त्यांच्या माताच्या नावांशी निगडित केलेली आढळतात गौतमीपुत्र, वासिष्ठीपुत्र, हारितीपुत्र, इत्यादी

चद्रवल्ली उत्खननात कित्येक सातवाहनी नाणी सापडली आहेत ती शिसे व पोटिन (चादी व तावे याचे मिश्रण) यापासून बनवलेली आहेत याच ठिकाणी चिनी आणि रोमन नाणीही मिळाली आहेत यावरून त्या काळातल्या विदेशाशी असलेल्या व्यापाराची व्याप्ती दिसून येते सातवाहनी नाण्यांवर नौकाचे ठसे उठवलेले आहेत हिप्पेलसने पावसाळी वाऱ्याचा शोध लावल्यामुळे विदेशाशी चालणाऱ्या व्यापाराला उधाण आले निर्यात होणाऱ्या वस्तूत माकडे, हस्तिदत

आणि मोर याचाही समावेश असे ओफिर (सोपारा) आणि कारवार ही पश्चिम तीरावरील महत्त्वाची बंदरे असल्याच्या प्राचीन वृत्ताला यावरून दुजोरा मिळतो

सातवाहन राजा हाल 'गाथासप्तशती' या विख्यात प्राकृत ग्रंथाचा कर्ता होता ख्रिस्ती शकाच्या प्रारंभीच्या काळात प्राकृत व कन्नड यांचा परस्परांवर प्रभाव पडलेला असल्याची भाषिक प्रमाणेही आहेत कर्नाटकाच्या इतिहासात अधिक महत्त्व आहे ते 'आपण कुंतलावर राज्य करीत असू'—कुंतल जनपदेश्वर—या हालाच्या निश्चित विधानाला सातवाहनातले निदान काही राजे तरी कन्नड भाषिक होते हे सिद्ध करणारा भरपूर पुरावाही आहे

**बनवासीचे कदंब राजे** (इ स ३००–५००)

अखिल भारतीय ख्याती प्राप्त करून घेणाऱ्या पहिल्या राजघराण्याची राजधानी बनवासी हिचे नावच मंत्रमुग्ध करणारे आहे, तिचे गुणगान करताना आमचे कवी कधीच कंटाळत नाहीत कर्नाटकाच्या मनोहर माळनाड प्रदेशात ती वसलेली आहे या घराण्याच्या संस्थापकाच्या नाट्यपूर्ण सत्तालाभाचा वृत्तांत वाचायला एखाद्या रोमहर्षक अद्‌भुतकथेसारखा वाटतो (इ स ३४५–३६०, मयूरवर्मा) कांचीच्या पल्लवांचे वर्चस्व झुगारून देऊन त्याने आपण स्वतंत्र असल्याची घोषणा केली त्याच्या वंशजांनी कर्नाटकावर दोन शतके राज्य केले तळगुंडा स्तंभावरील संस्कृत शिलालेखाचा कर्ता कवी कुब्ज हा विख्यात राजा काकुत्स्थ वर्मा याचा मुलगा शांतिवर्मा याच्या राजसभेचा सदस्य होता पुराणमतवादी ब्राह्मण असूनही जैन व बौद्ध धर्मांना आश्रय देणाऱ्या या घराण्यातील राजांचा विस्तृत वृत्तांत त्याने दिला आहे आर एस पंचमुखी म्हणतात, " पाटलीपुत्र येथील गुप्त आणि तळकड येथील गंग या तत्कालीन भारतातील प्रथम श्रेणीच्या राजसत्ताशी कदंबांनी विवाहसंबंध जोडले होते कदंबाच्या अभ्युदयाबरोबरच मयूरवर्म्याने कर्नाटकाच्या राजकीय कर्तृत्वाचा शुभारंभ केला आणि काही शतकाच्या अवधीत ते एक लक्षात घेण्याजोगे बलाढ्य राज्य बनले आणि शेवटी समग्र राष्ट्राचे व वंशाचे संगमतीर्थ ही बनले "

वेदांचे अध्ययन करणे, वैदिक यज्ञयाग करणे, आणि तलाव बांधणे या कामात कदंबांनी मनोभावे लक्ष घातले थोडक्यात म्हणजे कदंब राजे उदारमनस्क सम्राट असून त्यांनी राज्यशासनकलेचे निरामय आदर्श स्वत च्या उदाहरणाने घालून दिले आणि ललितकलांच्या क्षेत्रातही शिक्षणाच्या द्वारा यथायोग्य परंपरा घालून दिल्या

**तळकडचे गंग** (इ स ३५०–९९९)

परस्पर युद्धमान असलेल्या दोन बलाढ्य राजांच्या सापटीत सापडल्या कारणाने पल्लव राजे किंवा कर्नाटकचे राजे यांपैकी जे कोणी विवक्षित काळी सर्वसत्ताधारी

असतील त्याचे माडलिक बनून राहण्यावरच गग राजाना समाधान मानून असावे लागे परतु ३५० ते ९९९ इ स या राजकीय घडामोडीच्या गदारोळ उसळलेल्या अत्यत प्रदीर्घ कालखडात त्यांचे राजनैतिक चातुर्य मात्र त्याना कधीच सोडून गेले नाही आकाशापर्यंत भरान्या मारून कर्तृत्व दाखविण्यास त्यांना मुळीच वाव नसला, तरी भूपृष्ठाच्या भौतिक पातळीवर त्यानी खूपच चागले कार्य केले कला, साहित्य आणि धार्मिक जीवन यात मोलाची भर घालून त्यानी अपार कीर्ती जोडून ठेविली आहे नृपतुगाने एका गग राजाचा निर्देश कोण्या एका गद्य ग्रथाचा कर्ता म्हणून केला आहे दुर्दैवाने हा ग्रथ उपलब्ध नाही दुसऱ्या एका राजाचे व त्याच्या सेनानीचेही नाव, एका कन्नड म्हणीच्या भाषेत सागावयाचे तर "दगडी स्मारकाइतके चिरस्थायी" होऊन राहिले आहे त्याची ख्याती अक्षरश पाषाणस्मारक–एका कवितेसारखी–झालेली आहे श्रवणबेळगोळाचा अतिप्रचड पुतळा ! राजा राचमल्ल आणि त्याचा सेनापती चावुडराय दोघेही विद्येचे मोठे पुरस्कर्ते होते ग्रथकर्ता म्हणवून घेण्याचा स्वयसिद्ध अधिकार चावुडरायाला लाभलेला आहे कारण "चावुडरायपुराण" या कन्नड गद्य ग्रथाचा तोच रचियता आहे परतु त्याला प्रसिद्धी लाभली ती मुख्यत वर उल्लेखिलेल्या शिल्पाकृतीमुळेच (९८३ इ स)

बाहुबली नावाच्या एका पौराणिक राजाची स्मृती वरील गोम्मटविग्रह शिल्पाने अजरामर करून ठेविली आहे तो एक जगज्जेता वीर होता परतु त्याने मिळविलेला सर्वश्रेष्ठ विजय म्हणजे आत्मजय श्री सीतारामय्या म्हणतात, "आत्मजयाद्वारे सपादन केलेल्या सद्‌गुणाची ही प्रचड प्रतिमा म्हणजे एक अविचल दगडी सदेशच असून तो जगाने अनेक प्रदेशांत आणि कित्येक भाषामधून फिरून फिरून ऐकलेला आहे, परतु त्याचा लाभ मात्र जगाला करून घेता आलेला नाही."

**चालुक्य राजे** (इ स ५००–७५७)

चालुक्य हे महान विजेते असून ललितकलाचेही मोठे पुरस्कर्ते होते त्याच्यातले काही जण दिग्विजय केल्यामुळे प्रसिद्धीस आले चालुक्याची सेनाच पुढे कर्नाटकी सेना म्हणून ओळखली जाऊ लागली यात कर्नाटकी सस्कृतीचा एक वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म आपल्या ध्यानी येतो चालुक्य मुळात कदबांच्याच वशातले ते उदयास आले तेही कदबाचे माडलिक म्हणूनच साम्राज्याचे चक्र कलापथावरून गडगडत जाते तसतसे राज्यकर्त्यांची सत्ता आणि प्रतिष्ठा यांतही नाट्यपूर्ण परिवर्तन घडून येत असते माडलिक सम्राट बनतात आणि उलट सम्राटाचे मांडलिक होतात मानवी जीवन नेहमीच असे कालचक्राच्या भोवऱ्यात गरगरत असते ! "कालाय तस्मै नम" सास्कृतिक परपरेचा दुसराही एक गुणधर्म ध्यानी घेण्यासारखा आहे

राजवंश उदयास येतात व अस्तास जातात, परंतु सांस्कृतिक परंपरा मात्र निरंतर पुढेच जात असते

आपली राजधानी म्हणून पहिल्या पुलिकेशीने बदामीची निवड केली ती युद्ध दृष्टचा त्या नगरीला लाभलेल्या महत्त्वामुळे त्याने त्या नगरीला तटबंदीही उभारली तो वैदिक धर्माचा अनुयायी होता आणि आपण स्वतंत्र राजा असल्याचे दाखवून देण्यासाठी त्याने कित्येक यज्ञही केले होते त्याचे नाव मोठे अर्थपूर्ण आहे कारण त्यात कन्नड ' पुली 'ची संस्कृत ' केशी 'शी सांगड घातलेली आहे सांस्कृतिक भाषा या नात्याने कर्नाटकचे लोक व राजे दोघांचाही आश्रय संस्कृतला नेहमीच लाभलेला आहे परंतु कर्नाटकची शासकीय भाषा म्हणून कन्नडला दिलेल्या मान्यतेमुळे चालुक्यांचा काळ महत्त्वाचा ठरतो या काळातले कित्येक शिलालेख राजनैतिक आणि भाषिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत मोलाचे आहेत

दुसरा पुलिकेशी (किंवा पुलिकेशिन्) हा पश्चिमेकडील चालुक्यातला सर्वांत विख्यात राजा होय विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेशाचे प्रमुख भाग त्याच्या राज्यात समाविष्ट झाले होते उत्तरेकडे लाट देशापर्यंतचा प्रांत त्याने पादाक्रांत केला होता इ स च्या सातव्या शतकापासून १२०० पर्यंत एकूण पाचशे वर्षे लाट व आंध्र हे दोन्ही प्रांत कर्नाटकच्या राजाच्या आधिपत्याखाली होते ही गोष्ट लक्ष वेधून घेणारी आहे उत्तरेकडील कनोजच्या सम्राट हर्षवर्धनाचा पराजय करून पुलकेशीने मोठीच मान्यता मिळविली होती

दुसरा पुलिकेशी केवळ एक महान विजेताच नव्हे तर एक निष्णात प्रशासकही होता ९९००० गावे मिळून बनलेल्या तीन 'महाराष्ट्रका'चा तो अधिपती होता. अजंठा येथील एका भित्तिचित्राच्या रूपाने त्याच्या राजवटीचे स्मारक केलेले आहे ह्यूएनत्संगच्या प्रवासवर्णनातही त्याच्या राजवटीचा वृत्तांत दिलेला आहे दक्षिण भारताच्या या सम्राटाची कीर्ती ऐकून पर्शियाच्या राजाने आपला राजदूत त्याच्याकडे पाठविला होता दुसऱ्या पुलिकेशीने केलेले या राजदूताचे स्वागत हाच अजंठाच्या उपयुक्त लेण्यातील सुशोभित भित्तिचित्राचा विषय आहे

ह्यू एनत्संग हा सांस्कृतिक राजदूत होता पुलिकेशीच्या राजधान्यातल्या एकीचे त्याने ठसठशित वर्णन केले आहे या प्रवाशाच्या मते पुलिकेशीच्या साम्राज्यातील लोक मित्राशी सौजन्यशील परंतु शत्रूंना मात्र दुर्जेय होते हस्तिदल त्याच्या अपराजित सैन्याचे एक अंग असे या देशाच्या कित्येक भागात मोठमोठाले अग्रहार आढळून येत (अग्रहार म्हणजे विद्वान ब्राह्मणांसाठी दान दिलेल्या निवासभमी), नंतरच्या कालखंडात उभ्या भारतातील असंख्य यात्रेकरूंना आकृष्ट करून घेण्यासाठी कित्येक हिंदू देवळांचीही भर घातली गेली ती देवळे ब्रह्मा, विष्णू व शिव

याच्या नावाने उभारली होती अशा प्रकारे कर्नाटक ज्यासाठी विख्यात आहे त्या धार्मिक सहिष्णुतेचे आणखी एक उदाहरण आपल्या दृष्टीस पडते कन्नडिगाचे आहार, वेष आणि रीतिरिवाज याचे सागोपाग शब्दचित्र त्या चिनी प्रवाशाने साकार केले आहेत पण त्याचा विचार पुढे कन्नडिगाच्या सस्कृतीवरील स्वतत्र प्रकरणात करण्यात येईल

चालुक्यांच्या साम्राज्याचा एक भाग बनलेल्या गुजरातेवरील अरबाचे प्रचड आक्रमण परतवून लावल्यामुळे दुसऱ्या विक्रमादित्याची राजवट महत्त्व पावली आहे

त्यानतर मात्र राजलक्ष्मीने चालुक्यांकडे पाठ फिरविली आणि राष्ट्रकूट राजे अधिकारारूढ झाले चालुक्यानी आपले साम्राज्य फिरून जिंकून घेण्यापूर्वी दोन वर्षांचा अवधी उलटून जावा लागला परतु या कालानुक्रमाकडे दुर्लक्ष करून सास्कृतिक क्षेत्रातील घडामोडीकडेच अवश्य ते लक्ष पुरविणे अधिक बरे राष्ट्र-कूटाची कथा हाती घेण्यापूर्वी आपण उत्तरकालीन चालुक्याचाही विचार करून टाकू या त्यामुळे आधीच्या व नतरच्या दोन्ही चालुक्यानी सास्कृतिक विकासाला लावलेल्या हातभाराचा साकल्याने विचार करता येईल

बदामीच्या चालुक्याना ग्रहण लागले असले तरी ते पूर्णपणे नामशेष मात्र झाले नव्हते काही थोडेसे चालुक्य राज्यकर्ते माडलिक या नात्याने अजून टिकाव धरून होते त्यातल्या काहींनी स्वत च्या राजकीय महत्त्वाच्या मानाने अत्यत मोठ्या प्रमाणावर सास्कृतिक कार्य केले आहे उदाहरणार्थ, आपला पहिला महान कवी पपा हा चालुक्य घराण्यातील अरिकेसरी नावाच्या एका लहानशा राजाच्या राज-सभेत होता त्याचा स्वत चा आश्रयदाता सम्राट नव्हता म्हणूनच केवळ त्याला कविचक्रवर्ती ही हवी हवीशी वाटणारी पदवी पटकावता आली नाही

सहावा विक्रमादित्य कल्याणच्या चालुक्यातला सर्वांत ख्यातनाम राजा उत्तरेस नर्मदेपासून ते दक्षिणेस कावेरीपर्यंत त्याचे साम्राज्य पसरले होते पश्चिम आंध्रचे मोठाले भागही त्याच्या साम्राज्यात अतर्भूत होते

त्याने स्वत च्या नावाने विक्रम शक हा नवा शक सुरू केला इ स १०७६ पासून पुढे जवळ जवळ शभर वर्षे तो उपयोगात होता युद्ध आणि शातता या दोन्ही प्रसगी करून दाखविलेल्या कित्येक महान कार्यभागामुळे विक्रमादित्य ख्याती पावला दूरवरचे आणि जवळपासचे विद्वान लोक त्याच्या राज्यसभेकडे आकृष्ट होत सत्पात्र आश्रयदात्याच्या शोधात काश्मीरचा सुप्रसिद्ध कवी बिल्हण याने सारे हिंदुस्थान पायाखाली घातले सरतेशेवटी तो सहाव्या विक्रमादित्याचा राजकवी बनला त्याच्या '**विक्रमांकदेव–चरित**'च्या कीर्तीवर दुहेरी अधिकार पाहोचतो ते चरित्र

काव्य व इतिहास दोन्ही आहे भारतीय साहित्यात इतिहासाचे ग्रथ फारच दुर्मिळ आहेत हे आपण जाणतोच बिल्हणासारख्या प्रतिभाशाली कवीकडून पराक्रमी वीर या नात्याने मान्यता मिळविणे ही काही लहानसहान कर्तृत्वसपन्नता नव्हे

विज्ञानेश्वराने आपला '**मिताक्षरा**' ग्रथ विक्रमादित्याच्याच राजवटीत लिहिला. तो हिंदू कायद्यावरील एक प्रमाणभूत ग्रथ असून एक बगाल वगळता तो समग्र भारतात मानला जातो

चालुक्य राजाच्या आश्रयाखाली चिरस्थायी स्मारके, विशेषत चित्रकला, वास्तुशास्त्र आणि शिल्पकला या ललितकलांच्या क्षेत्रात निर्माण झाली देवळे उभारण्याच्या आणि त्याच्या यथायोग्य व्यवस्थेसाठी भूमी दान करण्याच्या कामात राजघराण्यातील मडळीची परस्पर चढाओढच चाले पूर्वकालीन चालुक्याच्या राजवटीत बांधलेल्या मदिरात बदामी, पट्टदकल आणि ऐहोळे येथील मदिरे येतात नतरच्या कालखडातील देवळे लक्कुडी, डाबळ, गदग आणि कुरुवट्ट या ठिकाणी आढळतात नृत्य व सगीत यासकट सर्व ललितकला चालुक्याच्या आधिपत्याखाली खूपच भरभराटीस आल्या होत्या हे सिद्ध करणारा पुरेसा पुरावा अस्तित्वात आहे. दोन मूक कलावताची नावे आपल्यापर्यंत परपरेने आलेली आहेत गुड नावाचा आधुनिक विश्वकर्मा, आणि नृत्यकलेचा शोध लावणारा अचल (पूर्वकालीन चालु-क्याच्या काळातले) —उत्तरकालीन चालुक्ययुगातील वास्तुकलेच्या शैली विलक्षण कलात्मक आणि अलकृत अशा होयसाळ शैलीच्या रूपाने कळसाला पोहोचली

रण्ण हा सत्याश्रय या उत्तरकालीन चालुक्य राजाचा राजकवी होता

महान काव्याचे सुयोग्य माध्यम बनण्याच्या दृष्टीने कन्नड भाषेचा विकास पुरेशा दीर्घकालापासून केला गेलेला असल्याचा शिलालेखरूप पुरावा उपलब्ध आहे इ स च्या सातव्या शतकातला असल्याचे सिद्ध झालेला एक शिलालेख असून त्यात 'त्रिपदी' नावाचा मूळ कन्नड प्रदेशातला छद निष्णातपणे योजिलेला आहे अशा प्रकारे चालुक्यानी विद्येच्या अभिवृद्धीला लक्षणीय हातभार लावलेला आहे काव्य आणि इतर ललित कला यांना आलेल्या बहराचे बरेचसे श्रेय त्याच्याच उदार पण विवेचक प्रोत्साहनाकडे जाते

## कल्याणचे कलचूर्य (११५६–११८३ इ स)

कल्याणी चालुक्याच्या प्रदीर्घ इतिहासातले हे एक लहानसे उपाख्यान होय परतु याच राजवटीत हिंदूधर्मात सुधारणा करण्याच्या चळवळीचा जन्म झाला आणि तिचे परिणाम अत्यत दूरगामी ठरले तिसरा तैल हा राजा दुर्बळ होता त्याचा सेनानी, कलचुरीचा बिज्जल याने या परिस्थितीचा उपयोग करून घेतला

आणि प्रत्यक्ष व्यवहारापुरता तोच त्या प्रदेशाचा राज्यकर्ता बनला तैलाच्या मृत्यू-नतर त्याने राजाची पदवीही धारण केली 'वीरशैव पथ' या नावाने ओळखली जाणारी धार्मिक चळवळ बसवानी आरंभिली ती त्याच्या राजवटीत या धार्मिक पुनरुत्थानाचे पर्यवसान कर्नाटकातील जैन धर्माच्या वाढीला ओहोटी लागण्यात झाले वीरशैवपथ लोकप्रिय झाला आणि दक्षिण भारताच्या अनेक भागात त्याची लोकप्रियता आजही टिकून आहे राजकीय महत्त्वाविषयी म्हणाल तर कलचुरी राजवटीच्या उदयामुळे बलाढ्य चालुक्य साम्राज्याच्या अवनतीला सहाय्यच झाले त्याचे आता दोन भाग पडून तुगभद्रा ही त्याची विभाजक सीमा बनली उत्तरेकडे देवगिरीचे यादव स्वतत्र राज्यकर्ते बनले आणि दक्षिणेकडे दोरसमुद्राचे होयसाळ राजे सत्तारूढ झाले

**राष्ट्रकूट राजे** (७५७–९७३ इ स)

पूर्वकालीन चालुक्याच्या सत्तेचा ऱ्हास इ स च्या आठव्या शतकात झाला. दतिदुर्गाने राष्ट्रकूट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन राजघराण्याची स्थापना केली कर्नाटक राज्याचा विस्तार करण्यासाठी हाती घेतलेल्या अनेक यशस्वी स्वाऱ्यामुळे हा राजवश प्रसिद्धी पावला बृहत्कर्नाटकावर राज्य करणारे हेच पहिले राज्यकर्ते होत त्यांचे सामर्थ्य रामेश्वरापासून तो हिमालयापर्यंत सर्वत्र जाणवत होते दतिदुर्गाचा उत्तराधिकारी पहिला कृष्ण यानेच जगातील आश्चर्यां-पैकी एक म्हणून मान्यता पावलेल्या व खडकात कोरून काढलेल्या वेरूळ येथील कैलास मदिराची उभारणी केली तिसरा गोविंद ७९८ इ स त राज्यावर आला विंध्याच्या उत्तरेस आणि दक्षिणेस दोहोकडे राज्य जिंकून घेण्यासाठी त्याने स्वाऱ्या केल्या प्रतिहार व पाल राजाचा त्याने पराभव केला त्याचे सैन्य थेट हिमालया-पर्यंत चालून गेले त्याने पल्लव राजानाही आपल्या वर्चस्वाखाली आणले वेगीचे पौर्वात्य चालुक्य राजेही त्याचे माडलिकच होते अमोघवर्ष नृपतुग या विख्यात राजाने ६५ वर्षे राज्य केले (८१४–८७८) निष्ठावान जैन असल्याने तो विजिगीषू युद्धाच्या विरुद्ध होता त्याने कवी व तत्त्वज्ञ यांना उदार आश्रय दिला '**कविराज-मार्ग**' हा आज उपलब्ध असलेला सर्वांत प्राचीन ग्रथ त्याचा राजकवी श्रीविजय याने लिहिला प्राचीन कन्नडमधील या महाकाव्यावरून आपणास प्राचीन कन्नडिग आणि त्याची सस्कृती याविषयी बरीच माहिती मिळते दक्षिणेस कावेरी आणि उत्तरेस गोदावरी या प्राचीन कर्नाटकाच्या सीमा याच ग्रथात आखून दिलेल्या आहेत (कावेरी यिंदम् आ गोदावरियरम्) राष्ट्रकूटाचे साम्राज्य गुजरातपासून थेट आध्र प्रदेशापर्यंत पसरलेले होते बेळगाव, धारवाड, रायचूर व विजापूर या जिल्ह्यांत शुद्ध कन्नड भाषा बोलली जाई पण एवढ्या मोठ्या प्रदेशात स्थानिक

भेद अटळपणे दिसून येणार वरील कवीने उत्तर व दक्षिण बोलीचा निर्देश केलेला असून तो कन्नड भाषेचा उल्लेख अनेकवचनीच करतो

तिसरा कृष्ण आणखी एक बलाढ्य राजा मध्य प्रदेशातल्या जूर येथे आढळलेल्या एका शिलालेखात श्रीकृष्णाने गाजविलेल्या शौर्याचे वर्णन शुद्ध कन्नड भाषेत आणि लिपीत केलेले आहे राज्याचा विस्तार आणि ललितकलाची प्रगती या दोन्ही सदर्भात ठळक घटनामुळे त्याची राजवट, वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे गगराजवशाशी विवाह जमवून त्याद्वारा त्याने त्याचाही पाठिंबा मिळविला कृष्णाची बहीण दुसऱ्या बटुगाला देण्यात आली कृष्णाने चोळाचा पराभव केला आणि तो थेट रामेश्वरपर्यंत जाऊन ठेपला वीरोचित राजनीतिनैपुण्य आणि धर्मसहिष्णुता याच्या बळाचा राष्ट्रकूट राज्यकर्ते या अफाट प्रदेशात शातता व सुव्यवस्था टिकवू शकले त्याचा कल जैनधर्माकडे असला तरी त्यांनी शिव व विष्णू या दोन्ही देवाची मदिरे बाधून उपासनेच्या लोकप्रिय पद्धतीना उत्तेजनच दिले

राष्ट्रकूट राजवटीने कन्नडिगाचा सर्वांगीण उत्कर्ष झालेला पाहिला नृपतुग हा केवळ साहित्याचा आश्रयदाताच नव्हे तर ग्रथकर्तृत्वाच्या श्रेयाचाही अधिकारी होता दहावे शतक कन्नड साहित्याचे सुवर्णयुगच होते कन्नड कवीतील सर्वश्रेष्ठ कवी आदिपपा याचेच ते युग होते दुसरा कन्नड एक कवी पोण्ण यालाही तिसऱ्या कृष्णाने आसरा दिला होता ललितकलाच्या क्षेत्रात राष्ट्रकूटानी गाजविलेले कर्तृत्वही तितकेच उल्लेखनीय आहे पूर्वकालीन चालुक्याच्या मनोज्ञ परपरेचा उत्तराधिकार त्याना लाभला होता आणि त्यांनी तिला एक अभिनव परिमितीचीही जोड दिली अशा रीतीने त्यांनी जागतिक कीर्ती जोडली वेरूळ आणि एलेफटा यथील त्याची मदिरे वस्तुशिल्प आणि शिल्पकला यात त्यानी घातलेल्या भरीची निदर्शक ठरतात वेरूळ येथील कैलास मदिराच्या निर्मितीद्वारा पहिल्या कृष्णाने स्वत ची शिवभक्ती प्रकट केली हे शिल्प म्हणजे पाषाणात खोदलेल्या भारतीय वास्तुशिल्पाचे सर्वांत भव्य असे उदाहरण होय "कैलास मदिराने व्यापलेले क्षेत्र जवळ जवळ अथेन्समधील पेर्थेनॉ इतकेच विस्तृत आहे हे लक्षात आले म्हणजे त्याच्या भव्यतेची काहीशी कल्पना येऊ शकेल परतु त्याची उची तर त्या उत्कृष्ट ग्रीक शिल्पाच्या जवळजवळ दीडपट आहे तात्पर्य कलात्मक निर्मितीतील उच्चाकाहूनही ते काहीसे अधिक श्रेष्ठ आहे ते एक महान आध्यात्मिक साफल्य आहे परमोच्च ध्येयाच्या परिपूर्तीसाठी मानवी मने, हृदये आणि हात एकजुटीने झटत राहिल्याच्या चमत्काराचे कैलास लेणे हे आदर्श उदाहरण होय " (पर्सी ब्राऊन)

पुराणे व महाकाव्ये यांतील प्रसग साकार करणाऱ्या उठावाच्या भित्तिचित्राचे त्यातील सौंदर्य आणि निसर्गचित्रणातील वास्तवता यामुळे विशेष कौतुक

केले जाते राष्ट्रकूट राजवटीतील शिल्पकलेचे सर्वोत्कृष्ट कर्तृत्व एलेफंटाच्या रूपाने साकार झाले आहे पुष्कळदा त्रिमूर्ती या चुकीच्या नावाने उल्लेखिल्या जाणाऱ्या महेशमूर्तीचे आकारमान प्रचड असून ती २३ फूट उच आणि २० फूट रुद आहे एकाच सत्त्वाचे तीन मोहोरे कृत्रिमतेची यत्किंचितही छटा येऊ न देता तीत सुसवाद साधून शिल्पांकित केले आहेत इतका प्रभाव आणि एवढा समतोल एकाच ठायी सामावलेली ईश्वरी सत्तत्त्वाची अशा प्रकारची पार्थिव प्रतीके उभ्या जगाच्या कलाकृतींमध्येदेखील विरळाच आढळतील

## होयसाळ राजे (१००६–१३४५)

लहानशा तलवारीने वाघ मारणाऱ्या राजाच्या कथेत सत्यापेक्षा कल्पनाविलासच अधिक असणार आणि त्या राजाला त्याच्या जैन गुरूची अनुज्ञा मिळेपर्यंत वाघानेही उदारपणाने वाट पहात राहावे ही घटना त्या कथेला थेट दतकथेच्याच क्षेत्रात नेऊन टाकते (युद्ध-साळ किंवा होय-साळ) परतु ही दतकथा अत्यत अर्थपूर्ण आहे कारण, या विख्यात राजवशातील राज्यकर्त्यांनी बाधलेल्या असख्य देवळातल्या प्रत्येकावर कोरलेले हे राजचिन्ह म्हणजे त्याच्या पराक्रमाचे अतिशय मनोरम असे प्रतीकच होय चालुक्य घराण्याचा ऱ्हास आणि अती विनाश यामुळे त्याच्या माडलिकांना स्वत साठी राज्याचे लचके तोडून घेण्याला भरपूर वाव मिळाला होयसाळ राजे खूप महत्त्वाकाक्षी आणि उत्साही होते अर्थातच त्यांनी आपल्या राज्याचा विस्तार करीत करीत शेवटी तुगभद्रेच्या दक्षिणेकडील प्रदेशाचे सार्वभौमत्व प्राप्त करून घेतले चालुक्याचे महान साम्राज्य आता देवगिरीचे यादव आणि दोरासमुद्राचे होयसाळ याच्यात विभागले गेले पण दोन हिंदू सत्ता निरतर परस्पराशी लढतच राहिल्या त्यामुळे मुस्लिम राज्यकर्त्यांचा दक्षिणेत शिरकाव होण्याच्या दृष्टीने तो काळ अत्यत उपकारक ठरला मलिककाफुरची स्वारी मुळात या हिंदू राज्यातले वैभव लुटण्यासाठीच योजिलेली होती पुढे मात्र मुस्लिम राजघराण्याची सस्थापना करण्याचा विचार त्याच्या डोक्यात आला १३०७ मध्ये यादव राज्य सपुष्टात आले

होयसाळाचा पूर्णतया पराभव करण्यात मात्र मुस्लिमाना अपयशच आले हे हिंदू राजे शूरही होते आणि शहाणेही समान शत्रूला तोंड देण्यासाठी सयुक्त आघाडी स्थापन करण्याची निकड त्यानी ओळखली पण काळ मात्र अशा शौर्याच्या कृत्याच्या दृष्टीने परिपक्व झालेला नव्हता दक्षिण भारतावरील मुस्लिम विजयाची लाट थोपविण्याचे श्रेय विजयनगरच्या सम्राटाकडेच जाते

अशा प्रकारे कर्नाटकाची तुगभद्रेचा दक्षिण भाग आणि उत्तर भाग अशा दोन आडव्या राज्यात विभागणी होण्याचा प्रारभ बाराव्या शतकापासूनच झालेला

असल्याचे आपल्या निदर्शनास येते कर्नाटकाचा सलगपणा टिकवून ठेवण्यात तीन शतकापर्यंत विजयनगर साम्राज्याला यश लाभले परतु विजयनगर पडल्यानतर जुन्या मैसूर प्रदेशाच्या बऱ्याचशा भागावर वोडियाराचे वर्चस्व आले या प्राचीन राज्याला ब्रिटिश राज्य येण्यापूर्वीदेखील अनेक स्थित्यतरातून जावे लागले वोडियाराची फिरून स्थापना करण्याचे धोरण शहाणपणाचे ठरावे असे त्याना वाटले परतु ब्रिटिशाच्या या धोरणापायी कर्नाटक खडित झाला परतु या प्रसगी आपण हे मात्र ध्यानात ठेवायला हवे की कर्नाटकाच्या सास्कृतिक परपरेचा इतिहास अविच्छिन्न राहिला आहे चालुक्याचा सास्कृतिक उत्तराधिकार जसा होयसाळाकडे आला तसाच विजयनगरच्या सम्राटाच्या सास्कृतिक परपरेचा उत्तराधिकार वोडियाराना लाभला

आता आपण होयसाळापैकी अधिक विख्यात झालेल्याच्या कर्तृत्वाचा विचार करू या (१०२२–१३४२)

चोळ राजाविरुद्ध गग राजाचा पक्ष उचलून धरणारे या नात्याने होयसाळाना महत्त्व प्राप्त झाले परिणामी होयसाळ जुन्या मैसूर सस्थानाचा गाभा असलेल्या गगवाडीचे स्वामी बनले कणनूर होयसाळाच्या राजधान्यातली एक होती या वस्तुस्थितीमुळे बाराव्या शतकातल्या राजनैतिक घडामोडीवर बराच प्रकाश पडतो. राजधानी सोसेनुरूहून बेलुरूस (वेळापुरास) हलविली ती पहिल्या बल्लाळाच्या राजवटीत (११६२) दोरासमुद्र (हळेबीड) येथे पर्यायी राजधानी असे राजधानीचा हा वरच्यावर झालेला थारेपालट लढायातील दैवगतीच्या चढउताराचा द्योतक ठरतो सर्वसाधारणपणे होयसाळ राजे रणागणावर विजयी ठरत 'थलकडुकोंडा 'सारख्या सनसनाटी पदव्या धारण करू शकत

विष्णुवर्धन होयसाळाच्या माहात्म्याचा जनक होय महान श्रीवैष्णव सत रामानुज याच्या उदयामुळे त्याची राजवट ख्याती पावली इ स १११६ त रामानुजानी विष्णुवर्धनाची गाठ घेऊन श्रीवैष्णव पथ स्वीकारण्यासाठी त्याचे मन वळविले, पण त्याची आदर्श राणी निष्ठावत जैन होती तर तिचा पिता शैव होता कन्नडिगाच्या सर्वधर्मसमन्वयरूप सास्कृतिक परपरेचे हे आणखी एक उदाहरण म्हणावयाचे बेलूरच्या केशवमदिरातील भितीवर कोरलेल्या श्लोकात हे सत्य उदघोषित केलेले आहे सैद्धातिक व व्यावहारिक दोन्ही दृष्टीनी धर्मसहिष्णुतेविषयी होयसाळ राजे सुविख्यात होते याचा दुसरा पुरावाही मिळतो

दुसरा बल्लाळ एक महान प्रशासक होऊन गेला यादव व होयसाळ याच्यामधील सार्वभौम सत्तेचा सघर्ष निकरावर आला तो त्याच्याच राजवटीत उत्तरेवर चाल करून त्याने धारवाड जिल्ह्यात लोक्किगुडी येथे तळ दिला अशा प्रकारे मलप्रभा

ही होयसाळाची उत्तर सीमा बनली हे खरोखरीच महान कर्तृत्वाचे युग होते दक्षिण भारतातील राजनीतीला निर्णायक वळण देणारे या नात्याने होयसाळ खूपच चमकले

हे उत्तरेकडील जिल्हे किंवा तमिळ आणि तेलगू जिल्हेदेखील होयसाळाना फारसा दीर्घ काळ आपल्या हाती राखता मात्र आले नाहीत दुसऱ्या बल्लाळाच्या राजवटीत या दोन युद्धमान सत्ताना एक नवेच सकट भेडसावू लागले–मुस्लिम सत्तेचा दक्षिण भारतात शिरकाव होण्याचे दक्षिण भारताच्या इतिहासात प्रथमच मुसलमानानी दक्षिणेवर आक्रमण करून खूप दूरवर विध्वस व लूटमार केली (१३१०) त्याची सुसाट मूर्तिभजक धडक अडवील असा कोणीही नव्हता १३११ व १३२७ मध्ये दोनदा दोरासमुद्र निपटून काढला गेला अशा प्रकारे होयसाळांची सार्वभौमत्वाची महत्त्वाकाक्षा सपुष्टात आली पण धूमधडाक्याने नव्हे तर रे रे पो पो करीतच तिसऱ्या बल्लाळाने पराक्रम गाजवीत धारातीर्थी देह ठेवला ज्या ध्येयासाठी त्याने मरण पत्करले ते पुढे विजयनगरच्या सम्राटानी देदीप्यमान शौर्याच्या वळावर उचलून धरले

आक्रमण, उत्तराधिकार आणि स्वाऱ्या यापायी वारवार युद्ध उद्भवत असताना-देखील विद्या आणि ललितकला याना आसरा देण्यापुरता रिकामा वेळ होयसाळाना मिळे विष्णुवर्धनाची राणीच एक निष्णात गायिका व नर्तिका होती राजपुत्र-राजकन्या याच्या शिक्षणाकडे सारखेच लक्ष पुरवले जात असे हे दाखविणारा पुरावा उपलब्ध आहे राजे रजाधानीत अनुपस्थित असतानाच्या काळात काही राण्यानी राज्यसूत्रे हाती घेतल्याचेही लिहून ठेवलेले आढळते महान कवी जन्न राजकवी होता ज्या थोड्या कवींनी पाषाणावर कोरलेले साहित्य समृद्ध केले त्यातला तो एक होय परतु होयसाळाचे चिरस्थायी यश दृग्गोचर होते ते मदिराचे शिल्प आणि वास्तुशिल्प या क्षेत्रात म्हैसूरच्या निरनिराळ्या भागात सुरक्षिततेच्या विभिन्न अवस्थात असलेली पन्नास एक होयसाळी देवालये आहेत त्यापैकी बेलूर, हळेबीड आणि सोमनाथपूर येथील देवालयाकडे आजही यात्रेकरू आणि कलाप्रेमी मडळी आकृष्ट होत असतात चालुक्याची वास्तुशिल्पकला होयसाळानी पूर्णावस्थेला पोहोचविली बाधकामाच्या या शैलीचे शिखर गाठून त्यानी सर्वोच्च यश पटकाविले बाहेरील भिंतीवर खोदलेल्या हत्तीच्या न सपणाऱ्या रागा आणि महाकाव्यांतील आख्यायिका म्हणजे चिरतन आनदाचे उगमस्थान होत भिंतीवरील हे लेख म्हणजे सामान्य जनतेच्या शिक्षणाचे एक उपयुक्त साधनच होय मदिराच्या अतर्भागातील सजीव भासणाऱ्या मदनिकाच्या मूर्तींचे कौतुक उच्चवर्गीयानाच वाटू शकेल

जाज्वल्य धार्मिक श्रद्धेचे ते युग होते जनतेची आध्यात्मिक भूक शमविण्याची आणि त्याची ऐहिक सपदाही वाढविण्याची काळजी शासनाने घेतली होती राज्य-कर्ते पराक्रमी योद्धे आणि प्रशासक होते त्यानी वैदिक पडितासाठी असख्य अग्रहार आणि जैन श्रमणासाठी अनेक वसद्या उभारल्या **सर्वे जना सुखिनो भवन्तु ।**

## विजयनगरचे साम्राज्य (१३३६–१५६५)

दक्षिण भारतातील राज्ये एकाभागोमाग एक करीत कशी गडगडली आणि आपली पुरातन सस्कृती नष्ट करण्याच्या कामात मुस्लिम जवळजवळ यशस्वी कसे झाले हे आपण पाहिले तीस एक वर्षांपूर्वी रामकृष्ण मिशनने प्रसिद्ध केलेल्या 'भारताचा सास्कृतिक वारसा' या ग्रथातील एका उताऱ्यावरून याची यथार्थ जाण येते एरवी सर्वसामान्य वाचक झाडेच पहात जातो आणि अरण्य पाहू शकतच नाही (बारिक सारिक माहितीमागचे व्यापक सत्य त्याला आकलन होत नाही ) "विजयनगरच्या साम्राज्याची स्थापना म्हणजे हिंदू सघटनेचा परमोच्च भव्य कळसच म्हणायला हवा त्यानेच मुस्लिमाच्या परकी सस्कृतीचा लोंढा थोपवून धरला या साम्राज्याने दक्षिण भारताच्या सरक्षकाचे पद तीन शतकाहून अधिक काळ साभाळले आणि यथायोग्य व स्वाभाविक वाढ साधणाऱ्या हिंदू सस्कृतीचे जतन केले" (एस के आयगार)

विजयनगरच्या साम्राज्याने मुस्लिम आक्रमणाची लाट थोपविली एवढेच नव्हे तर त्याने धार्मिक साहित्याच्या अभ्यासालाही गती दिली आणि अशा रीतीने परपरागत मूल्याविषयी आदरभाव जागृत केला हिंदू धर्म सनातन–काल, आज, निरतर एकरूप–आहे असे म्हटले जाते रवींद्रनाथ टागोरानी भारतीय देशभक्ताची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे "मी भारतावर प्रेम करतो ते भौगोलिक मूर्ति-पूजेची जोपासना करावी म्हणून नव्हे तर भारताने आपल्या महान सुपुत्राच्या ज्ञान-ज्योतीने उजळलेल्या जाणिवेतून स्फुरण पावलेल्या चैतन्ययुक्त वाङ्मयाचे प्रक्षुब्ध अशा युगातही रक्षण केले म्हणून" ऐहिक विद्याप्रमाणेच धार्मिक ग्रथाचेही सरक्षण करणे, त्याचा प्रचार करणे आणि त्यावर भाष्ये लिहिणे अगत्याचे असते एरवी आपले हे परपरागत वैभव आपल्या दृष्टिआड होण्याची भीती असते सायण आणि मध्व यासारख्या थोर भाष्यकाराच्या अभावी आधुनिक जगाच्या दृष्टीने आपल्या धर्मग्रथाचे महत्त्व लुप्तच झाले असते दिग्विजयाची वाटचाल धर्मविजयाच्या हातात हात घालून व्हावी याची काळजी विजयनगरच्या सम्राटानी घेतली पण ते कडवे हिंदू होते असे मुळीच नाही राजनैतिक कार्यभाग साधण्यासाठी आवश्यक होती त्याहून कितीतरी पलीकडची तड धर्मसहिष्णुतेने गाठली होती सपाट प्रदेश आणि पठारी भाग याच्या राज्यकर्त्यांत सतत चालू असलेली, अगी मुरलेल्या दुखण्यासारखी

युद्धे, उत्तराधिकारासाठी होणाऱ्या अपरिहार्य लढाया आणि बहामनी राज्याच्या उदयामुळे समोर उभे ठाकलेले नवे संकट या साऱ्यांची तमा न बाळगता विजय-नगरच्या सम्राटानी एवढा मोठा कार्यभाग साधला हे त्याना अत्यंत भूषणावह ठरते त्यातल्या काहींनी जागतिक प्रतिष्ठा मिळविली आणि पाषाणशिल्प, प्रभावी काव्य आणि सांस्कृतिक परंपरा यांच्या रूपाने अमर स्मारकेही मागे ठेवली

हे राजे चार राजवंशातले होते संगम, साळुवा, तुळुवा आणि अरविडू साळुवाचे राज्य अल्प काळ टिकले आणि त्याला फारसे महत्त्वही लाभले नाही संगम घराण्यातला दुसरा देवराय (१४२२–४६) आणि तुळुवा घराण्यातला कृष्णदेवराय (१५०९–२९) हे मात्र भावी पिढ्यांना संस्मरणीय होत मुस्लिम राजांच्या एकत्रित सैन्याने विजयनगरच्या सेनेचा भीषण पराभव केला तो अरविडु राम-रायाच्या राजवटीत (१५४६)

स्वत च्या वंशाचा उगम सूर्य, चंद्र, स्तनपान करणारा वृक आणि अस्वल, वाघ किंवा हत्ती याच्याशी एकाकीपणे झुंजणारा एखादा राजा याच्यापर्यंत नेऊन भिडवण्याची जगातल्या राजाना मोठीच आवड असते आणि या पुराणकथांत सत्याचा अंशही असतो जगज्जेते वीर साधारणपणे जीवनाहूनही अधिक विशाल असे पुरुष असतात त्यांनी केलेल्या पराक्रमाच्या कृत्याविषयी संशयाला वावच नसतो राज-मुकुट धारण करणाऱ्या त्याच्या मस्तकाभोवती पौराणिक कथांतील गुणोगौरवाचे तेजोवलय तळपत असले तरी त्यामुळे त्याच्या खऱ्याखुऱ्या गुणाना कमीपणा येत नाही

संगम बंधू पांडवांसारखे पाच होते परंतु शौर्याचा गौरव करणाऱ्या युगात अर्जुन व भीम याना वाढते मोल लाभले उदा आपल्याला माहिती मिळते ती मुख्यत्वेकरून हरिहराने स्वत साठी राज्याचा भाग पटकावला आणि बुक्काने ते राज्य सुसंघटित केले याचीच होयसाळांच्या ऱ्हासाचा काळ आकाशाला गवसणी घालणाऱ्या कर्तृत्वाला अतिशय अनुकूल होता त्यासाठी शासनाच्या यंत्रणेत किंवा उपासनेच्या पद्धतीतही फारसे परिवर्तन घडवून आणण्याची निकड मुळीच नव्हती कारण, हरिहर होयसाळाच्या राज्यातला एक अधिकारी असून तो विवाहसंबंधानेही त्याचा नातलग होता त्यामुळे चेन्नकेशव आणि विरूपाक्ष या होयसाळांच्या संरक्षक देवतांची उपासना चालूच राहिली नानाविध संघर्षांपायी छिन्नविच्छिन्न झालेल्या देशात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे जे कार्य विजयनगरच्या संस्थाप-कानी अंगावर घेतले होते त्याचेच वराहरूप राजचिन्ह हे प्रतीक होय विजयनगरच्या राज्यकर्त्यांनी समग्र दक्षिण भारतावर सार्वभौम सत्ता प्रस्थापित केल्यानंतर शृंगेरीचे राजगुरू जगद्गुरू या नावाने ओळखले जाऊ लागले विद्यानगरच्या नावाशी

विद्यारण्यांचे नाव निगडित करणारी एक पौराणिक कथा आहे कारण, विद्यानगर हेही राजधानीला दिलेले एक नाव होते विजयनगरचे राजे शृंगेरी, सोसाळे व मेळकोटे येथील धर्मगुरूना अतिशय मान देत असत हे सिद्ध करणारा शिलालेखीय पुरावाही मिळतो त्यांच्या धार्मिक सहिष्णुतेचे हे आणखी एक उदाहरण विजय-नगरचे सम्राट "कन्नडराज्य रामरमण" आणि 'वैदिकमार्गप्रवर्तक' या पदव्याचा अभिमान बाळगीत कन्नड अक्षरात कोरलेली त्याची विरूपाक्ष ही मुद्रा ते याच भूमीचे पुत्र असल्याची तसेच आपल्या प्रजेच्या जाज्वल्य धर्मनिष्ठेतही ते सहभागी असल्याची साक्ष देते

मधुरेच्या सुलतानाचा पराभव करून आपले राज्य श्रीलकेपर्यंत विस्तारणे दुसऱ्या हरिहराच्या कर्तृत्वाचा एक भाग त्याच्या पदरी बलाढ्य नौसेना असल्यामुळे त्याला तिन्ही समुद्राचा राजा या पदवीवर यथार्थ अधिकार सागता येई सायण आणि मध्व या ख्यातनाम सस्कृत पडितानी श्रुतींवरील भाष्यलेखनास याच्याच राजवटीत प्रारभ केला या राजाचा सर्वसमावेशक दृष्टिकोन जैन-रामानुज निर्णयाच्या ऐति-हासिक घटनावरून स्पष्ट होतो बिट्टिदेवाने श्रीवैष्णव पथाची दीक्षा घेतल्यापासूनच जैनाच्या महत्त्वाला ओहोटी लागून श्रीवैष्णव पथी लोक वरचढ होऊ लागले होते एका सम्राटाच्या राजवटीत बहुसख्य व अल्पसख्य समाजांच्या अधिकारांविषयी वाद उद्भवला पी बी देसाई सांगतात की त्या राजाचा निर्णय म्हणजे अधिकार-विषयक घोषणापत्रकच होते मुसलमान व ख्रिश्चन यांच्यासकट सर्व अल्पसख्य समाजाना आपापल्या धर्माच्या पालनाची मोकळीक दिली होती दुसऱ्या देवरायाला आपल्या साऱ्याच प्रजाजनांच्या कल्याणाची इतकी आस्था होती की प्रजाजनातल्या कोणत्याही गटाच्या धार्मिक भावना दुखविणे त्याला नकोसे वाटे तीनुसार त्याने पवित्र कुराणाची एक प्रत आपल्या सिंहासनाजवळ ठेवली होती हेतू हाच की आपल्या मुसलमान प्रजाजनानी सिंहासनाला प्रणाम तर करावाच परतु त्याच्या जोडीने त्याना आपल्या धार्मिक निष्ठाही राखता याव्यात प्रत्येकाला आपापल्या धर्मानुसार देवाची पूजाअर्चा करता यावी यासाठी देवळाप्रमाणे मशिदीही बांधल्या जाव्यात याची काळजी हे राजे वहात

दुसऱ्या देवरायाच्या राजवटीत या राज्याला सर्वांगीण प्रगतीचे आणि समृद्धीचे दिवस दिसले युद्धदृष्ट्या महत्त्व लाभलेल्या ठिकाणाचे रक्षण करण्यासाठी आपले राजप्रतिनिधी नेमून त्याने पूर्वसीमा बळकट केली लक्कण्णा दडनायक या आपल्या सेनापतीच्या सहाय्याने त्याने आपले साम्राज्य श्रीलकेपर्यंत विस्तारले केरळमधील सस्थानिक आणि क्विलोनचा राजा याना त्याने खडण्या द्यायला भाग पाडले पर्शियाचा राजदूत अब्दुल रज्जाक याच्या शब्दांत सागायचे तर त्याचे साम्राज्य श्रीलकेपासून गुलबर्ग्यापर्यंत आणि ओरिसापासून मलबारपर्यंत पसरले होते

शांततेच्या काळाला अनुरूप अशी कलाचीही या काळी भरभराट झाली देवराय स्वत विद्वान असून विद्येचा थोर आश्रयदाता होता कित्येक महान कन्नड आणि तेलगू कवींनी त्याची राजसभा भूषविली होती कन्नड कवींपैकी आपणांस कुमार व्यास व चामरस यांचा उल्लेख करायला हवा आणि तेलगू कवींतल्या श्रीनाथांचाही त्याने जे जे म्हणून केले त्या साऱ्यातच अभिरुची आणि दृष्टिकोन यांचे सर्वसमावेशकत्व दृग्गोचर होते उदाहरणार्थ, त्याच्या अफाट साम्राज्यात बोलल्या जाणाऱ्या कन्नड, तेलगू, तामिळ इत्यादी सर्वच भाषाना त्याचा उदार आश्रय असे

कृष्णदेवरायाच्या राजवटीत (१५०९-१५२९) साम्राज्याने वैभवाचा कळस गाठला तो बलाढ्य विजेता आणि महान प्रशासकही होता साहित्य आणि ललितकला यांची अभिजात अभिरुचीही त्याच्या ठायी होती परदेशी लोकांशी तो ज्या सौजन्याने वागे त्यावरून हे स्पष्ट दिसून येते की तो सर्वार्थांनी खराखुरा राजा होता

आपल्या शत्रूंना पराभूत करून आपले साम्राज्य सुसघटित करण्यासाठी कृष्णदेवरायाला अनेक स्वाऱ्या हाती घ्याव्या लागल्या युद्धाच्या आखणीतील कौशल्य, सघटनेतले नैपुण्य आणि सैनिकी डावपेचातील चातुर्य यांच्या बळावर तो सतत विजयी होत गेला रायचूरच्या लढाईत (१५२०) त्याने विजापूरच्या सुलतानावर निर्णायक विजय मिळविला गुलबर्ग्याच्या सुलतानाला फिरून राज्यावर बसविण्याच्या राजनीतिनैपुण्यामुळे त्याला 'यवनराज्य प्रतिष्ठापनाचार्य' ही पदवी मिळाली ओरिसाचे राजे आणि कर्नाटकातील छोटे छोटे संस्थानिक यांच्या विरुद्धही तो असाच यशस्वी ठरला

विरूपाक्षमंदिराच्या प्रवेशद्वारावर त्यानेच गोपुर उभारले त्याचे राजसभागृह त्याच्याच राजवटीत उभारल्या गेलेल्या प्रासादातले एक होय आपल्या मातेच्या सन्मानार्थ त्याने नागालपुर नगर वसविले त्याची भरभराट आजही चालूच असून लवकरच ते (होस्पेट) एक पोलादनगर बनणार आहे ' कृष्णदेवरायाची वीस वर्षांची राजवट म्हणजे दक्षिण भारताच्या इतिहासातले एक संस्मरणीय युग होय आपल्या प्रजाजनांची सुरक्षितता आणि कल्याण यांचाच विचार प्रामुख्याने मनात बाळगणाऱ्या हिंदू राजाचा आदर्श स्वत पुढे ठेवणाऱ्या राज्यकर्त्याचे उत्कृष्ट उदाहरण आपल्याला त्याच्या रूपाने मिळते (**युगायुगातला कर्नाटक**)

या महान साम्राज्याने वैभवाचा कळस गाठला होता त्या काळी त्याच्या राजधानीला भेट देणाऱ्या अनेक प्रवाश्यांपैकी एकाच्या शब्दात त्या साम्राज्याचा स्मृतिलेख आपण आता लिहू या त्यातले कित्येक पोर्तुगीज होते पोर्तुगीजांनी गोवा जिंकले याकडे डोळेझाक करण्याच्या धोरणासाठी कृष्णदेवरायाचे कौतुक करणे शक्यच नाही शतकानुशतके तो कर्नाटक साम्राज्याचा भाग होता विजापूरच्या सुलतानाने

तो आपल्या राज्याला जोडून दिला होता १५१० मध्ये अल्बुकर्कने गोवा विजापुरी सुलतानाच्या तावडीतून हिरावून घेतला सम्राट कृष्णदेवरायाने तटस्थतेची भूमिका दोन कारणापायी स्वीकारली सागरी व्यापारातून अरब आणि पर्शियन लोकाची हाकालपट्टी करणाऱ्या पोर्तुगीजांशी मित्रत्वाचे सबध जोडणे हितावह होते, विशेषत युद्धोपयोगी घोड्याची सम्राटाला निकड भासे आणि पोर्तुगीज लोक ते पुरविण्यास समर्थ असत दुसरे म्हणजे त्याला असे वाटे की विजापुरची हानी हा विजयनगरचा लाभच होय पण हे धोरण अदूरदृष्टीचे होते हे मागाहून घडलेल्या घटनांनी दाखवून दिले आहे

कृष्णदेवरायाच्या काळातील एका प्रवाश्याने आपल्या नाडहब्बचे म्हणजेच नवरात्र उत्सवाचे वर्णन केले आहे भव्य राजसभेचा देखावा, मल्लाच्या कुस्त्या, स्त्रियाचे नृत्य, घोड्यावरून केलेल्या लुटुपुटीच्या लढाया, रगीबेरगी दारूकाम, प्रातोप्रांतीच्या राज्यपालाच्या विजयी रथाचे सचलन, राजाला अभिवादन करण्यास शिकविलेल्या हत्तींची मिरवणूक या साऱ्यामुळे या प्रसगीच्या आनदोत्सवात भरच पडे महोत्सवाचा शेवट एका भव्य सैनिकी पर्यवेक्षणाने होई आणि उठावदार देखावा उघडच त्या ऋतूला सर्वात जास्त ठळकपणे डोळ्यात भरणारा ठरे (डोमिंगो पायस)

अलिय रामराया हा कृष्णदेवरायाचा जावई त्याने सार्वभौम सत्ता हाती घेतली रामराया शूर सेनानी आणि समर्थ प्रशासक होता आधुनिक धर्तीचा तो एक चाणाक्ष राजनीतिज्ञ असून आजच्या काळातील राजकारणी पुरुषाहून तो रेसभरही कमी नव्हता सैन्याला बळकटी आणण्याच्या दृष्टीने त्याने कित्येक मुस्लिमांचा भरणा आपल्या सेनेत केला आणि त्याना उच्च पदीही चढविले यामुळे तालिकोटच्या लढाईत निर्णायक भूमिका बजावण्याची सधी मुस्लिम सेनापतीना लाभली एका मुस्लिम सत्तेला दुसरीविरुद्ध चिथविण्यास काही काळ रामदेवरायाला यशही लाभले पण मुस्लिमानी लवकरच हा डाव ओळखला आणि त्यांनी आपली आघाडी सघटित केली या आणीबाणीच्या लढाईत दोन मुस्लिम सेनानी शत्रूला जाऊन मिळाले आणि अशा प्रकारे त्यांनी आकस्मिकपणे साम्राज्याचा नाश घडवून आणला त्या काळातल्या सर्वात भरभराटलेल्या नगरीला च्छिन्नविच्छिन्न वास्तूच्या ढिगाऱ्याचे स्वरूप आले हपी येथील भग्नावशेष विजयनगर साम्राज्याच्या प्राचीन वैभवाचे आणि थोरवीचे आजही स्मरण करून देतात

**बगलोरचा सस्थापक**

विजयनगरच्या पाडावापासून ते श्रीरगपट्टणचा पाडाव होईपर्यंत ज्या राज्यकर्त्यांनी कर्नाटकच्या निरनिराळ्या विभागावर आधिपत्य गाजविले त्याची सख्या

इतकी मोठी आहे की माणूस गोंधळून जातो त्यातल्या ज्या थोड्यानी आपल्या मागे मिदिरे, मशिदी व चर्च यांच्या रूपाने चिरस्थायी स्मारके करून ठेविली आहेत किंवा निराळ्या रीतीने कर्नाटकची सास्कृतिक परपरा समृद्ध केली आहे त्याचाच तेवढा विचार आपण करू या

येळहाक प्रभूचा आवर्जून उल्लेख करायला हवा कारण, ते बगलोरचे सस्थापक होत आरभी ते विजयनगरचे माडलिक होते आणि पधराव्या शतकापासून सतराव्या-पर्यंत त्यानी येळहाक, मगदी व बगलोर याच्या आसपासच्या प्रदेशावर राज्य केले मध्ययुगीन राज्यांच्या पालटत्या भागधेयाच्या अनुरोधाने त्यानाही, कधी मराठ्याचे, कधी विजापुरी शहांचे अधिराज्य मान्य करावे लागे १६८७त बगलोर मैसुरात समाविष्ट झाले बगलोरच इतिहास दहाव्या शतकापर्यंत मागे नेता येतो अलीकडेच उत्खननात आढळलेल्या रोमन नाण्यावरून असे दिसून येते की खिस्ती शकाच्या पहिल्या काही शतकांत ते बहुधा व्यापाराचे भरभराटलेले केद्र असावे परतु आजचे बगलोर मात्र पहिल्या कॆंपेगौडानेच बसविलेले आहे गवि गगाधरेश्वराच्या प्राचीन देवालयाचा त्याने विस्तार केला एक नगारा, एक छत्र आणि एक त्रिशूळ असे या गुफामदिरातले तीन एकसघ स्तभ आजही प्रवाश्यांचे आकर्षण बनून राहिले आहेत कॆंपेगौडाने एक तलावही बाधला आणि आपल्या कुलदैवताच्या सन्मानार्थ त्याला कॆंपांबुधि असे नाव दिले बसवेश्वर मदिरासमोर त्याने अकरा फूट उचीचा एक सुदर नदी बसविला आजनेय, गणपती, नदीश्वर आणि मल्लिकार्जुन या देवळाचा या ठिकाणी असलेला चौकडा केपेगौडाच्या धार्मिक सहिष्णुतेची साक्ष देतो

नगराच्या भावी विस्ताराची निदर्शक म्हणून केपेगौडाने चार निरीक्षण गोपुरे उभारली तसा या नगरीच्या विस्ताराला अमाप वाव असल्याचे आढळून आले आहे परतु या गोपुरासाठी निवडलेल्या स्थानावरून केपेगौडा हा दूरदृष्टी मनुष्य लाभला असल्याचे दिसून येते कॆंपेगौडा जेथे जेथे म्हणून जाई त्या प्रत्येक ठिकाणी देवळे उभारण्याविषयी, तलाव बांधण्याविषयी आणि अग्रहार दान करण्याविषयी तो विशेष कळकळ बाळगी शिवगगा आणि उल्सऊर येथील मदिराच्या अस्तित्वाचे श्रेय याच घराण्याकडे जाते

बगलोरचा इतिहास म्हणजे ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीच्या दोन शतकांतील मैसूरच्या धामधुमीच्या इतिहासाचा स्मृतिलेखच होय विजापूरच्या सुलतानाचे माडलिकपण धारण करणाऱ्या शहाजीच्या आणि त्याच्या वशजाच्या आधिपत्या-खाली ते गेलेले होतेच (१६३९–८७) बाल्यावस्थेत शिवाजी काही काळ बगलोरात राहातही असे काही थोडे दिवस मोंगलाच्या वर्चस्वाखाली आलेले बगलोर १६८७त चिक्कदेवराय वोडियारने जिंकून घेतले पुढे टिपू सुलतानाने तेथे राजवाडा बाधला

याच सुलतानाच्या करमणुकीसाठी विख्यात लालबाग उद्यानाची आखणी दोनशेवर वर्षांपूर्वी करण्यात आली श्रीरंगपट्टणच्या पाडावानंतर बंगलोरचा काही भाग वोडियारना परत करण्यात आला (१७९९) कँटोनमेंट मात्र १९४७ पर्यंत ब्रिटिशांच्याच प्रत्यक्ष सत्तेखाली होते सॅन्डर्स्टहून पदवी मिळविल्यानंतर वुइन्स्टन चर्चिल यांनी सैनिकी इतिहासाचे अध्ययन करीत ब्रिटिश साम्राज्याचा इतिहासकार बनण्याची स्वप्ने रंगवीत काही काळ याच ठिकाणी व्यतीत केला होता

बंगलोर महापालिकेच्या क्षेत्रात सर्व ठिकाणी आढळणारी मंदिरे, मशिदी, चर्च आणि पुतळे ऐतिहासिक स्मारकेच आहेत रस्त्याचे नव्याने नामकरण करण्याचा हव्यास बाळगणाऱ्या आपल्या नगरपित्यांनी या संबंधात वरील बाजूचा विचार करावा आणि इतिहास कितीही अप्रिय असला तरी त्याच्या या भागावर आवरण घालण्याचे टाळावे हे चांगले इतिहासापुरताच विचार करायचा तर घड्याळाचे काटे उलटे फिरविता येत नाहीत ही म्हण अक्षरश खरी ठरते ज्यांना म्हणून भूत-काळात डोकावून पाहण्याची इच्छा असेल त्यांच्या दृष्टीने बंगलोर हे दृष्टिद्वारा शिक्षण देणारे एक सत्यस्थितिदर्शक वस्तुसंग्रहालयच आहे बंगलोरमधील वास्तूंच्या नानाविध शैली पाचशेंवर वर्षांच्या काळाचे दर्शन घडवितात

### मैसूरचे वोडियार राजे

वोडियार घराण्याचा संस्थापक यदुराज होय (१३९९) जवळ जवळ दोनशे वर्षेपर्यंत वोडियारांना छोटेसे संस्थानिक म्हणून राहावे लागले होते विजयनगरच्या पाडावाने मात्र त्यांना राजप्रतिनिधीच्या आसनावर बसून राजघराण्याला साजेशा पदव्या धारण करण्याची संधी दिली 'बिरुदतेंबर गंड' (बिरुदे धारण करणाऱ्यातला प्रमुख) आणि 'कर्नाटक-चक्रवर्ती'

विजयनगरच्या सम्राटाचे सार्वभौमत्व मानण्याची परंपरा मात्र रणधीर कण्ठीरव नरसराज वोडियारच्या काळापर्यंत वोडियारांनी चालूच ठेविली होती (१६३८–५९) मैसूरच्या राज्यकर्त्यांचे स्वातंत्र्य व्यावहारिक दृष्ट्या ठामपणे घोषित करणारा तोच पहिला राजा होय दलवायांच्या गगनाला गवसणी घालू पाहणाऱ्या महत्त्वा-कांक्षेला आळा घालण्यातही तो यशस्वी ठरला स्वत ला सगळीकडून घेरून बसलेल्या शत्रूवरही त्याने विजय मिळविला मदुरा, इक्केरी, पेरियपट्टण आणि नागमंडळ येथील हिंदू राजाच्या भरीला त्याला विजापूरच्या सुलतानाशी सामना करावा लागला मैसूरची प्रादेशिक एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी त्याला सारे युद्ध-कलाचातुर्य आणि शासनसामर्थ्य पणालाही लावावे लागले टांकसाळ घालून त्याने स्वत च्या (कण्ठीरव वराह या) नावाची नाणीही पाडली

कण्ठोरवामागून राज्यावर आलेला देवराज वोडियार (१६५९–७३) याचे स्मरण त्याने चामुंडी टेकडीच्या शिखरापर्यंत १००० पायऱ्या बांधल्या म्हणून ठेवावयाला हवे टेकडीच्या अर्ध्या चढणीवर स्थानिक कणप्रस्तर पाषाणातून कोरलेला भव्य नंदीही त्यानेच बसविला त्याच्यामागून राज्यावर आला मैसूरचा सर्वांत कीर्तिशाली राजा (१६७३–१७१४) चिक्कदेवराज विजापूरच्या सुलतानासकट आपल्या सर्वच शेजाऱ्याच्या आक्रमक आकांक्षाना आळा घालणे त्याला भाग पडले पुढे तर दुर्जेय अशा शिवाजीनेही स्वत च्या नेतृत्वाखाली स्वारी केली (१६७७) १६८२ त मराठ्यानी मैसूरवर दुसऱ्यांदा चाल केली पण या दोन्ही स्वाऱ्या परतविण्यात आल्या

आपले आसन स्थिर करून चिक्कदेवरायाने १६८७ पर्यंत आपल्या राज्याचा पुष्कळच विस्तारही केला होता त्याने बगलोर पादाक्रांत केले कणिक लिंगप्पैयाच्या नेतृत्वाखाली त्याने औरगजेबाकडे प्रतिनिधिमडळही पाठविले त्याचा परिणाम डोळयात भरण्याजोगा होऊन मैसूरचा राजा मोगल सम्राटाचा मित्र, सिंहासनावर स्थिरपद झालेला आणि आक्रमणाच्या भयापासून मुक्त गणला जाऊ लागला त्याचे अतर्गत धोरणही कमी नाट्यपूर्ण नव्हते निष्णात मत्रिमडळाचे त्याला सहाय्य असे साऱ्या राज्यभर डाक नेण्याआणण्याची व्यवस्था करण्यात आली होती भूमीवरील आणि इतरही कर निश्चित ठरवून लेखनिविष्ट केले होते शासनयत्रणा आठरा विभागात (आठरा कचेऱ्या) वाटलेली होती काळजीपूर्वक मितव्यय करून या राज्यकर्त्याने राज्याच्या कोशात नऊ कोट पगोडे साठविले होते त्याचा नवकोट नारायण म्हणून गौरवही केला जाई

राजाश्रयाखाली उद्योगधदे आणि शेती याची भरभराट झाली राजाने बारा सहस्र विणकर बगलोरात आणून वसविले आणि बनविलेल्या वस्तूंच्या निर्यातीचीही व्यवस्था केली त्याने धरणे आणि कालवे बाधले आणि अशा प्रकारे ओलिताखाली येणाऱ्या क्षेत्रात भर घातली त्याने कित्येक मदिरे उभारली आणि विद्वान वाङमयनिर्मात्याना आश्रय दिला

चिक्कदेवरायानतर जवळजवळ एक शतकपर्यंत वोडियाराची राजवट चालू राहिली पण खऱ्या अर्थाने त्यानी राज्य मात्र केले नाही दलवई आणि सेनापती हेच वस्तुत राज्यकर्ते होऊन बसले ,टिपू सुलतानाने तर नवे राजघराणेच स्थापन करण्याचाही घाट घातला होता युरोप खडात फ्रेंच आणि इग्रज याची युद्धे चालू असलेला तो काळ होता ब्रिटिशाच्या राजकारणपटुत्वामुळे निजाम व मराठे त्याच्या पक्षाला मिळाले टिपू सुलतानाच्या मानाने ही राजनैतिक एकजूट अजिंक्यच ठरली त्याने माघारी वळून श्रीरगपट्टणचा आसरा घेतला ब्रिटिशाना अचानक धाड घालून

ते ठाणे हस्तगत करावे लागले भाषिक अथवा सांस्कृतिक एकात्मतेचा विचारही न करता कर्नाटकची विभागणी अनेक शासकीय विभागांत करणे त्यांच्या धोरणाच्या दृष्टीने आवश्यक होते त्यामुळे त्यांनी सागरतीराचा पट्टा स्वतःच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली ठेवला रायचूर, बेदर आणि गुलबर्गा निजामाच्या वाट्यास आले उत्तर कर्नाटकाचे जिल्हे मराठ्यांनी आधीच पादाक्रांत केलेले होते त्यावर राज्य करण्याची मोकळीक त्यांना देण्यात आली अशा प्रकारे बेळगाव, विजापूर आणि धारवाड हे कन्नडभाषिक जिल्हे दक्षिण महाराष्ट्र म्हणून ओळखले जाऊ लागले कोणीही प्रतिस्पर्धी न उरलेले भारताचे राज्यकर्ते म्हणून ब्रिटिशांना मान्यता मिळाल्यानंतर त्यांनी जुन्या मैसूरव्यतिरिक्त सर्व कन्नड-भाषिक प्रदेशाची वाटणी दोन इलाखे आणि अनेक एतद्देशीय संस्थाने यांत करून टाकली

आता आपण चौथ्या कृष्णराज वोडियारच्या राजवटीपर्यंत येऊन ठेपलो तो मैसूरचा शेवटचा गौरवशाली राजा होय सी रंगाचार्य, के शेषाद्री अय्यर, एम विश्वेश्वरय्या, आणि मिर्झा इस्माइल या महान मल्यांच्या मंडळाचे निष्णात सहकार्य त्याला लाभले होते टप्याटप्याने स्वातंत्र्याचा विकास घडू देण्याची ब्रिटिश राजनीती या राजानेही अनुसरली राजनियुक्त सभासदांचा समावेश असलेली प्रतिनिधि-सभा १८८१ त स्थापन करण्यात आली १८९१ मध्ये निवडणुकीची पद्धती चालू केली गली कालांतराने विधिमंडळाचीही जोड देण्यात आली

१९२३ मध्ये विधिमंडळाला विधिवत् मान्यता मिळाली १७ मार्च १९२४ ला महाराजाने प्रतिनिधि-सभा आणि विधिमंडळ यांच्या संयुक्त बैठकीचे औपचारिक रीत्या उद्घाटन केले अशा प्रकारे प्रांतांमधून द्विदल राज्यपद्धतीचा प्रयोग ब्रिटिश राज्यकर्त्यांनी करून पाहण्याच्या पुष्कळच आधीपासून लोकसत्ताक शासनाच्या प्रणालीशी जुन्या मैसूरच्या लोकांचा परिचय झालेला होता

जनतेचे हित साध्य करण्याच्या खटपटीत मैसूर या एतद्देशीय संस्थानाने कितीतरी गोष्टी पहिल्या प्रथमच चालू करण्याचा अग्रमान पटकावला आहे विश्वविद्यालय असलेले पहिले (१९१६), लोखंड, सीमेंट, कागद, साखर, चिनी मातीची भांडी, साबण, रेशीम, इत्यादी उद्योग मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक क्षेत्रद्वारा हाती घेणारे पहिले, आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने विचार करणारे पहिले, शिक्षणाला व्यावसायिक कल देणारे पहिले आणि जलविद्युत्प्रकल्पाचा प्रारंभ करणारे पहिले, इत्यादी महाराजा आणि सर मिर्झा यांना नगरांच्या सुव्यवस्थित आखणीचा छंद होता जुन्या मैसूरच्या कित्येक विभागातील बंगलोर, तुमकुर, मंड्या, शिमोगा, आणि मैसूर नगरी यातील नवीन वास्तूंच्या भव्य रांगांवरून त्यांच्या उच्च अभिरुचीची कल्पना येते सुंदर नगरीच्या आदर्शासंबंधी आपण सर मिर्झांचेच ऋणी आहोत

सर एम् विश्वेश्वरय्या यानी कृष्णराजसागर धरण बाधले तर वृदावन उद्यानाची आखणी करून सर मिर्झानी गौरवाचा कळस गाठला

**सतराव्या व आठराव्या शतकातले कर्नाटक**

नृपतुगाने आखून दिलेल्या कन्नड देशाच्या चतु सीमा जवळजवळ शभर वर्षे टिकून राहिल्या तेथून पुढे मात्र आपली प्रादेशिक एकात्मता राखणे कन्नडिगाना वारवार कठीण जाऊ लागले तेराव्या शतकात हा प्रदेश यादव आणि होयसाळ याच्यात आडवा कसा विभागला गेला ते आपण पाहिलेच आहे विजयनगरच्या काळी कर्नाटक साम्राज्याच्या या दोन विभागाचे फिरून एकीकरण झाले होते परतु तेव्हादेखील कृष्णा व तुगभद्रा या दोन नद्यामधील प्रदेश एकाच्या हातून वारवार दुसऱ्याच्या हाती जात असे विजयनगर साम्राज्याच्या पाडावाचे पर्यवसान तर कर्नाटक खडविखड होण्यात झाले १५६५ नतर विजापुरी सुलतानानी आणि पुढे मराठ्यानी तुगभद्रेच्या उत्तरेकडचा बराचसा प्रदेश पादाक्रात केला सतराव्या आणि आठराव्या शतकात तर उभ्या भारताचाच राजकीय दृश्यपट अराजकाच्या अवस्थेत होता चौथ्या मैसूर युद्धात जिकलेल्या प्रदेशाची (१७९९) वाटणी करण्याच्या निमित्ताने तर कर्नाटकाच्या खडविखडित अवस्थेवर दीडशे वर्षांच्या कालावधीपुरती ब्रिटिश राज्याची निर्णायक मुद्राच उठविली गेली मुबई राज्याच्या काही भागातल्या कन्नडिगाना मराठी शिकावे लागे, मद्रास राज्यात त्याना तमिळ किंवा तेलगू शिकणे भाग पडे तर हैदराबादेत त्याना उर्दू शिकावे लागत असे कारण, या भाषा त्या त्या राज्याच्या अधिकृत भाषा म्हणून मान्य झाल्या होत्या कन्नड-भाषिक लोकाजवळ जोपासण्याजोगी भाषा, साहित्यसपदा किंवा सस्कृती जणू नाहीच असा भास त्यामुळे होई (प्रा एम् व्ही कृष्णाराव)

निरनिराळे नवाब, पाळेगार आणि राजे याच्यात जणू कर्नाटकाची वाटणी झाली होती राजकीय दृश्यपटात विविध रगरूप धारण करणारे परिवर्तन घडून येत असतानाच्या गदारोळात दोन सत्य घटनाचा निर्देश मात्र अभिमानाने करायला हवा १६७२ मध्ये मूर्धाभिषिक्त झालेल्या शिवाजीच्या रूपाने एक नवा पाठिराखा हिंदू राष्ट्रवादाला अरविडू घराण्यातला शेवटचा राजा परलोकवासी होण्यापूर्वीच लाभला दुसरे म्हणजे मैसूरचे वोडियार आणि केळदीचे नायक यानी विजयनगरची सास्कृतिक परपरा जतन करण्याचा आटोकाट प्रयत्न केला पुढे आले ब्रिटिशाचे राज्य त्यानतरच्या राजकीय घडामोडी इतक्या सुप्रसिद्ध आहेत की त्याचा येथे आढावा घेण्याची आवश्यकता नाही सास्कृतिक घडामोडीपुरता विचार करायचा तर सरदार पणिक्करांचे मत उद्धृत करण्यास प्रत्यवाय नाही दक्षिण भारताच्या इतिहासाची काही स्वतत्र वैशिष्ट्ये आहेत त्यामुळे उर्वरित भारताच्या इतिहासाहून

तो स्पष्टपणे निराळा ठरतो—त्याच्या सामाजिक सघटनेची अखडितता व स्थिरता आणि त्याच्या सस्कृतीची एकात्मकता

**केळदीचे नायक** (१५५०–१७६३)

विजयनगरच्या पाडावानतर या साम्राज्याच्या सथ विनाशाचा काळ चालू झाला सामतमडलयुक्त शासनपद्धतीपायी अनेक छोटचा सस्थानाच्या वाढीस उत्तेजन मिळाले कित्येक पाळेगार राजेच बनले त्यातले मैसूरचे वोडियार आणि केळदीचे नायक याच्या भाग्याचे चढउतार काहीशा विस्ताराने निवेदन केलेच आहेत कारण, या दोन कानडी घराण्यांकडेच विजयनगरच्या परपरेचा उत्तराधिकार चालत आला होता त्याचा पराक्रम आणि जागरूकपणा यांमुळेच तुगभद्रेच्या दोन्ही बाजूना आणि समग्र सागरतीराच्या पट्टयात कन्नड भाषा आणि सस्कृती भरभराट साधू शकली मोगल व विजापुरी सुलतान याची कर्नाटक पादाक्रात करण्याची खटपट मोडून काढण्यात आली आणि आमच्या सास्कृतिक परपरेचे सातत्य टिकून राहिले

या स्थानिक आपत्तींच्या भरीला दक्षिण भारताच्या राज्यकर्त्यावर विदेशात उगम पावलेल्या आपत्तीनाही तोंड देण्याची पाळी आली ती म्हणजे सागरावर सचार करणाऱ्या पोर्तुगीज, फ्रेंच आणि ब्रिटिश या राष्ट्रांची साम्राज्यपिपासू महत्त्वाकाक्षा पोर्तुगीजाच्या आक्रमक हेतूला पायबद घालण्यास केळदीला यश लाभले कारवार ते कासरगोडपर्यंत उभ्या पश्चिम तीरावर नायकाचे आधिपत्य होते तीरावरील सखल प्रदेशात आणि त्यालगतच्या समृद्ध अतर्भागातील भूमीत तादूळ, मिरी आणि इतर वस्तू याचा लाभदायी व्यापार चालू ठेवायचा तर इग्रज व इतर व्यापाऱ्याना नायकाची अनुज्ञा घ्यावी लागे मगरूळ, भटकळ आणि कारवार यासारख्या बदराचे उल्लेख आपणांस आढळतात ते याच सदर्भात पूर्वेकडील अत्यत समृद्ध नगरींपैकी एक म्हणून बिदनूर ही राजधानी विख्यात होती त्याची आधीची राजधानी केळदी दक्षिण भारताचे कोठार म्हणून ओळखली जाई नायकांनी नौदल उभारण्याचे मनावर घेतले नाही परतु पश्चिम तीराची प्रादेशिक एकात्मता मात्र त्यानी जतन केली होती हा प्रदेश दोन जिल्ह्यांत विभागला गेला तो ब्रिटिशांचे राज्य स्थापन झाल्यानतरच

कर्नाटकाच्या या भागाला देण्यासाठी निवडलेल्या नावावरून राज्यकर्त्यांचे अज्ञानच उघडकीस येते 'कॅनरा' हे उघड उघड कन्नड शब्दाचेच चुकीने लिहिलेले रूप आहे प्रत्यक्षात या जिल्ह्यातील लोकाची मातृभाषा उत्तर कानडात कोकणी तर दक्षिण कानडात तुळू आहे 'कॅनरीज' हे रूप तर ग्राम्य असून त्याच्या वापराला उत्तेजन मिळता कामा नये मैसूर गॅझेटियरमधील एक उतारा येथे उद्धृत करणे उचित होईल (१९२७)

' उभ्या भारतातील एकशेदहा लाख कन्नड भाषिकापैकी जवळजवळ अर्धे मैसुरात आढळतात हे नाव अनेक अपभ्रशाना बळी पडलेले आहे इग्रजी लेखकानी ' कॅनरीज ' बनविले तर सस्कृत पडितांनी ' कर्नाटक ' । ' करूनाडू ' ही व्युत्पत्ती एवढे दर्शविते की ते नाव या राज्याच्या उचवटचाच्या किंवा पठारी प्रदेशाला यथार्थ-पणे लागू पडते तीरावरील पट्टचाला ते लावण्यात आले ते मात्र अज्ञानामुळे त्यातूनच कॅनरा आणि कॅनरीज ही विपर्यस्त नावे जन्मास आली '

नायकाच्या आश्रयाखाली रचल्या गेलेल्या एका महाकाव्यामुळे सामाजिक इतिहासावर मोठाच प्रकाशझोत पडतो आणि म्हणून इतिहासकारानी त्याचा अभ्यास करायला हवा आहे लिंगण्णाचा 'केळदीनृपविजयम्' नावाचा कन्नड ग्रथ साहित्यिक गुणवत्तेपेक्षा ऐतिहासिक दृष्टचाच अधिक मोलाचा आहे तो १७६३–१८०४ या काळात रचलेला असून त्यात भारतातील राजकीय घडामोडींचे वेधक चित्र रेखाटलेले आढळते

१५५०–१७६३ या जवळजवळ अडीचशे वर्षांच्या काळात दक्षिण भारतातील एक मोठी सत्ता म्हणून हे हिंदू राज्य मान्यता पावले होते उत्कर्षाच्या शिखरावर असताना ते गोव्यापासून कॅनॅनोरपर्यंत पसरलेले होते आजचे कारवार, शिमोगा आणि मगळूर हे जिल्हे त्यात मोडत हस्सन, चिक्कमगरूळ, चित्रदुर्ग आणि धारवाड जिल्ह्याचेही काही भाग केळदीच्या राज्यात समाविष्ट होते केरळाचाही एक तुकडा त्यात अतर्भूत होता केळदीचे सस्थापक कृष्णदेवराय आणि अलिय रामराय याचे समकालीन असून माडलिकही होते सार्वभौम सत्ता आणि माडलिक राजे याचे सबध मात्र स्नेहाचेही होते साम्राज्याच्या शत्रूशी लढाई करून पहिल्या दोन नायकानी विशेष मान्यता मिळविली होती

वोडियार आणि नायक याच्यात कित्येक गोष्टीमध्ये सादृश्य आहे वोडियाराना आपली राजधानी दोनदा हलवावी लागल्याचे आपणास माहीत आहेच श्रीरग-पट्टणहून मैसूरला आणि मैसूरहून बगलोरला नायकांनीही आपली राजधानी केळदीहून इक्केरीला हलविली आणि इक्केरीहून पुढे बिदनूरला हे नाव ' बिदरूर ' असे असले पाहिजे कारण, ही राजधानी ' वेणुपुर ' म्हणूनही ओळखली जाई नायक आणि वोडियार दोघांचेही राजचिन्ह एकच होते—गडेभेरड दोन्ही घराणी वीर-कर्नाडग असून ते राजे हिंदूच होते परतु परस्पराशी लढत राहणे मात्र त्यांना टाळता आले नाही केळदीला एकूण अठरा नायकानी राज्य केले शिवाप्पा नायकाच्या राजवटीत केळदीचे वैभव शिखराला पोहोचले शिवाप्पा नायकाने ' शिस्त ' या नावाने प्रसिद्ध असलेली राजस्वविषयक नियमावली बनविल्यामुळे तो प्रसिद्धीस आला ' इक्केरी वराह ' नावाचे एक सोन्याचे नाणेही त्याने काढले हे सुस्थिर अर्थ-


व्यवस्थेचे आणखी एक उदाहरण परंतु भारताच्या राजकीय रंगमंचावर शौर्याची भूमिका करणारी व्यक्ती मात्र राजा नव्हे तर एक राणी होती मराठ्यांच्या इतिहासातील एका आणीबाणीच्या काळी राणी चेन्नम्माच्या राजसभेत राजारामाला राजकीय आश्रय मागावा लागला होता (१६७१–९६) ती केवळ निष्णात प्रशासिकाच नव्हे तर एक शूर स्त्रीही होती राजाराम मोगलाच्या हातात सापडणार नाही याची काळजी तिने घेतली त्यामुळे औरंगजेबाचा राग उफाळून आला त्याने केळदी जिंकण्यासाठी प्रचंड सैन्य पाठवून दिले पण चेन्नम्मा स्वत च्या प्रदेशाचे रक्षण करण्यास समर्थ होती जंगलातील युद्धकलेची माहिती मोगल सैनिकांना नव्हती त्यामुळे त्या बलाढ्य सम्राटाला पराभव पत्करावा लागला

पण हैदर अलीने बिदनूरवर आक्रमण केले तेव्हा मात्र त्याची सेना अधिक सुसज्ज होती आणि त्याची हेरयंत्रणाही सुसंघटित होती त्यामुळे केळदी मैसूर राज्याचा भाग बनली विजेत्या हैदरने राजधानीचे बिदनूर हे नाव पालटून तिला हैदरनगर हे नाव दिले पुढे ते नगर याच नावाने ओळखले जाऊ लागले १८३० मध्ये नगर जिल्ह्यात झालेले बंड जुन्या मैसूरमध्ये कमिशनरचे शासन येण्यास कारणीभूत (१८३१–८१) झाले


केळदीचे राज्यकर्ते वीरशैव पंथी होते परंतु कर्नाटकच्या परंपरेला जागून त्यांनीही धर्मसहिष्णुतेविषयी ख्याती मिळविली होती एका धार्मिक उत्सवाच्या वेळी राणी चेन्नम्माने १९६००० जंगमांचे भटक्या वीरशैव साधूंचे आदरातिथ्य केल्याचे सांगतात पण त्याबरोबरच ब्राह्मणी विद्येच्या अभिवृद्धीसाठी अग्रहार उभारण्यात, आणि शृंगेरीला भूमिदान देण्यातही तिने औदार्य प्रकट केले होते साऱ्याच धर्मांतील लोकांना उपासनेचे स्वातंत्र्य उपभोगता येईल तदनुसार साऱ्या राज्यभर मशिदी आणि मंदिरे उभारली गेली या काळात बांधली गेलेली देवळे केवळ ईश्वराच्या महतीचीच नव्हे तर ललितकलांमधील मानवी कौशल्याचीही चिरंतन स्मारके होत

## १७९९ पूर्वीचे कर्नाटक

कर्नाटकाची युगानुयुगांतील राजकीय उत्क्रांती म्हणजे नानाविध रंग आणि पोत यांच्या गुंतागुंतीचे एक जाळेच असल्याचे दाखवून देणारे भरपूर लेखन केले गेले आहे शाश्वत स्मारकांचा विचार करण्यापूर्वी आपण या रंग उडालेल्या चित्रपटाचे दर्शन थोडा वेळ घेऊ या असंख्य नवाब, नायक आणि पाळेगार या अनेक दुव्यांची मिळून कर्नाटकाच्या इतिहासाची लांबच लांब शृंखला बनलेली आहे असे उद्गार डॉ जी एस दीक्षित यांनी काढले आहेत. परंतु स्थलाभावी त्या साऱ्यांचा निर्देश आम्हांला करता येत नाही आणि फिरून इतिहासातल्या या आकस्मिक घटनांना



चित्र ६  श्रीगोमटेश्वराची विशाल प्रतिमा, श्रवणबेळगोळ, जिल्हा हस्सन



चित्र ७ हंपी (होस्पेट, जिल्हा बेल्लारी) येथील श्रीविरूपाक्षाच्या मंदिराच्या आतील भागातील चित्रकारी

चित्र ८ हंपी येथील सुप्रसिद्ध शिलारथ.






चित्र ९  बेलूर येथील मंदिराच्या बाहेरील भिंतींवरील मूर्तिकला.



चित्र १० बेलूर येथील चन्नाकेशव मंदिर; होयसळ वास्तुकलेची उच्चतम कृती.

चित्र ११ निर्मात्याच्या अत्युच्च कलेचे प्रतीक अशी आश्चर्यकारक प्रतिध्वनि मालिका, विजापूर येथील गोलघुमट.



आशय प्रदान करू शकेल असे त्यांचे सजीव नातेही पण नाही ऐतिहासिक आकृतिबंधाच्या अभावी ही असंख्य नावे वाचताना दूरध्वनीच्या सूचीतली परस्पराशी काहीही तार्किक संबंध नसलेली नावे वाचल्यासारखेच वाटेल तरी-देखील विजापूरचे व बेदरचे सुलतान आणि पुण्याचे पेशवे यांजविषयी मात्र काही थोड्या गोष्टी सांगायलाच हव्यात कारण, या निरनिराळ्या सत्तांनी आधुनिक कर्नाटकाच्या घडणीला लावलेला हातभार थोडाथोडका नाही "बहामनी राज्याने (प्राचीन काळातील चालुक्यांप्रमाणे) उत्तर व दक्षिण यांची सांधेजोड करणारे मध्यवर्ती स्थान सांभाळले होते या वस्तुस्थितीतच त्या राज्याचे ऐतिहासिक महत्त्व सामावलेले आहे धार्मिक दृष्ट्या श्रद्धाळू असूनही ते हिंदू प्रजेशी छळवादी किंवा असहिष्णू वृत्तीने वागले नाहीत पाटबंधाऱ्यांच्या मोठमोठ्या योजना त्यांनी हाती घेतल्या, कला व साहित्य यांना उत्तेजन दिले आणि शिक्षणासाठी सढळ देणग्याही दिल्या त्यांचा थोर मंत्री महमद गवान याने तर तीन सहस्रावर ग्रंथ असलेल्या वाचनालयासकट एक महाविद्यालयही (बेदर येथे) काढले " (सरदार पणिक्कर)

बहामनी राज्याच्या फाटाफुटीतून पाच सुलतानी राज्ये उदयास आली त्यातल्या विजापूर आणि बेदर या दोहोंचा कर्नाटकच्या इतिहासाशी जिव्हाळ्याचा संबंध आहे शहाजी विजापूरच्या सुलतानाचा सेनापती होता शिवाजीने कर्नाटकावर स्वारी केली ती बाह्यत तरी आपला पैतृक दायभाग परत मिळविण्यासाठी बंगलोर, बेल्लारी, कोलार, बेळगाव आणि धारवाड आपल्या राज्याला जोडण्याचे प्रयत्न त्याने निरनिराळ्या वेळी केले त्या संघर्षात त्याला आलटून पालटून जयापजय लाभले मुगल सम्राटाचे उत्तराधिकारी या नात्याने कर्नाटकाच्या लोकांकडून चौथाई गोळा करण्याची खटपट पेशव्यांनी केली पण हैदर आणि टिपू यांनी त्यांच्या मागणीला विरोध केला १७९९ पर्यंत कर्नाटक आणि मराठे यांच्यातल्या कटकटी इतक्या विकोपाला गेल्या होत्या की एकदम घाला घालून श्रीरंगपट्टण पादाक्रांत करण्यास पेशव्यांनी ब्रिटिशांना आनंदाने साहाय्य केले परंतु सरते शेवटी याचे घातक परिणाम मराठ्यांनाही भोगावे लागलेच परंतु तात्कालिक परिणाम मात्र मराठ्यांना अनुकूलच ठरला उत्तर कर्नाटकाच्या चार जिल्ह्यांचे आधिपत्य त्यांच्या हाती येऊन त्या जिल्ह्यांना दक्षिण महाराष्ट्र हे नाव देण्यात आले

विजापूरने तर आपले स्वातंत्र्य कधीच गमावले होते कारण, विजापूरवरील विजय औरंगजेबाच्या दक्षिणेतील स्वारीत साध्य झालेल्या कार्यभागातलाच एक भाग होय (१६८६) परंतु विजापूरने शिवाजीला एक स्वतंत्र राजा म्हणून १६६२ मध्येच मान्यता दिली होती साम्राज्य उभे करण्याचे शिवाजीचे धोरण पेशव्यांनी पुढे चालविले होते पण मोगल सम्राटाचे स्थान बळकाविण्याचे पेशव्यांचे सुखस्वप्न पानपतच्या युद्धाने संपुष्टात आणले (१७६१) उत्तरेकडील महत्त्वाकांक्षा

अशी उद्ध्वस्त झाली असली तरी दक्षिणेकडे मात्र पेशव्यानी आपले आक्रमक धोरण चालूच ठेवले होते शेवटी ब्रिटिशांच्या ' फोडा आणि मग झोडा ' या राजनीतीचाच विजय होऊन मराठेही जिंकले गेले

इस्लाम आणि हिंदू धर्म याच्या गाठीभेटीचे आणि सगमाचे फलित काय याचा विचार पुढे करू मूर्ती फोडण्यात आणि मदिरे उद्ध्वस्त करण्यात मुसलमानांना अभिमान वाटे यात काहीच शका नाही पण त्याप्रमाणे त्यानी मोठमोठे प्रासादही बाधले त्याच्या मशिदी व मकबरे, त्याचे महाल व घुमट त्याच्या धर्मश्रद्धेची आणि कलात्मक अभिरुचीची साक्ष देतात विजापूर येथील भग्नावशेष आपणांस कर्नाटकाच्या इतिहासातील विस्मृतिपथाला लागलेल्या एका अध्यायाचे स्मरण करून देतात युद्धाचा तुमुल गदारोळ यापुढे ऐकू येत नाही परतु कलेचे सौंदर्य मात्र टिकाव धरून आहे

" जमशेदने जेथे गौरवशाली राज्य भागले आणि आकठ सुरापान केले त्या राजसभेची राखण सिंह आणि सरडे करताहेत म्हणे ।"

" कला चिरतन असते पण जीवन मात्र भगुर असते "

## उपसहार

२६ जानेवारी १९५० ला लागू करण्यात आलेल्या नवीन भारतीय घटनेनुसार मैसूरचा समावेश ब वर्गातील सस्थानात केला होता महाराजा, हिज हायनेस जयचामराज वोडियार हे या राज्याचे पहिले राजप्रमुख झाले १ नोव्हेबर १९५६ ला सर्व कन्नडभाषिक प्रदेश एकाच शासकीय राज्यात समाविष्ट करण्यात आला व तेव्हापासून त्याना राज्यपाल म्हणू लागले पण आता ते केवळ एक सामान्य नागरिक आहेत ध्यानात ठेवावयाची गोष्ट हीच की उदारमतवादी राजतत्रापासून तो थेट समाजाच्या सभावादी आराखड्यापर्यंतचे हे सारे क्रांतिकारी परिवर्तन अहिंसेचाच मार्ग चोखाळीत घडवून आणलेले आहे

## स्वातत्र्यसैनिक आणि कर्नाटकासाठी आदोलन करणारे वीर

स्वातत्र्यसैनिक आणि कर्नाटकासाठी आदोलन करणारे वीर याच्या निर्देशाविना राजकीय इतिहासाचे हे आख्यान अपुरेच राहील पुष्कळदा या दोनही चळवळी एकाच व्यक्तीच्या ठायी सामावलेल्या असत एस निजलिंगप्पा, आर. आर दिवेकर आणि के हनुमतय्या ही अशी उल्लेखनीय उदाहरणे होत स्वराज्य मिळविण्याचे धावते प्रयत्न कर्नाटकाच्या जनतेने कॉंग्रेस अस्तित्वात येण्याच्या किती तरी आधी (१९०६) पासून चालविले होते अगदी १८२४ मध्येच ब्रिटिश राज्याविरुद्ध बडाचा झेंडा उभारणारी बेळगाव जिल्ह्यातील कित्तूरची चेन्नम्मा हिचा

मराठी ग्रंथ संग्रहालय
५८३ ३५
५१
२७८५९ (स्थळ प्रत)



उल्लेख येथे करता येईल  कर्नाटकाच्या जनतेच्या मनात तिचे आत्मबलिदान अविस्मरणीय बनून राहिले आहे  बहुजनसमाजाची राजकीय जाणीव जागृत करण्याच्या आणि नेत्याना शिक्षण देण्याच्या कार्यात कन्नड वृत्तपत्रानी उचललेल्या वाट्याचा आढावा पुढील प्रकरणात घ्यावयाचा आहे  १९१७ त अलूर वेंकटराव यांनी केलेले कर्नाटक गत वैभवाचे प्रकाशन म्हणजे तर स्वातंत्र्याकडील वाटचालीतील मैलाचा दगडच होय  अलूर वेंकटरावांसारख्या वक्त्यानी व लेखकांनी बहुजन-समाजाचा राजनैतिक आवेश जागवला  त्यामुळे पुढे गांधीनी शिकविलेल्या स्वदेशीच्या मंत्राचा लाभ घेण्यास तो समाज आधीपासूनच सज्ज होऊन राहिला होता  लोकमान्य टिळकाच्या निर्याणानंतर लवकरच गांधी राजकीय आखाड्यात उतरले  बहुजन-समाजाशी संपर्क प्रस्थापित करणे हे त्यांचे महान कार्य  कर्नाटकाच्या लोकानी आपल्या रंगीबेरंगी टोप्या फेकून दिल्या आणि आता ते पांढऱ्या टोप्या अभिमानाने मिरवू लागले  चरखा पावित्र्य, साधेपणा आणि विपुल परिश्रम यांचे प्रतीक बनून गेला  जुन्या परपरांच्या बाटल्यातून त्यानी नवीन आशयाचे नवे मद्य भरले 'कायकवे कैलास' यासारख्या सनातन सत्याचा साक्षात्कार जोडण्याचा मार्ग त्यानी दाखवून दिला "स्वर्ग प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्याच्या आटोक्यात असतो " १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात कन्नडिगानी मोठाच वाटा उचलला आणि त्यामुळे अंकोल्याला भारताच्या नकाशावर बारडोली आणि चंपारण्य याच्या तोडीचे असे स्थान लाभले  १८९० मध्ये धारवाडला स्थापन झालेल्या 'विद्यावर्धक संघा' मुळे सांस्कृतिक पुनरुत्थानाला नवे चैतन्य लाभले  १९१५ मधील कर्नाटक साहित्य ॲकॅडमीची स्थापना कन्नडिगाच्या आशाआकांक्षाना इष्ट तो आकार देण्याच्या दृष्टीने उपकारक ठरली डी [1] व्ही जी, श्री, मस्ती आणि बी शिवमूर्ती शास्त्री या तिच्या प्रमुख पदाधिकाऱ्याना स्वातंत्र्यसैनिकदेखील म्हणता येईल  सांस्कृतिक पुनरुत्थान, आपल्या गौरवशाली परंपरेला यथोचित मान्यता आणि भाषेचे प्रमाणी-करण यासाठी त्यांनी मोठीच चळवळ केली  प्रादेशिक समतोलाचा अभाव दूर केल्या-विना कन्नडिगाची सर्वांगीण प्रगती साध्य करता येण्यासारखी नव्हती  ज्या कारणा-साठी त्याना संयुक्त कर्नाटक स्थापन व्हायला हवा होता त्यातले हे एक  १९२४ च्या बेळगाव राष्ट्रसभेच्या अधिवेशनात कन्नडिगाची पृथक राज्याची मागणी मान्य करण्यात आली  त्याचे स्वप्न साकार कसे झाले याचा वृत्तात आधीच सांगितलेला आहे  मैसूरच्या नव्या राज्याच्या मूळ उद्घाटनापासूनच स्थिर शासनाचे सौभाग्य कर्नाटकला लाभले आहे  युद्धार्जित विजयाहून तिळमात्रही उणे नसलेले विजय शांतता पटकावीत असते  या प्रदेशापुढे आ वासून उभ्या असलेल्या समस्याचा आणि जनतेच्या जनतेकडून आणि जनतेसाठीच कार्यान्वित असलेल्या शासनाला किती प्रमाणात यश लाभले आहे याचा आढावा शेवटच्या प्रकरणात घेतला आहे

---

1 डी व्ही गुण्डप्पा, बी एम श्रीकंठय्या, मस्ती वेंकटेश अय्यंगार.

## ४. साहित्याचा इतिहास

**भाषा**

कन्नड ही द्राविड वंशी समूहातील भाषा आहे प्राचीनतेच्या दृष्टीने तिचा अनुक्रम एका तमिळच्या तेवढा खाली लागतो आदि-द्राविड भाषेपासून कन्नड नेमकी वेगळी कधी झाली याचा निर्णय करता येत नाही इतर भारतीय लिप्यासारखी कन्नड लिपीही अशोककालीन लिपीपासूनच व्युत्पन्न झालेली आहे कन्नड लिपी बव्हंशी तमिळ लिपीशी एकरूप आहे शब्दसंग्रह आणि व्याकरणदृष्ट्या रचना या अंगानी तर त्या भाषा अधिकच निकटच्या आहेत आपण जितके अधिक मागे जातो तितके तमिळ व कन्नड या भाषांत अधिकाधिक साम्य आढळून येते बोली भाषेत समाविष्ट असलेले सगळेच्या सगळे ध्वनी चिन्हांकित करण्याच्या दृष्टीने कन्नड लिपी परिपूर्ण आहे आमच्या लोकाचे एक वैशिष्ट्य इतिहासकाराच्या ध्यानात आलेले आहे महाप्राणयुक्त आणि हकारयुक्त वर्णांच्या उच्चारात काही थोडे काठिण्य जाणवत असल्याचे बोलण्याच्या धाटणीवरून दिसून येते हे ध्वनी असलेल्या शब्दाच्या उच्चारातील बिनचूकपणाचा अभाव म्हणजे ग्राम्यपणाचे चिन्ह होय असा ठपकाही ठेवण्यात आला आहे परंतु 'र' व 'ल' याच्या उच्चारातील पाच संभाव्य ध्वनीत तीन तर या लोकानी सर्वसामान्यपणे वर्ज्यच केले आहेत छंदोबद्ध रचना आणि अर्थभेदाची अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी जुन्या कानडीत या ध्वनींना जिव्हाळ्याचे स्थान लाभले होते ही उपयुक्तता आधुनिक तमिळने जतनही करून ठेविली आहे हे ध्वनी समाविष्ट असलेल्या शब्दांचा नेमका अर्थ आणि अक्षरलेखन जाणून घ्यायची इच्छा असेल तर तमिळमधील मूळ प्रतिरूपे अभ्यासणे आपणास इष्ट ठरेल

तमिळची शब्दसिद्धी तेलुगू, कन्नड आणि मल्याळी यांहून भिन्न आहे संस्कृत-मधून शब्द उसने घेण्यास तमिळी लोक काकू करतात ते देशज धातूवरच काम भागवून घेतात कन्नड, तेलुगू आणि मलयालम यामधील तत्सम व तद्भव शब्दाचे शेकडा प्रमाण खूपच अधिक आहे पुष्कळदा तर संस्कृत शब्द आवश्यकता नसतानाही उसने घेतले आहेत या प्रवृत्तीचा कवींनी वेळोवेळी निषेधही केला आहे सध्याच्या काळात मात्र 'मार्गा'हून 'देशा'ला अधिक अनुकूलता लाभलेली दिसते लय आणि देशज वाक्प्रचार याचा वापर केल्यामुळे काव्याच्या भाषेतून लुप्त झालेले कित्येक आशयघन वाक्संप्रदाय आता सर्रास प्रचलित झाले आहेत

कल्पनांच्या देवाणघेवाणीसकट सर्व व्यापार आणि वाणिज्य याची अभिव्यक्ती करणाऱ्या शाब्दिक ऋणाचे कन्नड भाषेने निरतर स्वागतच केले आहे प्रचारातील शब्दांचे काळजीपूर्वक परीक्षण करून सस्कृत, प्राकृत, पोर्तुगीज, मराठी, हिंदुस्थानी व इग्लिश या परकी भाषाशी आलेल्या आपल्या सबधाच्या इतिहासाविषयी चाणाक्ष तर्क भाषाशास्त्रज्ञ लढवू शकेल सध्या शास्त्रे आणि तत्रविज्ञान यावर जो भर दिला जात आहे त्याचे पर्यवसान इग्लिशमधून अनेक शब्दाच्या गटाची भर पडण्यात होत आहे एके काळी जशी ओढून ताणून सस्कृत पालुपदे लावण्याची टूम पडली होती तसेच गांधी-पूर्वयुगात एकाच वाक्यात कन्नड आणि इग्लिश याची भेसळ करणे हे प्रतिष्ठेचे लक्षण होऊन बसले होते टी पी कैलासन् यांनी या हास्यास्पद सवयीचा उपहास आपल्या हास्यात्मिकातून केला आहे

भाषाशुद्धिवादी आणि पडित मडळी याचे दिवस आता सरले आहेत भाषेकडे पहाण्याचा आजचा दृष्टिकोन अगदी तर्कशुद्ध आहे तिच्या मूळ प्रतिभेला बाधा आणणारे काहीही करता कामा नये आपल्या आदिकवीने तिचे वर्णन तीन शब्दात केले आहे 'हित, मित आणि मृदू वचन ' गद्यापुरता विचार करायचा तर श्रुति-माधुर्य, मिताक्षरत्व आणि नेटकेपणा याना नेमकेपणाची जोड द्यायला हवी मानव जातीच्या विचारांची, भावनांची आणि आशाआकाक्षाची समग्र सृष्टी शब्दरूपाने अभिव्यक्त करण्याच्या दृष्टीने कन्नडजवळची शब्दसामग्री पुरेशी आहे

## प्राचीन–पूर्व कन्नड

"यमकानी नटलेल्या माझ्या समर्थ काव्याहून
कधीच टिकाऊ ठरणार नाहीत सगमरवरी वास्तू वा राजाची सारी स्मारके !"

हे विधान इग्लिश कवींच्या सदर्भात खरे असू शकेल कर्नाटकाच्या सदर्भात मात्र ते नेमके उलटे होऊन बसले आहे पुष्कळ वेळा ग्रथ नष्ट झालेले आहेत परतु पाषाणावरील शिलालेख मात्र कन्नडिगाच्या प्राचीन सस्कृतीशी बोलकी साक्ष देत खडे आहेत

कन्नडचे प्राचीनत्व हल्मिडीच्या शिलालेखाने सिद्ध केले आहे (४५० इ स) भाषाशास्त्रदृष्ट्या तो एक मोलाचा प्रमाणलेख आहे गग राजाने दिलेल्या एका देणगीचे वर्णन त्यात केलेले आहे मूलद्राविडचा आद्यस्थानी येणारा 'व' प्राचीन आदिकन्नडमधे जसाच्या तसा राहिला आहे– "बिट्टिदल्लि वेळेयदे कुडुगे ' (पेरलेले बी नष्ट होवो ) शब्दाचा अर्थही फारसा पालटलेला नाही पण स्वर व व्यजने यात घडून आलेला पालट मात्र भाषेच्या इतिहासकाराच्या दृष्टीने खूपच लक्षणीय आहे.

श्रवणबेळगोळचा शिलालेख (७०० इ स ) जगांतील साहित्यातल्या उत्कृष्ट अशाशी तुलना करण्याजोगा आहे वस्तुत इहलोकातल्या वस्तूची भगुरता कोणत्याही अर्थाने नवीन कल्पना नव्हे परतु शब्दसहतीचा बिनचूकपणा आणि यमकांचे सौंदर्य यांतले यश लक्षणीय आहे

"सुरचपम्बोळ विद्युल्लतेगळ तेरवोळ मजुवोळ तोरिबेग
पेरिगु श्रीरूपलीलाधनविभव रसिगळ निल्लवर्गम् ।"

या ओळी शेक्स्पीअरची आठवण करून देतात

"छायेसारख चचल, स्वप्नासारख छोटुकल विजेसारख भगुर ?
किती झटकन् उजळ वस्तू जातात गडबडून !"

आणि तशीच या बर्नच्या ओळीचीही

"सुखे असतात खसखशीच्या ताटव्यासारखी विस्तृत
फुले घेताच खुडून, जातो बहर ओसरून !"

आपल्या वैशिष्टचाला जागून या जैन कवीने एक नैतिक सिद्धातही दिग्दर्शित केला आहे

"ऐहिक सुखाचा सन्यास घ्या, स्वर्गसुखाचा सचय करा !

## कविराजमार्ग

हा कन्नड साहित्यातला सर्वांत जुना उपलब्ध ग्रथ होय कवीच्या राजमार्गाचे वर्णन करणारे हे काव्य नृपतुगाच्या राजसभेत वास्तव्य करणाऱ्या श्रीविजयाने लिहिले आहे (८१४–८७८ इ स ) पण ते दडीच्या काव्यादर्शाचे कन्नड रूपातर असल्यामुळे या ग्रथाला मौलिकतेवर अधिकार सांगता येत नाही परतु सहस्त्र वर्षांमागील कन्नडिगांच्या राजकीय, सामाजिक आणि साहित्यिक जीवनावर मात्र त्यामुळे पुष्कळच प्रकाश पडू शकतो- 'कावेरी यिंद आ गोदावरीवरम्' या शब्दांत कर्नाटकाच्या सीमा ज्यात रेखल्या आहेत तोच हा ग्रथ जेथे सर्वांत विशुद्ध कन्नड भाषा बोलली जात असे तो प्रदेश म्हणून त्याने उत्तर कर्नाटकातील चार नगरांचा उल्लेख केला आहे

नृपतुग स्वत ही कवित्वपदाचा अधिकारी होता श्रीविजय आपल्या आश्रयदात्या राजाच्याच मताना शब्दरूप देत होता हे उघड आहे त्याने निर्दिष्ट केलेल्या तीन गोष्टी विचारार्ह आहेत त्यांचा सबध पुढील घटकांशी आहे कर्नाटकाचा भौगोलिक विस्तार, कन्नडिगांची सस्कृती आणि निरनिराळ्या कारणामुळे कन्नड भाषेत घडून आलेले फेरपालट कन्नड आता गोदावरीच्या खोऱ्यात वास्तव्य करणाऱ्याची

मातृभाषा राहिलेली नाही नृपतुगाच्या काळी मात्र तुगभद्रेच्या उत्तरेकडचा प्रदेश म्हणजे तर कर्नाटकाचा गाभाच होता आर नरसिंहाचार कन्नड भाषेच्या अर्वाचीन काळातील स्थितीचा विचार करू लागले तेव्हा त्यांना जुने मैसूरच आता कन्नड भाषेचे आणि सस्कृतीचे माहेरधर बनून गेले आहे ही वस्तुस्थिती प्रथम ध्यानी घ्यावी लागली

जुन्या आदि कन्नड भाषेचे स्थान ज्या काळात प्राचीन कन्नडकडे जाऊ लागले होते त्या काळात नृपतुग होऊन गेला कर्नाटक इतक्या प्राचीन आणि एवढ्या अफाट साम्राज्यात बोलीमध्ये अतर पडत जाणे अपरिहार्यच होते त्यामुळेच नृपतुगाला प्रमाणीकरणाची निकड जाणवली

अज्ञात मूक मिल्टन (कवी) आणि खेडेगावातले हॅम्डेन (पुढारी) याजविषयी या कवीने जे उद्गार काढले आहेत त्यामुळे देशभक्तिजन्य अभिमानाने शरीर रोमाचित होते कन्नडिगाच्या जन्मजात व्यवहारचातुर्याची आणि अभिजात अभिरुचीची त्याने तोड भरून प्रशसा केली आहे ते स्वभावत च सुसस्कृत असून काव्य आणि धर्मनिष्ठा याना ते मोठेच मोल देतात

"जुन्या आदिकालीन प्राचीन कन्नडमध्ये कन्नडचे परिवर्तन घडवून आणण्यात अग्रभागी असलेल्या 'कविराजमार्ग' या ग्रथात त्या काळच्या साहित्यसृष्टीतील परिवर्तनशीलतेचे प्रतिबिंब उमटले असून परिणामी त्या ग्रथाने कन्नड साहित्यातील सुवर्णयुगाच्या अग्रदूताचा मानही पटकाविला आहे" (युगायुगातला कर्नाटक)

## कन्नड साहित्याचे कालखड

कन्नड साहित्याला १५०० वर्षांहून प्रदीर्घ अशी गौरवशाली परपरा लाभलेली आहे परतु पपा (९०२ इ स) पूर्वीच्या ग्रथातील बहुतेक ग्रथ आज उपलब्ध नाहीत मिठाचा सत्याग्रह आणि जागतिक मदी या जगाला हादरा देणाऱ्या घटनानतरचा कालखड निरनिराळ्या साहित्यिक आदोलनाचा साक्षी आहे, पण आपण कालदृष्ट्या त्याच्या इतके निकट आहोत की यथातथ्य दृष्टिकोनातून त्याचे निरीक्षण करणे आपल्याला शक्यच नाही उलट तत्पूर्वीच्या जवळजवळ सहस्र वर्षांतील आपल्या साहित्याचे वस्तुनिष्ठ दृष्टीने अवलोकन करणे मात्र अगदी शक्य आहे साहित्याच्या इतिहासाची वाण मुळीच नाही जैन, वीरशैव आणि ब्राह्मण यातल्या ज्या पथाचे साहित्यसृष्टीत वर्चस्व असेल त्याच्या अनुषगाने साहित्यिक दृष्ट्या इतिहासाचे कालखड पाडले जात असत पपा, हरिहर, कुमार व्यास आणि श्री या कवीनी इतिहास घडवून आणला म्हणून त्या त्या कालखडाना त्यांचीही नावे देता यावीत आणखी

फिरून आमच्या कवीनी 'चपू', 'रगळे', 'षट्पदी' आणि अर्वाचीन छद असे जे जे काव्यप्रकार पूर्णत्वाला नेले त्यानाच महत्त्व देणारे इतिहासही आहेतच यशोमदिरात प्रवेश मिळवू पहाणाऱ्या प्रत्येक कालखडातील शेकडो कवीपैकी काही थोडे प्रातिनिधिक कवी विशेष गौरवाने उल्लेखण्याजोगे आहेत निवडक कवीच तेवढे अमर होतात हे एक ऐतिहासिक सत्य आहे दुसरे म्हणजे अधिक परिपूर्ण वृत्तात देण्यासाठी अवश्य त्या स्थलाच्या अभावी निवड करावी लागतेच श्रीचा समावेश करताना परिहार देण्याची आवश्यकता नाही कारण, त्याची जन्मजात गुणवत्ता आणि ऐतिहासिक महती अर्ध्या शतकाहून अधिक काळ मान्यता पावलेली आहे

या योजनेमुळे बारा प्रमुख कवीविषयी थोडीफार सविस्तर माहिती देणे लेखकाला शक्य होईल पपा, रन्न, जन्न, आणि रत्नाकर, हरिहर, राघवाक, कुमार व्यास, लक्ष्मीश, श्री, बेंद्रे, कुवेंपू आणि पूथी ना बसव आणि सर्वज्ञ याही आमच्या साहित्यिक इतिहासातल्या महत्त्वाच्या व्यक्ती आहेत पण आमच्या साहित्यात त्यानी काय भर घातली याचा विचार धार्मिक साहित्य आणि ज्ञानप्रद साहित्य या शीर्षकाखाली करावयाचा आहे

वर जे काही म्हटले आहे ते केवळ काव्यापुरतेच आधुनिक काळात येऊन ठेपे-पर्यंत आमच्या लेखकांनी गद्याचे फारसे सवर्धन केलेच नव्हते आपल्याकडे काही अत्यत सुदर सुभाषिते रूढ आहेत "गद्य कवीना निकष वदन्ति । काव्येषु नाटक रम्यम् । पद्य वद्य हृद्य गद्यम् ।" परतु मानवी कर्तृत्वाच्या इतर क्षेत्रासारखीच साहित्याच्याही क्षेत्रात उपदेश आणि प्रत्यक्ष कृती याच्यामधे सावटच पडलेली आढळून येते मिल्टनच्या भव्योदात्त शैलीत गद्य लिहिण्याचा खटाटोप करणाऱ्या कवीची उदाहरणे आपल्याकडेही आहेत परतु ड्रायडनसारखी गद्याची आगळी वेगळी सुसवादी लयबद्धता कोणालाच साध्य झाली नाही तसल्या गद्याचाही मनोज्ञ प्रभाव पडत नाही असे नाही परंतु ते रसायन इतके तेजस्वी आणि इतके अत्युत्कृष्ट असते की रोजचा आहार म्हणून मानवी प्रकृतीला ते मानवूच शकत नाही कादबरीसारख्या अर्वाचीन कलात्मक साहित्यप्रकारातही यश मिळवून देण्याइतकी कन्नडची शब्द-सहती सर्वतोपरीनी आहे हे दाखवून देण्याचे दायित्व चालू शतकाच्या प्रारभी उदयास आलेल्या एका गौण कवीवरच जणू सोपविण्यात आले होते आजदेखील 'कवी' या उपाधीत काही आगळी मोहिनी आहे इतिहास, निबध आणि चरित्रे लिहिण्यात जिचा अधिक चागल्या प्रकारे विनियोग होऊ शकला असता अशी पुष्कळशी प्रतिभा सामान्य प्रतीच्या काव्याचे सर्जन करण्यात वाया दवडली जात आहे 'कवी हा जन्मजात असतो' या प्राचीन म्हणीत सत्याचा मोठाच अश आहे उलट पक्षी गद्य लेखकाला मात्र अनुकरण करणाऱ्या खटपट्या माकडाची भूमिका घेऊन थोर प्रतिष्ठा मिळविता येते विद्येच्या प्रत्येक क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रावीण्य प्राप्त करून देण्याची

गौरवास्पद खटपट आपली विद्यापीठे करीत आहेत हे ध्यानात ठेवायला हवे आता लोक वैद्यक किंवा ज्योतिर्विद्या यावरील ग्रथ पद्यात लिहीत नाहीत उत्कृष्ट गद्य शैली साकार करण्याच्या कामी विद्यापीठे, लोकप्रिय कादबरीकार आणि जनताप्रिय वृत्तपत्रे यानी उचललेल्या वाटचाचा विचार स्वतत्रपणे करावयाचा आहे

**पपा**

पपाचा जन्म इ स ९०२ मध्ये झाला त्याचा पिता जन्माने ब्राह्मण होता परतु त्याने जैन धर्म स्वीकारला होता मार्मिक उपरोध साधीत पपा म्हणतो की उच्च कुळी जन्मास आलेल्या ब्राह्मणाने अनुसरण्याजोगा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे अहिंसामार्ग पपा लहान असतानाच या कुटुबाला परिस्थितीपायी वैगीमडळ सोडून बनवासीत आसरा घ्यावा लागला त्यामुळेच पपाने जन्मभर बनवासीवर प्रेम केले

इ स चे दहावे शतक प्राचीन कर्नाटकाचे सुवर्णयुग- होते दक्षिण भारताच्या बहुतेक भागावर राष्ट्रकूट आणि चालुक्य सम्राटाचे आधिपत्य होते ते पराक्रमाचे युग होते जन्माला येण्यासाठी पपाला याहून चागला काळ निवडताच आला नसता कारण, तो कवी (विद्वान) आणि कली(वीर) दोन्ही होता त्याला अरिकेसरी नावाच्या चालुक्य राजाचा आश्रय मागावा लागला होता परतु पपाइतका विश्वासू अनुयायी आणि उत्साही भक्त आजवर कोणत्याही सम्राटाला लाभला नसेल पपाने आपल्या आश्रयदात्या राजाला भारतीय युद्धाचा नायक अर्जुन याच्या तोडीचा ठरवून टाकले होते हे समीकरण चालुक्य राजाची स्तुतिस्तोत्रे गाण्याच्या दृष्टीने उपकारक ठरले शांतता आणि युद्ध, प्रासाद आणि झोपडी, नगर आणि ग्रामीण भाग जे काही पपाने वर्णिले त्याचे प्रत्यक्ष ज्ञान त्याला होते त्याचे व्यक्तित्व एकसध होते तो गर्वाने प्रौढी मिरवी की आपण काव्यधर्म व धर्म यांविषयी सारखाच आदर बाळगीत असल्याची धरा आणि स्वर्ग यांविषयीच्या परस्परांशी निगडित असलेल्या कर्तव्याशी त्याने निष्ठा राखली तीनुसार त्याने दोन महाकाव्ये लिहिली जैन धर्माचे वर्णन करण्यासाठी 'आदिपुराण', आणि इहलोकीच्या घटनाचे वर्णन करण्यासाठी 'विक्रमार्जुनविजय' अशा प्रकारे गद्य व पद्य यांचा मार्मिक समन्वय साधणाऱ्या चपू काव्यशैलीत दोन महाकाव्ये लिहिण्याची टूम त्याने रूढ केली ही टूम दोन शतके प्रचारात होती रन्न आणि पोन्न या दोघानीही पपाचे अनुकरण करून एका सताच्या जीवनाचे वर्णन करण्यासाठी एक आणि जगज्जेत्या वीराची कथा निवेदन करण्यासाठी दुसरे अशी दोन दोन महाकाव्ये लिहिली चितनाच्या निस्तेज साचापायी पपा दुबळेही बनले नाहीत, किंवा आध्यात्मिक जीवनाची उपेक्षा करून विलासीही झाले नाहीत विरक्ती व सौदर्याची ऐंद्रिय आसक्ती, समाजातील सुखोपभोगांचा आनद आणि सैनिकाच्या जीवनातली कठोर नियत्रणा व जीवनाचे

रग आणि लय याविषयी उत्कट रसिकता इत्यादी त्याच्या प्रवृत्तीतील वैविध्य त्याच्या लेखनातही प्रतिबिंबित झालेले दिसते बहुतेक वेळा परस्पराशी स्पर्धा करणाऱ्या या प्रेरणाचा समन्वय कसा साधावयाचा ते त्याना स्वत लाच चागले माहीत होते म्हणूनच स्वत च्या जीवनातील प्रगाढ अनुभूतीचे सहजसुदर वर्णन त्याना करता आले गीते व कथा यामध्ये 'बनवासी' नावाने विख्यात असलेल्या मनोरम माळनाड प्रदेशाच्या पपानी केलेल्या सस्मरणीय वर्णनाचा निर्देश आम्ही आधीच केला आहे या ठिकाणी ज्या लोकाच्या जीवनरहाटीचे वर्णन पपा करीत आहेत त्यांपासून ते अलिप्तपणे दूर रहात नाहीत ताल धरणाऱ्या पावलाच्या लयीचा प्रतिध्वनी आपण ग्रहण करू शकतो मधुर आबा आणि सुवासिक जाई दोन्ही कर्नाटकात वैपुल्याने आढळतात सदाहरित अरण्यातील वृक्षांच्या शेंड्यावर बसून आपल्या गाण्याची सुरावट ऐकण्याजोगे कान असणाऱ्या लोकासाठी उलगडून देणे कोकिळेला आवडते तलावात कमळ फुलते, जगलात चदन वाढते आणि वाऱ्याची मद झुळुक कर्नाटकाच्या या भागात वास्तव्य करणाऱ्या लोकापर्यंत या दोहोंचाही सुगध वाहून नेते या सौभाग्याची त्याना उत्कट जाणीवही असते कारण इतर राष्ट्रांचे नागरिक होण्याचा मोह असूनही ते कन्नडिग असल्याचा अभिमान बाळगतात

"आरकुस वित्तीद नेवेवुदेन्न मनम् आ बनवासिदेशम्"

पपा, रन्न आणि नागचद्र यानी दैवहत पात्राची निष्णातपणे व्यक्तिचित्रे रेखाटून शाश्वत कीर्ती जोडली आहे पपाचा कर्ण, रन्नचा दुर्योधन आणि नागाचार्यांचा रावण ही ग्रीक शोकातिकांच्या साच्यात बसविलेल्या नायकाची उदाहरणे होत दैव आणि विमुक्त इच्छाशक्ती यांत नाट्यपूर्ण सघर्ष चालू असतो निष्ठुर दैवाविरुद्ध व्यर्थ झगडणारी मानवाची हतप्रभ इच्छाशक्ती येथे आपल्या दृष्टीस पडते सस्कृत महाकाव्यातील कविसकेताचे हे जैन कवी बांधील नव्हते स्वत च्या उद्दिष्टाला साजेसे परिवर्तन परपरागत कथावस्तूत घडवून आणण्यास आपण स्वतत्र आहोत असे ते मानीत कर्णाच्या शोकपूर्ण भाग्योदयाने पपावर मोठीच मोहिनी घातलेली दिसते ती दोन कारणामुळे जगरहाटीच्या गाभ्यातच झालेले हृदयगम वर्णन वाचकाना हेलावून टाकून अश्रू गाळण्यास प्रवृत्त करण्यास तेथे वाव होता एका भावाची त्याच्याच वडील भावाशी रणागणावर गाठ पडून त्याने त्याचा वध करावा ही घटनाच मुळात पुरेशी विदारक आहे परतु अशा प्रकारे आकस्मिकपणे मृत्युमुखी पडलेला हा वीर तर शौर्याचा पुतळा, दानशौर्याची मूर्ती आणि सत्याचा आदर्श होता पराक्रमाप्रमाणेच सद्गुणातही कर्ण अग्रगण्य होता त्याचे उत्तम गुण इतके विख्यात झालेले आहेत आणि त्याचे मधुर अस्तित्वच असे काही सर्वंकष आहे की ते सपूर्ण महाकाव्यच कर्णाच्या स्मृतिसुगधाने भारलेले दिसते

"कर्णरसायन अळते भारतम्।"

कर्णाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही वीराची आठवण न ठेवण्याची सूचना पपा आपल्या वाचकाना करतो त्या दुर्दैवी पाडवाविषयीच्या सहानुभूतीने त्याला इतकी मोहिनी घातली आहे की त्या महाकाव्याचा नायक अरिकेसरी–अर्जुन आहे याचाही त्याला क्षणभर विसर पडतो दुर्योधनाचे कर्णाशी आदर्श सख्य असल्यामुळे तो महामना ठरतो राजा व त्याचा मित्र याच्या परस्परसबधांची हीच बाजू द्यूतप्रसगीही व्यक्त झाली आहे कर्णाचे दुर्योधनाशी जे नाते होते तेच पपाचे अरिकेसरीशी होते शक्य तितक्या कमी शब्दात आदर्श स्नेहभावाचे अत्यत समर्पक चित्र तो साकार करू शकला ते यामुळेच म्हणूनच त्याने इतर सर्व वीराहून वरचढ अशी कर्णाची थोरवी गाइली आहे

काव्यशैलीविषयीच्या पपाच्या सिद्धाताचा निर्देश मागे केलाच आहे तो स्वत च्या सिद्धाताचे पालनही करतो प्रसगाच्या निकडीनुसार त्याची शैली प्रौढ वा साधी, मार्ग किंवा देशी बनते सूचकता हा त्याचा आगळा गुण होय आणि इतक्या थोडक्यात इतका महान आशय व्यक्त करण्यात दुसरा कोणताही कन्नड कवी त्याची बरोबरी करू शकणार नाही हे निश्चित या ठिकाणी महाभारताची समग्र कथा एकवटली असल्याने हा दृश्य पट दाटीवाटीचा आहे परतु पपा मात्र प्रमाणबद्धतेची आण ठेवण्यात कधीच चुकत नाही काव्यरचनेच्या 'रगळे' व 'वचन' या शैलीना वैष्णव कवीद्वारा लोकप्रियता प्राप्त होईपर्यंतच्या दोन शतकांत त्याच्या चपू काव्याचा प्रभाव कवीवर पडत आला होता तात्पर्य ऐतिहासिक महत्त्व आणि मूलभूत गुणवत्ता या दोन्ही गोष्टी पपाच्या ठायी आहेत म्हणूनच तर्कवाद व कालानुक्रम या दोन्ही दृष्टीनी तो अग्रगण्य ठरतो

### रन्न

सौम्य ९४९ हा सवत्सर कन्नडच्या दृष्टीने भाग्याचा ठरला कारण याच वर्षी विजापूर जिल्ह्यातल्या मुधोळ गावी रन्न जन्मास आला परतु गुरू म्हणून मात्र त्याने श्रवणबेळगोळच्या अजितसेनाचार्यांची निवड केली

त्याचा पहिला आश्रयदाता तळकुडच्या गगांचा एक सेनानी होता गोमटेश्वराच्या भारतीय भीमकाय पुतळ्याच्या उभारणीमुळे चामुडरायाला जागतिक कीर्ती लाभली दुसरा तल्ल या चालुक्य सम्राटाने रन्नला 'कविचक्रवर्ती' ही पदवी दिली अजाणता का होईना पण भावनिक एकात्मता साध्य केल्यामुळे वस्तुत रन्न 'भारतरत्न' या पदवीसही पात्र ठरतो

रन्नचा 'गदायुद्ध' (चित्रभानु ९८२) हा प्राचीन कन्नड ग्रथातला सर्वांत लोकप्रिय ग्रथ आहे आज सहस्र वर्षे तो वाचला जात असून त्याचे कौतुकही होत आहे त्याचे

रंगभूमीसाठी अभिनेय नाट्यात रूपांतर करून 'श्री'ने त्याला अधिकच गौरव प्राप्त करून दिला आहे चार दशकेपर्यंत गदायुद्ध नाटकाने रंगभूमी गाजविली होती

या प्राचीन महाकाव्याला रन्नाने शोकान्तिकेचा घाट दिला आहे कुरुक्षेत्रावरील युद्धाच्या अंतिम दिवसापर्यंतच त्यातील घटना सीमित करून त्याने कृतीची एकात्मता साधली आहे परंतु पृथ्वीचित्रण आणि पूर्वावस्थानिरूपण या आधुनिक तंत्राचा द्रष्टेपणाने उपयोग करून त्याने आपातत महाभारताची संपूर्ण कथाही निवेदन केली आहे आपण "सिंहावलोकनक्रमाचा" अवलंब केल्याचे रन्न सांगतो त्याव्यतिरिक्त त्याने दुर्योधनाचे व्यक्तिचित्र शोकनाट्याचा नायक बनण्यास पात्र असलेला एक महानुभाव या नात्यानेच रेखाटले आहे छल किंवा निर्धाराची दृढता हाच त्याचा शोककारक दुर्गुण होय

काव्याला विश्वव्यापित्वाचे रूप देणाऱ्या अद्‌भुताच्याही छटा आपल्याला आढळून येतात एका ऋषीच्या शापाची टांगती तलवार दुर्योधनाच्या मस्तकावर आहे या नायकाला मांड्या फोडल्या जाऊन मृत्यु यावा असे विधिलिखितच होते स्वत चा अंत होण्याच्या थोडेसेच आधी दुर्योधन आपल्या या कर्माचा उल्लेख करतो त्याचा त्याग करून राज्यश्री पांडवांच्या शिबिराची वाट चालू लागते पुढे घडून यावयाच्या रक्ताच्या रंगपंचमीत स्वत ची तहान शमवून घेण्यासाठी पिशाचे या प्रसंगावर लक्ष ठेवून बसलेली असतात

प्राचीन वीराच्या व्यक्तिमत्त्वाचा अन्वयार्थ स्वत च्या पद्धतीने लावण्याचा अधिकार जैन कवी गृहीत धरतात पण ते काव्यधर्माशी मात्र नेहमीच निष्ठा राखतात 'कौरवप्रलापाचे रन्नकृत वर्णन म्हणजे कन्नडमधील सर्वोत्कृष्ट विलापिकाच होय करुण हाच शोकांतिकेतला प्रमुख रस असल्याची त्याला जाणीव होती भारतीय टीकाकारांनी भयानकाला किंवा रौद्रालाही त्याच्याच तोडीचे महत्त्व दिलेले आहे वीर, करुण व रौद्र या रसांचा आविष्कार रन्नाने सिद्धहस्त कौशल्याने केला आहे

एका ठिकाणी दुर्योधन म्हणतो माझ्या रागाला शोकामुळे उधाण येते वीरमरण प्राप्त करून घेण्याचा दुर्योधनाचा निर्धार कर्णाच्या मृत्यूमुळे अधिकच दृढ होतो अशा प्रिय मित्राच्या मृत्यूनंतर जीवनाला अर्थच रहात नाही मुळी

उघड उघड अनेक गुणांनी संपन्न असा पुरुष असलेल्या आपल्या नायकाच्या मृत्यूचे वर्णन करताना कवी विश्वव्यापी प्रतिमानांची योजना करतो "केवढे भयानक पतन हे !" कुरुवंशातला सूर्य आणि आकाशस्थ सूर्य एकाच वेळी अस्त पावले "कुरुकुल अर्कनु अर्कनु अस्त ऐदीदर "

रन्न सांगतो की काव्यदेवता सोळा नव्हे तर छत्तीस अलंकारांनी नटलेली आहे संस्कृत कवींना परिचित असलेल्या अनेक वक्रोक्तींचा उपयोग त्याने कौशल्याने केला आहे त्या जवळजवळ नेहमीच औचित्यपूर्ण असतात अशा प्रकारे औचित्य, रस व ध्वनी हे निकष लावून पहाता रन्न जागतिक अक्षर साहित्याच्या रचयित्यां-च्याच श्रेणीचा ठरतो

सूचकतेत तर पंपा उत्कृष्ट आहे 'हित मित मृदु वचन तो थोडक्या शब्दात खूपच सांगून जातो आणि तेही लालित्यपूर्ण पद्धतीने रन्न मात्र पदरचनेची उज्ज्वलता आणि शैलीतील ओज यासाठी सुप्रसिद्ध आहे जगज्जेत्या नायकाच्या विजयाचे पवाडे गाताना तो युक्तिवादाचा कळस गाठतो कारण, रन्नाने भीमावर 'सत्याश्रय इडिव्र बेडग' याचाच अध्यारोप केला आहे

रन्नाची पदरचना विशेष लक्षपूर्वक अभ्यासण्याजोगी आहे संस्कृत आणि कन्नड दोहींत तो सारखाच सिद्धहस्त होता अदूषित (विशुद्ध) कन्नडचा मूलस्रोत म्हणून त्याची जन्मभूमी शतकानुशतके विख्यात होती त्याने योजिलेले कित्येक शब्द आजही प्रचारात आहेत परंतु रन्नची अवस्था शेक्सपीअरसारखीच आहे रन्नाचे संपूर्ण रसग्रहण करण्यासाठी अनुरूप कोशाची निकड भासते

आपल्या वाचकाचे थोडेफार संस्कृतचे ज्ञान रन्नाला गृहीत धरता येई त्यामुळे तो संस्कृत शब्द, पदसंहती आणि कधीकधी तर काव्याचे चरणही योजितो हे मान्य करायलाच हवे की पंपा आणि रन्न यांनी संस्कृत व कन्नड यांचा एकमेळ साधण्यात यश मिळविले होते 'युलिसिसचे हे धनुष्य' पेलणे नंतरच्या कवींना शक्य झाले नाही गेल्या पंचवीस वर्षांच्या साहित्यिक इतिहासावरून 'मार्ग' शैलीचा हळूहळू ऱ्हास होत गेल्याचेच निदर्शनास येते वीरशैव कवींचा अभ्युदय होताच 'देशी' शैलीला तिचे योग्य स्थान प्राप्त झाले

रन्नाचा गुरू पंपा हा स्वत ही संस्कृत व कन्नड या दोन्ही भाषांत निष्णात होता पंपाचे रन्नावर अमाप ऋण आहे परंतु रन्न दुसऱ्या प्रतींच्या बिचकत बिचकत निहिणाऱ्यातलाही नव्हे किंवा ग्रंथचौर्य करणाराही नव्हे परंपरागत काव्यसामग्रीचा उपयोग करताना त्याने प्रकट केलेले आगळे व्यक्तिवैशिष्टच, इष्ट तो परिणाम साधण्यात त्याने जोडलेले भरीव यश आणि त्याचे संस्मरणीय काव्य यामुळे रन्न हा कन्नड साहित्यातील एक प्रमुख गौरवशाली कवी होऊन राहिला आहे

**वीरशैवांची साहित्यिक चळवळ**

कन्नड साहित्यातला पुढचा प्रमुख कवी हरिहर याचा विचार करण्यापूर्वी वीरशैव चळवळीचे विहंगमावलोकन करणे उपकारक ठरेल बाराव्या शतकातली एक सर्वंकष

स्वरूपाची क्रांतिकारी चळवळ पहावयास मिळाली तिचा प्रभाव जीवनाच्या सर्वच अंगावर पडला आणि तिने लोकांच्या जीवनविषयक दृष्टिकोनात संपूर्ण परिवर्तन घडवून आणले शैव म्हणजे शिवाचा उपासक आणि वीर म्हणजे योद्धा वीरशैव लोक शिवाचे उपासक असून ते दुसरी कोणतीच देवता मानीत नाहीत ते असेही म्हणतील की आमचे दैवत मोठे मत्सरी आहे बसव, अल्लम आणि अक्कमहादेवी यांनी हराची सर्वश्रेष्ठता घोषित केली त्याच काळाच्या आसपास हरीच्या सर्वश्रेष्ठत्वाला उचलून धरणारा एक पंथ रामानुजांनी स्थापन केला या धार्मिक चळवळींच्या उदयावरून एवढेच सिद्ध होते की राजकीय जीवनाला ओहोटी लागलेली असल्यामुळे तिच्या अनुषंगाने ब्राह्मण धर्मालाही उतरती कळा आली होती सर्वसाधारणपणे ब्राह्मणवर्ग अहंभ्रुव, कर्मठ आणि अलिप्त राहणारा बनला होता कर्मकांडातून शूद्र व स्त्रिया यांना वगळले जाई जैनधर्माचीही पिछेहाट झाली होती एक महत्त्वाची सत्यस्थिती मात्र ध्यानात ठेवायला हवी वीरशैव पंथाचे नेते स्वतःला साहित्यिक मानीत नसत ते देवाचे दास (शिव-शरण) होते आणि यात नवलही नाही कारण, साऱ्या भारतीय संस्कृतीचाच मुळी धर्म हा मूलस्रोत आहे

या चळवळीच्या राजकीय व सामाजिक अंगाचा परामर्श त्या त्या विषयावरील प्रकरणात घेतला आहे येथे काही थोडे सर्वसाधारण विचार तेवढे साहित्यिक इतिहासाच्या विवक्षित संदर्भात व्यक्त केले आहेत पण साहित्य हाच तर जीवनाचे प्रतिबिंब दाखवणारा आरसा आहे अर्थातच या चळवळीला पायाभूत असलेले तत्त्वज्ञान किंवा तिचा युगधर्म या गोष्टी त्या कालखंडातील साहित्यिक कार्यापासून अलग करता येणार नाहीत बऱ्याच अंगांच्या दृष्टीने वीरशैव चळवळीचे फ्रेंच राज्यक्रांतीशी साम्य आहे दोन्हींची घोषवाक्ये एकच होती—स्वतंत्रता, समता आणि बंधुभाव तुंगभद्रेच्या दक्षिणेस होयसाळ भरभराटीस आलेले असले तरी कर्नाटकचे ऐक्य मात्र खंडितच झालेले होते लवकरच कर्नाटकला इस्लामच्या आक्रमणाचा अनुभव घ्यावयाचा होता सुसंघटित कर्नाटकाची स्थापना झाली ती पुढे विजयनगर काळीच तेवढी आपापसात लढत राहणाऱ्या असंख्य छोट्या संस्थानांत कर्नाटक विभागला गेला होता त्यामुळे आपली एकात्मता आणि स्वातंत्र्य निर्धाराने घोषित करण्याजोगा काळ अजून परिपक्व नव्हता परंतु समता आणि बंधुभाव जोडण्याची आवश्यकता आणि शक्यताही आपल्या नेत्यांनी ताडली होती उपदेश आणि प्रत्यक्ष उदाहरण या दोन्ही मार्गांनी हे ध्येय साध्य करण्याच्या खटपटीला ते लागले

वीरशैव साहित्य सैद्धांतिक उपदेशाला वाहिलेले आहे शैव धर्माने त्याला अवश्य ती स्फूर्ती प्रदान केली शैवागम उपनिषदातील उपदेशावरच आधारलेले आहेत

नव्या बाटल्यात (साहित्यात) जुने मद्य (सिद्धात) भरणे हाच वीरशैव सताचा उद्देश होता माणसे खरोखरी बोलत त्याच शब्दांत सनातन धर्माची सत्तत्त्वे ग्रथित करण्यात आली आता साहित्याच्या इतिहासाच्या दृष्टीने हे परिवर्तन क्रातिकारीच होय चपूकाव्याच्या रचयित्यांनी सस्कृतचा उपयोग मुक्तपणे केला होता पडित व राजे याची मान्यता मिळवावयाची एवढाच त्याचा हेतू असे वीरशैव लेखकानी मात्र खऱ्याखुऱ्या लोकतत्रात्मक चळवळीचा शुभारभ केला वचनकारात राजे-रजवाडे आणि शेतकरी दोहोंचाही समावेश असे धर्माचे आश्वासन उभ्या मानवतेला उपलब्ध करून द्यावे हे त्याचे ध्येय होते धर्माच्या नव्याने केलेल्या विवरणाचा आनद त्याना सामान्य मानवात जास्तीत जास्त प्रसृत व्हायला हवा होता माणसाला माणसापासून अलग करणाऱ्या साऱ्याच भौतिक भेदभावांची अवगणना करून मानवाच्या जन्मजात आध्यात्मिक नात्यावर त्यानी भर दिला आध्यात्मिक जीवनाचा समान वाटा मिळविण्याची मोकळीक त्यानी स्त्रियाना व निम्नजातीय लोकाना दिली जन्माचा निकष जाऊन आता मानवाच्या श्रेष्ठत्वाच्या निकषाचे स्थान आचरणाकडे आले अशा प्रकारे जात वा धन, पथ वा लिंग याना ' शिवशरण या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आप्तपरिवारात ढवळाढवळ करण्याची मोकळीक राहिली नाही या कालखडातील साहित्यावर लोकसत्तेच्या तत्त्वाची मुद्रा उमटलेली आहे ते जनतेचे, जनतेसाठी आणि जनतेकडूनच सिद्ध झालेले आहे

हरिहर आणि राघवाक प्रमुख कवींच्या मालिकेत गणले जातात बसव धर्मसस्थापक आणि कवी दोन्ही होते ते ' भक्ति-भाडारी भक्तीचे भाडार म्हणून ओळखले जाऊ लागले भक्ती मोक्षाचा सर्वांत सुलभ मार्ग असला (' स्थिर-भक्तियोगसुलभो') तरी वचनकाराना ज्ञानयोग आणि कर्मयोग या इतर मोक्ष-पथाचा विसर पडला नव्हता त्याच्या ' कायक ' सिद्धांताने कर्मयोगाच्या मार्गाला एका नव्या परिमाणाची जोड दिली वचन ' हा साहित्यप्रकार बसवाने नव्याने शोधून काढला असे नाही परतु त्याच्या व्यक्तित्वाची एकात्मता, अतरगाचे पावित्र्य, भावनाची उत्कटता आणि साक्षात्काराचे तेज यामुळे त्याचे नाव अमर होऊन गेले आहे त्याप्रमाणेच रचनेतील परिपूर्णता आणि पदयोजनेतील सुश्लिष्टता यामुळे त्याची वचने ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची आणि सहजगुणाचा आनद देणारी उतरली आहेत बायबलच्या प्रमाणभूत प्रतीविषयी चर्चिलनी जे म्हटले आहे ते वचनशास्त्राच्या विस्तृत सग्रहालाही लागू करता येईल कन्नड–भाषिक जनतेच्या प्रतिमेचे भव्योदात्त व चिरस्थायी स्मारक जणू वचनकारानी उभारून ठवले आहे त्याला तत्काळ शाश्वत यश लाभले दक्षिण भारतातील कन्नड-भाषिक लोकात साहित्यिक आणि धार्मिक स्वरूपाचा चिरतन भावबधच त्यांनी निर्माण केला

तीन एक शतकानंतर शिवगुणप्रसादी महादेवय्या यांनी संकलित केलेल्या एका. तत्त्वज्ञानपर प्रबंधाचाही या ठिकाणी निर्देश आपल्याला जाता जाता करता येईल. 'अनुभव मंटपात' (आध्यात्मिक विद्यापीठ) अल्लम प्रभू याच्या अध्यक्षतेखाली झालेल्या चर्चांचा वृत्तांत 'शून्य संपादने' या ग्रंथात दिला आहे या संदर्भात प्रा रानडे यांनी केलेली प्रशंसा उद्धृत करता येईल "तो एक अत्यंत असामान्य ग्रंथ आहे या चर्चांची आखणी बरीचशी प्लेटोच्या संवादाच्या धर्तीवर केलेली आहे" (कन्नड साहित्यातील ईश्वरप्राप्तीचा मार्ग)

एखाद्या ग्रंथाची ऐतिहासिक महती त्याच्या मूलभूत गुणवत्तेच्या तोडीची ठरते तेव्हाच तो ग्रंथ अभिजात साहित्यात गणला जाऊ लागतो या अर्थाने हरिहर व राघवांक यांचे ग्रंथही अभिजात साहित्यात मोडतात ते याच भूमीचे सुपुत्र होते त्यांची पदसंहती अशी काही आहे की ती जणू विशुद्ध कन्नडचा मूलस्रोतच ठरावी कोणत्याही ग्रंथकाराला याहून अधिक उदात्त विषय शोधूनही सापडला नसता हर म्हणजेच सत्य हे कवी मानवाच्या आध्यात्मिक आकांक्षा आणि मानवाच्या मुक्तीसाठी देवाला लागलेली तळमळ यांचा परामर्श घेतात सर्वसाधारणपणे साऱ्याच भारतीयांचा आणि विशेषेकरून कन्नडिगाचा हा अत्यंत आवडता विषय आहे

बसवाचे नाव जसे 'वचन' या साहित्यप्रकाराशी निगडित झालेले आहे त्याप्रमाणे हरिहर हा 'रगळे' कवी म्हणून ओळखला जातो कारण, त्याने 'रगळे' छंद काव्यासाठी औचित्यपूर्ण ठरणाऱ्या श्रेष्ठ गांभीर्याच्या गौरवास्पद पदवीला पोहोचविला राघवांकाने 'षट्पदीला' सुप्रतिष्ठित स्थान प्राप्त करून दिले 'त्रिपदी' आणि 'सगत्या' यांसारखे देशज छंद योजिणारे दुसरेही काही कवी होऊन गेले विजयनगर साम्राज्य आणि आधुनिक काळ यापर्यंत येऊन ठेपलो की आपल्याला असे आढळून येते की वीरशैव महाकाव्यांचे अध्ययन कुमार व्यास आणि कुवेंपू यांसारख्या अनेक पहिल्या प्रतीच्या कवींना लाभदायक झाले आहे अमर कीर्ती खचित मिळावी इतके भरपूर ओज आणि चैतन्य वीरशैव कवींनी सुप्रतिष्ठित केलेल्या साहित्यप्रकाराच्या ठायी निश्चितच सामावलेले आहे

## हरिहर

विरूपाक्षाचे मंदिर आणि जवळूनच वहात जाणारी तुंगभद्रा नदी यांमुळे दुहेरी पावित्र्य लाभलेली 'हंपी'च हरिहराची जन्मभूमी होय त्याचे जीवन व साहित्यकृती याविषयी आपल्याला उपलब्ध असलेला पुरावा बव्हंशी अंतर्गत स्वरूपाचाच आहे बाराव्या शतकातील तिसरे दशक बसवेश्वराचा जन्मकाल निर्धारित केला आहे त्यांच्यामागून एका पिढीनंतर हरिहर होऊन गेला असावा कारण, 'बसवेश्वर रगळे' हे बसवेश्वरांच्या सर्वांत प्रसिद्ध चरित्रात मोडणारे चरित्र हरिहराने लिहिलेले

आहे त्यात बसवेश्वराचा उदय आणि त्याचे जीवितकार्य याचे वर्णन केलेले आहे 'वचनें' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका अभिनव धर्तीच्या गद्य रचनेद्वारा बसवेश्वरानी कन्नड साहित्य समृद्ध केले कन्नड गद्य शैलीच्या मदगती विकासाची रूपरेषा देताना त्याचा परामर्श घेणे उचित ठरेल वीरशैव सिद्धात या नावाने प्रसिद्ध असलेल्या क्रातिकारी चळवळीचा प्रसार करण्यात दोघानीही महत्त्वाचा वाटा उचलला होता, हाच बसव आणि हरिहर याना साधणारा बिंदू होय लोक प्रत्यक्ष बोलत असत त्याच भाषेत उपदेश करून बसवानी अजाणता कन्नड साहित्याची सेवा केली आहे 'चपू शैली'त सस्कृत उक्तीची रेलचेल होऊन ती जनमनाची पकड घेण्यास असमर्थ बनली असल्यामुळे तिचा त्याग करण्यात आला

हरिहर जाणीवपूर्वक साहित्यार्जन करणारा कलावत होता त्याने पाडलेल्या नावीन्यपूर्ण प्रथा विपुल व मौलिकही होत्या भारताच्या साहित्यिक परपरेचे मोल तो जाणून होता 'गिरिजाकल्याण' या त्याच्या चपू काव्यावर महाकाव्याचा प्रभाव आढळून येतो पण त्याचा कीर्तीवर अधिकार पोहोचतो तो मुख्यत 'रगळे' नावाच्या देशज छदाला लोकप्रियता मिळवून दिल्यामुळे या धाटणीच्या त्याने शभरावर कविता लिहिल्या असे मानले जाते त्यामुळेच त्याला 'रगळे'कवी म्हणून उपाधी लाभली

हरिहराने महान वचनकाराच्याच ग्रथांची उसनवारी केलेली असल्याचे समान उद्धरणावरून सिद्ध करता येते उदा 'गिरिजाकल्याणात' तो लिहितो "जलदोलगण जलजदते, तिलदोलगण तैलदते" वचनकारानी लिहिले आहे "तिलदमरेय तैलदते, भावद मरेय ब्रह्मवागिप्प चिन्नमल्लिकार्जुन । (ताडून पहा–'पद्मपत्रमिवाम्भसा') हरिहराने परपरागत उपमा आणि अक्षरसाहित्यातील कल्पना उपयोगात आणल्या हे उघड आहे त्याने टाळली ती केवळ नादनिनाद आणि शब्दावडबर याच्या बुजबुजाटाकडे झुकू लागलेली सस्कृतप्राचुर्याचा अतिरेक झालेली पदसहृती आणि अभिजात छदाची योजना व्याकरणाचे नियम, पदरचना आणि उच्चार याचा साधेपणा आड येऊ नये असे सागण्याइतके धैर्य त्याच्याजवळ होते 'ल' च्या तीन विभिन्न उच्चाराना त्याने एकातच सामावून घेतले (राल, कुल आणि कषाल) पण दोन्ही प्रकारचे 'र'कार मात्र त्याने यमक आणि अर्थ याच्या सोयीसाठी तसेच ठेवले कन्नड भाषेच्या अभ्यासकाच्या दृष्टीने ही गोष्ट फारच मनोवेधक ठरते कारण, जुनी कन्नड मध्यावस्थेतील कन्नडमध्ये रूपांतर पावत असतानाच्या सक्रमणकाळात हरिहर होऊन गेला हे तीवरून सिद्ध होते

हरिहराच्या काळी लोकमताचे वारे नव्या प्रथा रूढ करण्याच्या दृष्टीने अनुकूल होते आख्यानक पद्यरचनेची देणगी हरिहराला लाभलेली होती 'काड' आणि

'वृत्त' परिमाणाचे प्राचीन चरण आपल्या आख्यानाच्या मुक्त प्रवाहाला अडथळा करीत असल्याचे त्याला आढळून आले गद्यच कथानिवेदनाचे यथायोग्य माध्यम बनू शकेल हे सत्यही त्याला जाणवले परतु तो ज्या भक्तीच्या भावनेला आवाहन करू इच्छीत होता तिच्यासाठी तर छदोबद्ध रचनेचीच आवश्यकता होती त्याच्या व्यक्तित्वात कविप्रतिभा आणि धर्मभावना याचा मनोज्ञ समन्वय घडून आलेला होता त्यामुळे त्याने तडजोडीचे एक सूत्र सिद्ध केले एकाआड एक गद्य व पद्य प्रकरणाच्या माध्यमातून आपली सतचरित्रमाला निवेदन करण्याचे। त्याने योजिलेला छदाचा प्रकार रगळे हा होय सर्वसामान्य स्वरमानाहून अधिक तार स्वरातले दैनदिन व्यवहारातले भाषण अशी त्याची व्याख्या करता येईल तो बहुधा एतद्देशीय कन्नड म्हणी व वाक्प्रचार वापरतो त्याचे गद्य वचनकाराच्या गद्यासारखेच आहे मूलत गद्यरूप पदसहतीच पण काव्यात्मतेच्या अनेक गडद छटा असलेली तात्पर्य, हा केवळ एक महान कवीच नसून कन्नड लेखकातल्या मोजक्या गद्यप्रभूतही त्याची गणना होते

हरिहराने सर्वात महत्त्वाची नवी प्रथा रूढ केली ती विषयभूत वस्तूच्या निवडीत आपला काव्यसप्रदायही त्याने तितक्याच परखडपणे घोषित केला कोणत्याही स्वाभिमानी माणसाने इहलोकातील राजाची स्तुती करून त्याची तुलना इद्र, चद्र, कर्ण किंवा कुबेर याच्याशी करण्यास, केवळ क्षुद्र दमडयाच्या आशेपायी समती देऊ नये उलटपक्षी पपाक्षेत्राच्या परमेश्वराचे अहोरात्र चिंतन करून त्याचीच स्तुतिस्तोत्रे गावी, त्याचीच उपासना करावी " निन्न, अर्हनिश नैन, पोगळ, अर्चिसु, एम्मकाड्डु सौम्पिन पैपिन हपेयळदनम् ' अशी भाबडी धर्मनिष्ठा हरिहराला शिपी, कासार, कोष्टी, न्हावी, गारी, हरिजन, गिरिजन इत्यादी सर्वांत खालच्या वर्गातल्या लोकांत आढळून आली तिला धरून त्याने याच देवभोळया लोकाची निवड आपले नायक म्हणून केली ६३ प्राचीन 'शिवशरण' सताची आणि कित्येक अर्वाचीन शिवभक्तांचीही चरित्रे सागणारी काव्ये त्याने लिहिली त्यातले काही बसवांसारखे महामना महात्मे, अवतार मानले जाऊ लागलेले सतवृत्तीचे पुरुष होते परतु भोळीभाबडी धर्मनिष्ठा आणि प्रामाणिकपणा या गोष्टी त्या साऱ्याच्याच ठायी समान होत्या खरे सागायचे तर हरिहराने घडवून आणलेली क्रांती महान कल्पनारम्यत्ववादी कवी वर्डस्वर्थ याच्या क्रांतीशी तुलना करून पहाण्याजोगी आहे त्याने काव्याच्या विषयभूत वस्तूची व्याप्ती वाढविली आणि आपापले दैनदिन व्यवसाय करणारे सर्वसामान्य स्त्रीपुरुष जी भाषा बोलतात तीतच त्यानी मानवी भावभावनाच्या मूलस्रोताचा मागोवा घेतला विशुद्ध भावगीनाचा सूर आणि उद्देश असलेले अनेक 'रगळे' रचण्याच्या सदर्भातही त्याचे वर्डस्वर्थशी साम्य आहे त्याचे 'पुष्प रगळे' महजच कालिदासाच्या शाकुतलाचे स्मरण करून देतात 'नादत्ते

प्रियमडनापि भवता स्नेहेन या पल्लवम् ' तसेच गीतेचेही देतात 'पत्र पुष्प फल तोय ' इत्यादी

हरिहराच्या 'बसवराज रगळेचे ' अलीकडील सपादक टी एस व्ही यांनी दिग्दर्शित केलेल्या काही विशेषाचा निर्देश करून आपल्याला या भागाचा समारोप करता येईल "साहित्यिक गुणवत्तेच्या दृष्टीने हरिहराचे रगळे कित्येक चपूपेक्षाही अधिक मनोरम असून अधिक बारकाईने अभ्यासण्यायोग्य आहेत परपरागत अठरा वर्णनशैलीचा त्याने त्याग केला स्त्रीसौंदर्याचे वर्णन करताना महत्त्वाच्या मोज-मापाच्या यात्रिक परिगणनाचा त्याला फारसा उपयोग नव्हताच त्याने जे जे लिहिले त्या साऱ्यात औचित्याचा नियम मात्र पाळला महापुरुषाच्या सक्षिप्त जीवनाचे वर्णन करताना अठरा पारपरिक वर्णने ओढून ताणून त्यात बसविणे म्हणजे बालकाच्या चिमण्या मस्तकावर अवाढव्य ओझी लादण्यासारखेच झाले असते रगळचाच्या द्विपदीतील आदी आणि अत्य यमकानाही हरिहराने फाटा दिला असता तर कन्नड-मध्ये आधुनिक छदाची निर्मिती करण्याचा मान त्याने पटकावला असता आहे त्या स्थितीतदेखील पदरचना, शैली आणि विषयभूत वस्तू यात त्याने पाडलेल्या नवीन प्रथानीच कन्नड छदोरचनेतील उशिराच का होईना पण अपरिहार्यपणे घडून आलेल्या परिवर्तनाचा मार्ग चिरेबद केला "

कन्नड साहित्यात हरिहराने एक नवे युग चालू केले हे दाखवण्याच्या दृष्टीने भरपूर प्रपच केला गेला आहे त्याच्या मागून उदयास आलेल्या साऱ्याच वीरशैव कवींनी आपला पहिला आणि सर्वांत महान कवी म्हणून त्याचा गौरव केला आहे

**राघवाक**

राघवाक खरा हरिहराचा पुतण्या पण या ज्येष्ठ कवीचे आपल्यावर केवढे मोठे ऋण आहे हे दाखविण्यासाठी तो स्वत स हरिहरपुत्र म्हणवितो ज्येष्ठाच्या ऋणाकडे केलेला असा दृष्टिक्षेप हे कन्नड काव्याचे वैशिष्टच होय इग्लिश काव्यात याच्याशी मिळतेजुळते असे एकटे एकच उदाहरण आहे कवीचा एक गट आपणास बेनचे पुत्र म्हणवीत असे सर्वसाधारणपणे सागायचे तर मुले पित्याच्या अधिकाराविरुद्ध बडच करतात पण कन्नडमधे मात्र कविपरपरेचा अभिमान बाळगणाऱ्या कवीची एक सपूर्ण मालिकाच आपल्याला आढळून येते अभिनव पपा (नागचद्र), हरी-श्वरसुत (राघवाक), कुमार व्यास (नारणप्पा) आणि अभिनव कालिदास (बसप्पा शास्त्री) या पदव्या जणू युगायुगातून चालत आलेली अविच्छिन्न साहित्यिक परपराच घोषित करतात पण साहित्याच्या इतिहासात मात्र हे कवी परपरावादी म्हणून नव्हे तर नव्या सप्रदायाचे प्रवर्तक म्हणूनच ओळखले जातात यातली विसगती खरीखुरी असण्यापेक्षा आभासात्मक अधिक आहे कारण, टी एस इलियटने

"ट्रॅडिशन अँड दि इंडिव्हिज्युअल टॅलेंट' मध्ये म्हटले आहे की "परंपरेत ऐतिहासिक जाणीव सामावलेली असते आणि ही जाणीव म्हणजे भूतकालाच्या केवळ अतीतत्वाचीच नव्हे तर त्याच्या अस्तित्वाचीही संवेदना होय ही ऐतिहासिक जाणीव माणसाला लिहिण्यास प्रवृत्त करते ती आपल्या हाडीमासी खिळलेल्या स्वत च्याच तेवढ्या पिढीचे भान ठेवून नव्हे, तर (जगाच्या) समग्र साहित्याला एकसमयावच्छिन्न अस्तित्व लाभलेले असते आणि त्याने स्वत पुरती एक प्रकारची एकसमयावच्छिन्न अशी सुव्यवस्थाही लावून घेतलेली असते अशा भावनेने"

पपाने 'चपू' शैलीत महाकाव्ये लिहिण्याची परपरा चालू केली, हरिहराने 'रगळे'ला महान काव्याचे माध्यम या नात्याने प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, राघवाकाने निष्णातपणे उपयोग केल्यामुळेच 'षट्पदी' छद प्रचारात आला कन्नड काव्यातील या विख्यात सत्यकथाचा अर्थ असा मात्र नव्हे की कवींनी परपरागत शैलीत लेखन करणे एकाएकीच सोडून दिले आणि नावीन्यपूर्ण क्लृप्त्याचा अवलब केला वस्तुत 'काड', 'वृत्त', 'रगळे', 'षट्पदी' आणि 'सगत्या' हे छद कन्नड काव्याइतकेच प्राचीन आहेत कांडाने आपली जुनी प्रतिष्ठा आजही गमावलेली नाही षट्पदी लोकप्रिय झाल्यानतरही कवी कित्येक शतकेपर्यंत चपू शैलीत लिहीतच असत दुसरीही एक गोष्ट या सदर्भात निदर्शनास आणून द्यायला हवी प्रत्येक प्रमुख कवीच्या सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण रचनेचाच केवळ विचार या पृष्ठांत केला जावयाचा आहे कारणे उघड आहेत, पण याचा अर्थ असा नव्हे की त्यांनी गौण काव्यसभाराची रचना केलीच नव्हती खरे पाहिले तर काव्याची भरमसाट निपज आणि गद्याची तितकीच वाण हेच तर कन्नड साहित्याचे ठळक विशेष आहेत या प्रास्ताविक विवेचनानतर आता आपण राघवाकाच्या महत्तम ग्रथातील गुणवत्तेचा परामर्श घेण्याकडे वळू या

ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात रचलेल्या 'बुक ऑफ जॉब' या अभिजात धार्मिक काव्याशी हे काव्य खूपच मिळतेजुळते आहे बहुतेक धार्मिक ग्रथातून सर्रास आढळते तसल्याच दु ख भोगल्यानतरच सफळ ठरणाऱ्या धर्मनिष्ठेचीदेखील ही एक साधीसुधी कथा आहे जॉब म्हणतो, "परमेश्वराने दिले, परमेश्वरानेच हिरावून घेतले परमेश्वराचे नाव धन्य असो" हरिश्चद्राला जेव्हा अकारणच प्रचड दु:खे भोगणे भाग पडते तेव्हा त्याची भूमिका नेमकी हीच असते जॉबच्या कथेला तत्त्वज्ञानात्मक नाट्य म्हणतात ते अर्थपूर्ण आहे एका प्रकारे सगळेच कन्नड काव्य आध्यात्मिक आहे परतु नाट्याच्या तत्रानुसार आखलेली महाकाव्ये मात्र विरळाच रन्नाच्या 'गदायुद्धाची' नाट्यरूप गुणवत्ता आधीच निर्दिष्ट केलेली

आहे 'हरिश्चंद्र' काव्यानेही नाट्यरूप पुनर्रचनेला वाव दिला आहे दोन्ही महा-काव्यात आपल्याला अपूर्व व्यक्तिवैशिष्ट्य लाभलेली पात्रे, संविधानकाच्या रचनेचे कौशल्य, ठसठशित संवादाच्या माध्यमातून प्रगत होत जाणारी कथा आणि नाट्य-पूर्ण घटना आढळतात प्रारंभीचे प्रवेश स्वर्गात घडवून आणले आहेत, परंतु मानव-तेतील नाट्याचा आविष्कार धरातलीच घडविला आहे प्रत्येक काव्यातील परमोच्च बिंदू ईश्वराच्या हस्तक्षेपानेच साध्य केलेला आहे ऊहापोहाचा शेवट दैवी वाणी-द्वाराच होतो आणि जॉब मान्य करतो की पापाची समस्या इतकी काही सखोल आहे की मानवी मनाला तिची उकल करताच येत नाही हरिश्चंद्र काव्यात हरिश्चंद्राच्या सत्यनिष्ठेला आशीर्वाद देण्यासाठी विरूपाक्ष स्वतःच प्रकट होतो वीरशैव द्रष्ट्यांनी फिरून शोधून काढलेले महान धार्मिक सत्तत्त्व घोषित केले जाते हरनेंबुदे सत्य, सत्यवेंबुदे हरनु सर्व वासनांच्या उपशमानंतर मन शांती हे वर्णन दोन्ही नायकांना लागू पडते

जीवनातील नानाविध व्यापाराच्या यथातथ्य वर्णनाइतकेच राघवांकाचे नाट्यरचनाकौशल्यही वाखाणण्याजोगे आहे या साऱ्या प्रदीर्घ काव्यभर तो कधी-देखील चाचरताना दिसत नाही आणि इष्टार्थव्यंजक शब्दसृष्टीही त्याच्या हाताशी सदैव सिद्ध असते बहुतेक वेळी तो देशज वाक्संप्रदाय वापरतो आणि त्यातूनच प्रासादिकता आणि ओज साध्य करतो त्याने योजिलेल्या विपुल उपमा त्याच्या सर्वांगीण निरीक्षणातूनच निष्पन्न झालेल्या असून स्वाभाविकता आणि शब्द-योजनेची सुश्लिष्टता यामुळे त्या उठून दिसतात हा विशेष राघवांकाच्या लोक-प्रियतेला खूपच उपकारक ठरला आहे त्याचे काव्य संस्मरणीय पंक्तींनी रचलेले असून त्यातल्या शेकडोंना प्रचारातील सुभाषिताचा गौरवही लाभला आहे

षट्पदीतील संगीताची तुलना पुष्कळदा भुंग्याच्या गुंजारवाशी करतात—"षट्-पदीय झंकार" ह्यामुळे करुण रसाचा परिपोष करण्याच्या दृष्टीने त्यातली माधुरी राघवांकाला आवश्यकतेपेक्षा अधिक वाटली म्हणूनच साप चावून रोहिताश्वास मृत्यू येतो तेव्हा त्याच्या देहापाशी चंद्रमतीने आक्रोश 'रगळे' शैलीत व्यक्त केला आहे परिणामाची उत्कटता साध्य करण्याच्या दृष्टीने या विलापिकापर भागाचे स्थान एका रन्नच्या 'करुणप्रलापाच्या'च खालोखाल लागेल

अशा प्रकारे एकेरी नव्हे तर दुहेरी रांगांत (पंपा व रन्न, हरिहर व राघवांक) महाकवींची अव्याहत परंपरा निर्माण करून आपला पहिलावहिला आनंदोद्रेक फिरून फिरून पकडण्यास समर्थ असलेल्या गाणाऱ्या पक्ष्यांचे कर्नाटक हे एक घरटेच आहे या नृपतुंगाच्या प्रतिपादनाची सत्यता कर्नाटकाने जगाला प्रत्यक्ष दाखवून दिली उपर्युक्त मंडळीत आपण जन्न, नारणप्पा, लक्ष्मीश, चामरस आणि रत्नाकर यांची भर घालायला हवी

**जन्न**

त्या काळातला सर्वांत थोर कवी जन्नच होता परंतु त्याला मानाचे स्थान मात्र हरिहरालाच द्यावे लागले कारण, जन्नाने ओहोटीस लागलेला पक्ष उचलून धरला होता तर हरिहराने विषयवस्तू आणि छंद दोहोंतही नव्या प्रथा आणल्या होत्या जन्न लक्ष्मीचा लाडका पुत्र होता असे प्रतिपादन करण्याइतपत पुरेशी माहिती आपणास त्याच्या पार्श्वभूमीविषयी मिळाली आहे त्याचा पिता स्वत ही 'सुमनोबाण' पदवी लाभलेला कवी होता दुसरा नागवर्मा हा विख्यात पंडित जन्नाचा गुरु होता प्रसिद्ध वैयाकरण केशिराज त्याचा पुतण्या ज्या कुळात जन्म घेतला ते कुळ आणि स्वत ची प्रतिभा याना अनुरूप असे शिक्षणही जन्नाला मिळाले होते यात सदेह नाही काव्यरचनेचा अभ्यास त्याने लहान वयातच सुरू केला असणार शिलालेख लिहिण्यासाठी त्याच्याकडे मोठीच मागणी असे अशा प्रकारे मूलभूत प्रतिभा, समृद्ध अनुभव आणि साहित्याचे सस्कार या सान्यानी मिळून त्याचा सर्वोत्कृष्ट ग्रथ यशोधराचरिते (इ स १२०९) साकार केला आहे आपल्या अतियशस्वी जीवन-क्रमाचा उज्ज्वल वृत्तात जन्नाने स्वत च सागितला आहे " महान चोलकुलोद्धारकाच्या राजसभेत मला सेनापतीपद लाभले आहे, मल्याची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे आणि कविचक्रवर्तीच्या नात्याने राजाश्रयाचाही उपभोग मी घेत असतो "

" साहित्याचे वैपुल्य आणि उत्कर्ष या दोन्ही दृष्टींनी दुसऱ्या बल्लाळाची राजवट गौरवशाली ठरली आधी निर्दिष्ट केलेल्या कवीमध्ये आपल्याला 'जगन्नाथविजय' काव्याचा रचयिता रुद्रभट्ट याची भर घालायला हवी धर्माचे तीन प्रमुख प्रवाह असे सरमिसळ होऊन राहिले ही वस्तुस्थिती होयसाळाच्या धार्मिक सहिष्णुतेची बोलकी साक्ष देते " (कर्नाटक थ्रू द एजेस)

जन्नाने एक आदर्श जैन पुराण सागितले आहे आपल्याकडील कौटुबिक जीवनाच्या रहाटगाडग्याचे ते वर्णन आहे " जन्म, मैथुन व मृत्यू एवढ्यानेच समग्र जीवनाचक्राचे वर्णन करता येत नाही असे हिंदू मानतात कारण, गीतेत सागितलेच आहे की " ध्रुव जन्म मृतस्य च " तात्पर्य, सायुज्य मुक्तीप्रत पोहोचेपर्यंत मनुष्य फिरून फिरून जीवात्मा बनविणाऱ्या दरीत जन्म घेतच असतो

पुनर्जन्माच्या या अगाची जैन आवृत्ती म्हणजे एक गुतागुतीचे आख्यानच आहे परंतु धर्माच्या नावाखाली पशुहत्या करण्याच्या तामस कार्यात स्वत ला झोकून देण्याच्या बेतात असलेल्या मारिदत्ताला अभयमतीने अहिंसेचा सिद्धात कसा शिकविला आणि त्या राजाला मग जैन धर्माची दीक्षा कशी दिली हाच त्या कथेचा केंद्रबिंदू आहे

कालीचे मदिर मृत्युदेवतेच्या स्वयपाकघरासारखे दिसत होते बलिदानासाठी

सिद्ध केलेल्या प्राण्यात काही मानव प्राणीदेखील होते वधस्थानाचे वर्णन करताना तर कवीने भयानक रसाची शीगच लावली आहे प्रत्यक्ष वसतागमानेसुद्धा या भीषणतेच्या राजवटीतील रगछटा आणि नादनिनाद आत्मसात केले होते चद्राची कोर पशूना पकडण्यासाठी वापरावयाच्या आकडीसारखी किवा अर्धचद्र बसविलेल्या दांडक्यासारखी भासत होती; विपुल पुष्पसभाराने डवरून आलेला अशोक वृक्ष ज्वालानी वेढलेल्या झोपाळू माणसासारखा दिसत होता, कोकिळाचे कूजन जणू मृत्यूच्या पाशात गवसलेल्या प्राण्याच्या आक्रोशाला दाखवलेल्या वाकुल्यासारखे वाटत होते, किशुकाची लाल फुले वसताने पकडून केवळ स्वत'चे व्रत पूर्ण करण्यासाठी म्हणून कालीला अर्पण केलेल्या शिशिर ऋतूच्या मासाच्या तुकड्यांप्रमाणे दिसत होती, इत्यादी " प्रिय देवी, आम्ही जे देतो तेच तर आम्हाला मिळते " आणि हा नाट्यपूर्ण प्रसगच असा आहे की या शब्दचित्राला नुसत्या मानवधर्मारोपणाच्या हलक्या पातळीवर तो उतरूच देत नाही

जन्नाने निसर्गाचे काळजीपूर्वक निरीक्षण केले होते हे उघड आहे आपणास अधिकच आनद होतो तो परपरागत उपमा आणि सांकेतिक रूपके याच्या पकडीतून तो मुक्त आहे याचाच

या काव्याची अपूर्व गुणवत्ता मात्र त्यातील वर्णनातही सामावलेली नाही आणि व्यक्तिरेखातही नाही कारण, एखादे नैतिक तात्पर्य सुचविण्यासाठीच जन्न परस्पराशी निगडित असलेल्या कथाची मालिका निवेदन करीत असतो, पण कथा आणि नैतिक तात्पर्य ही दोन्ही निसर्गाला धरून असतात आणि यातच त्या साऱ्याचे सौंदर्यही सामावलेले आहे जन्न नुसता एक महान कथाकार नसून एक निष्णात मानसशास्त्रज्ञही आहे मानवी प्रणयाची नानाविध स्वरूपे आणि चचल विलसिते यांचे सुदर रेखाचित्र देणारे 'यशोधराचरिते' हे कन्नडमधील एकटे एक काव्य आहे राजा यशोधर आणि राणी यशोमती यांच्या चरित्राचा प्रारभ परिपूर्ण सुखासमाधानात होतो आणि अत मात्र सपूर्णतया शोकात होतो आणि याला अशत तरी कारणीभूत झालेला आहे स्त्रीजातीचा स्वच्छदीपणा अभयमती एका अत्यत घृणास्पद माणसाच्या प्रेमात पडते कारण, त्याच्या गायनाने तिला मत्रमुग्ध केलेले असते सुदरी आणि पशू याच्या प्राचीन कथेसारखेच हे घडून आले परतु ही कथा म्हणजे काही प्रेमाच्या शाश्वत त्रिकोणाचाच एक निराळा प्रकार नव्हे राजाला त्याच्या पत्नीने केलेल्या विश्वासघाताचा पत्ता लागल्यानतरची प्रमुख घटना म्हणजे तादळाच्या पिठीच्या एका कोंबड्याचे बलिदान आपल्या मुलाला जडलेल्या हाडी तापाला उतार पडण्यासाठी हे हवन कोणत्यातरी प्रकारे उपकारक ठरेल असे राजमातेला वाटत होते, पण दुर्दैवाने कोंबड्याच्या देहात एक दुष्ट पिशाच प्रविष्ट झाले

होते त्यामुळे पशुहत्येचा दोष तेवढा राजाला लागला त्यापायी तो आणि त्याची आई याना पापाच्या परिमार्जनाचा मार्ग म्हणून सात पुनर्जन्माच्या रहाटगाडग्यात सापडावे लागले मरिदत्ताला यातले नैतिक तात्पर्य स्पष्ट कळून चुकले " तांदळाचा कोंबडा मारल्यामुळे यातनाचा शेवट होणे शक्य नसेल, तर आपण पशुहत्येपासून कटाक्षाने दूरच रहायला हवे "

या कथेचे एन्शट मरीनरशी जिव्हाळ्याचे साम्य आहे दोन्हीही कथा अपराध व दड यांविषयीच्याच आहेत जन्न आणि कोलरिज दोघानीही उपदेशिलेले नैतिक तात्पर्य 'प्राण्यावर दया करा' हेच आहे

जन्नाने मानवी प्रणयभावनेवर केलेली मल्लिनाथी विख्यात आहे "दैवाने हात दिला तर रहस्यमय वृत्तीचे प्रणयरूप दैवत (मदन) प्रणयी जनाच्या मृत्यूचाही आनदोत्सव मानील."

## कुमार व्यास

सामान्य वाचकाला आवाहन करणे हाच आमच्या कवीचा आणि धर्मसस्थापकाचा होयसाळाच्या काळी प्रमुख गुणधर्म कसा बनून गेला होता हे आपण पाहिले तदनुसार 'मार्ग' शैलीने आपले स्थान 'देशी' शैलीला देऊन टाकले वीरशैव सताची चरित्रे हरिहराने 'रगळे' छदात लिहिली राघवाकाने 'षट्पदीची' परपरा चालू केली पण लोकप्रिय छद या नात्याने षट्पदीची प्राणप्रतिष्ठा करण्याचे श्रेय मात्र कुमार व्यासाकडे जाते

साहित्यातील क्रांतिवादी चळवळीच्या हातात हात घालून फिरून एकदा धार्मिक पुनरुत्थान घडून आले भक्तिभावाचा आविष्कार करणारी भावगीते (कीर्तने) लिहिण्यात हरिदासांची शिवशरणाशी स्पर्धा चाले या कालखडाचे सपूर्ण गुणग्रहण करण्याच्या दृष्टीने त्याच्या राजनैतिक व धार्मिक पार्श्वभूमीचे आकलन होणे अत्यत आवश्यक आहे सरदार पणिक्करांच्या मते या कालखडातील पारलौकिक प्रवृत्ती आणि कट्टर अद्वैतवाद याना अंशत इस्लामचे आक्रमण कारणीभूत झाले परतु हा सिद्धांत प्रस्थापित करणे कठीणच आहे धार्मिक पार्श्वभूमीचे विवरण मात्र सुलभतेने करता येईल

" फिरून नव्याने लिहिलेल्या पुराणानी आणि महाभारताने भारतातील लोकाना देवताची परपरा, अपूर्व वीरगाथाचा सग्रह, सार्वजनिक नीतिशास्त्राची समृद्ध प्रणाली आणि बहुजनसमाजासाठी धार्मिक साहित्य याचा पुरवठा केला आणि सर्वच पथांच्या उपासनापद्धतीचा समावेश हिंदू धर्मात होण्याच्या दृष्टीने हे सारेच पुरेसे उदारमतवादी होते " (पणिक्कर)

महान काव्ये लिहिणाऱ्यात जैनच पहिले होत बसव, अल्लम, हरिहर आणि राघवाक ही महान नावे ज्या अर्थी वीरशैवपथात समाविष्ट आहेत त्या अर्थी त्यानेही साहित्याच्या एका वैशिष्टयपूर्ण प्रकाराची जोड दिली हे उघडच आहे साहित्याच्या रगभूमीवर प्रवेश करून ब्राह्मण कवीनी जैन व वीर शैव कवींच्या वाटयाला आलेला टाळ्यांचा गजर हिरावून घेतला तो पुढे एकटया विजयनगर साम्राज्याच्या काळातच कारण, त्यानीही देशी शैलीत रचना करण्यास आरभ केला पण ते वीर शैव असोत वा वीर वैष्णव, एक गोष्ट मात्र त्याच्यात समान होती—ती म्हणजे भक्ती भक्तीचे वातावरण खरोखरीच भारतातला सर्वव्यापी चमत्कार आहे आणि हे कबीर, मीरा, चैतन्य आणि हरि व हर याचे अगणित भक्त याच्या चरित्रानी सिद्ध करून दिले आहे

"परतु सस्कृतचे महत्त्व मात्र ओसरले नाही त्याच एका भाषेने हिदूना सघटित केले त्रावणकोरपासून थेट काश्मीरपर्यंत पाडित्याची आणि मननचिंतनाची भाषा अव्याहतपणे सस्कृतच असे पण त्याबरोबरच सस्कृत ही सामान्य माणसाच्या जीवनापासून सपूर्णतया विलग होऊन गेली होती सस्कृतची विचारप्रणाली आणि परपरा यांच्याशी एतद्देशीय भाषाची सांगड घालूनच या शृगापत्तीवर मात करता आली हे साफल्य अभ्यासण्याजोगे आहे " (पणिक्कर)

ज्याना वेदपठनाची बदी होती त्या स्त्रिया, शूद्र आणि नावापुरते ब्राह्मण याची व्यासाना कीव आली असे उद्गार सायणाने वेदार्थप्रकाशात काढले आहेत त्यांनाच आनद व उपदेशही देण्यासाठी व्यासानी महाभारत रचले कालातराने या थोर महाकाव्याला पचम वेदाची प्रतिष्ठा लाभली आपले आदिकवी म्हणून वाल्मीकी मान्यता पावले असले तरी कन्नड कवीना मात्र व्यासांच्याच महाकाव्याने अधिक मोहित केले होते कन्नड महाभारतांना लाभलेली प्रतिष्ठा आणि लोकप्रियता कन्नड रामायणाच्या वाटयाला आलेली नाही कुवेंपूचे 'रामायणदर्शन' हा एकमेव अपवाद पण त्याचा विचार स्वतत्रपणे करायला हवा

डॉ जॉन्सनचे असे मत होते की साहित्याचे मूल्यमापन करण्याचा अधिकार सामान्य वाचकाला असतोच या निकषाची कसोटी लावता सार्वजनिक लोकप्रियतेच्या दृष्टीने 'गदुगिन भारताचा' क्रम पहिलाच लागतो त्याला लाभलेल्या लोकप्रियतेच्या एका कारणाचा निर्देश आधी केलाच आहे पहिले म्हणजे युगधर्माचे प्रतिबिंब उमटलेले ते एक भक्तिकाव्य आहे दुसरे असे की त्याची भाषा (मध्यावस्थेतील कन्नड) आधुनिक कन्नडला अधिक निकटची आहे वस्तुत नारणप्पा हे आधुनिक कन्नडच्या निर्मात्यातले एक होत त्यांनी केलेले रूपांतर गाता येण्याजोगे आहे जनमनरजनासाठी 'गदुगिन भारताचे' गायन करणारा निदान एक तरी 'गमती' प्रत्येक खेडयात असतोच

एका युगप्रवर्तक प्रकाशनाचा निर्देश या ठिकाणी करणे क्रमप्राप्त आहे मैसूरच्या साहित्यिक विभागाने कुमार व्यासाच्या ग्रथाची एक जनता आवृत्ती १९५८ मध्ये प्रसिद्ध केली हा विभाग म्हणजे श्री के हनुमथैय्या याच्या प्रतिभेचे अपत्य होय श्रीनिवास व कुवेंपू या दोन कीर्तिशाली लेखकांनी या ग्रथाचे सपादन केले होते दोन रुपये या नाममात्र किंमतीला या ग्रथाच्या प्रती लोकाना उपलब्ध करून दिल्या जात 'दानचिंतामणी' या प्राचीन पदवीने गौरवले जाण्यास श्री के हनुमथैय्या पात्र ठरतात पुढे घेतलेला परामर्श कुवेपू यांनी लिहिलेल्या सिद्धहस्त व सर्वांगपरिपूर्ण प्रस्तावनेचा साराश होय

कन्नड कवितेच्या साम्राज्यात आपणास आधुनिक युगासकट उत्क्रातीच्या चार अवस्था ओळखता येतात पपा, हरिहर, व्यास आणि श्री याचा या युगांचे निर्माते म्हणून जयजयकार केला जातो पपा आणि हरिहर याचा परामर्श आपण मागेच घेतला आहे आता आपण कुमार व्यासाचा विचार करू या

नारणप्पाने आपले महाकाव्य इ स १४२३ मध्ये लिहिले असे सागतात त्याने सिद्ध केलेली महाभारताची रूपातरित आवृत्ती बायबलची अधिकृत आवृत्ती प्रसिद्ध होण्याच्या (इ स १६११) निदान शभर तरी वर्षे अगोदर निर्माण झालेली होती याचे स्मरण सुखद ठरते धार्मिक साहित्य आणि इहवादी साहित्य यातल्या भेदाची उपेक्षा करण्याकडे कल असणे कन्नड लोकाचे एक वैशिष्ट्य होय धर्मासाठी स्वतत्र प्रकरण लिहिले असल्यामुळे येथे आपण काव्यधर्माचाच परामर्श घेऊ या

आपण आपली पपाशी तुलना करण्याचे आव्हान देत असल्याची अगदी उत्तम जाणीव नारणप्पाला होती काव्यगुणात पपाची बरोबरी करण्याची आशा बाळगणे म्हणजे कल्पनेचा एक धाडसी विलासच होय परतु प्रत्येक अगाने नारणप्पा पपाच्या तोडीस तोड उतरला आहे दोघेही भाषाप्रभू आहेत मौलिकता आणि नवनिर्मितीचे कौशल्य याची देणगी दोघानाही लाभलेली आहे, आणि दोघानीही कथाविधान आणि व्यक्तिरेखन यात परम नैपुण्य प्रकट केले आहे

पपाने वनवासी देशाच्या केलेल्या वर्णनाचा उल्लेख मागे आलाच आहे पण नारणप्पा ब्रह्मानदाच्या साक्षात्कारात इतका काही निमग्न झालेला आहे की क्षणभर थाबून भौतिक सौंदर्य निरखण्याइतकी उसतच त्याला नाही नैसर्गिक चमत्कृतीच्या अनत वैविध्याची जाणीव पपाला आहे त्याच्या वर्णनातील लालित्याची बरोबरी कन्नड काव्यात क्वचितच केलेली आढळते शैलीतील एक प्रकारची सूक्ष्म सुश्लिष्टता व सूचकता, सुसस्कृत, सामाजिक सुसवादातील मनोज्ञ कलात्मकता, जीवनाच्या रगीबेरगी आणि सूत्रमय विविधतेची मनोरम आणि गोड वर्णने यात पपा नारणप्पाला खूपच मागे टाकतो परंतु भावनेची प्रगाढता, विचारांचा आवेश,

रागड्या परंतु प्राथमिक स्वरूपाच्या भावनांचा आविष्कार आणि या सर्वांत वरताण म्हणजे ज्यामुळे नारणप्पाला चिंतनाचे सारेच विषय दैवी तेजाने अवगुंठित झालेले दिसतात तो विश्वात्म्याचा साक्षात्कार, या सर्वच वैशिष्ट्यात नारणप्पा पंपावर मात करतो

असाधारण व्यक्तिवैशिष्ट्याने युक्त असलेल्या व्यक्तिरेखा निर्माण करण्याची क्षमता पंपाने प्रकट केली आहे आपल्या महाकाव्याच्या शेवटी एका प्रसिद्ध श्लोकात कुरुक्षेत्रावर एकत्र आलेल्या वीरपुरुषरूपी सुमनांची माळ गुंफून ती पंपाने वाचकाच्या आल्हादनासाठी त्यानाच अर्पण केली आहे दुर्योधनाचा दृढ निर्धार, कर्णाची स्वामि-भक्ती, भीमाचा उसळता उत्साह, शल्याचे बळ, भीष्माचा धीरोदात्त स्वभाव, द्रोणाचे धनुर्विद्येतील नैपुण्य, अर्जुनाने निकरावर येऊन केलेली धाडसी कृत्ये, धर्मरायाची अविचल धर्मनिष्ठा—नायकाच्या या सद्गुणानीच महाभारताला जागतिक सन्मान मिळवून दिला आहे

नारणप्पाने वरील मालिकेला राजघराण्यातील व्यक्तिनामांची पुरवणी जोडून दिली आहे श्रीकृष्ण, द्रौपदी, उत्तर कुमार आणि अभिमन्यू त्या महाकाव्यातील व्यक्तिरेखाच्या विविधतेत आणि व्यापक परिसरात नारणप्पाने घातलेली ही भर होय. विनोदाचे रूप देणे (उत्तर कुमार), वीररसात करुणाची मिसळ करणे (अभिमन्यू), आणि भक्तिभावाचे हृदयग्राही चित्रण करणे (द्रौपदीशी निगडित असलेले निरनिराळे प्रसंग), यासाठी आपल्या कवीला वरील गोष्टीमुळे उत्कृष्ट वाव मिळाला उपर्युक्त प्रसंगाच्या जोडीला किरातार्जुनीयाचे आणि कर्ण व भीष्म याच्या शेवटच्या क्षणाचे नारणप्पाने केलेले वर्णनही मौलिक प्रतिभेची छाप प्रकट करते

कृष्णाचे वर्णन अवतार म्हणून केले आहे जीवनाच्या नाटकात तो एक नट आणि नाटकाचा दिग्दर्शक दोन्ही आहे स्वभावातील शालीनतेचे कधीही अतिक्रमण होऊ न देता तो नेहमीच स्वतःच्या स्वभावाला साजेसे आचरण करतो कर्णासकट त्याच्या साऱ्याच भक्ताना त्याच्या विश्वरूपाचे दर्शन घेऊन स्वर्गीय सुखाचा आस्वाद घेता येतो त्याच्या इच्छेला जे विरोध करतात त्याना आपण काय करीत आहोत हे कळतच नसते कारण, कृष्ण आपल्या शत्रूवरही प्रेम करतो (कोळुव हुगेगे ओळिव)

पंपा व नारणप्पा हे युगनिर्माते (युगपुरुष) होते नंतरच्या कवींनी त्याच्या-पासूनच स्फूर्ती मिळविली पदयोजनेची त्याच्या इतकीच सर्वांगपरिपूर्णता साधण्याचा ज्यानी प्रयत्न केला ते मात्र अगदीच अपेशी ठरले

नारणप्पाच्या शैलीला एक आगळावेगळा उत्कर्ष प्राप्त झालेला असून अनुवादकाच्या कौशल्याला त्यापुढे हारच खावी लागते समर्पक प्रतिमानाच्या समृद्ध रूपकालंकाराचे

वैपुल्य त्या शैलीत दिसून येते अशा समर्पक प्रतिमानांच्या सहाय्याने अमूर्त कल्पनांनाही त्याने मूर्त रूप दिले आहे डब्ल्यू बी यीट्सने म्हटले आहे की, " प्रज्ञा प्रथम बोलते ती प्रतिमानाच्या रूपात " हे म्हणणे उदाहरणे देऊन सिद्ध करणे व्यर्थच होय

कुवेंपूने काढलेल्या उद्‌गारांनुसार, " उत्तुग सह्याद्रीची देणगी देवाने कन्नडिगाना दिली आहे पवित्र तुगा व कावेरी या आमच्या नद्या होत रमणीय माळनाडाला ताडामाडानी हिरवे गार दिसणाऱ्या सागरतीराच्या सान्निध्यामुळे वैभव आणि वैचित्र्य याची जोड लाभली पपा व नारणप्पा यांच्यासारख्या भव्योत्तुग विभूतीही ईश्वराचीच देणगी होय सामान्य कवीच्या आवाक्याच्या मानाने ते अनेकपट उत्तुग असले तरी ते मैत्रीचे मात्र भोक्ते आहेत त्याचे खरेखुरे मोल आस्वादण्याचे आणि तद्द्वारा स्वत च्या जीवनाचे पुष्प सपूर्णतया विकसित करून घेण्याचे सामर्थ्य तेवढे आपणास लाभावे, आणि हे दोन थोर कवी आपलेच स्वकीय असल्याचे प्रतिपादन करण्याचा आणि या दोहोंचे ग्रथ म्हणजे जगाच्या अभिजात महाकाव्यात आपण घातलेली भर असल्याचे घोषित करण्याचा विसर आम्हांस कधीही पडू नये "

**लक्ष्मीश, षडाक्षरी व रत्नाकर**

कुमार व्यास हा आपण आधुनिक काळात पदार्पण करण्यापूर्वी होऊन गेलेला कदाचित शेवटचाच श्रेष्ठ कवी असेल परतु ज्याना थोरवीचा अश विभिन्न प्रमाणात लाभलेला होता अशा तीन कवीच्या उदयाचे दर्शन सोळाव्या आणि सतराव्या शतकानी घेतले होते लक्ष्मीश, षडाक्षरी आणि रत्नाकर गौण प्रतीचे कवी असूनही त्यांनी कन्नड काव्यात महत्त्वाची भर घातली असे म्हणता येईल पहिल्या दोघाना अलीकडेपर्यंत मोठीच लोकप्रियता लाभली होती तिसरा कवी काव्याचा आशय आणि छद या दोन्ही अगानी लक्षणीय आहे महान काव्यात क्वचितच योजिल्या जाणाऱ्या ' सगत्य ' छदाच्या शैलीत त्याने दहा हजार श्लोकाचे प्रदीर्घ काव्य रचले जैन पुराणातून घेतलेल्या भरत आणि बाहुबली या दोन व्यक्तिरेखांच्या चित्रणात त्याने ' योग ' व ' भोग ' या दोन वादांचा समन्वय साधला आहे या तिघापैकी एकेक जण कन्नड काव्याच्या मूल स्रोतातल्या एकेकाचा प्रतिनिधी बनला आहे लक्ष्मीश वैदिक धर्माचा, षडाक्षरी वीरशैव पथाचा आणि रत्नाकर जैन धर्माचा

शैलीच्या पोताची उत्कृष्टता लक्ष्मीश आणि षडाक्षरी याचा समान विशेष होय जी एम हॉपकिन्स याचे काव्य वाचणाऱ्याना असे आढळून येईल की आधुनिक इग्लिश काव्याचा हा जनक आणि तत्पूर्वीच्या युगातले हे दोन कन्नड कवी याच्यात निकटचे साधर्म्य आहे शाब्दिक कलाकुसर आणि श्रुतिमाधुर्य या दोन गुणात हे तिन्हीच्या तिन्ही कवी श्रेष्ठ प्रतीचे आहेत या वैशिष्ट्यापुरते आमचे कन्नड कवी एका प्राचीन परपरेचे उत्तराधिकारी आहेत हॉपकिन्सला वेल्श काव्याच्या अध्ययना-

तून स्फूर्ती लाभली अनुप्रास, ध्वन्यनुकरण आणि नानाविध यमके याचा परिश्रमपूर्वक व लोकप्रिय पद्धतीने उपयोग करून इष्ट तो परिणाम त्याने साध्य केलेला आहे "हॉपकिन्सने या काव्यसामग्रीची योजना सदभिरुचिपूर्वक आणि सयमाने केली त्याच्यामुळे काव्यात्म आशयाला उत्कटता, विविधतेतही एकात्मता आणि अपरिहार्यता लाभली आहे "(डब्ल्यू एच गार्डनर) कवीची स्वत चीत्र शब्दसहती वापरायची तर, अतर्गत आशयाला आतूनच वळकटी आणण्यात त्याने यश मिळविले

परतु आपल्या भारतीय कवीची प्रवृत्ती मात्र या अलकाराची योजना शोभेसाठीच करण्याकडे असते प्रमुख उद्दिष्ट साध्य करण्याची ती साधने नसून ती स्वत च मुळी साध्य करावयाची उद्दिष्टे होती आजच्या काळात अभिरुचीचा दोष म्हणून याचा धिक्कार केला जातो लक्ष्मीशाहून षडाक्षरीच्या ठिकाणी अशा सुसस्कृत अभिरुचीची उणीव अधिकच जाणवते त्याला खालच्या प्रतीचे मानले जाते ते यामुळेच

ही वजावाट केल्यानतरदेखील वरील कवीना सुनिश्चित चिरतनता मिळवून देण्यास पुरेसे काव्यगुण वरील कवींनी घातलेल्या भरीत बाकी उरतानच आता आपण प्रत्येकाचा विचार स्वतत्रपणे करण्याकडे वळू या

लक्ष्मीश हरि आणि हर यात भेद मानीत नाही ती तर केवळ एकाच चैतन्याची दोन नावे आहेत शिवाची आणि विष्णूची स्तुती तो सारख्याच उत्साहाने करतो वाह्यत तो 'श्रीकृष्णचरितामृत' लिहीत असला तरी त्याने शिवाचेही स्तवन तितक्याच मनोभावाने केले आहे हॉपकिन्सनेही ईश्वराच्या श्रेष्ठतर गौरवासाठीच आपल्या कविता लिहिल्या होत्या हे येथे ध्यानात ठेवायला हवे

कन्नड साहित्यात ज्याची बूज केवळ प्रसगोपात्तच राखली जाते त्या हास्यरसाला लक्ष्मीशाने महत्त्व दिले म्हणून तो प्रशसेला पात्र ठरतो वस्तुत अश्वमेधीय अश्वाच्या प्रमुख कथेत वीर रसालाच प्राधान्य देणे अगत्याचे होते परतु या कवीने मात्र निरनिराळ्या विनोदी कथा सागण्याची सधी साधली आहे आपल्याला एका उदाहरणाचा विचार करता येईल एक ब्राह्मण होता आणि त्याचा ज्या स्त्रीशी विवाह झाला होता ती म्हणजे जणू विरोधी स्वभावाची प्रत्यक्ष मूर्तीच होती हा विषय हास्यात्मिकेसाठी यथायोग्य आहे नवऱ्याने आपल्या बायकोला वठणीवर आणण्याचा प्रयत्नच केला नाही स्त्रीजातीच्या वागणुकीचे रहस्य जाणणाऱ्या एका विद्वान व्यक्तीने शिकविलेल्या एका क्लृप्तीचा अवलब करून त्याने आपल्या खाद्यावर लादलेल्या या मुळाचे ओझे कमी केले त्याला दूध प्यायचे असेल तर तो पेलाभर पाणी मागायचा बायको त्याला दूधच देण्याचा हट्ट करायची काही काळ गाडे सुरळीत चालले पण एक दिवस नवऱ्याला स्वत ची भूमिका वठविण्याचा विसर

पडला त्यामुळे झाले काय की बायकोने काही तरी धर्मविरोधी कृत्य केले परिणामी बायकोने ब्राह्मणाचा शाप मात्र जोडला आणि ती दगड बनली तात्पर्य, जिचा प्रारभ एक हलकी-फुलकी हास्यात्मिका म्हणून झाला त्या कथेचा शेवट मात्र एका दारुण शोकातिकेत झाला लक्ष्मीशाने ज्या पद्धतीने ही कथा निवेदन केली आहे तीमुळे कन्नड साहित्यात एका साचेबद '–चडीच्या'– पात्राची भर पडली आहे चद्र-हासाची कथा सागतानाही या कवीने स्वत चे स्वतत्र वैशिष्टच प्रकट केले आहे गभीर हास्यात्मिकेचे घटक त्या कथेत अनुस्यूत आहेत हास्य व करुण रसाची रूपे देऊन या विषयाची सविस्तर माडणी पराकाष्ठेच्या कौशल्याने केली आहे करुण हा हास्याचा एक घटक आहे याचे स्पष्ट प्रात्यक्षिकच येथे दाखविले आहे

लक्ष्मीशाने निर्माण केलेली व्यक्तिचित्राची मालिका चॉसरच्या यात्रिकांचे स्मरण करून देते लक्ष्मीशाच्या पात्रामध्ये सत्याभासाप्रमाणेच विविधताही आहे प्रत्यक्ष ईश्वरानेच निर्मिलेले वैपुल्य आपल्याला येथे आढळते जगज्जेते सम्राट, अवतार या नात्याने मान्यता पावलेला मानव, अन्नाच्या वासानेच तोंडाला पाणी सुटणारा मुमुक्षू, दुष्ट मत्री, प्रामाणिक राजेरजवाडे, पराक्रमी सैनिक इत्यादी ईश्वरभक्तीत दग झालेल्या स्त्रीपुरुषाच्या गर्दीचा समावेश वरील सूचीत केलेला नाहीच

उपमाची लक्ष्मीशाला मोठीच हौस असून त्याने 'उपमालोल' ही पदवीही सपादन केली होती कुवेपूनी वर्णन केले आहे त्याप्रमाणेच हर्षोत्फुल्ल होऊन नृत्य करणाऱ्या आणि त्याच्या जोडीला उगवल्या सूर्याच्या सोनेरी प्रकाशाचा आणि लुसलुशित गवताला हेलकावे देणाऱ्या सुखस्पर्श झुळकीचा आस्वादही घेणाऱ्या मोरा-सारख्या लक्ष्मीशाच्या उपमा असतात दुष्टबुद्धीच्या मनाची तुलना नदीच्या विशाल पात्रातील नितळ पाण्याने भरलेल्या पण तळाशी क्रूर मगरीचा कळप दबा धरून असलेल्या खोल डोहाशीकेली आहे

जैमिनी भारताला काव्यक्षेत्रातील हिमालयाच्या शिखराची उची नाही गाठता येणार कदाचित, परतु अनेक छटाचे चमकणारे रग, समप्रमाण रचना आणि सह-सवेदनाजन्य हास्य निष्पन्न करण्याची क्षमता, अशा अनेक विशेषापुरते त्याचे वृदावन उपवनाशी साधर्म्य आहे

काव्यातील स्वरसगीत, पदरचना आणि प्रतिभासृष्टी याच्या आधुनिकतेमुळेही रत्नाकराला थोरवीवर अधिकच अधिकार सागता येतो अत्युत्कृष्ट पद्धतीने सगीतात बसविलेल्या आपल्या कविता गाणे स्त्रियांना सुलभ जावे म्हणून त्याने व्याकरणाची गुतागुत टाळली आहे त्याच्या कृतीना केवळ कन्नडिगाचीच नव्हे तर तेलुगू आणि तुळू बोलणाऱ्या लोकाचीही वाहवा मिळायला हवी आपल्या वाचकाची व्याप्ती वाढवावी हाच आपला डोळस उद्देश असल्याचे दर्शविण्यासाठी त्याने तेलुगू व तुळू

भाषातील पदसंहती वापरल्या आहेत त्यावरून आपणास टी एस इलियटच्या संदर्भमय शैलीचे स्मरण होते

## गौण काव्य

प्रत्येक भाषेने ॲरिस्टॉटल, लाँजायनस, बर्गसन किंवा आनंदवर्धन निर्माण करावे अशी अपेक्षा बाळगणे व्यर्थच आहे कर्नाटकात तर अजूनही एखादा सेंट्सबरीही निर्माण व्हावयाचा राहिलाच आहे कन्नड कवींनी काव्यकलेच्या इंगितावर प्रभुत्व संपादन केले होते एवढेच नव्हे तर प्रसंगोपात्त ते विषयवस्तू आणि छंद यांच्या निवडीवरही आणि काव्याचे प्रयोजन व आपल्या वैशिष्ट्यपूर्ण उद्दिष्टाला साजेसे पदरचना व शैली यांचे प्रकार यावरदेखील ते पुष्कळसा प्रकाश टाकू शकत प्रमुख व गौण कवी यांजमध्ये भेद करण्याचा प्रयत्न करणे भाग पडते कन्नड अभिजात साहित्य आणि इंग्लिश अक्षरवाङ्मय यातील साम्यस्थळे वरचेवर दाखविण्यात आली आहेत ती केवळ आमच्या कवींपैकी निदान काहींच्या तरी कृती जागतिक कीर्तीच्या कलाकृती मानता येतात हे दाखविण्यासाठीच प्रस्तुत सूची सर्वसमावेशक नसून विविध पंथ, प्रवृत्ती व प्रकार यांची नुसती प्रातिनिधिक जंत्री आहे या संदर्भात प्रा अमलेंदु बोस यांनी गौण काव्याचे केलेले समर्थन उद्धृत करण्याजोगे आहे "कवी लिहीत असतो तो सर्जनाच्या आनंदासाठीच वाचकाकडून काव्याला लाभलेल्या प्रतिसादाविषयी म्हणाल तर महत्त्व असते ते कवी प्रमुख आहे की गौण याला नसून त्या विवक्षित कवीच्या प्रामाणिकपणाला असते " अर्थात ज्यांचा प्रामाणिकपणा संशयातीत आहे अशा कवींचा आढावा घेऊन या भागाचा समारोप करणे उत्तम

आदियमकासंबंधीचे नियम पाळण्यात आमचे अभिजात कवी अत्यंत दक्ष असत मध्य आणि अंत्य यमकाची योजना करण्यासही वाव असतोच शैलीच्या पोताची उत्कृष्टता साध्य करण्याच्या दृष्टीने कन्नड सुलभ व अनुकूल ठरते लक्ष्मीश व षडाक्षरी यांच्या काव्यगुणांचा परामर्श घेण्याच्या ओघात या वस्तुस्थितीचा निर्देश पूर्वी केलाच आहे समान अंत्याक्षराचा नादमय ध्वनी म्हणून मिल्टनने ज्याची कुचेष्टा केली आहे त्या प्रकारचा आल्हाद त्याने योजिलेल्या काव्यक्लृप्त्यामुळे होतो परंतु प्रासयुक्त शब्दांची काळजीपूर्वक निवड केल्यावरही ध्वनी आणि अर्थ परस्पर संलग्न झालेले आहेत हे निश्चित करून घेऊन (वागर्थांचा समन्वय) परंपरागत छंदात रचना करणारे कवी आपणास काव्यानंदाचा लाभ देतातच देतात

नेमिचंद्राने एका विख्यात वृत्तात पुढील प्रासयुक्त शब्द योजिले आहेत "कट्टुगे

मेत्तुगे, मुट्टुगे आणि मुत्तिदार ' "वानराच्या तुकड्यानी सागरावर पूल बांधला असेल वा नसेल, वामनाच्या पावलाने अंतरिक्ष व्यापले असेल वा नसेल, नराने हराचा पाडाव केला असेल वा नसेल—कवींनी तसे म्हटले आहे आणि स्वत च्या काल्पनिक अनुभवाशी प्रामाणिक असलेले कवी या नात्याने वाचकानी त्याना मान्यताही दिली आहे " पुढे तो फिरून म्हणतो, "मूर्खा, तुला असे का वाटते की काव्य बाजारात विकत मिळू शकेल ? पाहू देच मला तुला पुढील वस्तू विकत मिळतात का ते वसंत ऋतू, सह्याद्रीवरून वहाणारी मंद झुळूक, अद्भुतरम्य प्रीती आणि चंद्राचे चांदणे !"

### नयसेन व ब्रह्मशिव

विरळाच आढळणारा ओघ जोपासला म्हणून बाराव्या शतकातल्या या दोन कवींचा आवर्जून उल्लेख करायला हवा नयसेन 'देशी' शैलीचा चहाता होता त्याने पुढील उद्‌गार काढले आहेत "कवींना संस्कृतमधून लिहावयाचे असेल तर त्याना तसे करू द्या, पण विशुद्ध कन्नडमधून लिहिताना त्यानी संस्कृत वाक्प्रचार मधेच ओढून कशाला आणावे ? हे तर तुपात तेलाची भेसळ करण्यासारखे आहे

"कोणी तरी आपल्या मुखासमोर आरसा धरला म्हणून मूर्तिमान सौंदर्य अपमान मानणार नाही परंतु एखादा कुरूप मनुष्य मात्र त्या आरसा धरणाऱ्या माणसाला पिटून काढण्याचा, दांडक्याने ...

... वाघ (हुला) मारणाऱ्या माणसाच्या पराक्रमाला दुष्ट लोक क्षुल्लक मान-ण्याचा संभव आहे उलट पक्षी त्यानी स्वत मात्र एखादा उंदीर (इलि) मारला तरीदेखील मोठ्या श्वापदाच्या मृगयेतील स्वत च्या नैपुण्याच्या वल्गना ते करतील


पुढेमागे म्हणींचे ओज लाभावे अशा पदसंहती सिद्ध करण्यात नयसेन निष्णात होता कुत्र्याचे शेपूट सरळ करणे व्यर्थच होय' (नायी बाल डोंकु)

ब्रह्मशिवाच्या हाती उपहासाला एक आगळे परिमाण लाभले त्या काळात लोकांची अशी समजूत असे की आपल्या धर्माची प्रतिष्ठा साधण्यासाठी दुसऱ्या लोकांच्या धर्माला कुचेष्टेच्या धारेवर धरणे आवश्यक आहे तीनुसार जैन ब्रह्म-शिवाने हरि आणि हर यांची उपहासगर्भ शब्दचित्रे रेखाटली आहेत

"जे जे दृष्टिपथात येते त्या साऱ्याचा राजा विष्णू असेल तर त्याने बळी-जवळ तीन पावले ...

... सारखा बनण्याइतके खालच्या पातळीवर उतरून स्वत ची प्रतिष्ठा का गमवावी ?"

"शिव अडाणी आहे हे त्याच्या माळेचे मणी मोजीत जप करण्यावरून सिद्ध होते, त्यांचा त्रिशूळ त्याच्या क्रौर्याचा निदर्शक ठरतो, त्याच्या लिंगपूजेवरून तो



चित्र १२ पट्टडकाल येथील गलगनाथाचे मंदिर




चित्र १३ दक्षिण कर्नाटकची ज्यासाठी प्रसिद्धी आहे अशा यक्षगान, नृत्यनाटकाचे एक दृश्य

चित्र १४  पाटलाच्या लाकडावर नक्षीमध्ये हाताने कोरलेली श्रीगणेशाची सर्वांग सुंदर मूर्ती




चित्र १५  लाकूड आणि काच यांपासून बनवलेले भरतनाट्याचे कलाकार.





चित्र १६  चदनी लाकडाची बनवलेली दागिन्याची पेटी  हिच्या  चारी बाजूस
शिवगणाच्या मूर्ती आहेत व झाकणावर सगीतज्ञ वाद्ये वाजवीत आहेत



चित्र १७  गीतोपदेश – चदनाची एक सुदर नक्षीदार कलाकृती

निर्लज्ज असल्याचे सूचित होते, गौरीला सदैव स्वत च्या मांडीवर वागविती यावरून त्याला तपश्चर्येची कल्पनाच नसल्याचे दिसून येते हे सारे दोष माहीत असूनही लोक शिवाची उपासना का म्हणून करतात ?"

त्याने जैन धर्माचे गोडवे पुढीलप्रमाणे गाइले आहेत "नगारा बडवीत जैन धर्म खोटारड्याना, क्रूर लोकाना आणि व्यभिचाऱ्याना दूर निघून जाण्याविषयी बजावीत असतो "

**अंडय्या**

अडय्याचा उपदेश आणि आचार यामुळे कन्नड कवीचे डोळे उघडले आणि एतद्देशीय वाक्प्रचारांतली झळाळी आणि दैनंदिन बोलीतील लय त्याना दिसून येऊ लागली अडय्याने तीन प्रकारचे नाविन्य प्रकट केले आहे विषयभूत वस्तूचे, शैलीचे आणि पदरचनेचे शब्दाच्या निवडीविषयीचे त्याचे म्हणणे सविस्तर विवरण करण्याजोगे आहे सस्कृत कवींपासून उचललेल्या वृत्तातून अभिजात कवीनी पुष्कळशा सस्कृत वाक्प्रचाराचा उपयोग केला सस्कृत सस्कृतीची भाषा बनून गेली. कित्येक सस्कृत शब्द सर्रास रूढ झाले आणि साधे सोपे कन्नड शब्द जातिबहिष्कृत ठरले अडय्याने अशा शब्दाचा पक्ष उचलून धरला सस्कृत वाक्प्रचारांविषयी अतिरेकी आवड बाळगण्याच्या आरोपाविरुद्ध त्याने अभिजात कवीचे ( कब्बिगर काव) समर्थन केले विशुद्ध परतु घरगुती कन्नड शब्द सस्कृतचा ठसका व घोष निर्माण करू शकत नाहीत असे त्यांचे मत असावेसे दिसते अडय्याने बडाचे निशाण उभारले पण त्याला अनुयायी मात्र थोडकेच लाभले 'देशीला' स्वत च्या अधिकाराचे स्थान लाभले ते बाराव्या शतकातच

कन्नड नाडूचे रग आणि गीत, मधुर सुगध आणि फळे याची मनसोक्त स्तुती करणाऱ्या कवींनलाच अडय्या हा एक कन्नड मेनिप्प नाडु चेलवायतु "कर्नाटकातल्या निसर्गसौंदर्याच्या अनत वैचित्र्याला न्याय देणे हजार फणाच्या आदिशेषालाही कठीण वाटेल मग एका मर्त्य मानवाला या भूमीचे पर्याप्त वर्णन कसे करता येणार ?"

अडय्याने केलेल्या वर्णनानुसार या देशात दूध, मध व नारळपाणी याचे पूर वहात असणार "उपवनाना भरपूर पाणी दिले जाई आणि लोक शांततेचा आणि समृद्धीचा उपभोग घेत असत राजधानीचे नावच मुळी पुष्पपूर होते हे अर्थातच नागरिकाच्या अभिजात अभिरुचीचे निदर्शक होते आणि त्यातला प्रत्येक नागरिक कोणत्या ना कोणत्या प्रकारे विख्यात होता '

**चामरस (१४३० इ)**

असाही एक काळ होता की जेव्हा चामरसला नारणप्पापेक्षादेखील अधिक लोकप्रियता लाभली होती दुसरा कवि हरिहरात भेद मानीत नसे चामरस धर्मनिष्ठ कवी असल्याने त्याला शकराचे सर्वश्रेष्ठत्व वर्णावे लागले या दोन कवीचे नव्याने मूल्यमापन होण्यास हाही एक घटक कदाचित कारणीभूत झाला असेल तथापि 'धर्माचा' काव्यधर्माशी' समन्वय साधण्याचा चामरसाचा प्रयत्न मात्र अत्यत वाखाणण्याजोगा होता आपल्या आदिकवीचा तो एक सन्माननीय अनुयायी बनून राहिला भामिनी षट्पदीतील त्याचे महाकाव्य (प्रभुलिग लीले) छोटीशी उद्धरणे देण्याच्या दृष्टीने सोयीचे नाही त्या अर्थी आपल्याला कन्नडच्या गौरवावर स्वत'ची मुद्रा उठवून देणाऱ्या एका सत्याची नोद करण्यावर समाधान मानायला हवे या काव्याला अशी काही लोकप्रियता लाभली होती की त्याचे सस्कृत, कन्नड, मराठी, तामिळ आणि तेलगू अशा चार भाषात अनुवाद होऊन चुकले आहेत, कन्नड साहित्यात ही एक अपूर्व घटनाच म्हणायला हवी 'प्रभुलिग लीले'चे अर्वाचीन सपादक एम आर श्रीनिवास मूर्ती यानी त्याचा गौरव आपले "यात्रिक क्रमण" "पिलिग्रम्स प्रोग्रेम" या शब्दात केला आहे

**होन्नम्मा**

चिक्कदेवराय वोडियार विद्येचा थोर आश्रयदाता होता कित्येक गुणी स्त्री-पुरुषानी त्याची राजसभा भूषविली होती त्यापैकी होन्नम्मा नावाच्या एका कवयित्रीचा विशेष गौरवाने निर्देश करणे उचित ठरेल कारण 'सगत्य' शैलीचे ४६८ श्लोक असलेली एक दीर्घ कविता तिने लिहिली आहे पतिनिष्ठ पत्नीची कर्तव्ये तिने वर्णिली आहेत ती सतराव्या शतकात होऊन गेली असली तरी स्त्रीदास्यविमोचनाच्या आधुनिक चळवळीचे भाकित तिने वर्तविले होते (इग्लडमध्ये १९२६ व भारतात १९५२) "ज्या मातेने तुला जन्म दिला ती आणि ज्या व्यक्तीने तुझे पालनपोषण केले ती या दोघीही स्त्रियाच होत्या मग मूर्खाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणी स्त्रीला हीन लेखण्याचा खटाटोप का करावा ?"

पत्नीधर्माविषयी तिची कल्पना मिल्टनच्या कल्पनेशी खूपच मिळतीजुळती होती "तो देवासाठी (झटतो) तर ती त्याच्यातील देवासाठी "मनदन्न ओळु माधवन भाविसे" तसेच याला साजेसे प्रतिकर्तव्य पुरुषासाठीही सागण्याइतकी ती धीट होती "नानाविध रगाची नव्याने उमललेली फुले हलक्या हाताने वेचून आपल्या प्रियतमेसाठी पुष्पगुच्छ बनविणाऱ्या प्रियकराप्रमाणे तिचे प्रणयाराधन करून तिला प्रसन्न करून घेण्याचा प्रयत्न त्याने करावा"

**चिक्कुपाध्याय**

चिक्कुपाध्याय हा प्रारंभी राजपुत्राचा शिक्षक होता आणि पुढे त्याचा मंत्री झाला. वैविध्य आणि वैपुल्य या दोन्ही दृष्टींनी कन्नड साहित्यात त्याने घातलेली भर लक्षणीय आहे मातृभूमीचे आणखी एक सस्मरणीय शब्दचित्र त्याने रेखाटून ठेवले आहे "उज्ज्वल वैभवाची भूमी, सौंदर्याचे जन्मस्थान, आनंदोत्सवाचा हाट, उत्कृष्टतेचे वसतिस्थान, सुखोपभोगाचा प्रासाद, सद्गुणाचे पारितोषिक, सौहार्दाचे माहेरघर, संस्कृतीचा पेटारा, समृद्धीचे भांडार, संताची भूमी, इत्यादी कन्नड नाडूचे सौंदर्य तर वर्णनातीतच आहे"

आपल्या दीर्घ काव्यात ज्याना सुनिश्चित स्थान लाभलेले आहे त्या कोटिक्रमाची आणि विनोदाचीही उदाहरणे तो पुरवितो

"परमेश्वरा, हे मर्त्य मानव किती मूर्ख असावेत! राजवाड्याला ते आरमणे (अर्धगृह) म्हणतील तर सुसंस्कृत माणसाला 'अरस' (रसहीन) म्हणून संबोधतील" इत्यादी ज्या सहजतेने तो आपला कोटिक्रम आणि विरोधाभास खचून ठेवतो ती त्याच्या समृद्ध शब्दभांडाराचीच निदर्शक ठरते

**सर्वज्ञ**

उभ्या कर्नाटकभर त्रिपदी शैलीला पराकाष्ठेची प्रसिद्धी मिळवून देणाऱ्या कवीची 'सर्वज्ञ' ही पदवी होय हे उघडच आहे त्याला एखादे सामाजिक किंवा धार्मिक उपहासगर्भ दीर्घ काव्य सहज लिहिता आले असते, पण त्याने आपला सारा काळ प्रासंगिक चुटके आणि शीघ्रस्फूर्त उपहासिका लिहिण्यातच व्यतीत केलेला दिसतो "जे मनात वारंवार आले होते, पण ज्याला इतके उत्कृष्ट शब्दरूप कधीच दिले गेले नव्हते ते," हे त्याच्या शैलीचे समर्पक वर्णन ठरेल त्याची कित्येक पद्ये वरचेवर उद्धृत केली जातात

हिवतापाचे उच्चाटन केले जाण्यापूर्वीच्या माळनाडचे एक वास्तववादी वर्णन पुढे दिले आहे 'माळनाडला येणारा प्रवासी खरोखरीच पापी असला पाहिजे, कारण, तेथे त्याला आढळतात सर्दी, ताप आणि यकृतविकार यांनी पछाडलेले लोक आणि हे लोक जीवन कंठतात आदिमानवाचे, झाडावरची फळे गोळा करीत! दुसऱ्या एका पद्यात त्याने "मसाल्याच्या पदार्थांचे माहेरघर आणि कर्नाटकचे धान्याचे कोठार" असल्याचे श्रेय माळनाडला देऊन टाकले आहे

उत्तरेकडच्या भागातल्या कोरड्या दुष्काळाचेही त्याने उठावदार वर्णन केले आहे, मनुष्यवस्ती असलेले एकही ठिकाण येथे आसपास नाही, प्यायला पाणी आणण्यासाठी माणसाला तीन मैलांचे अंतर तुडवावे लागते, रणरणत्या सूर्यापासून

प्रवाश्याला निवारा मिळण्याजोगे एकदेखील झाड नाही पुरे झाली ही उत्तर प्रदेशातली भटकती !"

प्रसगोपात्त हेही ध्यानी घ्यायला हवे की होकायत्रातल्या चार दिशा दाखविण्या-साठी वडगळु, तेंकळु, मुडळु व पडवळु हे देशज शब्दच सर्वज्ञ वापरतो, त्या काळा-पर्यंत टूम म्हणून सर्रास वापरले जाणारे सस्कृत शब्द नाही वापरीत

## अर्वाचीन कालखड

### प्रवृत्ती आणि प्रभाव

सर्जनशील व्यापाराचा प्रत्येक नवा कालखड इतिहासातल्याच कोणत्या ना कोणत्या तरी आकस्मिक घटनेपासून उत्स्फूर्त होत असतो परकीयाचा प्रभाव नुसता विशुद्ध पदार्थापासून नवी सयुगे बनण्याच्या दृष्टीने उपकारक ठरणाऱ्या उत्प्रेरकासारखा असतो स्वदेशातील प्रतिभेच्या अभावी विदेशी प्रभावातून काहीच निष्पन्न होत नाही ब्राउनिंगच्या पुढील पक्तीतल्या आशयात सर्जनशील साहित्याच्या रहस्याचे उत्कृष्ट आकलन झालेले आढळते

" मानवाला लाभाव्या अशा काही देणग्या त्याच्या तीन ध्वनीच्या रचनेमधून चौथा यावा तो ध्वनी नव्हे, तर तारा !" प्रवृत्ती आणि प्रभाव याचा परामर्श घेताना हे ध्यानात ठेवायलाच हवे नाही तर तर्कविरुद्ध अनुभवावर येऊन ठेपण्याचा अनवस्था प्रसग आपणावर ओढवेल स्वदेशातील प्रतिभेपेक्षा विदेशी प्रभावालाच अधिक महत्त्व दिले जाऊ लागेल कन्नड साहित्याला गौरवशाली परपरा प्राचीन काळापासून लाभलेली आहे हे आपण आधीच पाहिले आहे प्राचीन परपरेविरुद्ध अर्वाचीन बडे होत गेली ही वस्तुस्थिती त्या वैभवाचा एक भाग आहे परपरा शाश्वत असते तर आधुनिकता एक तात्पुरती, भगुर अवस्था असते चालू शतकाच्या प्रारभी उभ्या भारतभरच लोकमताचे वारे विद्येच्या पुनरुज्जीवनाला अनुकूल होते 'स्वदेशी' राजकारणातला मत्र बनला होता, तर आपले कवी 'देशी' या देवतेला आवाहन करीत होते योगायोग असा की काळाची निकड ओळखून वर्डस्वर्थने ती भागविलीही होती भावगीता ( लिरिकल बॅलडस )नी "काव्याची भाषा बोलभाषेतूनच निवडलेली असली पाहिजे" ही काव्य-विषयक बिरुदावली याचा कवीवर सखोल परिणाम झाला ते वर्डस्वर्थचे कट्टे अनुयायी बनले यात नवल नाही

**बेल्लूर मैलर श्रीकंठय्य (श्री)**

पाच एक दशकापूर्वी परिस्थिती अशी होती. आधुनिकतावादी कवितांच्या एका संग्रहाला प्रस्तावना लिहिताना १९६५ मध्ये एका थोर अर्वाचीन कवीने म्हटले आहे, कदाचित काव्यकलेच्या रथाला समतोल साधून वाटचाल करण्यास उपकारक ठरावे म्हणून असेल, पण आमचे थोर कवी नेहमीच जोडी जोडीने उदयास आले आहेत श्री आणि श्रीनिवास, पै आणि पजे, विनायक कृष्ण आणि गोपाळ कृष्ण, कणवी आणि शिवरुद्रप्पा, निस्सार अहमद आणि चंद्रशेखर तसेच चित्तळ आणि कंबन.[१] योगायोगाने हे समीक्षकही थोर कवींच्या अंबिकातनय दत्त आणि किशोरचंद्र वर्णी या जोडीतले एक असल्याकारणाने त्यांनी या जोडीचा उल्लेख गाळला आहे पण कालानुक्रमाच्या आणि तर्काच्या अशा दोन्ही दृष्टींनी आणखीही एका जोडीची भर घालायला हवी पु ति न (पी टी नरसिंहाचार) व के एस एन (नरसिंह स्वामी) वास्तविक कवींची ही जोडीजोडीची मालिका वार्षिक नसून नित्याचीच आहे आजपर्यंतच्या काव्याच्या प्रगतीवर आढावा घेण्याचा आमचा उद्देश नाही प्रस्तुत इतिहासासाठी १९३१ या वर्षाची मर्यादा घातलेली आहे अर्थातच या विभागात मुख्यत तिसऱ्या आणि चौथ्या दशकातील साहित्यिक घटनांचाच तेवढा परामर्श घेतला आहे

कर्नाटकाच्या इतिहासाचा ब्रिटिश कालखंड एकोणिसाव्या शतकाच्या अंतापर्यंत काव्याच्या क्षेत्रात फारसा सर्जनशील नव्हता आता कन्नड साहित्यातील रम्याद्-भुतवादी आंदोलन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घटनेला युरोपियन साहित्याच्या अध्ययनाने चालना दिली

(भारत) सोनेरी युगाच्या शिखरावर खडा होता
त्या उष कालो नुसते जिवंत असणे हाही जणू आनंदोत्सवच होता[1]
आणि त्यातही तरुण असणे म्हणजे तर स्वर्गसुखच

या आंदोलनाचा शुभारंभ करणारे कवी त्या वेळी मैसूर विद्यापीठाचे सचिव आणि कन्नडचे सन्माननीय प्राध्यापक होते ते इंग्लिशचे प्राध्यापक झाले ते एका दशकानंतर कुलपतीच्या किंवा प्राचार्यांच्यादेखील पदाला ते कधीच चढले नाहीत कन्नड भाषा आणि साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी श्रींनी जी महान सेवा बजाविली तिचे मूल्यमापन करताना ही वस्तुस्थिती ध्यानात ठेवायला हवी

इंग्लिश साहित्याचा विद्यार्थी असतानादेखील, एकाकीपणे ट्रिप्लिकेन समुद्र-काठच्या वाळूवरून दूरवर हिंडताना कन्नड साहित्य समृद्ध करण्याची साधने व मार्ग

१ मस्ती वेंकटेश आयंगार, एम् गोविंद पै, पजे मंगेशराव, व्ही के गोकाक, गोपाळ कृष्ण अडिगा,

यांचेच चिंतन श्री करीत असत मद्रासहून परतल्यानतर लवकरच (१९११) धारवाडच्या 'विद्यावर्धक समाजाला' उद्देशून त्यानी केलेल्या भाषणातही हेच दिसून येते की इतक्या प्रदीर्घ काळपर्यंत ज्या दलदलित कन्नड साहित्याचा रथ रुतून बसला होता तीमधून त्याचा उद्धार करण्याची योजना त्यानी सिद्ध केली होती तीत एक अश सैद्धांतिक उपदेशाचा होता, तर दुसरा प्रत्यक्ष उदाहरण घालून देण्याचा मानवी प्रकृतीला दैनदिन पोषाक आहार म्हणून उपयोगी पडण्याजोगी कन्नडची आधुनिक गद्य शैली साकार करण्याची निवड त्याने निदर्शनास आणून दिली याचाच अर्थ साहित्याच्या अभिनव प्रकाराचे प्रयोग करून पहाणे, प्राचीन अभिजात साहित्याचे सपादन करणे व नवे साहित्यसग्रह सपादित करणे आणि अभिनव साहित्याचा जन्म झाल्याची वार्ता प्रसृत करण्यासाठी दूरवरच्या ठिकाणी प्रदीर्घ पर्यटने करणे असा होतो इतिहास, कोश आणि व्याकरणग्रथ याचा अव्याहत प्रवाह मुद्रणालयातून बाहेर पडत रहावा अशी इच्छा असेल तर स्वत चेच मुद्रणालय असणे अत्यत उपकारक ठरते 'कन्नड साहित्य विद्यापीठा'चे प्रमुख अधिकारी झाल्या-नतर त्यानी पहिले काम केले ते मुद्रणालयाची उभारणी करून देण्याचे श्रीनी आपले कार्य, आपले समग्र हृदय, चित्त आणि आत्मा ओतून कसे पार पाडले याच्या अनेक उदाहरणातील हे केवळ एक

कन्नड काव्याच्या अलकाररूप शृखला तोडून टाकून त्याला आधुनिक सवेदन-शीलतेचे समर्थक माध्यम बनविण्याच्या दृष्टीने झालेल्या नानाविध प्रयत्नाचे दर्शन विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात घडले नवीन आशय अभिव्यक्त करण्या-साठी एच नारायणराव यांना नवीन छद हवा वाटला तरी जुन्यापुराण्या यमक-योजनेला मात्र ते चिकटून राहिले एप्रिल १९११त गोविंद पैनी मात्र हाही सूर मारला अभिनव लयीची स्वप्ने पहाणाऱ्यातले ते पहिले असून त्यांनी निरनिराळे उत्कृष्ट आकृतिबध पुरविलेही गद्य व पद्य दोहीत आधुनिक कन्नडचा उपयोग करण्याची निकड उत्तर कर्नाटकातील शात कवी आणि जुन्या मैसूरमधील निष्ठावत कार्यकर्त्यांचा एक गट ( विशेषत एस सी नरसिहाचार ) याना दीर्घ काळ वाटत आली होती हे आघाडीवरचे वीर कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यास पात्र ठरतात परतु मूर्तिपूजेच्या भारतीय परपरेला मिरवणुकीचे नेतृत्व करायला मात्र एकच व्यक्ती हवी असते १९२१ मध्ये त्याच्या 'इग्लिश गीतगळु' या युगप्रवर्तक प्रकाशनाच्या हातात हात घालून हा मान श्रीकडे गेला सेंट्रल महाविद्यालयाच्या कर्नाटक सघाने त्याचे पुनर्मुद्रण केले आणि प्रबुद्ध कर्नाटकच्या वर्गणीदाराना ते विनामूल्य वाटले १९५३ पर्यंत या पुस्तकाची तिसरी आवृत्तीही निघाली होती तिसऱ्या आवृत्तीच्या श्री टी एन श्रीकठय्यानी लिहिलेल्या विद्वत्तापूर्ण प्रस्तावने-तूनच वर सकलित केलेल्या वास्तव घटना घेतल्या आहेत

आपल्या विद्यार्थ्यांच्या पहिल्याच गटात टी एन एस (टी एन श्रीकंठय्या) के व्ही पी (कुवेंपू—के व्ही पुट्टप्पा) आणि डी एल एन (नरसिंहाचार) हे शिष्य लाभल्यामुळे बी एम एस (श्रीकंठय्या) भाग्याचे ठरतात कन्नड भाषा व साहित्य यात एम ए पदवी मिळण्यापूर्वीच कित्येक वर्षे त्यातले पहिले दोघे प्राध्यापक मंडळाचे सदस्य बनले ते बी एम एस यांच्या भलावणीवरच कित्येक वर्षेपर्यंत स्वत च अभ्यास करून बी एम एस नी अनेक भारतीय व युरोपियन भाषांचे विद्वत्तापूर्ण अध्ययन केले होते इंग्लिश, कन्नड, संस्कृत, ग्रीक, तमिळ आणि तेलगू कन्नड भाषा व साहित्य यांच्या एम ए पदवीसाठी अभ्यासक्रमाची रूपरेषा त्यांना सिद्ध करायची होती तेव्हा त्यांनी आर्य व द्राविड दोन्ही वर्गांतील संस्कृत, तमिळ व तेलगू या भाषांच्या अध्ययनाला यथोचित महत्त्व दिले बी एम एस यांचे कर्तृत्वाचे महावस्त्र पेलण्याइतके भरदार खांदे कोणत्याही एकेकट्या शिष्याला लाभले नव्हते त्यामुळे तो मान कवी आणि पंडित यांच्या एका गटात विभागला गेला काव्य-कुवेंपू, संस्कृत टी एन एस कन्नड, डी एल एन ग्रीक, के व्ही आर (के व्ही राघवाचार) तामिळ एल जी (एल गुंडप्पा) आणि इतरेजन श्रींचे तिसऱ्या पिढीतले शिष्य म्हैसूर व बंगलोर या विद्यापीठांचे सध्याचे आधारस्तंभ बनले आहेत कारण, टी एस व्ही आणि ए आर के (टी एम वेंकण्णय्या आणि ए आर. कृष्णशास्त्री) हे दोन्ही आचार्यच मुळी श्रींचे एकनिष्ठ शिष्य होते

सेंट्रल महाविद्यालयाच्या वाट्याला अनेक चढउतार आले परंतु म्हैसूर विद्यापीठाची परंपरा मात्र अर्ध्या शतकाहून अधिक काळ अविच्छिन्न राहिलेली आहे अर्थातच कन्नड साहित्याच्या अभिवृद्धीसाठी ते विद्यापीठ इतके महान कार्य करीत आहे यात नवल नाही कर्नाटक विद्यापीठाने या जुन्या विद्यापीठाचाच कित्ता गिरविला आहे त्या विद्यापीठाने एक संशोधन संस्था आणि एक कन्नड अध्ययनाची संस्था स्थापन केली आहे

आचार्य महाकाव्याचे संपादक, कन्नडभाषी संप्रदायाचे संस्थापक, दोन्ही भाषांतले वक्ते, देशभक्त आणि आधुनिक कन्नड काव्याचे जनक या नात्यांनी बी एम एसनी गाजविलेल्या विविधरूपी कर्तृत्वाला एखाद्या संक्षिप्त लेखात न्याय देणे अशक्यच आहे त्यांच्या प्रमुख ग्रंथांचा थोडक्यात आढावा घेऊन आपण हा विभाग संपवू या

'इंग्लिश गीतगळु' ही त्यांची सर्वोत्कृष्ट कृती होय आशय व छंद, पदरचना व सूर, यमकयोजना व लय प्रत्येक प्रकारे ती अभिनव होती जुन्या म्हैसूरी 'लावण्या' दक्षिण कानडाची यक्षगाने', उत्तर कर्नाटकातील 'सांगत्य,' कूर्गमधील 'हुत्तारी' गीते, इत्यादी लोकगीतांचा अभ्यास बी एम एसनी केला होता त्यांनी काव्याचे जे विविध प्रकार रचले त्यासाठी नव्या नव्या चाली आणि नवी नवी गणपरिमाणे

निर्माण करण्याच्या दृष्टीने तो अभ्यास उपकारक ठरला कारण, त्याच्या तुटपुंज्या काव्यनिर्मितीत केवळ भावगीतांचाच नव्हे तर आख्यानक काव्ये, उद्देशिका आणि ग्रीक शोकांतिकाच्या कन्नड पद्यांतील रूपांतराना सोयीचा असा पद्यबंध याचाही समावेश आहे परंतु त्यानी कमीत कमी परिवर्तन करूनही जास्तीत जास्त परिणाम साधला त्यानी वापरलेली अभिनव गणपरिमाणे सर्वस्वी नवीन नव्हती आपल्या अभिनव पद्यबंधासाठी सोयीचा आधार शोधताना ते पंपापर्यंत माघारी वळले आपल्या आदिकवीने 'रगळे' शैलीत लिहिलेली प्रासंगिक पद्ये स्वत च्या उद्दिष्टपूर्तीसाठी उत्कृष्ट असल्याचे त्याना आढळून आले पंपाच्या रचनेत तीन आणि चार अक्षरांचे चरण एकाआड एक येतात बी एम एसनी तीन व पाच अक्षरांचे चरण योजिले त्याना नुसते चालचलाऊ भाषांतर करावयाचे नसून भाषांतरित नवनिर्मिती हे त्यांचे ध्येय होते त्याच्या यशाचे महत्त्व दिग्दर्शित करण्यासाठी एक उदाहरण उद्धृत करता येईल हूडच्या ' ब्रिज ऑफ साइज 'चे (उसाशाचा पूल) त्यानी केलेले रूपांतर वाचताना स्वतंत्र कृतीसारखेच वाटते संपन्न आणि विलक्षण अशा काही अपूर्व कृतीत त्यानी त्याचे रूपांतर केले आहे छंददृष्टया केलेले फेरपालटही लक्षणीय आहेत त्या साऱ्यांच्या कारुण्याला उठाव देण्यासाठी त्यानी एक पद्य जोडले आहे दुर्दैवाच्या घणाघाती प्रहारांची अवहेलना करून जीवनाला चिकटून राहाण्याचा मोह तिला ज्याच्यासाठी पडावा असे स्वत चे मूल त्या गरीब बिचाऱ्या दुर्दैवी स्त्रीला नव्हते असे दिसते भाषा ओघवती असून ती त्या भूमीचीच बोली आहे साध्या भोळ्या लोकाच्या भाषेत उरियवनु ' (ज्वलत) सारखे शब्द अजूनही आढळतात अशा वाक्प्रयोगांच्या स्तुतीत अतिशयोक्ती आणताच येत नाही

होमरने सोफॉक्लिसच्या संदर्भात जे केले तेच होमरच्या संदर्भात करण्याची श्रींची महत्त्वाकांक्षा होती असे सांगतात शेक्सपीअरच्या ग्रंथाचे अध्यापक या नात्याने त्याची ख्याती कर्नाटकच्या चतु सीमापलीकडेही दूरवर पसरली होती इंग्लिशमधून रूपांतरित केलेल्या साठ काव्यखंडातल्या काही सर्वोत्कृष्ट गीतांचा मान शेक्सपीअरच्या गीताकडेच जातो ' इंग्लिश गीतगळू 'त इतकी काही मूलभूत गुणवत्ता आहे की प्रकाशित झाल्यानंतर लवकरच त्याला अभिजात काव्याची प्रतिष्ठा प्राप्त झाली तो नुसता प्रयोगच नव्हे तर यशलाभही होता आघाडीच्या नेत्याला आनुषंगिकपणे लाभणारे स्वातंत्र्य आणि जन्मजात कवीचा स्वाभाविक संयम यांच्या त्या ग्रंथाच्या शैलीत झालेल्या मनोज्ञ संगमाचे लोकाना कौतुक वाटले ' कर्नाटक कविचूतवन चैत्र' या शब्दात सर्वांनी श्रींचा एकमुखाने जयजयकारही केला

कन्नडसाहित्याला नाटचवाङ्मयाच्या संचाची जोड अजून लाभायचीच आहे नवशिके नाटचसंघ ठिकठिकाणी उदयास येत आहेत रवींद्र कलाक्षेत्रात एक प्रकारच्या सर्वसंग्राहक पोतडीसारख्या नाटचमंदिराची स्थापना करण्याची खटपटही

नाटच सघ आणि राज्य सगीत नाटक अॅकेडमी यानी चालविली आहे एक किंवा अर्धा तास रजन करण्याची निवड भागविणाऱ्या-नभोवाणी श्रुतिका आणि एकांकिका-देखील निर्माण केल्या जात आहेत परतु नाटचसाहित्य म्हणून प्रतिष्ठा लाभलेली नाटके मात्र थोडीच असून रगमचावरील प्रयोगक्षमतेच्या कसोटीला उतरतील अशी नाटके तर त्याहूनही कमी आहेत नाटचसाहित्य म्हणून अभ्यासण्याजोग्या दोन नाटकाचे लेखक या नात्याने श्रींना कन्नड नाटचवाङमयातही मानाचे स्थान लाभलेले आहे त्याच्या 'गदायुद्ध' नाटकाचा उल्लेख पूर्वी केलाच आहे 'अश्वत्थामन्' या नावाने सोफॉक्लिसच्या अॅजॅक्सचे रूपातर करून श्रीनी साहित्यिक इतिहासात आणखी एकदा पहिला क्रमाक पटकावला आहे ग्रीक शोकांतिका कदाचित मानवी प्रतिभेने शोधून काढलेला सर्वोच्च साहित्यप्रकार असावा तिचे मर्म प्रतिबिंबित करणारे गीतनाटच लिहिणारे श्री पहिलेच कवी या नव्या प्रकारात श्रींना लाभलेल्या यशामुळे काव्यमय नाटके, सगीतिका आणि युरोपियन अभिजात नाटकाची अभिनव रूपातरे करण्याचा प्रयत्न करण्यास तरुण लेखकाना उत्तेजन मिळाले

**कालातीत भाट**

बेंद्रे आणि कुवेंपू हे कन्नड रगभूमीवर १९३०मध्ये पहिल्यादाच आणि तेही जोडीने अवतीर्ण झाले ही घटना कन्नड साहित्याच्या सोळाव्या वार्षिक समेलनाच्या वेळी घडली त्या वर्षी कुवेंपूनी लिहिलेली, "एखाद्याने कुमार व्यासाचा स्वर ऐकला तर तो थेट द्वापार युगात जाऊन ठेपेल," ही कविता अत्यत लोकप्रिय ठरली दोन वर्षांपूर्वी बेंद्र्यांनीही 'कालपक्षी' या आपल्या प्रसिद्ध गीताने गुलबर्ग्याच्या श्रोत्याना मत्रमुग्ध करून टाकले होते महाराजा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना उद्देशन केलेल्या भाषणात श्रीनी ही कविता गाऊन दाखविली फिरून एकदा मर्कारा येथील परिषदेत बेंद्र्याच्या 'कुनियोनु बार' या कवितेच्या गायनाने श्रोत्याना रोमाचित करून सोडले आपल्या एका देशभक्तीपर गीताने कुवेंपूनीही श्रोत्याना थेट द्वापारात नेऊन सोडले. धारवाड परिषदेत ते पुन्हा एकदा एकाच व्यासपीठावर आलेले दृष्टीस पडले तात्पर्य, आमच्या या दोन थोर कवींनी निरनिराळी राज्यपातळीवरील आणि राष्ट्रीय पारितोषिके पटकाविली इतकेच नाही तर आपल्या व्यक्तित्वाच्या मोहिनीने आणि आपल्या गमक कले—काव्यगायनकले—मधील मधुर सगीताने कन्नडप्रेमी लोकांची वाहवाही मिळविली

साम्य सांगायचे तर दोघेही जन्मजात कवी असून दोघानाही अफाट लोकप्रियता लाभली एवढेच पण त्यांच्यात भेदही आहेतच कुवेंपूचे सगोपन विद्यापीठीय कुजाच्या सुरक्षित वातावरणात झाले भुग्याच्या गुणगुणण्याने निनादित झालेल्या उपवनात राहणे त्याना प्रिय ते पद्यातच भावावेगाने बोलत कारण, पद्य

आपोआपच उत्स्फूर्त होई बेंद्रे जॉन्सनच्या सुरात सूर मिसळून म्हणू शकतील, "दारिद्र्यापाशी उतरलेले मोल मद मतीनेच चढत असते स्वत ची गीते गुणगुणत आणि स्नेहभावाचा मध गोळा करीत उभ्या भारतभर भटकती करणे त्याना आवडते भावनिक एकात्मतेसाठी इतके प्रयत्न दुसऱ्या कोणत्याही कन्नडिगाने केलेले नाहीत" त्याच्या साहित्यकृतीची मराठीतही भाषातरे झालेली आहेत त्यानी मराठी साहित्यात घातलेल्या भरीसाठी त्याना अनेक पारितोषिकेही मिळाली, पुण्यात आणि नागपूरला विद्वान श्रोत्यासमोर त्यानी मराठीत व्याख्यानेही दिली तात्पर्य, त्यांनी आपल्या मातृभूमीसाठी जितका आटापिटा केला, तितकाच आपल्या माय-भाषेसाठीही केला आहे १९१७ त श्री अरविंदांचे शिष्यत्व पत्करल्यापासून तर एक पाऊल पुढेच टाकून उभ्या जगाचे नागरिक बनण्याची आकांक्षा त्यानी बाळगली आहे 'गेळेयर गुपूचे' ते सस्थापक होत बेंद्रयाच्या शिष्यांपैकी व्ही के जी या शिष्याने 'कविजनाशी माझा परिचय' नावाचा एक लेख 'त्रिवेणी' पत्रिकेसाठी लिहिला आहे विनायकाचे शिष्य प्राचार्य आर जी कुळकर्णी यांचे मत बेंद्रयाच्या साहि-त्याच्या सदर्भात प्रमाणभूत ठरले आहे या लेखातली पुष्कळशी माहिती त्याच्या 'चतुर्मुख' या अलीकडच्या (सन १९६८) प्रकाशनातून घेतली आहे

सुस्थिर स्वरूपाची ख्याती लाभलेल्या आमच्या कवीच्या एका महत्त्वपूर्ण वैशिष्टयाचा उल्लेख करण्यास हे स्थळ योग्य दिसते ते सारेच ऋषी अरविंदाचे शिष्य असून ज्या प्राचीन ऋषींच्या पख लाभलेल्या शब्दसपदेविषयी टागोरानी गौरवपूर्वक प्रशशोद्गार काढले आहेत त्या प्राचीन ऋषींशीही त्यानी श्री अरविंद-द्वारा सपर्क साधलेला आहे बेंद्रे व कुवेंपू दोघानीही जगातील महाकाव्यांना आपली आदराजली अर्पण केलेली असून आपलेही राष्ट्र ज्याचा स्वेच्छेने विनाश होऊ देणार नाही अशा कृतींत आपणही आपल्या वाटणीची भर घातलेली आहे अशी आशा दोघेही बाळगून आहेत

यमकरचना आणि लय, पदबध शैली याचे अखड प्रयोग बेंद्रे करीत आले आहेत बेंद्रयांनी लक्ष्मीशाचा विशेष अभ्यास केलेला आहे हे कळल्यावर त्याच्या काव्याचे वाचक चकित होणार नाहीत कारण, पोताची सपन्नता हा दोन्ही कवीचा समान गुणधर्म आहे बेंद्रयानी सपादन केलेले यश तर अष्टपैलू आहे गीते, उद्देशिका, एकांकिका, समीक्षात्मक निबध आणि अनुवादात्मक रूपातरे. कित्येकाच्या मते लोकप्रिय ठरलेल्या लोकगीताच्या धर्तीवर रचलेल्या आपल्या कवितातील शब्द-योजनेची बिनखोड परिपूर्णता आणि भारताच्या प्रसिद्ध श्लोकात सांगितलेल्या शृगार, वीर, करुण, बीभत्स, इत्यादी मूलभूत भावनाना आवाहन करण्याची क्षमता यात तर बेंद्रयांनी डोळयात भरण्याजोगे यश जोडले आहे

त्याचे अगदी अलीकडचे पुस्तक म्हणजे माताजींच्या नव्वदाव्या जन्मदिनी त्याना वाहिलेली श्रद्धाजली होय त्यात ते माताजीचा गौरव 'अरविंद माता' म्हणूनच करतात स्वस्ति स्वर्गगत ते स्वस्ति' यासारखे ऋग्वेदातले कित्येक मत्रही त्यानी माताजीसाठी ईश्वरी कृपेचे वरदान मागताना उद्धृत केले आहेत अरविंदाच्या कित्येक उद्गाराचेही बेंद्रयानी 'वचन' शैलीत रूपांतर केले आहे "मानवाच्या हृदयसिहासनावर अधिष्ठित झालेल्या परमेश्वराचा मार्ग आपल्या साऱ्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक शक्तीच्या सहाय्याने चोखाळणे म्हणजेच एकात्म योग" "अनताशी सायुज्य साधणे हेच योगाचे ध्येय होय ज्या माणसाने हे ध्येय साधले त्याला इतर साऱ्याची जोड आपोआपच लाभेल"

श्री वि कृ गोकाक याच्या श्री अरविंदावरील खाली दिलेल्या चरणाची तुलन उपयुक्त वचनाशी करायला हवी

' महान हे ऋतदाल्या, नव्या जगाच्या,
द्रष्ट्या आणिक भूतभविष्याच्या,
स्वामि, गीत तुझे अन् वैश्विक उद्गार तुझे
होतील माझे अन्नपाणी रे ! लाइफस टेपल-(जीवनमदिर) ब्लॅकी अँड सन, लिमिटेड

श्री अरविंद प्रभूविषयी आणि तिसऱ्या पिढीपर्यंत पसरलेल्या त्याच्या विख्यात शिष्यांविषयी एवढेच पुरे अरविदांच्या तत्त्वज्ञानाने बेंद्रचाच्या कवितेत चैतन्य ओतले आहे यात नवल नाही पुरातन काळच्या ऋषीप्रमाणे सूत्राचे अल्पाक्षरत्व, सौंदर्य आणि सस्मरणीयत्व लाभलेल्या अगदी मोजक्या सुटसुटित चरणात बेंद्रचाना जीवनमृत्यूचे रहस्य ओतता येते "रसवे जनन, विरस मरण, समरसवे जीवन" (जन्म म्हणजे प्रीती, मरण म्हणजे द्वेष, श्रेष्ठ जीवनाचे रहस्य सामरस्यात सामावलेले आहे)

**काव्याचा रथ**

के व्ही पुट्टप्पा (कुवेंपु) यांची भावगीते ज्याने वाचली व आस्वादिली नसतील असा एकही कन्नडिग मिळणार नाही तसेच त्याचे किडरी जोगी' ज्यानी पाठ केले नाही असे एकही लहान बालक नाही त्यांच्या तानाजीतून ज्याना स्फूर्ती लाभली नाही असे कोणी देशभक्त तरुणही नाहीत आणि शेवटी किशोरचद्र वणी यानी आपल्या भावगीतात चित्रित केलेले दिव्य सौंदर्य, भव्यता आणि शातिमय वातावरण याविषयी कौतुक नसलेले कोणी प्रौढही नाहीत (किडरी जोगी आणि इतर कविता या सग्रहाला बी एम एस यानी जोडिलेली प्रस्तावना)

कुवेंपूच्या आख्यानक कवितांचा संग्रह प्रकाशित झाला ते वर्ष म्हणजे कर्नाटकाच्या थोर कवींतील सर्वांत अष्टपैलू प्रतिभा लाभलेल्या या कवींच्या गौरवशाली कर्तृत्वाचा पहिला टप्पा होय यापूर्वी दहा वर्षे त्यांचा अपूर्व रीत्या सन्मान करण्यात आला होता सेंट्रल महाविद्यालयातील कर्नाटक संघाने बोलाविलेल्या 'विद्यार्थी-कवि-परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते तात्पर्य, तिसरे दशक हा त्यांच्या आख्यानक काव्याचा कालखंड होय चौथ्या दशकात त्यांची भावगीतपर प्रतिभा फुलताना दृष्टीस पडली आणि पाचव्यात त्यांनी आधुनिक युगातले एकमेव महाकाव्य, 'रामायण दर्शन', रचण्यास प्रारंभ केला मध्यतरीच्या काळात टीका, काव्यात्म नाटके, वर्णनपर निबंध, चरित्रे, लघुकथा आणि कादंबऱ्या यांचे ग्रंथ प्रसिद्ध करण्यासाठीसुद्धा त्यांनी वेळ काढला होताच कन्नड साहित्याच्या समग्र पसाऱ्यात त्यांच्याइतकी बहुप्रसव आणि अष्टपैलू प्रतिभा लाभलेला दुसरा कोणताच प्रमुख कवी झाला नव्हता सहाव्या दशकात ते कुलपती बनावे हे अगदी यथोचितच होय आपलीच मानसकन्या ठरणाऱ्या 'मानस गंगोत्री'त एकत्र येणाऱ्या विद्वानांच्या गटाला स्फूर्ती देणारा मूलस्रोत ही भूमिका निवृत्तीनंतरही कुवेंपु अव्याहत बजावीत आलेले आहेत

दशकामागून दशके, पायरी पायरीने चढत जाऊन कुवेंपूनी यशाचे शिखर ज्या पद्धतीने गाठले तीवरून आपल्या तरुण होतकरू कवींनी धडा घ्यायला हवा कित्येक वर्षेपर्यंत परिश्रमपूर्वक अभ्यास केला तेव्हाच कुठे त्यांना आपल्या राष्ट्रकवीचा मान मिळविता आला ब्रह्मचर्य, स्वाध्याय, अपरिग्रह आणि आचार, विचार व कृती यांचे पावित्र्य या आपल्या परंपरागत नियमनक्रमातून ते पार पडले जॉन्सनप्रमाणे आपल्यालाच स्वतःलाच हास्यविषय बनवून केलेला विनोद तेही आस्वादू शकत एका खाजगी संभाषणात त्यांनी म्हटले होते की महाकाव्याचा रचयिता अंडी उबविणाऱ्या कोंबडीसारखा असतो ऊब ओसरून गेली तर दोघांच्याही पदरात काहीच श्रेय पडणार नाही

'प्रबुद्ध कर्नाटका'च्या ए आर. के स्मारक अंकाला जोडलेल्या आपल्या प्रस्तावनेत त्यांनी आपल्या महत्तम साहित्यकृतीच्या उगमाचा मोठा मार्मिक आढावा घेतला आहे "मैसूरच्या रामकृष्ण आश्रमातला शिष्य या नात्याने माझा कल भोगापेक्षा योगाकडेच अधिक होता प्रा ए आर. वाडिया हे स्वामी श्रद्धेश्वरानंदांचे शिष्य असल्याकारणाने ते वरच्यावर आश्रमाला भेट देत परमहंस आणि अद्वैत तत्त्वज्ञान यासारख्या पारलौकिक विषयात मी पूर्णतया बुडून गेलो असल्याचे ते जाणून होते म्हणून एम ए च्या पदवीसाठी तत्त्वज्ञानाचा अभ्यास हाती घ्यायची सूचना त्यांनी मला केली होती मी होकारही दिला पण दैवाची इच्छा निराळीच होती (एरवी मोठा पापी असलो, तरी मी एक समर्पित जीवात्मा बनावे यासाठी तेव्हा माझ्या-

करिता व्रतवैकन्येही चालू होती ) काव्यशारदेने ए आर. केंच्या मुखाने आदेश दिला नव्याने चालू केलेला कन्नडमधील एम ए चा अभ्यासक्रम मी स्वीकारावा अशी त्याची इच्छा होती मी त्याच्याही सूचनेला मान्यता दिली कारण, तीन वर्षांत तत्त्वज्ञान व कन्नड दोन्ही विषयातील एम ए पदवीला पात्र ठरता येईल अशी आशा मला होती आणि हा निश्चय अमृतसिद्धियोगच (अमृथ क्षण) ठरला विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्याना कन्नड साहित्य शिकवण्याच्या आणि काव्यशारदेच्या पपा, रन्न, जन्न, नागवर्मा, राघवांक, कुमार व्यास आणि लक्ष्मीश या लाडक्या थोर कवींचे विशेष अध्ययन करण्याच्या दृष्टीने तो माझ्या उपयोगी पडला मी कन्नड साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन केले नसते, तर ' रामायण दर्शना 'सारख्या महान साहित्यकृतीसाठी अवश्य ती समृद्ध शब्दमहती आणि भव्योदात्त शैली मला प्राप्त झालीच नसती प्रातिक वृत्तपत्रासाठी अगदी सामान्य प्रतीचे स्तभ लिहिणाऱ्या लेखकापलीकडे अधिक चागली प्रगती मला साधताच आली नसती, आणि इग्लड-मध्ये बनलेल्या वस्तूचे ओझे डोक्यावर घेऊन त्या वस्तू विकीत गावोगावचे रस्ते तुडविणाऱ्या फेरीवालीची अवकळा माझ्या काव्यप्रतिभेला प्राप्त झाली असती। '

आपल्या भव्योदात्त विषयाला तोडीस तोड ठरेल असा भव्योदात्त छद आणि भव्योदात्त उपमाचा ओघ त्यांना सिद्ध करावा लागला खरा परतु निवेदन करावयाच्या घटनाच्या सुराशी मेळ बसेल अशा प्रकारे पदरचनेला साधेसुधे स्वरूप कसे द्यावे आणि छदात वैविध्य कसे आणावे हेही त्यांना अवगत होते

कन्नड काव्याच्या या पहाणीत पपांपासून तो कुवेंपूपर्यंत सहस्र वर्षांचा आढावा घेतला आहे आधुनिक कवी बनवासी देशात जन्मास यावे यात काही विशेष औचित्य दिसून येते या भाग्यशाली भूमीचे गुणगान करताना पपा व कुवेंपू दोघेही कधीच कटाळत नाहीत "आपण ज्यावर चढून जातो तो पर्वत सह्याद्री होय, जे पाणी पितो ते पवित्र तुगेचे होय आणि आपल्या गावचे लोक जी भाषा बोलतात ती सर्वात शुद्ध कन्नड होय", असे कुवेंपू मोठ्या अभिमानाने घोषित करतात माळनाडला त्यानी हार्डीच्या वेसेक्सइतकी किंवा वर्डस्वर्थच्या लेक डिस्ट्रिक्टइतकी ख्याती मिळवून दिली सरतेशेवटी आपणांस म्हणता येईल की शक्य त्या प्रत्येक मार्गाने कुवेंपूनी कन्नड साहित्य समृद्ध केले आहे बी एम एस , टी एस व्ही आणि ए आर के या आचार्यांचे आशीर्वाद त्याना लाभले होते परतु त्यानी गाजविलेल्या कर्तृत्वाने या आचार्यांच्या स्वप्नसृष्टीवरही मात केली आहे आता ते विद्यमानही नाहीत आणि म्हणून कुवेंपू स्वत च कन्नड कुळाचे आचार्य बनले आहेत त्यामुळे प्रस्तुत परीक्षणात आम्ही ज्यावर निरतर भर दिला आहे त्या काव्यपरपरेच्या सातत्याची निश्चिती प्रस्थापित झाली आहे कन्नड कवीचा निरोप घेऊन कन्नड गद्यसाहित्याचा परामर्श घेण्यास प्रारभ करण्याचा हाच उचित बिंदू होय

# ५. कन्नड गद्यशैली

"वड्डराधन" या ग्रथाने कन्नड गद्यशैलीचा भव्य शुभारभ केला त्याचे लेखक शिवकोटी हे पपाच्या एक पिढी अगोदर होऊन गेले जैन पुराणांतून घेतलेल्या एकोणीस कथा त्यानी निवेदन केल्या आहेत पण त्याची शैली मात्र पुराणाच्या शैलीहून खूपच निराळी आहे ती सूत्रमय पण मनोरम अशी देशी शैली आहे निवेदनाचे कौशल्य तर असे विलक्षण आहे की वाचक मत्रमुग्ध होऊन पुढे काय घडते हे जाणण्यास अत्युत्सुक होतात एक उदाहरण विचारात घेऊ या "बाळा, राजा आला आहे, चल, आपण जाऊ या" "आपला राजा कोण?" "जो आपल्यावर नियत्रण ठेवतो तो" "असा नियत्रण ठेवणारा कोणी आहे?" पद-रचनेचा साधेपणा, आकलनाची सुलभता, जडणघडणाची स्वाभाविकता आणि श्रवणसुभग माधुर्य लाभलेल्या या शैलीत आपण ज्यासाठी आधुनिक गद्यप्रभूचे कौतुक करतो ते एकूण एक गुण आहेत आपण आपल्या स्वत च्या कालखडात येऊन पोहोचतो शिवोक्तीना कोणीही अनुयायी लाभला नाही ही खेदाची गोष्ट होय याची कारणे शोधायला मात्र लांब जायला नको

अभिजात साहित्याच्या कालखडातील लेखकाचा उद्देश राजेरजवाडे आणि पडित याचे रजन करण्याचा असे सर्वसामान्य वाचक अजून उदयाला आलाच नव्हता विषय कोणताही असो, अभिव्यक्तीचे सार्वत्रिक माध्यम म्हणून सस्कृतचाच वापर होत असे पुढे कन्नडने हळुहळू सस्कृतचे उच्चाटन केले बी एम एस नी उद्‌गार काढले आहेत त्याप्रमाणे, "असा भास होई की लेखकाने जणू सस्कृतातच लिहिण्यास आरभ केला असून चुकीने काही थोडे कन्नड प्रत्यय सस्कृत धातूना सहजगत्या चिकटले आहेत अर्थगर्भ व आल्हादकारक परतु साधेसुधे असे कन्नड शब्द कोपऱ्यात फेकून दिलेले होते लाबच लाब सस्कृत शब्द वापरण्याची प्रथा मान्यता पावली होती कन्नडला जणू सस्कृतवाचून काहीच साध्य होण्यासारखे नाही असे वाटत होते कन्नड भाषेच्या प्रकृतीशी विसगत ठरणाऱ्या व्याकरणनिष्ठ रचनाही योजिल्या जात असत उदाहरणार्थ, कर्मणी प्रयोग कन्नडमध्ये स्वाभाविक नाही तो साधण्यासाठी क्रियापदाला (अल्पडू) एखादा उपरा कर्णकटू प्रत्यय जोडावा लागतो अर्थात तुमच्याकडून दुर्योधन पाहिला गेला का?' असे विचारण्यापेक्षा 'तुम्ही दुर्योधनाला पाहिले का?' असे विचारणे अधिक श्रुतिसुभग ठरते आशयाची अभिव्यक्ती सुस्पष्ट, साध्या आणि आल्हादकारक पद्धतीने करण्यापेक्षा स्वत च्या विद्वत्तेचे प्रदर्शन

करण्यासाठीच कन्नड गद्य लिहिले जाई सामान्य वाचकाला आल्हाद देण्याचा प्रश्न तर अजून उद्‌भवलाही नव्हता ''

कन्नड शैलीचा परिपूर्ण आणि यथायोग्य विकास होण्यासाठी मुद्रणालयाचे आगमन, देशी भाषेत वृत्तपत्रीय लेखनकलेची वृद्धी, विद्यापीठाची स्थापना आणि साक्षरतेची प्रगती याची व त्यातूनच निष्पन्न झालेल्या लघुकथा व कादबऱ्या याच्या भरमसाट मागणीची वाट पहावी लागली बोलपटातील पटकथा व सवाद आणि नभोवाणीवरून प्रसारित होणारी भाषणे लिहिण्याची निकड हा गद्यशैलीच्या विकासातला शेवटचा टप्पा 'मागणी तसा पुरवठा' हा नियम साहित्याच्या राज्यातही लागू आहेसे दिसते!

कन्नड गद्याचा विकास गोगलगाईच्या गतीने होण्याचे आणखी एक कारण पूर्वी सागितलेच आहे काव्य आणि साहित्य म्हणजे केवळ चपूकाव्य विशुद्ध कन्नड भाषेत लिहिलेल्या कथा किंवा लावणी–पोवाड्यासारखी जनताप्रिय गीते साहित्याची पदवी लाभण्याइतकी प्रतिष्ठा मिळण्याची अपेक्षा बाळगून शकत नसत मोकळ्या दिवसापुरती रिकामटेकडी करमणुक अडाणी लोकाना त्यानी पुरवावी फार तर पण विद्वज्जनाच्या गोष्टीत परामर्श घेतला जाण्यास त्या पात्र ठरत नाहीत किंवा राजसभातही त्याना शिरकाव करून घेता येत नाही यामुळेच अगदी अलीकडे एकोणिसाव्या शतकापर्यंतही शैलीचे एक विचित्र मिश्रण झालेले आपल्याला आढळून येते चामराजकोटीचे रामायण आणि कृष्णराज वोडियारच्या राज्यारोहणाची अय्याशास्त्री यानी केलेली वर्णने (१९०२) निकृष्ट कन्नड शैलीची उत्कृष्ट उदाहरणे होत याच लेखकानी किती तरी अधिक चागले काव्य लिहिले होते हेही ध्यानात घ्यायला हवे गद्यातल्या आगळ्यावेगळ्या एकमेळाचा मागोवा घेण्याची सधीच त्याना लाभली नव्हती 'कदा'ची आणि 'वृत्ता'ची रचना ते निष्णातपणे करू शकत आणि अनेक वाक्यखडानी सकीर्ण झालेले, शब्दावडबरयुक्त आणि लांबलचक वाक्याचे त्यानी लिहिलेले गद्यही त्या काव्यपद्धतीशी सुसगतच ठरते मान्यता पावण्याजोग्या ज्या कविता ते लिहीत त्यातच मधूनमधून शोभेचा भडक पट्टा म्हणून गद्याची योजना केली जाई ललितरम्य लिहिण्याची कल्पना त्याच्या मनात कधी उद्‌भवलीच नाही खरे सागायचे तर काव्याइतकेच गद्यही सुरेख लिहायला हवे असे त्याना कधी वाटलेच नाही

अर्थात हा सामान्य सिद्धात इतका वरवरचा आहे की समग्र सत्याचा समावेश त्यात होऊन गेला असण्याची शक्यता नाही म्हणूनच आपल्याला नियम सिद्ध करणाऱ्या मोजक्याच अपवादांचा परामर्श घ्यायला हवा हरिहराच्या साहित्याचा आढावा घेताना त्यानी आशय व छद दोहोंतही कसे क्रातिकारक परिवर्तन घडवून आणले याचा विचार

आपण केलाच आहे त्याना प्राचीन वचनकाराकडूनच स्फूर्ती लाभली होती बसवण्णा त्यातलेच एक असून शिवाची सर्वंकष महती प्रस्थापित करणाऱ्या चळवळीचे ते पुढारी होते बसवाच्या कर्तृत्वातील धार्मिक अशाचा विचार स्वतत्रपणे करावयाचा आहे साहित्य या नात्यानेही 'वचना'ची गुणवत्ता मोठी आहे वचनाचा पदबध, आकृतिबध आणि स्वरबध असा काही विलक्षण होता की ती थेट वाचकाच्या हृदयालाच जाऊन भिडत नैतिक उपदेश आणि आध्यात्मिक उन्नती असा वचन-काराचा दुहेरी उद्देश असे त्याच्या उद्दिष्टाला वचनशैली अतिशय सोयीची होती हातांनी कष्ट करून उपजीविका चालविणाऱ्या माणसाची साधीसुधी बोली भाषाच त्यांनी उपयोगात आणली त्याची गोत्रनामेच त्याच्या अगदी सामान्य अशा व्यव-सायाची निदर्शक ठरतात त्यामुळे वचनकाराची प्रतिमासृष्टीही जीवनातील चिरपरिचित व्यापारातूनच उचललेली आहे साकेतिक स्वरूपाच्या उपमारूपकां-पासून ती अलिप्तच आहे वचनकाराच्या यशाचे श्रेय त्याच्या साधेपणाकडे आणि स्वाभाविकपणाकडेच जाते बसवण्णासारख्या सिद्धहस्त साहित्यप्रभूच्या हाती वच-नाना इतके साधेसुधे, सडेतोड, सावेश आणि सूत्रमय स्वरूप प्राप्त झाले की त्याना सुभाषिताचीच प्रतिष्ठा लाभली (बायबलमधील दहा) आज्ञा, ब्रह्मसूत्रे आणि शेक्स्पीयरच्या काही सस्मरणीय पक्तींप्रमाणेच तीही वरच्यावर उद्धृत केली जातात "कायकवे कैलासा" (कर्तव्यपूर्ती हीच पूजा), "देवनोब्ब, नाम हळवु" (सत्तत्त्व एकच आहे, नामे अनत आहेत), "अय्या एदोडे स्वर्गा, एलवो एदोडे नरका," (सौजन्य हाच स्वर्ग, असभ्यता हा नरक), "दयाविल्लदे देव एवुदेय्या ?" (दये-वाचून ईश्वर करणार काय ?)

सगीताच्या चालीत बसवून वचने गायिलीही जात असली, तरी तो एक गद्य-प्रकार आहे हे नाकारता येणार नाही यमक व स्वरसवाद, अनुप्रास व नादानुकरण यासारख्या काव्यक्लृप्त्याना ती तिरस्करणीय लेखीत नसली, तरी त्याना नियमबद्ध असा छद मात्र नाही त्याला लयबद्ध गद्य म्हणावे फार तर सुसवादी रचना आणि अतर्निबद्ध यमके यामुळे महादेवी अक्काची वचने मात्र पद्याहून भिन्न मानणे कठीणच सूर व भाव दोन्ही दृष्टींनी ती काव्यात्मकच आहेत तरी पण महादेवीअक्का कवयित्री मात्र नव्हेत एका दृष्टीने त्या धर्मोपदेशिका होत प्रभुदेवासारखे इतर वचनकार सत्त्वाच्या साक्षात्काराची उज्ज्वलता साभाळीत गूढार्थ शैलीत लिहितात तात्पर्य, वीरशैवात जितके म्हणून सत, धर्मोपदेशक आणि द्रष्टे उदयास आले तितक्याच व्यक्तिनिष्ठ पद्धती 'वचना'त सामावलेल्या आहेत

हरिहराच्या 'रगळे' शैलीत गद्य आणि पद्य याना सारखेच महत्त्व दिलेले आहे त्यानी एकाआड एक एक सर्ग गद्यात व पद्यात लिहिला 'चपू' काव्यात प्रसगोपात्त

यणारे गद्य उतारे 'चपू' शैलीशी मिळतेजुळते असतात, तशी हरिहराची गद्य शैलीदेखील 'रगळे' शैलीनेच रेखलेली आहे साधेपणा आणि स्वाभाविकता हे 'वचन' व 'रगळे' दोहोतेही समान गुणधर्म आहेत परतु हरिहराची वाक्ये खूपच लावलचक असून ती पद्यात्म लयीला जवळची आहेत हरिहराच्या हाती गद्याला अमाप प्रतिष्ठा प्राप्त झाली असली तरी दैनदिन वापराजोगा आदर्श बनण्याच्या आड येणाऱ्या शृखला गद्याने अद्याप झुगारून दिल्या नव्हत्या नैतिक उपदेशासाठी वचनकारानी साधेसुधे गद्य लिहिले आणि भक्तिभावाला आवाहन करण्यासाठी भावनोत्कट भाषा योजिली आधुनिक शैली सिद्ध करण्याची खटपट न करता हरिहरानी त्याच्याच पावलावर पाऊल ठेवले

केंपू नारायणाची 'मुद्रामजूषा' हा कन्नड गद्य शैलीच्या विकासातला दुसरा टप्पा त्याच्या काळपर्यंत सस्कृतच्या आस्थापूर्वक जोपासनेत खड पडला होता. भाषातरे, रूपातरे आणि अनुवादात्मक नवनिर्मिती याना पूर्वी कधी नाही इतकी वाढती मागणी होती त्यामुळे राजाश्रय लाभलेल्या कवीनी महाभारत, मुद्राराक्षस आणि इतर अभिजात साहित्य यांतील कथा निवेदन करण्यास प्रारभ केला परतु एके काळी लोकप्रिय झाल्या असल्या तरी या कथा पदबधाचा जुनाटपणा आणि निवेदनाची पौराणिक ढब या अभिजात गद्याला आनुषगिकपणे येत असलेल्या जुळ्या दोषांमुळे उण्याच ठरतात आधुनिक सवेदनशीलतेला अगदी उद्वेगजनक वाटणारे शैलीचे विचित्र मिश्रण तेवढे त्यातून निष्पन्न होते

**मुद्दण्णा** नदलिकाना 'रामाश्वमेघ' जुन्या कन्नड शैलीतच लिहिणे परिस्थितीमुळे भाग पडले असले, तरी आधुनिक कन्नड शैलीचा आदर्श आपणासमोर ठेवण्याची क्षमता त्याना त्याच्या प्रतिभेतून लाभली होती शैलीची सरमिसळ करण्याचा अपराध त्यानी कधीही केला नाही त्याचा सूर कालविसगत कधीच ठरला नाही आख्यानक गद्याला पौराणिक शैली किती बावडी ठरते हे दाखविण्यासाठी त्यानी बुद्धिपूर्वक तिचे विडबन केले प्रतिभेला शिक्षणाचे सस्कार लाभलेले नसूनदेखील त्यांनी स्वत साठी सिद्ध केलेल्या नियमात अधिक सुधारणा करायला वाव नाही "पद्य वध्यम् हृद्यम् गद्यम्" (मरो ते पद्य, गद्यच हृदयगम असते) कन्नडमध्ये सस्कृतचे मिश्रण काळ्या मण्याच्या माळेत मधूनच डोकावणाऱ्या पोवळ्याच्या-तुकड्याइतकेच मोजके असावे वराने भेट म्हणून द्यावयाच्या आणि वधूने धारण करावयाच्या मगळसूत्राचा सदर्भ यात आहे "अलिदोडम उलिदोडम बट्टेदोरिप रसभरितम् चरितम्" (काव्यानद ही ब्रह्मानदाच्या अलीकडची पायरी ठरावी) करुणाची हास्याशी सरमिसळ करण्याच्या दृष्टीने नदलिक कन्नड साहित्यात अद्वितीयच होय लॅब व गोल्डस्मिथ याच्या निबधातल्यासारखाच हा गरीब बापडा

दरिद्री कादंबरीकारही तेवढ्या वेळापुरते आपण भौतिक सुखाच्या सिंहासनावरच बसलेलो आहोत असे मानतो कल्पनेच्या उत्तुंग भराऱ्याचा आस्वाद घेण्यात दारिद्र्याचा अडसर कधीच पडत नाही कल्पनेच्या पंखावर तरंगत तो स्वतःला व वाचकांनाही रामराज्यात नेऊन सोडतो "दरिद्री असण्यात काहीच सुख नाही का ?" मुद्दण्णा मनोरमेस सांगतो की कवी अनेक चमत्कार घडवून आणू शकतो आणि त्याला जादूचा मंत्रही अवगत असतो त्या साध्याभोळ्या पत्नीला माहीतच नसते की ही दर्पोक्ती तर अतिशयोक्तच आहे पांडित्यपूर्ण लांबलचक शब्द आणि गडगडाटासारखा ध्वनी योजून तो तिला अधिकच चकित करू पहातो साहजिकच त्याविषयी सारेच काही जाणून घेण्यास ती उत्सुक होते तो तिच्याकडून ते सारे गुपित ठेवण्याची शपथ घेवविती काही वेळ तिला असे चिडवल्यावर तो त्या महा-मंत्राचा उच्चार करतो तो मंत्र एकदोन अक्षराचा नव्हे, चांगला सप्ताक्षरी असतो 'भवति भिक्षां देहि ।'

महाकाव्ये रचणाऱ्या आमच्या कवींनी आपल्या प्रदीर्घ काव्यात नाट्याचीही वैशिष्ट्ये समाविष्ट करून घेतली हे मागे सांगितलेच आहे मुद्दण्णा या प्रकारचे आणखी एक उदाहरण पुरवितात अभिजात नाटकात वस्तुनिर्देशार्थ नटी व सूत्रधार यांचा संवाद घातलेला असतो ना, अगदी तसाच या प्रेमळ दांपत्याचा संवाद आहे. तो म्हणजे जणू नाटकातील घटनांवरचे एक वृंदगीतात्मक भाष्यच आहे दक्षिण कानडात लोकप्रिय झालेली नाट्यरूप करमणूक म्हणजे 'यक्षगान', त्यातही नंदलिकांनी आपले कौशल्य चालवून पाहिले होते ते अधिक जगते तर गीते, नाटके आणि कादंबऱ्या यांच्या द्वारा त्यांनी कन्नड साहित्य समृद्ध केले असते तरुण आणि अपरिपक्व अवस्थेतच मरण पावल्यामुळे तुटपुंज्या कीर्तीचे ते अधिकारी ठरले

## आधुनिक कालखंड

कन्नडिगांना छापण्याची कला शिकविणाऱ्यांतले जर्मन धर्मप्रचारक हे पहिले बेल्लारीस व मंगळूरला राहून काम चालवणाऱ्या त्यांच्या एका गटाने पहिले कन्नड वृत्तपत्र काढले (१८१२) आणि 'जैमिनी भारत' व 'बसवपुराण' (१८४८) यासकट अभिजात कन्नड साहित्याची एक मालाही छापून काढली कन्नडमधील वृत्तपत्रसाहित्याचा उद्गम व विकास यांचा आढावा पुढील प्रकरणात घ्यावयाचा आहे विद्वज्जन व प्रकाशक यांच्या आघाडीवरील कार्याचा संक्षिप्त वृत्तांत तेवढा येथे दिला आहे

आपल्याकडील अभिजात साहित्याच्या प्रमाणभूत प्रती प्रकाशित करण्याचे कार्य विद्यापीठांनी हाती घेण्याच्या किती तरी अगोदर श्रेष्ठ पंडितांनी या क्षेत्रात उत्कृष्ट सेवा बजावली होती "किटेल, रसीग्लेर, बी एल व ई पी राइस, काल्डवेल

इत्यादी ख्रिस्ती धर्मप्रचारकानी कन्नडमधील प्रमाणग्रथ प्रकाशित करण्यात आघाडीवर राहून केलेले कार्य त्याच्या मागोमाग आलेल्या आर नरसिंहाचार, एस जी नरसिंहाचार, रामानुज अयगार, इत्यादी श्रेष्ठ विद्वानानी पुढे चालविले आणि कन्नड साहित्याच्या पुनरुत्थानाला मोठाच हातभार लावला " ( कर्नाटक थ्रू दि एजेस)

शतक पालटताना झालेले किटेलच्या कोशाचे आणि १९०७ मधील आर नरसिंहाचाराच्या कविचरित्राचे प्रकाशन हे कन्नड साहित्याच्या प्रगतीचे दिग्दर्शन करणारे मैलाचे दगडच होत हे ग्रथ सशोधकाना आजही मौलिक सामग्रीचा पुरवठा करीत आहेत त्यानतर प्रा एम मरिअप्पा भट यानी किटेलच्या कोशाची सुधारलेली आवृत्ती चार खडात प्रसिद्ध केली आहे डॉ ए वेंकटसुब्बय्या (मैसूर), एम गोविद पै (मगळूर), आणि एस बी जोशी (धारवाड) यानीही आपल्या कवीचा कालानुक्रम निश्चित करण्यासाठी खूपच परिश्रम केले आहेत

१९३६ मधील इंग्लिश-कन्नड कोशाचे प्रकाशन ही कन्नडच्या अध्ययनाच्या प्रगतीतील पुढची पायरी त्यात मैसूर शासनाने पुढाकार घेतला आणि शासकीय मुद्रणालयातच तो छापला गेला मैसूर विद्यापीठातील प्रसरागच्या निर्देशकांनी दुसऱ्या आवृत्तीला जोडलेल्या आपल्या प्रस्तावनेत ( १९६७ ) असे उद्गार काढले आहेत की "नेमलेल्या वेळाच्या अर्ध्याच अवधीत, म्हणजेच दहाच महिन्यात, आपले काम पूर्ण केले म्हणून मणिपाल विद्युत् मुद्रणालयाविषयी आम्हास वाटणारी कृतज्ञता शब्दरूपाने योग्य प्रकारे प्रकट करणे कठीणच आहे "

हे उद्गार उद्धृत केले ते केवळ आधुनिक जगाचे वैशिष्ट्य बनून गेलेल्या परिवर्तनाच्या वेगाचे दिग्दर्शन करावे म्हणून तिसऱ्या दशकात श्रीना आपले 'इंग्लिश गीतगळु' खडश प्रसिद्ध करण्यासाठी तीन आश्रयदात्यावर अवलबून रहावे लागले होते तीन भावगीते १९१९ मध्ये 'विद्यादायिनीत' प्रसिद्ध झाली, बारा १९२१ मध्ये 'ग्रथमाले'त छापली गेली, दोहोचे सपादन बी एस रावानी केले होते १९२४ साली डी व्ही जीनी सपादित केलेल्या 'कर्नाटक 'मध्ये चोवीस छापली गेली आणि ए आर. केनी सपादित केलेल्या ' प्रबुद्ध कर्नाटकची ' पुरवणी म्हणून त्रेसष्ट प्रकाशित झाली

कुवेपु व बेंद्रे या आपल्या दोन थोर कवीच्या कवितांचे सग्रह, १९३२ साली श्री श्रीनिवास, एस जी शास्त्री, सी बी रामराव, बी पुट्टय्या, सी के वेंकटरामय्या, पी एच कृष्ण राव, टी जी आणि बी के गरुडाचार अशा नऊ जणाच्या समितीद्वारा प्रकाशित करावे लागले

आठव्या दशकातली परिस्थिती अत्यंत उत्साहवर्धक आहे साहित्य अ‍ॅकॅडमी, सर्वसामान्य जनता, विद्यापीठे, पॉप्युलर मुद्रणालय यांचा आश्रय असताना काय विचारायला हवे ? मुद्दण्णासारखे आता कोणत्याही लेखकाला प्रकाशकाच्या अभावी कुचंबत पडायला नको एका नव्या पुस्तकमालेचे प्रकाशन करताना मैसूर विद्या-पीठाच्या उपकुलगुरूंनी निदर्शनास आणलेल्या काही गोष्टी येथे उद्धृत करण्याजोग्या आहेत "या वर्षी प्रसरांगाने जवळजवळ लाख रुपये किंमतीची पुस्तके विकली आहेत पाचशेवर पुस्तके आधीच प्रकाशित होऊन चुकली आहेत येत्या काही वर्षांत आणखी पाचशे प्रकाशित करण्याची आशा आम्ही बाळगून आहो त्यामुळे नवसाक्षर, पदवीपूर्व विद्यार्थी आणि संशोधक अशा सर्वच पातळ्यांवरील वाचकांची निकड भागेल प्राध्यापकवर्गाला अवघ्या तीस टक्क्याहूनही कमी यश लाभते परंतु प्रसरांगाला मात्र परिपूर्ण यश मिळते कारण, जे आमची पुस्तके विकत घेतात त्यांनी ती वाचून त्यांचा अगदी संपूर्ण लाभ घेण्याची शक्यता आहे 'गृहसरस्वती ग्रंथमाला' काढली आहे ती ज्या लोकांना या ना त्या कारणाने विद्यापीठाच्या प्रांगणात प्रवेश मिळू शकला नाही त्यांच्यासाठी पंचवीस वर्षांच्या आपल्या अल्प-कालीन इतिहासात मैसूर विद्यापीठाने मातृभाषेतील ग्रंथ प्रकाशित करण्याच्या कामात अपूर्व यश जोडले आहे कर्नाटकाच्या सर्वच भागातून निवडलेले पंडित, मुद्रक व प्रकाशक यांच्या सहकार्याकडेच या संतोषजनक परिणतीचे श्रेय जाते मणिपाल आणि बागलकोट यासारख्या दूरवरच्या ठिकाणांहून आम्हाला ग्रंथ मुद्रित करून घ्यावे लागले चालू वर्षी ७५००० रुपये किंमतीची पुस्तके विकणाऱ्या एका एकाकी प्रकाशकाचाही निर्देश करायला हवा

## कन्नड गद्याचे शिल्पकार

शतक पालटण्याच्या आसपास काही प्रतिभाशाली लेखकांनी कन्नड गद्यात हलकेफुलके साहित्य लिहिण्याचे मनावर घेतले सामान्य वाचकाच्या करमणुकीसाठी प्रथम कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या त्या गलगनाथ आणि बी वेंकटाचार यांनी परंतु त्या म्हणजे मूळ मराठी वा बंगाली कादंबऱ्यांची नुसती भाषांतरेच होती उलट अलूर वेंकटरावांचे 'गाथावैभव' हे युगधर्म अभिव्यक्त करणारे पुस्तक असून त्यातील देशभक्तीच्या आवेशामुळे तर ते विशेषच मनोवेधक ठरते एम एस पुट्टण्णा आणि सी वासुदेवय्या यांनीही आघाडीवरचे पुष्कळच कार्य उरकले पण कन्नड साहित्यात तुरळक तुरळक आढळणारी ही रत्ने आधुनिक गद्यशैलीचे आदर्श बनतील अशी शक्यताही नव्हती आणि तशी ती बनलीही नाहीत मध्यममार्गी शैलीची बुद्धिपूर्वक निपज करून जनतेकडून कौतुक करून घेण्याजोग्या उच्च स्थानी तिची स्थापना करणारे कलाकार ए आर कृष्णशास्त्रीच होत

## कन्नड गद्यशैली

मराठी ... ग्रंथ संग्रहालय ... ६१३९८ ... २१६०१

ए आर केंनी 'प्रबुद्ध कर्नाटक' काढून ते पाव शतकाहून अधिक काळ चालविले. त्यांनी दुसरे काहीच केले नसते तरीदेखील या मासिकाचे खंड हेच त्यांचे चिरस्थायी स्मारक बनून राहिले असते कारण, कोणत्याही प्रकारचे आर्थिक अथवा संपादकीय सहाय्य न घेता त्यांनी ते मासिक एकहाती चालविले अध्यापनेतर अवांतर उद्योग म्हणून असे कष्टदायक काम फारच थोड्या प्राध्यापकांनी हाती घेतले आहे अनेक कारणांमुळे या मासिकाच्या खंडांना मोठेच ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. ए आर. के हे नवनिर्मितिक्षम लेखक आणि श्रेष्ठ टीकाकार असे दोन्ही होते तीन भाषांतले पंडित असल्याकारणाने यथोचित मानदंड घालून देण्याची काळजी त्यांनी घेतली होती दुय्यम कोटीचे काहीही प्रसिद्ध न करण्याचे व्रत घेतलेले ते एक गुणवत्तारक्षक होते व्ही सी (कलासमीक्षा), श्री (ग्रीक नाटके), कुवेंपु (भावगीते) मस्ती (लघुकथा), वेंकोबाराव (शिल्पशास्त्र), कुवेंपु, भारती एम आर. एस, ए एन एम, डी व्ही जी हे गद्य व पद्य नाटककार (के व्ही पुट्टप्पा, मौ टी टी शर्मा, एम आर. श्रीनिवास मूर्ती, ए एन मूर्ती, राव, डी व्ही गुंडप्पा (उमरण ओसगे) आणि कर्नाटकाच्या सर्व विभागातले प्रातिनिधिक लेखक, या त्यांनी जोडलेल्या लेखकांच्या नाममालिकेवरून हे सिद्ध होते की साहित्यिक गुणवत्तेचा मागोवा घेण्यात ते अत्यंत यशस्वी ठरले पदवीपूर्व विद्यार्थ्यांना सर्जनशील लेखन हाती घेण्यासाठी उत्तेजन देणारे ते पहिलेच संपादक भास्करराव, क्षीरसागर, आनंद, के जी के आणि एम एन एम (बी सीताराम शास्त्री, ए सीताराम, के गोपाल-कृष्ण राव, एम एन मूर्ती) यांच्या लघुकथा 'प्रबुद्ध कर्नाटकात' प्रसिद्ध होत कर्नाटक संघाच्या वार्षिकोत्सवाचे अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी प्रथितयश लेखकांना निमंत्रण देण्याची ए आर केंची पद्धत असे त्यामुळे हलकट्टी, बसवनाळ, पंजे, गोविंद पै आणि कन्नड पुनरुत्थानाचे इतर दीपस्तंभ यांच्यासारख्या स्फूर्तिदायक व्यक्तींशी विद्यार्थ्यांचा परिचय घडून येई अर्थातच त्या कालखंडाच्या अध्ययनाच्या दृष्टीने या मासिकाचे खंड अपरिहार्य बनून गेले आहेत

ए आर के एक उत्कृष्ट लघुकथालेखक होते त्यांनी निरनिराळे कन्नड अभिजात ग्रंथही संपादित केले आहेत संस्कृत नाटक या विषयाचे ते अधिकारी तज्ज्ञ होते 'वचन भारत' ही त्यांची सर्वोत्कृष्ट महान कृती होय तिला शाश्वत लोक-प्रियता लाभली आहे त्यांच्या 'बंकिम चंद्र' या ग्रंथाने त्यांना अॅकेडमी अॅवॉर्ड मिळवून दिले प्रा एच एम नायक यांनी आधुनिक कन्नड गद्याचे शिल्पकार या नात्याने ए आर केंचा गौरव केला आहे त्यांनी निदर्शनास आणलेल्या गोष्टींचा सारांश पुढे दिला आहे

"१९१८ त ए आर केंनी आपले संपादकीय कार्य चालू केले तेव्हा कन्नड गद्याला कसलीच स्थिरता किंवा उच्च पातळी लाभली नव्हती ए आर. केंनी त्याला नवी

प्रतिष्ठा मिळवून दिली अनेक दशके तीच उच्च पातळी टिकवून ठेवून त्यानी जनतेच्या अभिरुचीलाही वळण लावले त्यांच्या हाती कन्नड गद्याला प्रौढत्व आले त्यानी आदर्श गद्य लिहून त्यातील पराकाष्ठेच्या सामान्य शब्दानाही साहित्यिक भारदस्तपणाची जोड मिळवून दिली ज्याला म्हणून प्रसन्न, सक्षिप्त व समर्थ कन्नड शैली साध्य करावयाची इच्छा होती त्या प्रत्येकाला ए आर. केंच्या रूपाने उत्कृष्ट आदर्श लाभला सस्कृत शब्दाच्या योजनेवरील चिघळलेल्या समस्येच्या सदर्भात ए आर केंची भूमिका सिद्धात आणि व्यवहार या दोन्ही दृष्टीनी अत्यत यथायोग्य होती सस्कृत तर त्याच्या रक्तातच होते आणि सस्कृतचे अध्ययन त्यानी आपल्या साहित्यिक खटाटोपाचा केंद्रबिंदूच कल्पिला होता आणि तरीसुद्धा सस्कृत शब्द वापरताना त्यानी जो सयम प्रकट केला तो अत्यत प्रशसनीय आहे त्यानी म्हटले आहे, 'आपल्याला जे काही सागायचे असेल ते सारेच एखाद्याला सस्कृत शब्दाच्या सहाय्याविना सागता कसे येणार ? पण माणसाने या समस्येचा थोडा विचार करायला हवाच विशुद्ध कन्नड शब्दांत आशय अभिव्यक्त करणे शक्य असेल तेव्हा सस्कृतचे सहाय्य मागणे चूकच ठरेल !"

वेकटाचारनी बगालीतून केलेल्या भाषातराचा परामर्श घेताना ए आर केंनी भाषातरकाराच्या पदयोजनेवर टीकेची झोड उठवली होती सस्कृत शब्दाची रेलचेल बगालीत उचित असेलही परतु कन्नडच्या मूळ प्रकृतीच्या दृष्टीने देशी शब्दाचाच उपयोग करणे अगत्याचे असते त्याबरोबरच एवढी मात्र काळजी घ्यायला हवी की अपरिचित कन्नड शब्दाच्या जागी परिचित सस्कृत शब्दालाच प्राधान्य दिले जावे तात्पर्य, ए आर. केंची भाषाविषयक भूमिका केवळ भाषाशुद्धिवाद्याचीही नव्हती किंवा नुसती पडितमन्याचीही नव्हती, हे उघडच आहे

सर्वसामान्य शब्दाचा आणि घटनाचा कौशल्याने उपयोग करून ए आर के आपल्या लेखनात बराच जिव्हाळा निर्माण करीत सस्कृत नाटकातल्या नायिकांचे वर्णन करताना 'बुडबुडणे 'सारखा नादानुकारी शब्द, 'जबरदस्त 'सारखा पर्शियन शब्द आणि मातृसत्ताक पद्धती पाळणारा मलबार निर्देशित करणारा 'स्त्री मलयाला'-सारखा कन्नडिगाच्या परिचयातला सस्कृत शब्दबधही त्यानी वापरला आहे व्यक्ति-चित्राचा एका नवीन अगाने विचार करण्याच्या दृष्टीने हे शब्द वाचकाना उपकारक ठरतात

माणसे आणि लोकव्यवहार याचा व्यापक अनुभव प्रगाढ व्यासग आणि सशयातीत प्रतिभा या तिन्ही गोष्टी ए आर. केंच्या ठायी एकवटलेल्या असून त्यातूनच आवेश-पूर्ण सक्षिप्त आणि ललितमृदू अशी त्याची गद्यशैली निष्पन्न झाली आहे उत्तम गद्यशैलीत पुढील गुण असायला हवेत स्पष्टार्थता, नेमकेपणा आणि चिरतन

सुश्लिष्टता सहजगत्या लिहूनही शब्दाशब्दात आशय खच्चून भरणारे गद्य लेखक कोणत्याही भाषेत आढळले असे अगदी क्वचितच घडते

## डी व्ही गुडप्पा

"माझ्याजवळ जो काही सारासार विवेक होता तो ओसरण्याऐवजी वाढतच आहे आणि जे काय विचार असतील ते अशा काही वेगाने आत घुसून गर्दी उडवून देतात की निवडून कोणते घ्यावे आणि त्याज्य कोणते मानावे, त्याना पद्याच्या साच्यात ओतावे की गद्याचा आगळाच सुसवाद त्याना प्राप्त करून द्यावा, हीच माझी एकमेव समस्या होऊन बसते मी त्या दोन्ही प्रकाराचे अध्ययन व प्रत्यक्ष लेखन इतक्या दीर्घ काळपर्यंत केलेले आहे की ते आता माझ्या अगवळणी पडून गेले असून माझ्या पूर्ण ओळखीचे झाले आहेत" (ड्रायडन फेबल्सला जोडलेली प्रस्तावना)
'येन केन चिदाच्छन्नो त देवा ब्राह्मण विदु ।" (शकराचार्य, गीताभाष्य)

ए आर के हे यश श्रीला अज्ञात असलेले एक साधे प्राध्यापकच होते तेव्हाच लेखक व प्रकाशक, देशभक्त व पत्रकार आणि तीन भाषातले पडित या विविध नात्यांनी डी व्ही जी ना सुस्थिर कीर्ती लाभलेली होती ते विद्यापीठाचे एक आधारस्तभ आणि विधानसभेचे सदस्यही होते त्यानी आपल्या कार्यरत जीवनाचा आरभ वयाच्या पचविसाव्या वर्षी 'कर्नाटक' पत्राचे सपादक या नात्याने केला आणि १९१३ पासून दशकानुदशके नवी नवी कर्तृत्वे गाजवून ते जगाला चकित करीत आले आहेत बहुतेक लोक ज्या वयात निवृत्त होण्याच्या विचारात असतात त्या वयाला ते कन्नड लिटररी ॲकॅडमीचे अध्यक्ष झाले प्रारभी त्याना वाटे की आपल्या राजकीय कार्याद्वारा आपण जनतेची सेवा बजावू शकू अलीकडे मात्र ते राजकारणाला फारसे महत्त्व देताना दिसत नाहीत आपल्या अगच्या गुणांना सामाजिक कार्यच अधिक मानवते अशा निर्णयाला ते येऊन ठेपले आहेत लोकानाही हेच मान्य आहेसे दिसते कारण, अगदी अलीकडेच पूर्णतया प्रातिनिधिक स्वरूपाची एक सभा भरवून तीत मुख्य मत्र्यानी डी व्ही जी ना एक लाख रुपयाचा चेक भेट म्हणून दिला ही घटना कन्नड साहित्याच्या इतिहासात अपूर्वच होय जनतेने दिलेला हा निधी आणि साहित्याच्या ध्येयाची सेवा बजाविली म्हणून साहित्य ॲकॅडमीने दिलेला निधी दोन्हीही एका महान भारतीयाचे नाव दिलेल्या त्या सस्थेचा विकास घडवून आणण्यासाठी गोखले इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक अफेअर्सच्या कोशाध्यक्षाच्या स्वाधीन करण्यात आले

डी व्ही जी च कदाचित आपले सर्वांत थोर गद्यलेखक ठरतील ए आर केंना पहिला क्रम दिला जातो तो त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वामुळे आणि त्यांनी

आपल्या एकमार्गी गुणवत्तेचा उपयोग अनन्य भावाने एकाच उद्दिष्टासाठी करून घेतला म्हणून कवी या नात्याने डी व्ही जी ची महती जनतेने अजून निर्णित केलेली नाही ते स्वत तर स्थितप्रज्ञ किंवा कीट्सने म्हटले असते तसे ऋणात्मक कर्तृत्वाचे पुरुष आहेत असले प्रश्न भावी पिढ्याच्या निर्णयावर सोपविण्यास ते सिद्ध असतात त्यांनी पद्ये रचलेली आहेत आणि ती रचण्यात त्याना आनदही लाभलेला आहे त्याना ज्यात आनद गवसला त्याचे मूल्यमापन दुसऱ्यांनीच करू देत

वास्तविक काव्य आणि गद्य याच्या प्रमाणातील विषमता दूर करण्याचा काहीसा प्रयत्न या विभागात केला जात आहे कन्नडमध्ये तर साहित्यिक इतिहासाचा अर्थ काव्याचा इतिहास असाच होऊन बसला आहे या शर्यतीत गद्यलेखकही भाग घेतात पण ते आपले लक्ष्य कधीच गाठू शकत नाहीत डी व्ही जी चा या क्षेत्रातील कार्यभाग अनेकविध असून तो विशेष लक्ष पुरविण्याच्या योग्यतेचाही आहे

आधुनिक कन्नड साहित्याच्या साऱ्या आचार्यांमध्ये एकटे डी व्ही जी च तेवढे विद्यापीठातील पदवीची उणीव असलेले आहेत त्यानी स्वत च अध्ययन करून विद्वत्ता जोडली आहे उलट पक्षी आपल्या पुरातन परपरेचे ज्ञान त्याच्या रक्तातच भिनलेले असून प्रशिक्षणामुळे त्याला परिपूर्णता आली आहे त्याची सस्कारक्षम वर्षे ज्या मूलवगलमध्ये व्यतीत झाली ते तर एके काळी विद्येचे प्रवेशद्वारच होते. श्रीमध्वाचार्यांचे थोर शिष्य श्रीपादराय यांचे ते मूलपीठ होते याच्याविषयी पुढल्या प्रकरणात आपणास पुष्कळसे सागायचे आहे 'कन्नड प्रभा'साठी लिहिलेल्या एका लेखमालेतून डी व्ही जी नी आपल्या परपरागत विद्येची कल्पना लोकाना दिली. विभूतिभजनाचा आपला आवडता खेळ चालू करण्यापूर्वी लोकानी परपरागत मूल्ये समजून घेण्याची खटपट करावी असा त्याचा आग्रह असे

वर जे सागितले आहे त्यावरून हे स्पष्टच दिसून येते की डी व्ही जी म्हणजे एक चालतेबोलते विद्यापीठच आहे विद्यापीठाने जे करावे अशी अपेक्षा असते ते ते सारे--विद्येची जोपासना, प्रसार आणि विस्तार--त्यांनी करून टाकले आहे आता वरील उद्दिष्टाच्या परिपूर्तीचे गद्य हे अत्युत्कृष्ट साधन होय आणि डी व्ही जी चे गद्य आशयाने पुरातन असले तरी त्याचा सूर मात्र नूतनच आहे 'सायणचरित्रा'-पासून (हे चाळीस वर्षांपूर्वी प्रबुद्ध कर्नाटकमध्ये पहिल्यांदा प्रसिद्ध झाले ) ते गीता-भाष्यापर्यंत त्यांच्या सर्वच उत्कृष्ट गद्यलेखनाच्या सदर्भात हे विधान खरे ठरते चरित्रे आणि टीकात्मक लेख याच्या रूपाने त्यांनी हलकेफुलके साहित्य लिहिण्याचीही खटपट केलेली आहे त्याच्या सर्वोत्कृष्ट गद्याची काही उदाहरणे त्यानी लिहिलेल्या काही प्रस्तावनाच्या रूपात आढळतात रामायणाच्या एका नव्या आवृत्तीचे प्रमुख सपादक या नात्याने त्यांनी केलेले कार्यही या सदर्भात उल्लेखनीय ठरते

साध्या भाषेत सखोल विचार व्यक्त करणे हा उत्तम गद्याचा निकष मानल्यास डी व्ही जी ची शैली सर्वांत वाखाणण्याजोगी ठरेल आपल्या इंग्रजी लेखाना त्यानी व्हिक्टोरियाच्या काळातील आडंबराचे रूप दिले असणे शक्य आहे "ज्याच्या हाती सत्तेचे वैपुल्य असते त्याच्या सभ्यतेचे समजूतदारपणाचा विवेक हेच व्यवच्छेदक लक्षण होय (एम व्हीं ना वाहिलेली आदरांजली)" पण कन्नड गद्यात मात्र ते सदैव साधे, स्वाभाविक आणि शोभिवतन दिसतात तात्त्विक सिद्धांत स्वर्गातून भूलोकी आणून त्याची स्थापना ज्या ठिकाणी मानव प्राणी आपली बौद्धिक भूक शमविण्यासाठी जात असतात त्या ग्रंथालयांतून करण्याचे त्यानी स्वत वर लादून घेतलेले कार्य लक्षात घेता वरील यश फारच मोठे ठरते त्याच्यासारखे बुद्धिमान लोक बरेच असतील (तसे फारसे नाहीत हे खचित), पण आपली बुद्धी अधिक चांगल्या कार्यासाठी राबवणारा दुसरा कोणीही आढळणार नाही

आजच्या काळात, आपल्या राष्ट्रीय जीवनात फुटीर प्रवृत्ती बळावत चाललेल्या असताना तर, डी व्ही जीं चे लेखन आणि व्याख्याने यातून प्रसृत केला जाणारा भावनिक एकात्मतेचा संदेश विशेष महत्त्वाचा ठरतो गोखले त्याचे गुरू असून व्ही एस शास्त्री त्याचे स्नेही होते हेही या संदर्भात ध्यानात ठेवायला हवे आपल्या गीताभाष्यात डी व्ही जी नी व्ही एस एस ना मनोज्ञ आदरांजली अर्पण केली आहे तेराव्या अध्यायातले तेरा ते एकोणीस हे श्लोक व्ही एस एस ना स्फूर्ती देणारे ठरले असे दिसते डी व्ही जी च्या सामर्थ्याचाही मूलस्रोत तोच आहे हे उघड आहे कारण, या स्वर्गीय प्रकाशाच्या अभावी, विशेषत त्याच्या भौतिक देहाकडे साऱ्या आनुवंशिक रोगाचा उत्तराधिकार आलेला असताना, त्याना कर्नाटकच्या जनतेची मने जिंकता आलीच नसती डी व्ही जी च्या ऐंशीव्या जन्मदिनी आमच्या भीष्माचार्यांनी आमच्याच द्रोणाचार्यांचे अभिनंदन केले तो प्रसंग कर्नाटकच्या जनतेला अपूर्वाईचाच होता आर आर दिवाकर आणि डी व्ही जी याच्या सारखे समर्पित आत्मे जोपर्यंत आपल्यात आहेत तोपर्यंत आपल्या गत वैभवाचे पुनरुज्जीवन होण्याची आशा निश्चितच बाळगता येईल

### लघुकथेचे जनक

कन्नड लेखकांना पंप किंवा कालिदास याचे सुपुत्र म्हणवून घेणे आवडे असाही एक काळ होता आजची प्रथा मात्र लेखकाला साहित्याच्या या ना त्या प्रकाराचा जनक ही पदवी देण्याची आहे साहित्यातील वंशपरंपरेचा मागोवा किती उत्कटतेने घ्यावासा वाटतो याचेच हे गमक होय एकही प्रकार अनाथ राहायला नको उदाहरणार्थ, आपल्यात 'प्रहसन पितामह' (टी पी के—कैलासम्), 'वचन पितामह' (पी जी एच—हलकट्टी), आणि लघुकथेचे जनकही (श्रीनिवास) आहेत साहित्यिक

गुणवत्तेवर मान्यतेची मुद्रा कोडकौतुक करणाऱ्या जनतेकडून उठविली जाण्यापूर्वी दोन अटी पूर्ण व्हाव्या लागतात पहिली म्हणजे ऐतिहासिक महत्त्व किंवा आघाडी-वरचे प्रयत्न, दुसरी अगदी मूलभूत गुणवत्ता ही होय या दोन गुणाचा समन्वय एक विरळा आढळणारी साहित्यिक घटना ठरते म्हणूनच अशी मानाची पदवी लाभत असते

मगेशराव पजे लघुकथालेखनातील आघाडीचे वीर होत पण एकटी एक चिमणी काही उन्हाळा आणीत नाही पन्नास एक वर्षांपूर्वी अनेक उत्कृष्ट लघुकथा लिहिल्या-मुळेच श्रीनिवासांचा लघुकथेचे जनक म्हणून यथायोग्य गौरव करण्यात आला त्याच्या पहिल्यावहिल्या उत्कृष्ट कृतीतल्या ‘ वसुमती ’ या कथेचे एन रामारावांनी इग्रजीत भाषातर करून ते त्रिवेणीत प्रसिद्धही केले जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यात समावेश होण्यास पात्र असलेल्या दोन कथांतली एक म्हणून अलीकडेच डॉ श्रीनिवासानी तिची वाखाणणी केली आहे दुसऱ्या कथेचे नाव आहे ‘आचार्यांची भार्या’ गद्य आणि पद्य दोन्हीत लघुकथा लिहिण्याचा श्रीनिवासांचा उपक्रम अजून चालूच आहे त्याचा गोतावळा सतत वृद्धिगत होत आहे सुवण्णा ही त्याची प्रदीर्घ लघुकथा म्हणजे तर कन्नड साहित्यातले एक रत्नच आहे श्रीनिवास आधुनिक कन्नड गद्याच्या निर्मात्यातले एक होत त्यांच्या गद्य शैलीतील वैशिष्ट्यपूर्ण गुण-वत्तेचे सुवण्णाहून अधिक चागले उदाहरण दुसरे कुठेच गवसत नाही

कन्नडमधील भावगीत आणि लघुकथा याना जुळी भावडेच म्हणता येईल त्यात नवलही नाही कारण, त्या दोहोत किती तरी साधर्म्य आहे दोन्हीही प्रकार सक्षिप्त भावोद्रेकाच्या स्वरूपाचे असून थोड्या शब्दात खूपसा आशय व्यक्त करणे हेच दोन्हीचेही रहस्य आहे भावगीत एकट्या एका भावावस्थेचे चित्र रेखाटते, तर लघुकथेत एक विवक्षित परिस्थिती साकार केलेली असते एखादी लघुकथा भाव-गीततुल्य आनदोल्लास निर्माण करू शकते उलट पक्षी, पोवाड्यासारख्या भाव-गीतातही एखादी कथा निबद्ध करता येते श्रीनिवासाच्या लघुकथाच्या विश्वात कथांचे व्यापक व नानाविध प्रकार सामावलेले आहेत सर्वसाधारणपणे ते छोटीशी कथा सरधोपट पद्धतीने सागतात सौम्य विनोदाच्या एखाद्या धाग्यामुळे त्यातल्या कित्येक कथाना रम्याद्भुततेचाही स्वाद लाभला आहे त्याची साधीसुधी शैली म्हणजे कलात्मकतेलाच अवगुंठित करून टाकणाऱ्या कलेचे उत्कृष्ट उदाहरण होय

लघुकथामागोमाग कादबऱ्यांचे युग अवतरले कित्येक विवेचक टीकाकाराच्या मते लघुकथेने आपला प्रारभीचा आवेग गमावलेला दिसतो थोर लघुकथालेखकांनी आपले नैपुण्य कादबऱ्याच्या लेखनाकडे वळविले आहे दैनिकानीही कादबऱ्या क्रमश प्रसिद्ध करण्यास प्रारभ केला आहे त्यामुळेच लघुकथाच्या मागणीला ओहोटी

लागली आहे मिरजी आण्णाराव, बसवराज कट्टिमनी, निरजन आणि टी आर सुब्बाराव (टी आर एस ) यांच्यासारख्या कादबरीकारानी भरपूर खपाच्या कादबऱ्या लिहून अमाप वैभव जोडले उलट लघुकथाचे लेखन चालू ठेवण्याजोगी फारच थोडी प्रलोभने लघुकथाकारापुढे आहेत परंतु मागणी तसा पुरवठा हा नियम मात्र प्राधान्याने प्रभावी ठरलेला दिसत नाही लेखक लिहीतच राहातात कारण, त्याना तसे केल्याविना राहावतच नाही त्यात आतरिक प्रेरणाच अनिवार्य असते त्या सदर्भात विकल्पाला वाव नसतोच

कूर्तकोटी आणि के एन मूर्ती यांच्यासारख्या थोर टीकाकाराचे लक्ष प्रस्तुत साहित्यप्रकाराने वेधून घेतले आहे धारवाड येथील मनोहर ग्रथमालेच्या रौप्य-महोत्सव प्रसगी स्मरणिका म्हणून काढलेल्या 'नडेदुबद दरी' नावाच्या टीकापर आणि सर्जनशील लेखाच्या तीन खडांत कूर्तकोटीनी लघुकथेच्या उद्गमाचा आणि विकासाचा नि शेष आढावा घेतला आहे चाळीस लघुकथाचा एक ग्रथ कन्नड लिटररी अॅकेडेमीने के एन एम च्या प्रस्तावनेसह प्रकाशित केला आहे परिषदेच्या कारवारात भरलेल्या अधिवेशनाच्या (१९६५) निमित्ताने सर्व साहित्यप्रकाराचा आढावा घेण्याचे कार्यही हाती घेतले गेले आहे प्रथितयश लघुकथाकार, बरदराज हुयिलगोळ यानी आशेचा सूर प्रकट केला आहे ' लघुकथाच्या निर्मितीत घट झाली आहे हे म्हणणे यथार्थ नाही उत्कृष्ट लघुकथांचे लेखन चालूच असल्याचे दाखवून देणारा विपुल पुरावा उपलब्ध आहे "

परंतु कालानुक्रमानुसार सकलित केलेल्या शभर लघुकथा तीन खडात मिळून प्रसिद्ध करण्याची परिषदेची आकाक्षा आहे त्यात प्रत्येक लेखकाच्या सर्वोत्कृष्ट कृतीचा प्रतिनिधीरूपाने समावेश व्हावयाचा आहे अशा रीतीने गेल्या पन्नास वर्षांत लिहिल्या गेलेल्या शभर सर्वोत्कृष्ट कथाचा परिचय जनतेला होऊन जाईल श्री-निवासांच्या मागून उदयास आलेल्या कोणत्याच लेखकाला कलोत्कर्षाच्या दृष्टीने त्यांची पातळी गाठता आली नाही परंतु गेल्या दशकात दृष्टोत्पत्तीस आली तेवढी मोठी चागल्या लेखकाची सख्या कन्नडला पूर्वी कधीही लाभली नव्हती त्यातले चाळीस सग्रहात समावेश करण्यास पात्र ठरले यावरूनच हे स्पष्ट दिसते की लघु-कथालेखनाच्या कलेला जिव्हाळ्याचे स्थान लाभले असून ती प्रगतिशीलही आहे वरील चाळीस कथा तीन वर्गांत समाविष्ट करता येतात पारपरिक, प्रगतिपर आणि नवमतवादी प्रगतिपर कथानी वस्तुभूत विषयाचे क्षेत्र विस्तारले नवमतवाद्यानी लेखनतत्रात क्रातिकारक परिवर्तन घडवून आणले पुढील लेखकांनी लिहिलेल्या कथावरून लघुकथेला उज्ज्वल भवितव्य असल्याचे सिद्ध होऊ शकते निरजन, व्ही हुयिलगोळ, अश्वत्थ, बी कुळकर्णी, श्रीमती उषादेवी, के व्ही राज-गोपाळ, श्रीमती एच व्ही सावित्रम्मा, एल डी सभाहित, व्ही एम जोशी, बी

देवराव, यू आर अनंतमूर्ती, बी सी रामचंद्र शर्मा आणि सदाशिव यातले शेवटचे तीन आधुनिकतावादी आहेत व तीन लेखिकांना मानाचे पान लाभलेले आहे. आपण निवडलेल्या चाळीस कथा तर इतर भारतीय भाषातील अनुवादाद्वारा अधिक प्रसिद्धी मिळावी अशाच योग्यतेच्या आहेत असा के एन एम याना विश्वास वाटतो.

पुढील गोष्टी चिंतनार्ह आहेत असे हुयिलगोळना वाटते "१ आपल्या आधीच दृढमूल झालेल्या धारणांमध्ये विनोदाला वाव करून देणारा एकदेखील लेखक प्रातिक अथवा आधुनिकतावादी गटात नाही विनोदाला असे खग्रास ग्रहण लागावे याची कीव येते २ शास्त्रीय ज्ञानाचा आज जो परिस्फोट चालला आहे त्याकडे आपले लेखक अगदीच थोडे लक्ष पुरवीत आहेत ३ अनुमती किंवा नियंत्रण याना फाटा देऊन अतिरेकी वास्तववादाने अश्लीलतेला अगदी मुक्तद्वारच देऊन टाकले आहे कलादृष्ट्या हे समर्थनीय ठरते का ? ४ तंत्राचेच एवढे स्तोम माजवून ठेवणे आधुनिकतावाद्याना योग्य वाटते का ? ५ प्रगतिवाद्याना लिंगभावनेची मुळीच अपेक्षा नव्हती उलट आधुनिकतावाद्यांना तिच्या अभिरुचिहीन आविष्काराला पराकाष्ठेचा आनंद गवसतो लैंगिक शिक्षण त्याच्या धक्कादायी डावपेचाचाच एखादा भाग आहे की काय ? ६ काही लोक म्हणतात की आज विद्यमान असलेल्या मताच्या वातावरणात बुद्धिमान लेखकाला आधुनिकतावादाचा स्वीकार करणे भागच पडते तसे होणे अपरिहार्यच आहे का ?"

आमचे लेखक या धोरणाने विचार करीत आहेत ही वस्तुस्थितीच लघुकथा-लेखनाच्या कलेने आधुनिकता आत्मसात केल्याची निदर्शक ठरते

प्रादेशिक एकात्मता लाभल्यानंतरच्या एका दशकातील कन्नड साहित्याच्या प्रगतीचे अवलोकन करताना एच एम नायक यानी पुढील मीमांसा केली आहे "नवसंप्रदायाची ध्येये किंवा आकांक्षा काहीही असोत, त्यानी लघुकथेला आपल्या कळपात ओढून घेतले असून तीवर आपली घट्ट पकडही बसविली आहे नवे लेखक अभूतपूर्व संख्येने लेखक या क्षेत्रात कार्यरत झालेले आहेत ऐंशी एक लेखकानी मिळून लघुकथाचे एकशेतिसावर संग्रह प्रसिद्ध केले आहेत आणि त्यातल्या जवळजवळ एकचतुर्थांश स्त्रिया आहेत यू आर अनंतमूर्ती नवसंप्रदायाचे आघाडीवरील लेखक तर कूर्तकोटी आघाडीवरचे टीकाकार 'मनोहर ग्रंथमालेने' प्रकाशित केलेल्या 'होसक्षितिज' या चौदा कथाच्या संग्रहाला त्यानी प्रस्तावना लिहिली आहे नव्या व जुन्या संप्रदायातील मतभेदाच्या अंगाचा सारांश पुढीलप्रमाणे देता येईल पुनरुत्थानवादी संप्रदायाने परंपरागत मूल्ये व आदर्श स्वीकारले होते. नवसंप्रदाय मूल्याच्या शोधातच गुंतून पडला आहे भाषा व प्रतीकसृष्टी यांच्या योजनेत नवसंप्रदायाने नावीन्य प्रकट केले आहे कथावस्तू या घटकापासून दूर गेली

आहे मानवाच्या आतंर जीवनाविषयी आस्था बाळगणारा नवलेखक लैंगिक जीवनालाही अधिक प्राधान्य देत असल्याचे ध्यानात येऊन चुकले आहे नव्याजुन्याच्या या सघर्षातही आमची लघुकथा अगदी छान फोफावली आहे ही वस्तुस्थिती सतोषजनकच आहे हे लेखक आपल्या प्रशसेला पात्र ठरतात

या दशकातली एक लक्षणीय घटना म्हणजे प्रजावाणी या आघाडीवरील कन्नड दैनिकाने चालू केलेला दीपावली पारितोषिक स्पर्धेचा उपक्रम आणि तदनुसार सर्वोत्कृष्ट लेखकांना देण्यात आलेली भरीव रकमांची पारितोषिके ही होय महा-विद्यालयातील विद्यार्थ्यांना भाग घेता यावा यासाठीही विशेष व्यवस्था केल्यामुळे कित्येक तरुण लेखकाना पुढे सरून स्वत च्या श्रेष्ठतेला मान्यता मिळवून घेण्यास उत्तेजन मिळाले

१९७० च्या विलोभनीय स्पर्धेसाठी सर्वसाधारण लघुकथालेखकांतल्या चारशेंनी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विशेष गटातल्या दीडशेंनी कथा पाठविल्या होत्या अद्यावत् साहित्यिक इतिहास देण्याचा प्रस्तुत सर्वेक्षणाचा हेतू नव्हताच पण निर-निराळ्या कारणासाठी लघुकथापुरताच अपवाद केला आहे पहिले म्हणजे टीकापर सामग्रीची रेलचेल आहे दुसरे टीकाकारानी प्रतिपादन केलेले काही विचार भावगीत व एकाकिका यासारख्या इतर लेखनप्रकारानाही लावता येतात तिसरे असे की आधुनिक कन्नड साहित्याचे वैभव, वैविध्य आणि चैतन्य याचा तो रोकडा पुरावा ठरतो

**कारंतांचे विश्व**

शेक्सपीयरचे विश्व डिकन्सच्या विश्वाहून अधिक व्यापक आहे अद्वितीय व्यक्तित्व लाभलेल्या पात्राची सृष्टी निर्माण करणारी प्रतिभा दोघानाही लाभली होती कारतही या आधुनिक विश्वामित्रांच्या पक्तीला बसण्यास पात्र ठरतात ज्याचे पोषण अमृतावर झाले आहे अशा पात्राची सृष्टी आपणांस त्याच्याही कादबऱ्यांतून आढळते त्याच्या पृष्ठभागी सह्याद्री असून पुरोभागी अरबी समुद्र आहे समुद्र आणि पर्वत याच्यामध्ये पसरलेल्या भूमीत दृष्टीस पडणाऱ्या अनत नैसर्गिक आणि मानवी वैविध्याचा अभ्यास त्यानी केलेला आहे निर्घृण दैवदुर्विलास आणि अर्थ-शून्य रूढी याच्याशी, हार न मानता दोन हात करणाऱ्या दुबळ्या मानवतेच्या आर्त इच्छाशक्तीचे भव्य दृश्य त्याच्या कादबऱ्या साकार करतात कार्यरत असलेल्याचा गौरव करून कामचुकाराचा मात्र त्यानी धिक्कारच केला आहे त्याच्या दृष्टीच्या गरुडभरारीतून दक्षिण कानडातील जीवनाचे कोणतेही अग निसटले नाही कर्ना-टकाच्या त्या मानाने अज्ञात आणि दुर्गम अशा भागाची ओळख करून घ्यायची

इच्छा बाळगणाऱ्या लोकानी रात्रंदिवस कारंतानी आजपर्यंत लिहिलेल्या पन्नास कादबऱ्याच्या अभ्यासाला वाहून घ्यायला हवे

कारतानी केलेले मानव जातीचे सर्वेक्षण दक्षिण कानडापुरतेच सीमित नाही भारताच्या प्रवेशद्वारापलीकडे जलपर्यटन करून त्यांनी पश्चिम समुद्राच्या तट-प्रदेशाचेही सशोधन केले आहे त्याचे समग्र व्यक्तित्व त्याच्या कादबऱ्याच्या विश्वात सामावलेले नाहीच अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका गौरवाजलीपर ग्रथात सपादकानी असे उद्‌गार काढले आहेत की कारतानी निर्मिलेल्या पाच विश्वातले कादबऱ्याचे विश्व हे केवळ एक होय इतर चार म्हणजे विचारधन आणि व्यक्तित्व यांचे विश्व, कलाविश्व, विज्ञानविश्व आणि प्रासगिक व्याख्याने व लेख याचे विश्व कारण, वृत्तपत्रातले लेख व सपादकीये, गीते, नाटके आणि सगीतिका, लघुकथा, निबध, चरित्र व आत्मचरित्र, यातला कोणताही साहित्यप्रकार असा नाही की ज्याचे लेखन करून त्यांनी त्याला शोभा आणली नाही पदवी पदरात पाडून घेण्याची वाट न पाहाताच त्यानी गाधीच्या राजकारणात उडी घेतली पण यक्षगान या नावाने ओळखल्या जाणाऱ्या लोकप्रिय नृत्यनाट्यावरील त्याच्या ग्रथात भरीव सशोधन मात्र सामावले आहे या ग्रथामुळे ते केवळ ॲकॅडमीच्या पुरस्कारालाच नव्हे तर पीएच डी पदवीला ही पूर्णत्वाने पात्र ठरतात तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि सुधारक या नात्याने त्यानी पार पाडलेले कार्यभागही जगद्‌विख्यात होण्याजोगे आहेत त्याचे अष्टपैलू व्यक्तित्व आणि गायक, नर्तक, वक्ता, कोशकार, कला-समीक्षक आणि विश्वकोशकार या नात्यांनी त्यानी दीर्घकालीन केलेले यशस्वी कार्य याना न्याय देण्याच्या दृष्टीने पुरेसा स्थलावकाश येथे नाही त्याच्या व्यक्ति-त्वाची ही अगे उभ्या कर्नाटकात सुप्रसिद्ध असून त्याची वाहवाही केली जाते त्याच्या कादबऱ्या इग्रजीत आणि भारतीय भाषात रूपातरितही झाल्या आहेत समाजोपयोगी विज्ञानात त्यानी घातलेल्या भरीचे वर्णन करण्याचा प्रयत्न पुढे करीत आहोत

कारताना अभिमत असलेल्या विज्ञानविश्वाविषयी जे आर लक्ष्मणराव यांनी लेख लिहिला आहे त्याच्या मते कारताना केवळ ' शब्दसृष्टीचे ईश्वर ' ही उपाधी चिकटवून देणे अन्यायाचेच होईल जीवनाच्या नानाविध अगांचे आकलन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारा प्रज्ञावत या नात्याने त्याचा विचार करणे अधिक बरे बालकाना योग्य शिक्षण देण्याविषयीची कारताची आस्था अगदी त्यांच्या वसत मासिकाच्या सपादकत्वाच्या कालाइतकीच (१९२४–१९२९) जुनी आहे समाजो-पयोगी विज्ञानात कारतानी घातलेल्या भरीची पार्श्वभूमी समजून घेतलेली बरी दारिद्र्याची लांडगेतोड आपल्या घरापासून दूर ठेवण्यासाठी त्याना खडतर कष्ट करावे लागत तरीदेखील लोकाकडून फारशी बूज राखली न जाणारे हे काम आपण

होऊन स्वतःची सारी कळकळ आणि आस्था पणाला लावून अगावर घेतले त्यानी तीन खडांत मुलाचा एक ज्ञानकोश प्रसिद्ध केला (१९३६) त्याच्या मागोमाग 'हे जग' (द वर्ल्ड) या ग्रथाचे चार खडही त्यानी काढले (१९५९–६४)

शब्दसृष्टीच्या विश्वात कारतांना लाभलेले स्थान कोणते हे दर्शविण्यासाठी जे आर एल नी लोकोपयोगी शास्त्रीय साहित्याच्या उगमाचाही मागोवा घेतला आहे त्याचा रोख महाविद्यालयीन शिक्षणाचे प्रादेशिक माध्यम कोणते असावे या प्रश्नाकडे आहे सर्वच पातळ्यावर कन्नड माध्यम लागू करण्याचे प्रयत्न मैसूर विद्यापीठाने सर्व सामर्थ्यानिशी चालविले आहेत 'विज्ञान कर्नाटकाचे' सपादक या नात्याने जे आर एल विद्यापीठाचे एक आधारस्तभ आहेत भावी घटनाच्या रूपरेषेवर त्याच्या उद्‌गारानी पुष्कळसा प्रकाश टाकला आहे

'मानवाची उत्क्राती' (डिसेंट ऑफ मेन) या डार्विनच्या ग्रथाने उभ्या युरोपात निकराच्या वाग्द्वद्वाचा गदारोळ उडवून दिला (१८७१) कोणता ना कोणता तरी पक्ष विचारवताना अपरिहार्यपणे स्वीकारावा लागला माणूस हा शापभ्रष्ट देवदूत आहे की उदयोन्मुख वानर आहे याचा स्वत पुरता निर्णय त्याना करून घ्यायलाच हवा होता महान शास्त्रज्ञाचो गृहीत कृत्ये आणि सिद्धांत याचे लोकोपयोगी विवरण करून हक्स्ले प्रसिद्धी पावला तो याच वेळी लोकोपयोगी विज्ञानाचा जन्म अशा प्रकारे झाला त्यानतर पुढे जगाला हादरा देणाऱ्या शास्त्रीय क्षेत्रातील साऱ्याच घडामोडीना समर्थ भाष्यकार लाभत गेले सामान्य मानवाला खडबडून जाग आली व आइन्स्टाइनचा सापेक्षतावाद, अमेरिकेचा अणुबॉंब, रशियाचे अंतराळयान, फ्रेंचांचे जेट विमान आणि अतराळ युगाकडे वाटचाल करणाऱ्या शास्त्रविद्येचा स्फोट यासारखे अभिनव शोध व नवे नवे सिद्धात याकडे लक्ष द्यावेच लागले


विचारांच्या अफाट सागरावर एकाकीपणे विहार करू शकेल असा शास्त्रज्ञ भारतात अद्याप जन्माला यायचाच आहे कर्नाटकला तर सी व्ही रामन किंवा जे सी बोस यांच्या तोडीचे वैज्ञानिक लाभल्याचाही गर्व वाहाता येत नाही प्रा रामननी आपल्या सस्थेत नेत्रदीपक कार्य केलेले असले, तरी कन्नड शिकण्यापुरता वेळ त्याना नसेच कन्नड माध्यमाचे पुरस्कर्ते म्हणतात की कन्नडिग आपल्या शेजाऱ्यांहून कमी बुद्धिमान नाहीत परतु इग्लिश माध्यमापायी त्यांची बौद्धिक वाढच खुटली असून मौलिक कल्पकताही मारली गेली आहे त्यानी आपली राजकीय एकात्मता गमावली असून ते मागासलेले राहिले आहेत आपल्या पुरातन वैभवाचा काही भाग तरी परत मिळविण्याच्या दृष्टीने कन्नड माध्यम तरुण पिढीला उपकारक ठरणार आहे

चौथ्या दशकात या राज्यात सेंट्रल महाविद्यालय हे एकटे एक वैज्ञानिक महाविद्यालय होते १९१७ त विज्ञानसभा काढण्याची कल्पना दोन कन्नडिगांच्या मनात उद्भवली प्रा बी वेंकटनारायणप्पा आणि एन वेंकटेश आयगार याना एक वैज्ञानिक मासिक सपादित करून दिवाण विश्वेश्वरय्याचा पाठिबा मिळविण्यात यश आले या सपादकानी प्रस्तावनेत काढलेले उद्गार आज साहित्यिक इतिहासाचेच अग होऊन बसले आहेत "गेली साठसत्तर वर्षे आपण इंग्लिश शिकत आलो असलो तरी विज्ञानाच्या अध्ययनाविषयी मात्र आपले लोक पुरेशी आस्था दाखवीत नाहीत विज्ञान आणि तत्रज्ञान याच्या महतीकडे आपण नुकते कुठे डोळे उघडून पाहू लागलो आहोत आपल्या देशाची भरभराट पूर्णतया वैज्ञानिक ज्ञानाच्या सर्वसाधारण लोकातील प्रसारावरच अवलबून आहे विज्ञानाला लोकप्रियता प्राप्त करून देणे हे साऱ्याच देशाभिमानी व सुशिक्षित लोकाचे कर्तव्य आहे

'प्रबुद्ध कर्नाटकचे' सपादन १९३० मध्ये विद्यापीठाने हाती घेतल्यानतर शास्त्रीय लेखाना अधिक वाव दिला जाऊ लागला दुसऱ्या जागतिक युद्धापूर्वी 'विद्यापीठ शिक्षक सघाने' आणि 'कर्नाटक साहित्य सभेने' लोकोपयोगी विज्ञानावर व्याख्याने आयोजित केली विद्यापीठाची ही विज्ञानप्रसारक व्याख्याने ग्रथरूपाने प्रसिद्ध होऊ लागली विद्यापीठाकडून बजावल्या जाणाऱ्या सेवेच्या या बाजूची स्वदेशात आणि विदेशातही वाखाणणी होऊ लागली त्यामुळेच पुढे मुख्यत कन्नड ग्रथाच्या प्रकाशनासाठी 'प्रसरागा'ची स्थापना करण्यात आली आतापर्यंत विज्ञानावरील पन्नास ग्रथ प्रसिद्ध झाले आहेत पुढल्या काही वर्षांत कन्नड भाषेतल्या कन्नड ग्रथाची पुरेशी सख्या उपलब्ध करून दिली जाईल, त्यामुळे महाविद्यालयीन वर्गांत विद्यार्थी तत्परतेने कन्नड माध्यमाचा विकल्प स्वीकारू लागतील पी यू सी च्या पातळीवर कन्नड माध्यम लागू करून १९५७ साली या दिशेने पहिले पाऊल टाकण्यात आले तात्पर्य, परिवर्तनाचा वेग बळे बळे लादण्याचा खटाटोप मुळीच केला जात नाही


पी श्रीनिवास रावासारखेच जे आर एल हे विज्ञानाचे अत्यत विद्यार्थीप्रिय प्राध्यापक आहेत बै वा आर एल नरसिहय्याप्रमाणे ते एक विख्यात लेखकही आहेत अणूच्या इतिहासावरील ग्रथासाठी १९५०मध्ये जे आर एल नी सुवर्ण पदक पटकाविले कारनाच्या समाजोपयोगी विज्ञानातील भरीविषयी त्यानी काढलेले उद्गारच मुळी आधुनिक कन्नड गद्य शैलीचे उत्कृष्ट व आदर्श उदाहरण होय 'माधी, सुभग आणि रेखीव' त्याच्या लेखनामागील शास्त्रशुद्ध भूमिकेमुळे तर त्याच्या विलोभनीय व्यक्तित्वाला अधिकच मनोज्ञता लाभली आहे


"समाजोपयोगी विज्ञानाविषयी पुस्तके लिहिणाऱ्या थोर अग्रणीत कारताची



चित्र १८ ताब्याच्या मढवलेल्या ओतीव मूर्ती.

चित्र १९ ललित महाल, मैसूर – मैसूरच्या राजांनी बांधलेल्या अनेक राजवाड्यांपैकी एक





चित्र २० रात्री विद्युत्प्रकाशात झगमगणारे, मैसूर येथील मनास आश्चर्यमुग्ध करणारे वृंदावन उद्यान


चित्र २१ श्रीरंगपट्टणजवळचे रंगनाथित्तू पक्षिसंग्रहालय





चित्र २२ शिकारी हल्ल्यात जंगली हत्तींना दोरानी बांधले जात आहे. मैसूर राज्य शिकारी हल्ल्यांसाठी प्रसिद्ध आहे

चित्र २३ तुंगभद्रेचा बंधारा आणि विद्युद्गृह.





चित्र २४ जोग धबधबा.

गणना होते या अवाढव्य कामासाठी अवश्य ती सारी गुणवत्ता त्यानी प्राप्त करून घेतली होती त्या कामाचे महत्त्व आकलन करण्याइतका द्रष्टेपणा त्याच्याजवळ होता इंग्लिशमधील प्रमाणभूत ग्रथ वाचण्याच्या खडतर खटाटोपात त्यानी कित्येक दिवस व्यतीत केले त्याना शैलीचीही देणगी आहे विज्ञानाला लोकप्रियता मिळवून देण्यासाठी आणि त्याची अभिरुची निर्माण करण्यासाठी कारंतानी जेवढी खटपट केली तेवढी दुसऱ्या कोणत्याही लेखकाने केली नाही त्यांच्या या समर्पणरूप सेवेचे पर्यवसान म्हणून आता शास्त्रीय भूमिका उभ्या कर्नाटकात लोकाच्या अगी बाणू लागली आहे ''

**सामान्य वाचकाचे युग**

नवे काव्य, नवे सगीत, नवे वृदावन, नवे सौंदर्यशास्त्र, नवीन आशय, नवे शब्दबध आणि नव्या विभ्रमाची शोभा, जे जे काही म्हणून नवीन असेल त्या साऱ्यासाठी 'नवी अडगिळे' नावाचे खेडे प्रख्यात असल्याचे इ स १०५७ तल्या एका शिलालेखात सांगितले आहे गावकऱ्याचे मनोरजन करून ज्ञानदान करण्यात विशेष कौशल्य दाखवणाऱ्या कवी, गमकी, वादी आणि वाग्मी अशा लोकाचे सच बाळगून असल्याचा अभिमान तर पुष्कळच खेड्याना मिरवता येईल एखादे खेडे उद्ध्वस्त झाले की तेथील लोक दैव काढायला नगरात जातात अशी म्हण कन्नडमध्ये आहे. नागरीकरणाची नवी स्फूर्ती अनुभवून बगलोरकडे स्थलातर करणाऱ्या पहिल्या-वहिल्या कुटुबातलेच अन्नपूर्णा घराणे असणार अन्नपूर्णा नरसिंगराव कृष्णराव हे (ए एन के ) युगानुयुगाच्या सस्कृतीचे उत्तराधिकारी आहेत "कन्नडिग स्वभावत च सुसस्कृत असतो" या नृपतुगांनी केलेल्या वर्णनात ते चपखल बसतात सुसस्कृत समाजातील वैचारिक आदानप्रदानाची लालित्यपूर्ण कला शिकण्यासाठी विद्यापीठाची पदवी पटकावण्याची निकड ए एन के ना भासली नाही बाल्यकाली पोषण देणारी पचमहाभूते त्याना जितकी सहजगत्या लाभली तितक्याच स्वाभाविकपणे त्याच्या ठायी माधुर्य व प्रकाश (ज्ञान) प्रकट झाला खेड्यातल्या राहणीची सवय असलेल्या माणसाला उत्तम प्रकारे मानवणाऱ्याहून अधिक नादनिनाद आणि अधिक धूळमाती आता अन्नपूर्णांच्या आसपास असतात परतु जुन्यापुराण्या युगाशी निगडित असलेल्या सस्कृतीचे तेजोवलय अन्नपूर्णा अव्याहतपणे बाळगून आहेत

या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या शेवटी शेवटी, अन्नपूर्णा हे एक सास्कृति केंद्र बनले होते त्या वेळी बगलोरमध्ये सास्कृतिक केंद्रे थोडीशीच होती हे ध्यानात ठेवायला हवे विद्यापीठाचे ग्रथालय, ब्रिटिश कौंसिलचे ग्रथालय, सार्वजनिक कार्य करणारी गोखले इन्स्टिटयूट, इडियन इन्स्टिटयूट ऑफ कल्चर, रवीद्र कलाक्षेत्र, बगलोर लिटल थिएटर, खूपसे गायन समाज किंवा भारत नाटच केंद्रे, बुद्ध सोसायटी,

चिन्मय मिशन, साईबाबा सेंटर यातले काही काही नव्हते ए एन के चे वडील आपल्या मुलाला खूपच मोकळीक देत आपल्या प्रतिभाशाली पुत्राचे व्यक्तित्व सपूर्ण-पणे मोहोरून येण्याच्या दृष्टीने सास्कृतिक वातावरणाशी अत्यत आवश्यकता अस-ल्याचे ते जाणून होते एक कलामडळ स्थापन करून अन्नपूर्णाच्या भल्या मोठ्या सभा-गृहात आपल्या गुणी स्नेह्याचे आगतस्वागत करण्यास त्यानी ए एन केना मोकळीक दिली होती तेथे कोणालाही राज अय्यंगाराचे गायन अथवा भारतीचे वीणावादन, तसेच विख्यात नाटककार टी पी के. आणि त्याचे चाहाते याच्या हास्यविनोदाचे वाग्द्वद्व ऐकावयास मिळे, ए व्ही वरदाचार या गुणी नटाचे साध्या वेशात दर्शन घडे, हस्सन राजराव आणि त्याची मोहक फ्रेंच पत्नी याचा परिचय करून घेता येई, टी टी शर्मा या सिद्धहस्त पत्रकाराशी चालू विषयावर चर्चा करता येई, डी के भारद्वाज यानी चालविलेल्या ‘रगभूमी’साठी लेख सिद्ध करता येत किंवा त्याचे गुरू पडित तारानाथ याना अभिवादन करण्याचीही सधी मिळे, ए एन के व त्याचे मित्र एम एन एम याच्या एकाकिकाचे प्रयोग करण्यासाठी तालमी करता येत, कन्नड लघुकथा आणि रत्नाची गीते (रत्नन पदगळू) याचे इग्रजीत भाषांतर करण्या-सबधी गप्पागोष्टी करता येत (आणि ती भाषातरे त्रिवेणीत प्रसिद्ध करणे राम-कोटीश्वर रावाना फारच आवडे), यजमानांद्वारा सपादित करावयाच्या सग्रहा-साठी प्रेमगीताची निवड करता येई, इत्यादी

ए एन के इतका ऐतिहासिक महत्त्वावर अधिकार फारच थोड्या लेखकाना सागता येईल प्रेमगीतांचे त्यानी केलेले सपादन त्या प्रकारचे पहिले आणि सर्वोत्कृष्ट म्हणून मान्यता पावले ए एन के नुसते एक श्रेष्ठ लघुकथालेखकच नव्हते तर ‘कामना बिल्लु’ नावाचा निवडक लघुकथाचा सग्रह प्रसिद्ध करणारेही तेच पहिले होत कुळकर्णी (आधुनिक टीकाकार) आणि के एन एम (आधुनिक लघुकथा सग्रहाचे सपादक) या दोघानीही ए एन के च्या कार्याच्या गुणवत्तेची प्रशसा केली आहे आपला खराखुरा व्यवसाय कादबरीलेखनाचा असल्याचे ए एन के ना उशिराच कळून आले गेल्या पचवीस वर्षांत त्यानी शभरावर कादबऱ्या लिहिल्या आहेत ते आपली लेखणी सहजतेने चालवतात, त्याना तीव्र अवलोकनशक्ती लाभलेली आहे आणि मानव जात आणि लोकव्यवहार याविषयीचे त्याचे ज्ञानही अद्वितीय आहे स्त्रीच्या स्नेहातले लडिवाळ लालित्य ते सर्वतोपरीनी जाणतात आधुनिक प्रेमाच्या नानाविध परीची आणि दिखाऊ अभिमानाची त्यानी रगविलेली मन-मोकळी आणि वास्तववादी चित्रे त्याना पावित्र्यवादी लोकाच्या दृष्टीने काहीसे कुत्सेचे विषय बनविण्यास कारणीभूत ठरली पण आधुनिक साहित्यात वास्तववादाला लाभलेले महत्त्वाचे स्थान ओळखू शकणारे ए एन केच पहिले लेखक होत वास्तववादाचा त्यानी इतका यशस्वी प्रचार केला की आता तो मुळी वादाचा विषय

राहिलाच नाही आधुनिकतावाद्यानी त्यांना किती तरी मागे टाकले आहे ए एन के चा कीर्तीवरील अधिकार भरीव कार्यभागाच्या पायावर आधारलेला आहे सुस्थिर गौरव प्राप्त झालेल्या लेखकातले सर्वसामान्य वाचकाच्या अभिरुचीला यथायोग्य खाद्य पुरविणारे तेच पहिले लेखक लोकसत्ताक समाजात उच्चभ्रू वर्गाहून अधिक महत्त्वाचा कार्यभाग अधोभ्रू व मध्यभ्रू वर्गाच्याच वाटयाला येत असतो. ए एन के च्या कादबऱ्याविषयीची लालसा ज्यावर पोसली जाते त्यावरच ती वृद्धिंगतपण होत आहे कादबऱ्या विकत घेऊन वाचण्याची अभिरुची ए एन के नी निर्माण केली असेही म्हणता येईल जो प्रदेश एकाहून अधिक परीनी मागासलेला असतो तिथे तर हे खरोखरी फार मोठे साफल्य ठरते कारत, अण्णाराव आणि बसवराज कट्टिमण्णी याची वाहवा करणाऱ्याहून ए एन के च्या वाचकाची सख्या खूपच मोठी आहे या कादबरीकारांनी कित्येक लेखिकाच्या जोडीने कादबरीचे एक नवीन युग उदयाला आणले

आपल्या समाजाची आजची स्थिती सामाजिक सुधारणांसाठी आक्रोश करीत असली तरी ए एन के मात्र सामान्यत समाजसुधारणेच्या कडूतून मुक्तच आहेत 'नट सार्वभौम' (एक महान नट) किंवा 'सध्या राग' (एक महान सगीतज्ञ) यासारख्या कादबऱ्यातून कलाकराची जीवने शब्दरूपाने साकार करण्यात त्यानी उत्कृष्ट नैपुण्य प्रकट केले आहे त्यातल्या दुसऱ्या कादबरीवर बोलपटही निघाला असून त्याने तिकिटविक्रीचा उच्चाक गाठला आहे

सध्या ए एन के सगीत 'नाटक ॲकेडमी'चे सदस्य आहेत चर्चासत्रे घेण्यात आणि परिषदा आयोजित करण्यात ते निमग्न असतात चिरतारुण्याचे रहस्य त्याना सापडलेले आहे ए एन के च्या भात्यात आणखीही एक बाण आहे ते आमचे अग्रगण्य वक्तेही आहेत साहित्य परिषदेच्या उडिपी येथील अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविण्याच्या किती तरी आधी ते कन्नड साहित्य ॲकेडमीच्या पत्रिकेचे सपादक झाले होते त्यानी कन्नड साहित्याची जी सेवा केली तिच्याविषयी मान्यता दर्शविण्यासाठी अलीकडे मैसूर विद्यापीठाने त्याना 'साहित्याचार्य' ही सन्माननीय पदवीही दिली आहे राज्याच्या साहित्य ॲकेडमीचे अध्यक्ष या नात्याने कार्यरत असतानाच त्याना ९ जुलै १९७१ ला देवाज्ञा झाली तेव्हा त्याचे और्ध्वदैहिक समाजाच्या वतीने करण्यात आले

### वचन पितामह

साक्षात्कारी वीरशैव सताचे उद्गार 'वचने' या नावाने ओळखले जातात त्यात काव्य आणि शास्त्रे दोहोंचेही गुणधर्म एकवटलेले असतात वचन शैली हे कन्नड साहित्याचे असाधारण वैशिष्टय होय तीत आपल्याला कन्नड साहित्याचा

निष्कलंक स्रोत आढळतो सूत्ररूप रचना आणि लयबद्ध शैली यामुळे ती साऱ्याच कन्नडिगाच्या व्यावहारिक जीवनाला आणि हृदयालाही जाऊन भिडतात इ स च्या बाराव्या शतकातील थोर वीरशैव साक्षात्कारी पुरुष आणि समाजसुधारक, बसव, यानी ही रचनापद्धती रूढ केली होती त्यानी आपल्या धर्मप्रचाराच्या कार्याला बसवकल्याण येथे प्रारभ केला पण बहामनी व आदिलशाही राज्यकर्त्यांनी हिंदू राजांचा पराभव केल्यानतर 'शिवशरण सताना' देशातून पळ काढावा लागला वचनाची हस्तलिखिते दूरदूरच्या मठातून कडचाकुलपांत ठेवण्यात आली विजयनगर येथील हिंदू साम्राज्याच्या उदयामुळे 'वचन' शैलीत लेखन करण्यास प्रबळ चालना मिळाली विशेषत पहिल्या देवरायाची 'शिवशरणा'चा आश्रयदाता म्हणून प्रशसा केली जाते विजयनगरच्या पाडावानतर कन्नड साहित्याला फिरून एकदा वाईट दिवस आले मराठ्यानी कर्नाटकाचे उत्तरेकडील जिल्हे पादाक्रांत केले आणि पुढे ते विजयी ब्रिटिश राज्यकर्त्यांचे साथी बनले एके काळी कर्नाटकाचा गाभा असलेला भाग आता दक्षिण महाराष्ट्र म्हणून ओळखला जाऊ लागला या गौरवशाली साहित्याच्या अस्तित्वाचाच मुळी जनतेला सर्वस्वी विसर पडून गेला इंग्लिश प्रॉटेस्ट-टाच्या दृष्टीने बायबलला जे महत्त्व आहे तेच वीरशैवाच्या दृष्टीने वचनशास्त्राला आहे इतस्तत विखुरली गेलेली ही वचनें गोळा करून ती ग्रथरूपाने प्रसिद्ध करण्यात पी जी हलकट्टी यशस्वी झाले बसवाचा जन्म विजापूर जिल्ह्यात झाला आणि त्यानी आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस मलप्रभा व कृष्णा याच्या सगमावर वसलेल्या कुडाळसगम नावाच्या स्थळी व्यतीत केले अर्थातच बसव आणि त्यांचे अनुयायी यांच्या वचनाशी सबद्ध असलेली निरनिराळी हस्तलिखिते विजापूर जिल्ह्यात आढळावी यात काहीच नवल नाही पी जी एच याच्या अव्याहत खटपटीचे फळ म्हणून जवळजवळ दोनशेपन्नास वचनकाराच्या रचना प्रसिद्ध करता आल्या

कन्नड साहित्याच्या पुनरुत्थानकालातील प्रारभीच्या दिवसांत कारत (पुट्टूर), दिवाकर (धारवाड), ए आर के (बगळूर) आणि सर्वश्रेष्ठ पुरुषातले असेच आणखीही काही लोक वृत्तपत्रीय क्षेत्राकडे आकृष्ट झाले सपादकाचे मुख्य उद्दिष्ट वाचकाच्या शक्य तेवढ्या मोठ्या सख्येपर्यंत पोहोचणे हेच असे, मग त्या नियतकालिकाच्या आवृत्त्या कितीही वेळा निघत असोत, ते दैनिक असो वा ज्ञानप्रचुर साप्ताहिक असो डी व्ही जी नीही वृत्तपत्रकार म्हणूनच आपल्या कार्यरत जीवनाचा प्रारभ केला भरपूर सन्मान प्राप्त झालेल्या दीर्घ जीवनानतरही ते लोकोपयोगी स्तभलेखक म्हणून काम करीतच राहिले आहेत आर.आर.डी आजही एका लोकप्रिय दैनिकाचे संपादक आहेत (संयुक्त कर्नाटक) आधुनिक कर्नाटकच्या या साऱ्या शिल्पकाराचा साधारण गुणधर्म कोणता म्हणाल तर समर्पणाची भावना हाच या साऱ्यात पी जी एच विशेष सन्मानाच्या पदाला पात्र ठरतात ए आर. के चे पोषण विद्यापीठीय

परिसरातच झाले कारत एक लोकप्रिय कादबरीकार म्हणून पुढे आले डी व्ही जी व आर आर. डी याना आपल्या राजनैतिक क्षेत्रातील कार्याची फळे चाखायला मिळाली परतु पी जी एच याच्या वाट्याला मात्र यातले कोणतेच सद्भाग्य आले नव्हते सुखासीनतेचे आणि भौतिक सुखोपभोगाचे जीवन बुद्धिपूर्वक वर्ज्य करून त्यांनी आपले समग्र जीवनच आपल्या देशबांधवाच्या सेवेला वाहिले होते ते नुसते सिद्धहस्त पत्रकारच नव्हते (शिवानुभवाचे सपादक), तर एक श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञ व पेढ्याचे आणि सहकारी सस्थाचे सस्थापकही होते त्याच्या सेवाशीलतेने सार्वजनिक जीवनाच्या सर्वच क्षेत्राना गवसणी घातली होती चौसरच्या सच्चरित धर्मोप-देशकाप्रमाणे त्यानी आधी कष्ट केले आणि मग शहाणपण सागितले गीतेत, बायबल-मध्ये व वचनातही सागितलेल्या आदर्शाचाच मागोवा त्यानी घेतला अर्थातच जनतेने त्यांना कृतज्ञताबुद्धीने अर्पण केलेल्या ' वचन पितामह या पदवीला ते सर्वार्थाने पात्र आहेत सिद्धेश्वर बँकेसमोर उभारलेला त्याचा काशाचा पुतळा अशाच प्रकारचे समाजसेवेचे कार्य हाती घेण्याची स्फूर्ती असख्य पिढ्याना देत राहील

**रगनाथ रामचद्र दिवाकर**

आर आर डी हे स्वातत्र्यसैनिकाचे अग्रणी होत १९२१ मध्ये सत्याग्रहाची चळवळ चालू करून महात्मा गाधीनी स्वदेशाभिमानी तरुणाना आवाहन केले तेव्हा लगेच महाविद्यालयातील प्राध्यापकाच्या पदाचे त्यागपत्र देऊन, दिवाकरांनी चळवळीत उडी घेतली 'कर्मवीर' हे कन्नड साप्ताहिक त्यांनी काढले आजही ते समर्थपणे चालले आहे राजद्रोहाला प्रेरणा देण्याच्या आरोपाखाली सपादकांना अनेक वेळा कारावास भोगावा लागला १९३०चा मिठाचा सत्याग्रह, उत्तर कानडातला सत्याग्रह आणि १९४२ मधील 'भारत सोडा' आदोलन या साऱ्यातच ते सहभागी झाले होते काही इतर व्यक्तींसह भूमिगत होऊन त्यानी त्या आदोलनाचा आवेग टिकवून ठेवला होता गुप्त सभाची प्रथा वर्ज्य करण्याची महात्मा गाधीची आज्ञा मानून ते प्रकट झाले आणि त्या प्रसगी त्याना अर्पण केलेल्या थैलीच्या आधारे त्यांनी 'लोकशिक्षण विश्वस्त निधीची' उभारणी केली ते पुढील कन्नड नियतकालिके चालवीत असतात सयुक्त कर्नाटक (दैनिक), कर्मवीर (साप्ताहिक), आणि कस्तूरी (मासिक) या विश्वस्त निधीने कन्नडमध्ये निरनिराळ्या विषयावर अनेक छोटी पुस्तके प्रसिद्ध केली आहेत असख्य भारतीय सस्थाने आणि ब्रिटिश प्रात यात विखुरले गेलेले कन्नड-भाषिक प्रदेश एकाच शासनाखाली आणून कर्नाटकाचे एकीकरण करण्यासाठी त्यानी मोठेच प्रचारसत्र चालविले होते

कन्नड, मराठी, हिंदी, इंग्लिश व सस्कृत या साऱ्याच भाषांचे पडित असल्यामुळे त्यानी विपुल लेखन, विशेषत धार्मिक विषयावर, केले आहे गीता, उपनिषदे,

शिवशरणाची वचने आणि हरिदासाची गीते यावर त्यांनी कन्नड भाष्ये लिहिली आहेत भारतीय विद्याभवनाने प्रसिद्ध केलेल्या कित्येक इंग्लिश ग्रथाचेही लेखन त्यांनीच केले आहे गाधी व अरविंद याच्या तत्त्वज्ञानाचे ते थोर मीमासक आहेत ते अखिल भारतीय गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष असून उभ्या भारतभर विधायक कार्य चालविण्यात ते पूर्णपणे गढून गेलेले असतात 'युगानुयुगातला कर्नाटक' हा ग्रथ प्रकाशित करण्यासाठी मैसूर शासनाने नेमलेल्या सपादक मडळाचेदेखील ते अध्यक्ष होतेच

१९४७ साली ते नेहरूच्या मत्रिमडळात गेले आणि (१९५२–५७) बिहारचे राज्यपालही झाले आता सी व्ही रामन दिवगत झाल्यामुळे आर आर डी व सदाशिव नगरातील प्रज्ञावताच्या शिरोभागी आरूढ झाले आहेत वयाला ऐंशी वर्षे उलटून गेली असली तरी त्यानी आपले शारीरिक आणि बौद्धिक आरोग्य आबाधित राखले आहे ज्या सार्वजनिक सभा विभूषित करण्यास ते समती देतात त्या साऱ्यांनाच त्याच्यामुळे उजाळा येतो ते तर कन्नड कुलाचे भीष्माचार्यच आहेत !

## वृत्तपत्रव्यवसाय

पाश्चात्य देशात आपण काय पाहिले याचा आढावा (१९४५) 'नाडेदुबन्द दरीत' लिहिताना दिनकर डी देसाईंनी म्हटले आहे, " इग्लडमधील दैनिकाचा खप दहा लाखापर्यंत असतो पण कन्नड दैनिकाचा सगळा मिळून खप लाखाचीही तड गाठू शकत नाही इग्लडमधल्या या अफाट खपाची कारणमीमांसा तीन प्रकारे करता येईल–तेथे कोणीही निरक्षर नाही, वृत्तपत्रे खूपच स्वस्त असतात आणि लोकसत्ताक राज्यकारभाराच्या यशस्वी कार्यातला स्वत चा अशात्म का होईना, वाटा उचलण्यास सर्वसाधारण व्यक्ती उत्सुक असते एका सुयशासाठी मात्र आपल्याला स्वत ची पाठ थोपटता येईल बातम्यांच्या शीर्षकाची माडणी विचारात घेतली किंवा संपादकीयाची पातळी विचारात घेतली तर इग्लडमधील वृत्तपत्राशी तुलना करता आपल्या वर्तमानपत्राची प्रतिष्ठा उत्तम प्रकारे कसोटीस उतरते

जवळजवळ एक दशकानतर अधिक चागल्या प्रकारचा पालट घडून आल्याचे अरय्यांच्या निदर्शनास आले " एक काळ असा होता की लोकप्रियता आणि प्रतिष्ठा यात कर्नाटकातले कोणतेही दैनिक केसरीच्या तोडीस तोड ठरू शकत नसे पण अलीकडच्या वर्षांत आपण वेगाने प्रगती साधली आहे आता आपली दैनिके जगातील दुसऱ्या कुठल्याही ठिकाणच्या सर्वोत्कृष्ट वृत्तपत्राइतकीच उत्तम प्रकारे सपादित आणि मुद्रितही केली जात आहेत " (ना कडा कर्नाटक, १९५३)

कर्नाटकातील वृत्तपत्रव्यवसायाचा अभ्यास चार टप्प्यांनी करता येईल मुद्रण व प्रकाशन व्यवसायातील प्रारभीचे कार्यकर्ते (१८४२–८५), गाधीपूर्व युग

(१८८६–१९२०), स्वातंत्र्यसैनिकाचा काळ (१९२०–४७) आणि स्वातंत्र्योत्तर काळ (१९५६–७०)

मुद्रण व प्रकाशन व्यवसायातले प्रारंभीचे कार्यकर्ते म्हणजे मिशनरी लोक मंगळूरचा 'बॅसल मिशन प्रेस', व मैसूरचा 'वेस्लियन मिशन प्रेस' यानी अभिजात कन्नड साहित्याच्या प्रकाशनाचे डोळ्यात भरण्याजोगे कार्य करून ठेवले आहे

दुसऱ्या कालखंडात मोडणारी काही नावे आधीच उल्लेखिली आहेत एम वेंकटकृष्णय्या मैसूरचे ज्येष्ठ पुढारी आणि कन्नड वृत्तपत्रव्यवसायाचे जनक होत हे एक उदारधी दानशूर व शिक्षणतज्ज्ञही होते कर्नाटकातल्या स्वातंत्र्य चळवळीला त्यानीच चालना दिल्याचे सांगतात त्यानी बजावलेल्या सेवेच्या स्मरणार्थ आता मैसूरात एक पुतळाही उभारला आहे 'संपत अभ्युदय' नावाच्या कन्नड दैनिकाचे संपादन त्यानी अनेक वर्षे केले देशभक्तिपर कर्तव्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन दैनिके संपादित करण्याची स्फूर्ती पी आर. रामय्यासारख्या व्यक्तीना त्यांनीच दिली तीनुसार 'ताई नाडू' चालू करण्यात येऊन ते लवकरच कर्नाटकातले सर्वांत लोकप्रिय दैनिक बनून गेले रौप्य महोत्सव साजरा करणारे ते कर्नाटकातले पहिलेच वृत्तपत्र (१९५२)

गांधी युगात उत्कृष्ट कार्यभाग पार पाडणाऱ्या अनेक संपादकातलेच बंगलोरचे टी टी शर्मा आणि धारवाडचे आर. आर डी हे दोघे होत

कर्नाटकाच्या एकीकरणानंतरच्या कालखंडात अनेक वृत्तपत्रे निघाली हुबळीच्या आवृत्तीच्या जोडीला संयुक्त कर्नाटकाची निराळी आवृत्ती आता बंगलोरलाही प्रसिद्ध होऊ लागली आज सर्वांत अधिक खप 'प्रजावाणीचा' होतो रविवारी त्याच्या एक लाख प्रती छापल्या जातात, सचित्र पत्रिकेचा विभाग हे त्याचे प्रमुख आकर्षण होय दोन्ही दैनिके शक्य तितकी अधिक आकर्षक आणि ज्ञानप्रद करण्याच्या दृष्टीने त्याचे धनी खर्चात कोणतीही काटछाट होऊ देत नाहीत दीपावली अंका-साठी साहित्यिक स्पर्धा आयोजित करून, विशेषत 'प्रजावाणी'ने गुणी व तरुण स्त्रीपुरुषाना सर्जनशील लेखनाकडे वळण्यास उत्तेजन देण्याच्या दृष्टीने खूपच कार्य केले आहे 'सुधा' हे याच व्यवस्थापनाखाली निघणारे साप्ताहिक आहे १९६५ मध्ये ते काढले तेव्हा खप तीस हजार होता तो आता ऐंशी हजारावर गेला आहे

अगदी अलीअलीकडेपर्यंत इंग्लिश वृत्तपत्रे वाचू इच्छिणाऱ्याना 'टाइम्स ऑफ इंडिया' (मुंबई), 'हिंदू' (मद्रास) आणि 'इंडियन एक्स्प्रेस' (चित्तूर) यांवरच विसंबावे लागत असे 'डेक्कन हेराल्ड' हे उभ्या कर्नाटकात ख्याती पावणारे पहिले इंग्रजी वृत्तपत्र होय 'हिंदू' आणि 'इंडियन एक्स्प्रेस' दोहोंचीही आता बंगलोरास आवृत्ती निघते एक्स्प्रेस समूहाचे कन्नड दैनिक (कन्नड प्रभा) १९६८ मध्ये

चालू झाले आणि आता त्याने ५०००० चा खप गाठला आहे पत्रकार–व्यवसायातली एम ए पदवी मिळविण्यासाठी पाटील पुट्टप्पा अमेरिकेस गेले होते आता ते (१९४७ साली निघालेल्या) 'प्रपच' या लोकप्रिय साप्ताहिकाचे सपादक आहेत १९५९ मध्ये त्यानी 'विश्ववाणी' नावाचे दैनिक काढले हुबळीहून प्रसिद्ध होणारे हे दैनिक उत्तरेकडील जिल्ह्यात पराकाष्ठेचे लोकप्रिय झाले आहे

व्ही बी नाईकानी सपादित केलेले विजापूरचे दैनिक 'विजापूर वैभव' कर्नाटकातले सर्वांत जुने दैनिक म्हणून मान्यता पावले आहे १८९५ मध्ये ते निघाले आणि अजूनही तडाख्याने चालले आहे कर्नाटकाच्या इतर जिल्ह्याचीही आपापली वृत्तपत्रे आहेतच कन्नड वृत्तपत्रव्यवसायाची प्रतिष्ठा वृद्धिगत करण्यासाठी केलेल्या भरीव कार्यामुळे पुढील नावे उल्लेखनार्ह ठरतात मगरूळचे व्ही एस कुडवा, कूर्गचे सी एम पुनाचा, पी आय बेलिअप्पा आणि के टी सुब्बैया

मुडुविदु कृष्णराव याच्यासारखे वक्ते, टी टी शर्मा आणि एस शर्मा यांच्यासारखे कन्नड गद्यप्रभू, बी एम श्रीनिवासैय्या आणि बी एन गुप्ता यांच्यासारखे उद्योगपती या साऱ्याचाच वृत्तपत्रव्यवसायाशी सक्रिय सबध आहे देशभक्तीपर व्याख्याने देणे, कारागृहाच्या वाऱ्या करणे, सयुक्त कर्नाटकासाठी प्रचारसत्र चालविणे, सत्याग्रह करणे आणि वृत्तपत्रकार बनणे यासारखी अनेक रूपे स्वातत्र्यसमराने धारण केली होती कन्नड वृत्तपत्रव्यवसायाकडे नेहमीच सर्वश्रेष्ठ गुणवत्ता लाभलेले लोक आकृष्ट झाले आहेत बगलोरच्या 'प्रिंटर्स' लिमिटेडच्या पाठीशी खड्या ठाकलेल्या लोकासारखी माणसे वृत्तपत्रव्यवसायात पडल्यावर त्यानी त्या कार्यात उत्कृष्ट यश जोडावे यात काहीच नवल नाही कर्नाटकातील वृत्तपत्रव्यवसायाचे भविष्य अत्यत उज्ज्वल आहे

# ६ सांस्कृतिक इतिहास

संस्कृती म्हणजे मनाचे व आचारविचाराचे सुपरिष्कृत स्वरूप "संस्कृती म्हणजे समाजाचा आत्मा, त्याच्या जीवनाची प्रणाली बनून गेलेल्या मूलभूत श्रद्धा, वृत्ती आणि आध्यात्मिक मूल्ये" (प्रेम कृपाल) मॅथ्यू ऑर्नोल्डने संस्कृतीला "माधुर्य आणि प्रकाश" म्हटले आहे प्रा लेआव्हिस याच्या मते सभ्य समाजातील वैचारिक आदानप्रदानाची लालित्यपूर्ण कला हे संस्कृतीचेच एक अंग आहे या गुतागुतीच्या कल्पनेची व्याख्या देण्याचा प्रयत्न करणारे प्रा एस एस माळवाड हे सर्वांत अलीकडचे विचारवंत "मानसिक आनंद आणि शारीरिक सुखे या दोहोंचाही संस्कृती हा मूलस्रोत होय, ती बाह्य जगाच्या रागडेपणाचा विसर पाडते, ती अभिजात अभिरुचीला जन्म देते आणि इतर कोणत्याही गोष्टीहून अधिक म्हणजे कन्नड संस्कृती कन्नडिगाना भिन्नतेत सुसंवाद प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य देते"

युगायुगाच्या अवधीत कर्नाटकाच्या लोकानी एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती उत्क्रांत करून ठेविली आहे काव्याची 'चंपू' शैली आणि गद्याची 'वचन' शैली हे कन्नड साहित्याचे अपूर्व विशेष आहेत धर्म आणि तत्त्वज्ञान या क्षेत्रात कर्नाटकाने 'द्वैताची' आणि 'शक्तिविशिष्टाद्वैताची' भर घातली आहे शिल्पकलेच्या 'चालुक्य' आणि 'होयसाळ' शैलीना जागतिक ख्याती लाभली आहे दक्षिण भारतातले संगीत कर्नाटकसंगीत याच नावाने ओळखले जाते कर्नाटकसंगीताचे निर्माते म्हणून पुरंदरदास मान्यता पावले आहेत आपल्या संस्कृतीच्या व्यवच्छेदक अंगाची व्याख्या करणारा नवव्या शतकातील नृपतुंग हा पहिला त्याने असे म्हटले आहे की कन्नडिगाना संस्कृतीची देणगी वंशपरंपरेने लाभली असून त्याची अभिरुची अगदी जन्मापासूनच अभिजात असते संस्कृती संपादन करण्यासाठी परदेशगमन करण्याची त्याना मुळीच आवश्यकता नसते

प्रा व्ही के गोकाकनी पुढील सूचना केल्या आहेत 'ललित कला, स्थापत्य-शास्त्र, शिल्पकला, चित्रकला आणि संगीत यांविषयी जे काही सांगावयाचे असेल त्या साऱ्याचाच समावेश बहुधा सांस्कृतिक इतिहासाच्या प्रकरणात करावा लागेल" वरील सूचीतल्या विषयाचा परामर्श घेण्यास प्रारंभ करण्यापूर्वी आपण आपली प्राचीन परंपरा आणि राज्याची आधुनिक प्रकल्पना यावर दृष्टिक्षेप करू या

**प्राचीन परपरा**

साहित्य म्हणजे जीवनापुढे ठेवलेला आरसाच होय कोणत्याही लोकसमूहाचे शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी याच्या काळजीपूर्वक केलेल्या अभ्यासाइतके त्या लोकाच्या मनाच्या घडणीचे आकलन करण्याचे अधिक चागले साधन असूच शकणार नाही आता आपल्याला प्रमाणभूत सामाजिक लेख या नात्याने शिलालेखाची मीमांसा करावयाची आहे कविराजमार्गाचा रचयिता म्हणतो की कन्नडिगाची सस्कृती त्याना साधेपणाने धर्माचरण करण्यास, मातापिता व गुरू याना मान देण्यास धार्मिक वैविध्याविषयी सहिष्णुता प्रकट करण्यास, पुण्यशील जीवन जगण्यास प्रसन्न मनाने भरपूर दान करण्यास समर्थ बनवते (मनीषि पिरिदु ईगुम) उपदेश व प्रत्यक्ष उदाहरणे दोहोचीही वाण कधी भासलीच नाही मदिरे सास्कृतिक कार्यांची केंद्रेच बनली होती हरिदास आणि शिवशरण यांची कीर्तनप्रवचने श्रवण करणे हे धर्मकृत्य मानले जाई उदात्त तत्त्वे आईच्या दुधाबरोबरच अगी मुरत असत लक्ष्मीधर नावाच्या एका मत्र्याचा जन्म व लालनपालन याचे वर्णन करणारा प्रसिद्ध शिलालेख आहे (इ स १४११) त्यात आईने मुलाला पुढीलप्रमाणे उपदेश केल्याचे सागितले आहे "तळी बाध, विहिरी खोद, मदिरे उभार, आर्तांचे अश्रू पूस, आणि आपल्या अनुयायाचे रक्षण कर."

मध्ययुगीन जगात वर्चस्व पुरुषाचे असे, पण प्राचीन काळी मात्र तसे नव्हते आज मानवी व्यवहारांच्या सर्वच क्षेत्रात स्त्रिया फिरून एकदा स्वत चे न्याय्य स्थान प्राप्त करून घेत आहेत मुस्लिम आक्रमकांचे आगमन होईपर्यंत स्त्रीजातीला स्वत च्या मनाचा विकास साधण्याचा, वशपरपरेने सपत्तीत दायभाग मिळविण्याचा आणि दानधर्माची कृत्ये करण्याचा एकूण एक अधिकार असे रन्नाची आश्रयदाती अत्तिमब्बे हिचा उल्लेख पूर्वी आलाच आहे तिने कवीना आश्रय दिला एवढेच नाही तर देवळेही बाधविली आणि 'दानचिंतामणी' ही पदवीही पटकावली

धर्मसहिष्णुतेच्या पुरातन गुणाचे गोडवे गाणारा एक सस्कृत श्लोक आहे होयसाळ स्थापत्यशिल्पातील चमत्कृतीचे कोडकौतुक करण्यासाठी बेलुरास जाणाऱ्या प्रवाश्याना तो श्लोक पाषाणात कोरलेला वाचावयास सापडेल. पहिल्या तीन चरणात शिव, बुद्ध व जिन याना आवाहन केलेले आहे शेवटच्या चरणात केशव आणि ईश याचा निर्देश 'केशवेश' या एकाच सामासिक शब्दात आला आहे हरिहरात मुळीच भेद न करण्यास भक्त शिकेल, तर ते त्याच्या दृष्टिकोनाच्या विशुद्धतेचेच गमक ठरेल हा प्राचीन आदर्श आधुनिक भक्ताच्या निदर्शनास आणून देण्याचे कार्य मदिराचे निर्माते अव्याहतपणे करीत आले आहेत उदाहरणार्थ, सोडेकोप्पाच्या 'केशव-मदिरा'तील भिंतीना सुशोभित करणाऱ्या कित्येक उत्कृष्ट श्लोकांतला वरील श्लोक

हा केवळ एक होय 'स्वदेशो भुवनत्रयम्' हा प्रसिद्ध श्लोकही त्यात समाविष्ट झालेला आहे

तळकाडचे गंग राजे जैन होते, तर होयसाळांनी वैष्णव पंथ स्वीकारला होता पण या घराण्यांत विवाहसंबंध घडून येत आणि राज्यकर्ते धर्मसहिष्णुतेचाच अवलंब करीत कारण, आपले प्रजाजन विभिन्न धर्मांचे अनुयायी असल्याचे ते जाणून होते. उदा पहिला नरसिंह राजा श्रवणबेळगोळास गेल्याचे आणि त्याने गोम्मटाच्या चरणकमलाची पूजा बांधल्याचे एका शिलालेखात सांगितले आहे बल्लाळ शिवभक्त असून 'शिवबल्लाळ' म्हणूनच तो प्रसिद्ध होता पण होयसाळ राजांनी जैनांच्या वस्त्यांना अग्रहार दिले असून जैन गुरूंचा सन्मानही केला आहे सर्वशक्तिमान भगवंताच्या दोन्ही बाजू साकार करणाऱ्या एका मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून तिचे मंदिर बांधणारा दुसरा नरसिंह एका होयसाळ राजाचाच सेनानी होता (१४२२ इ ) हरीचा भक्त असूनही तो पराक्रमी सेनापती हराचीही पूजा बांधण्यास सिद्ध असे यामुळेच तुंगभद्रेच्या तीरावरील उद्योगनगरीला 'हरिहर' नाव पडले.

या पुरातन परंपरेचा मान राखण्याची काळजी कर्नाटकचे राजे घेत असत विजय-नगर साम्राज्याचा संस्थापक बुक्क याजविषयीची पुढील आख्यायिका याची साक्ष देते धार्मिक मतभेद अगदीच निकरावर येण्याचेही काही प्रसंग उद्भवत असत असा एक संघर्ष मध्यस्थी करण्यासाठी राजाकडे आला त्याने जैन व वैष्णव दोघां-चीही मने वळवून त्यांना गोडीगुलाबीने राहण्यासाठी समजाविले कारण, त्याच्या उपासनापद्धतीत तर त्याला कसलाच तात्त्विक भेद आढळला नाही कालांतराने धार्मिक मतभिन्नतेविषयीची ही सहिष्णुता मुसलमान व ख्रिश्चन यांच्यापर्यंतही पोहोचविली गेली केळदीच्या राजाने आपल्या मुस्लिम प्रजाजनांच्या उपयोगासाठी मशीद बांधून दिल्याची माहिती एका शिलालेखात मिळते अशी अनंत उदाहरणे दाखवून देता येतील कर्नाटक धर्मसहिष्णुतेची 'सर्व–धर्म–समन्वय' भूमी म्हणून विख्यात झाला यात आश्चर्य नाही

## सिंहावलोकन

टिपू सुलतानाच्या पाडावानंतर एका शतकाहून अधिक काळपर्यंत कर्नाटकाचे सांस्कृतिक जीवन सुप्तावस्थेत होते. वस्तुत साऱ्या भारताचीच अशी अवस्था झाली होती पण बंगालने मात्र परमहंस, विवेकानंद, राजा राममोहन रॉय, बंकिमचंद्र आणि टागोरमंडळी यांच्यासारख्या पुनरुत्थान आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या थोर

विभूती निर्माण करण्याचे श्रेय पटकावले नतर गाधी पुढे सरसावले आणि त्यानी स्वातत्र्ययुद्धाचे आवाहन बहुजनसमाजापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था केली टिळक आणि गोखले यांच्यासारखे थोर नेते महाराष्ट्रालाही लाभले उत्तर भारताच्या सपाट प्रदेशानेदेखील लाला लाजपतराय आणि नेहरू कुटुब याच्यासारख्या कित्येक स्वातत्र्यवीराना जन्म दिला सत्यमूर्ती आणि व्ही एस श्रीनिवास शास्त्री याच्या-सारखे उत्तुग व्यक्तिमत्त्वाचे लोक मद्रासच्याही वाट्याला आले पण याच कालखडात असे दैवी वरदान लाभलेल्या व्यक्ती कर्नाटकाला मात्र विरळाच लाभल्या कारण साधेच होते कर्नाटकची शकले इतस्तत विखुरलेली होती सास्कृतिक पुनरुत्थानाचा शुभारभ विलबाने होण्याचे आणखी एक कारण म्हणजे शिक्षणातला मागासलेपणा जुन्यापुराण्या ' अग्रहारा'चा आणि ' मदरसा'चा आधुनिक प्रवृत्तीशी व निकडीशी सूर जमत नसे त्यामुळे इलाख्यातील नगरे तेवढीच अटळपणे आधुनिक शिक्षणाची केंद्रे बनून गेली मुबई, मद्रास व कलकत्ता येथील विद्यापीठे मैसूर विद्यापीठ स्थापन होण्याच्या अर्धा शतक आधीच स्थापन होऊन चुकली होती ही इलाख्याची नगरे विदेशी व्यापाराला सोयीस्कर म्हणून आदर्शभूत होती व्यापार, व्यवहार आणि उद्योगधदे यांची जिव्हाळ्याची केंद्रे असलेल्या या नगराकडेच सारे रस्ते जात असत आजदेखील रुद अतराचा एकुलता एक लोहमार्ग बगलोरहून मद्रासलाच जातो एखाद्या कन्नडिगाला दिल्लीस जायचे असेल तर त्याला मद्रासेत, मुबईत किंवा हैदरा-बादेत किती तरी वेळ थांबावे लागतेच लवकरच कर्नाटकला स्वतत्र बदरे मिळतील काळाच्या ओघात हळूहळू आणखी पुष्कळसे रुद लोहमार्गही घातले जातील प्रवा-श्याची ये जा आणि उद्योगधदे याची वेगाने वाढ होऊ लागली की भविष्य काळात दिल्लीपर्यंत व परदेशीही सरळ विमानमार्ग जाता येईल अशी आशा आहे हेदेखील सस्कृतीचेच घटक आहेत, कारण, मानवजातीचा इतिहास इतका गुतागुतीचा आहे की राष्ट्रीय जीवनाच्या आर्थिक, सामाजिक व राजनैतिक अगाचे काटेकोरपणे परस्पर अव्याप्त असे वर्गीकरण करणे शक्यच नाही परतु सुस्पष्टता व सुलभता यासाठी विशुद्ध आर्थिक घटकांचा परामर्श पुढील प्रकरणात घ्यावयाचा आहे

## द्रष्टे सत आणि तीर्थक्षेत्रे

### श्रवणबेळगोळा व गोम्मटेश्वर

प्रत्यक्ष काळाच्याच निम्मे वयोमान असलेली नगरे जगात अगदीच थोडी आहेत रोम व वाराणसी या नगरी चिरतन म्हणून प्रसिद्ध आहेत त्याच्या पक्तीला बसण्याचा अधिकार श्रवणबेळगोळालाही आहे कर्नाटकातील दुसऱ्या कोणत्याही स्थळाला

इतका प्रदीर्घ व अखंड इतिहास लाभलेला नाही दंतकथा, इतिहास आणि साहित्य यांच्याशी निगडित झालेल्या समृद्ध परंपरेच्या दृष्टीने ते एकमेवद्वितीय आहे चंद्रगुप्त मौर्याच्या काळी हे ठिकाण 'कालबोप्पु' या नावाने प्रसिद्ध होते 'चिक्क बेट्ट' (छोटे टेकाड) चंद्रगुप्ताने (इ स च्या तिसऱ्या शतकात) बांधलेल्या एका बसदी-मुळे 'चंद्रगिरी' म्हणून ओळखले जाते गोम्मट विग्रह उभारलेला आहे तो 'दोड्ड बेट्ट' (मोठ्या टेकडी)वर तो 'इंद्र-गिरी' म्हणूनही ओळखला जातो मोठासा पवित्र जलाशय जवळ असल्याविना कोणत्याच तीर्थस्थानाला पूर्णता येत नाही अर्थात आख्यायिका अशी आहे की गोमटेश्वराच्या पहिल्या अभिषेकाच्या प्रसंगी चमत्कार घडून आला महामस्तकाभिषेकात प्रभूंना लावण्यासाठी वापरलेल्या दुधाच्या दोन थेंबाचा एक लोंढाच बनून त्याने तळे भरून गेले चामुण्डरायाच्या गुरूंनी त्याला 'श्वेत सरोवर' हे संस्कृत नाव दिले कन्नडिग त्याला 'बेळगोळा' म्हणतात या स्थळाला पावित्र्य प्राप्त झाले ते संत बाहुबली यांच्या मूर्तीमुळे आणि म्हणूनच ते 'श्रवणबेळगोळा' म्हणून ओळखले जाऊ लागले कारण, जैन योग्याला 'श्रवण' म्हणतात इ स ९८३ त उभारलेल्या या पुतळ्याला दोन नावे लाभली आहेत–बाहुबली हे पौराणिक आणि गोम्मटेश्वर हे ऐतिहासिक ही मूर्ती ज्यांनी घडवून घेतली त्या थोर गंग सेनापतीची 'गोम्मट ही एक पदवी होती गोम्मट हे मन्मथ–सौंदर्याची देवता–या शब्दाचे तद्भव रूपपण आहे दोन्ही परींनी ते नाव अर्थपूर्ण ठरते शिल्पकाराच्या नावाचा शोध मात्र अजून लागायचाच आहे

लुई राइस व आर नरसिंहाचार यांनी सहाशे एक श्रवणबेळगोळा शिलालेख जमवून ते संपादित व प्रकाशित केले त्यातले काही बोप्पणसारख्या कवींनी रचलेले आहेत त्यांच्यामुळे तळकाडचे गंग आणि हळेबिडचे होयसाळ यांच्यावर मोठाच प्रकाशझोत पडतो होयसाळांच्या कोशाध्यक्षाने एक बसदी बांधली ती 'भांडारी बसदी' म्हणून प्रसिद्ध आहे विष्णुवर्धनाची (बिट्टि देव) थोर राणी संतला हिने 'गंधवरण बसदी'चे दान केले होयसाळांचे सेनानी व मंत्री जैन होते त्यातले दोघे विशेष उल्लेखार्ह ठरतात गंगराजने श्रवणबेळगोळाजवळ जैननाथपूर वसविले आणि तेथे शांतिनाथाचे विख्यात मंदिर बांधले यात्रेकरूंना टेकडी चढणे व उतरणे सोपे जावे यासाठी भरतेश्वराने पायऱ्या खोदवून घेतल्या व मचही बांधवून घेतले चिक्क-देवराय वोडियारने तेथे एक तळेही बांधल्याचे (१६७२–१७०४) सांगतात

मंदिरांच्या स्थापत्यकलेपुरता विचार करायचा तर श्रवणबेळगोळा म्हणजे कर्नाटकाच्या निरनिराळ्या भागात आढळणाऱ्या सर्व शैलींचे एक संग्रहालयच ठरते स्थापत्यकलेच्या 'चालुक्य' व 'विजयनगर' पद्धती आणि शिल्पकलेची 'होयसाळ' शैलीही श्रवणबेळगोळात दृग्गोचर होते

'करकलचे गोम्मट' या आपल्या ग्रथात जी पी राजरत्नमनी गोम्मट साहित्याची ग्रथसूचीच दिली आहे त्या सूचीत कित्येक सुप्रसिद्ध नावाचा समावेश असून, अनत, मधुर, चारुचद्रमा यांच्यासारखे- तीत सागितलेले काही जण तर त्याहूनही अधिक विख्यात होण्याच्या योग्यतेचे आहेत सस्कृत व प्राकृत दोन्ही भाषातील ग्रथ तीत समाविष्ट आहेत 'गोम्मट विग्रहाना' आदराजली वाहणारे ग्रथ मराठीत व तामिळमध्येही असल्याचे निदर्शनास आणण्यासाठी त्यांनी श्रवणबेळगोळा-शिलालेखातली उद्धरणेही दिली आहेत पूर्वसूरीच्या या आख्यानाला डी व्ही. गुण्डप्पा आणि गोविंद पै याच्यासारख्या आधुनिक पडिताचीही जोड द्यायला हवी

१२० मीटर उचीच्या 'दोड्ड बेट्टा'च्या उघडचाबोडक्या शिखरावर कोरलेल्या या जगद्विख्यात एकसघ पाषाणमूर्तीला जुन्या मैसूरच्या मैदान या विभागाच्या विराट रूपाचे दर्शन घडते सर्वच देशातून आणि क्षेत्रातून सतत वाढत्या सख्येने येणाऱ्या यात्रेकरूच्या थव्याना भाषा व धर्म याच्या भिन्नतेचे विस्मरण व्हावे हा बाहुबलीच्या महानुभावतेचा गौरवच म्हणावयाचा केवळ जैनांनीच नव्हे तर, शैवांनी आणि वैष्णवानीदेखील मदिरे बाधून देऊन जैनाचे हे आध्यात्मिक केंद्र परोपरींनी भूषविले आहे आध्यात्मिक साम्राज्याचे गोम्मट हे सम्राटच होत धर्माची साहित्य व कला याच्याशी सांगड घालण्याची स्फूर्ती देण्याचे श्रेय या भीमकाय मूर्तीकडेच जाते कर्नाटकाच्या सस्कृतीत जे जे काही म्हणून थोर आहे त्या साऱ्याचाच हा पुतळा प्रतीक बनून गेला आहे महात्म्याच्या आकाक्षाही ऊर्ध्वगामी असतात. 'उत्सर्पिणी खलु महता प्रार्थना' असे उद्गार कालिदासाने काढले आहेत. बाहुबलीने मानव जातीच्या परिपूर्णतेचे सर्वोच्च शिखर गाठले याहून अधिक स्फूर्तिदायक उदाहरण मानव जातीच्या इतिहासात आढळणार नाही बोप्पणाच्या वृत्तातली एक ओळ येथे उद्धृत करता येईल

"एमक्षिति सपूज्यामो गोम्मटेश्वर जिनश्रीरूप आत्मोपमम् ।"

तीवरून आपणाला वाल्मीकीच्या विख्यात उपमाचे स्मरण होते– 'गगन गगनाकार सागर सागरोपम' गोम्मटाची भव्यता व महात्मता अद्वितीय उत्कर्षाप्रत पोहोचली आहे

१९५३मध्ये गोखले इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक अफेअर्सच्या विद्यमाने दोन गीतनाटचाचे प्रयोग करण्यात आले बाहुबली या विषयावरील उपलब्ध साहित्य-धनाला जी पी राजरत्नमनी नाटचरूप दिले कन्नड गीतनाटचाचे विख्यात रचयिते पी टी नरसिहाचार यानी वरील प्रयोगाचे परीक्षण 'जनप्रगती' पत्रासाठी लिहिले होते ही दैदीप्यमान, नाटचरूप करमणूक उपलब्ध करून देणाऱ्या साऱ्याचीच त्यात प्रशसा केली होती या नाटकाचे यशस्वी प्रयोग परस्परसहकार्याने केलेल्या

खटपटीचेच फलित होय मानाचे पान नट, गमकी (एम राघवेंद्र राव) आणि सगीत दिग्दर्शक (एल राजा राव) यांच्यात विभागले गेले होते पुढे जी आय पी ए च्या उपयोगासाठी ही नाटके जी पी राजरत्नमनी प्रसिद्धही केली होती या ग्रथासाठी डी व्ही गुडाप्पानी बहुमोल प्रस्तावनाही लिहिली गीतनाट्याशी निगडित असलेल्या समस्यांवरील टी एस इलियटचे उद्‌गार त्यानी उद्‌धृत केले आहेत शेक्स्पीयरचे अनुवादक आणि गद्य व सगीत नाटकांचे लेखक या नात्याने नभोवाणीवरून प्रसारित करण्यास आणि रगभूमीवर प्रयोग करण्यास साजेशा या साहित्यप्रकाराची कला व तत्र याच्याशी डी व्ही गुडप्पा चागलेच परिचित आहेत त्यांच्या उद्‌गारातले काही अश खाली उद्‌धृत करण्यास प्रत्यवाय नाही

"बाहुबलीत सगीत व काव्य याची अभिनयाशी घातलेली सागड मला आवडली असे म्हणण्याइतका मी जुन्या वळणाचा आहे जी पी राजरत्नम कन्नडमधील आधुनिकतावादी चळवळीच्या नेत्यातलेच एक होत तरीदेखील त्यानी आपल्या प्राचीन परपरेकडे पाठ फिरविलेली नाही त्याचा दृष्टिकोण विशुद्ध असल्याचेच हे प्रमाण होय नाटककाराचे उद्दिष्ट भावनाची उत्कटता किवा शैलीची व्यजकता अथवा आवेश यातले काहीही असू शकेल इष्ट तो परिणाम त्याना काव्याच्या सहाय्याने किंवा बोलभाषेतील वाक्प्रचाराच्या द्वारा साध्य करता येईल कधीकधी ही दोन्ही माध्यमे तोकडी असल्याचे आढळून आल्यामुळे लेखकाला गीताचाही अवलब करावा लागतो आधुनिक नाटककारापुढे असलेली समस्या आहे प्रसगाला अनुरूप काय ठरेल हीच भाषेतील सर्वच साधनाचा उपयोग करून घेण्याचा निर्णय त्याने घेतला, तर त्याचे मिश्रण काय प्रमाणात करायचे ? याचे उत्तर प्रत्येक नाटककाराने स्वत पुरते स्वत च शोधून काढायला हवे आपल्या टीकाकारांनी शोधलेल्या सूत्राच्या अनुरोधाने त्याना लेखनाचे कार्य करताच येणार नाही "

जैन व बौद्ध साहित्याला लोकप्रियता मिळवून देण्यात जी पी राजरत्नम आणि एस के रामचद्र राव यानी भरीव यश मिळविले आहे आजकाल एस के रामचद्राच्या 'शातला' या नृत्यनाट्याला मिळालेले यश सर्वत्र दुमदुमत आहे के व्ही अय्यर याची 'शातला' कादबरी तडाख्याने खपत आहे बेंद्रे तिची मराठी आवृत्ती सिद्ध करीत आहेत अशा प्रकारे जैन धर्म व साहित्य आजच्या सास्कृतिक जीवनाचे ताणेबाणेच होऊन गेले आहेत

### शृगेरी आणि शंकराचार्य

अद्वैत, द्वैत, विशिष्टाद्वैत आणि शक्तिविशिष्टाद्वैत हे तत्त्वज्ञानाचे विख्यात सप्रदाय आहेत तत्त्वज्ञान या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यागाचे फारसे ज्ञान सामान्य वाचकाला असण्याचा सभव नसल्यामुळे त्या विषयाच्या आत्मविषयक अगाविषयी

अधिक काही सांगायला नकोच तीर्थयात्रेच्या केंद्राचा स्थानिक इतिहास आणि चरित्र या नात्याने मनोवेधक ठरणाऱ्या गोष्टींचाच तेवढाच परामर्श घ्यावयाचा आहे भक्ती हाच साऱ्या धर्मांचा महत्तम साधारण विभाजक असून या वस्तुस्थितीवर पुरेसा भर अगोदरच दिलेलाही आहे पाखंडवादाचा धुव्वा उडवून पुराणमतवादाची प्राणप्रतिष्ठा करणे हीच शंकराचार्यांनी बजाविलेली ऐतिहासिक कामगिरी होय आस्तिक्य व धर्मश्रद्धा यांविना भक्ती असूच शकत नाही स्वर्गाच्या राज्यात अनेक प्रासाद असून त्याकडे नेणारे नानाविध मार्गही आहेत 'उपनिषदे', 'ब्रह्मसूत्रे' व 'गीता' या 'प्रस्थानत्रयी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रंथांवर भाष्ये लिहून शंकर, रामानुज आणि मध्व यांनी त्यातल्या तीन मार्गांचे स्पष्टपणे दिग्दर्शन केले या विख्यात 'त्रयी'पैकी 'गीता' सर्वांत सुटसुटित, मधुर आणि लोकप्रिय आहे मूळ भाष्ये संस्कृतात लिहिलेली आहेत कन्नडमध्येही असंख्य भाष्ये आहेत 'शांकर-भाष्याचा' परिचय करून घेऊ इच्छिणाऱ्या कन्नडिगांना होळेनरसीपूरच्या 'अद्वैत-प्रकाश'कार्यालयाने प्रसिद्ध केलेला ग्रंथ अत्यंत उपयुक्त वाटेल

आमचे कवी, संत व राजे यांच्या स्थलकालाविषयीची अनिश्चितता आमच्या सांस्कृतिक इतिहासात पानोपानी आढळून येणारा चमत्कार आहे तीन थोर आचार्यांतले एकटे मध्वच तेवढे कन्नडिग होते अर्थातच केरळात उदयास आलेल्या शंकराचार्यांहून आणि तमिळनाडूत जन्मलेल्या रामानुजाहून त्यांच्याविषयी आपणांस अधिक माहिती असणे स्वाभाविक आहे शृंगेरी महाविद्यालयाच्या पहिल्या प्राचार्यांनी शंकराचार्यांच्या शृंगेरीतील धर्मप्रचाराविषयी निरनिराळ्या महत्त्वाच्या सत्य घटना एकत्रित केल्या आहेत त्यांच्या संशोधनाचा सारांश खाली दिला आहे.

तुंगभद्रेच्या पश्चिम तीरावर वसलेली शृंगेरी चिक्कमगळूर जिल्ह्यात मोडते शंकराचार्यांच्या उदयाच्या दीर्घ काळ आधीपासूनच हे स्थळ 'आश्रम' किंवा 'तपोभूमी' म्हणून विख्यात होते ऋष्यशृंगाचा पिता विभांडक यांच्यासारख्या ऋषींच्या हिंडण्याफिरण्याने ती भूमी पावन झालेली होती जैनांनाही तिला आध्यात्मिक साधनेसाठी आदर्श ठिकाण म्हणून मान्यता दिली होती पडझड झालेल्या अवस्थेत का होईना परंतु जैनांच्या कित्येक वसत्या शृंगेरीच्या सभोवार आढळून येतात खरे सांगायचे तर शृंगेरी हा जैन धर्माचा भक्कम बालेकिल्लाच होता तेथेच अद्वैत तत्त्वज्ञानाचे केंद्र काढण्याची प्रेरणा शंकराचार्यांना झाली ती या वस्तुस्थिती-मुळेच आपल्या प्रदीर्घ भ्रमंतीत प्राचीन ऋषींनी पावन करून ठेविलेल्या अनेक ठिकाणांची माहिती शंकराचार्यांना निश्चितच मिळाली असेल तीर्थ मट्टूर, तीर्थ हळ्ळी आणि शिव मोग्ग यांसारख्या पुण्यक्षेत्रांची तुंगेच्या तीरी रेलचेल आहे या दृष्टीने तिचे स्थान एकट्या गंगेच्याच तेवढे खाली आहे स्वतःचे पहिले आध्यात्मिक केंद्र जैनांचे प्रबळ आश्रयस्थान बनलेल्या ठिकाणीच स्थापन व्हावे अशी शंकराचार्यांची

इच्छा असण्याचा सपूर्णतया सभव आहे दक्षिणेवरील त्याच्या आध्यात्मिक आक्रमणातल्या धर्मविजयाचा रोख अशत जैन धर्माविरुद्धच होता शकराचार्यांच्या आध्यात्मिक स्वारीनतर जैन व बौद्ध पथाची पिछेहाटही झाली

श्री शारदा या विख्यात मदिराच्या चौकात जवळजवळ अठरा मीटर उचीचा एकसंध पाषाणस्तभ आढळतो तो जैन परपरेचा मानस्तभ आहे त्या स्तभाच्या दक्षिणेकडील पृष्ठभागावर एक जैन मूर्ती कोरलेली आहे यावरून हेच सिद्ध होते की तो हिंदू मदिरांच्या परपरागत मूर्तिकलेतला गरुडखाब किंवा ध्वजस्तभ नव्हेच

जैनांच्या या मुख्य ठाण्याच्या पाडावानतर जैनांची आश्रयस्थाने ओस पडून त्यांची पडझड होऊ लागली पचवीस एक चौरस मैलाच्या क्षेत्रात अजूनही डझनभर जैन वसत्या आढळून येतात या भागातून गोळा केलेल्या निरनिराळ्या जैन मूर्ती महाविद्यालयातील वस्तुसग्रहालयाच्या प्रदर्शनात ठेवलेल्या आहेत

शकराचार्यांनी शृगेरीला दोनदा भेट दिली असणार त्यांचे गुरू गोविंद पूज्य भगवत्पाद याची नर्मदातीरी भेट होण्यापूर्वी त्यानी ती नगरी पहिल्यादा पाहिली, आणि उत्तरेतील धर्मविजयानतर शकराचार्यांनी शृगेरीला दुसऱ्यादा भेट दिली मधल्या सगळ्या अवधीत त्याची दृष्टी शृगेरीकडेच लागलेली असणार जैन विरोधकाना पराभूत केल्यानतर त्यानी आपले पहिले पीठ शृगेरीतच स्थापन केले दोन महत्त्वाच्या स्थापनासमारभाचे मार्गदर्शन करण्यासाठी ते तेथे पाच एक वर्षे राहिलेही असणार एका खडकात कोरलेल्या 'श्रीचक्रा'वर श्रीशारदा देवीची प्राणप्रतिष्ठा आणि आपले आवडते शिष्य सुरेश्वराचार्य याची त्या आध्यात्मिक मठाच्या अध्यक्षपदी स्थापना चद्रमौळीश्वराच्या स्फटिक लिंगाची आणि स्फटिकशिलेत कोरलेल्या रत्नगर्भ (मध्यभागी माणिक बसविलेला) गणपतीची पूजाअर्चा त्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीतच चालू करण्यात आली

शकराचार्यांच्या काळाविषयीचा पुरावा इ स पू पाचवे शतक ते इ स चे आठवे शतक एवढी विस्तृत कालावधी सूचित करतो शृगेरी, कुडाळी, द्वारका व कामकोटी येथील पीठे प्राचीनतर काळास अनुकूल आहेत पण आधुनिक पडित मात्र अर्वाचीन काळ अधिक सभवनीय असल्याच्या मताचे आहेत शकराचार्यांच्या सूत्रभाष्यावरील वाचस्पती मिश्राची टीका अतर्गत पुराव्याच्या आधारे इ स च्या सातव्याआठव्या शतकातील कोणत्या तरी काळाकडे बोट दाखवते शकराचार्यांच्या उपलब्ध कुडलीवरून इ स ८०५ चे अनुमान निघते कारण, तीत असलेले सारे ग्रहयोग याच वर्षी सभवतात दुसऱ्या जयवर्म्याच्या राजवटीतील (८७८–८८७ इ ) काबोजच्या शिलालेखात शकराचार्यांच्या पायाशी बसून समग्र शास्त्राचे

अधिक काही सागायला नकोच तीर्थयात्रेच्या केंद्राचा स्थानिक इतिहास आणि चरित्र या नात्याने मनोवेधक ठरणाऱ्या गोष्टीचाच तेवढाच परामर्श घ्यावयाचा आहे भक्ती हाच साऱ्या धर्मांचा महत्तम साधारण विभाजक असून या वस्तुस्थितीवर पुरेसा भर अगोदरच दिलेलाही आहे पाखडवादाचा धुव्वा उडवून पुराणमतवादाची प्राणप्रतिष्ठा करणे हीच शकराचार्यांनी बजाविलेली ऐतिहासिक कामगिरी होय आस्तिक्य व धर्मश्रद्धा यांविना भक्ती असूच शकत नाही स्वर्गाच्या राज्यात अनेक प्रासाद असून त्याकडे नेणारे नानाविध मार्गही आहेत 'उपनिषदे', 'ब्रह्मसूत्रे' व 'गीता' या 'प्रस्थानत्रयी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रथावर भाष्ये लिहून शकर, रामानुज आणि मध्व यानी त्यातल्या तीन मार्गांचे स्पष्टपणे दिग्दर्शन केले या विख्यात 'त्रयीं'पैकी 'गीता' सर्वांत सुटसुटित, मधुर आणि लोकप्रिय आहे मूळ भाष्ये सस्कृतात लिहिलेली आहेत कन्नडमध्येही असंख्य भाष्ये आहेत 'शाकर-भाष्याचा' परिचय करून घेऊ इच्छिणाऱ्या कन्नडिगाना होळेनरसीपूरच्या 'अद्वैत-प्रकाश'कार्यालयाने प्रसिद्ध केलेला ग्रथ अत्यत उपयुक्त वाटेल

आमचे कवी, सत व राजे याच्या स्थलकालाविषयीची अनिश्चितता आमच्या सांस्कृतिक इतिहासात पानोपानी आढळून येणारा चमत्कार आहे तीन थोर आचार्यांतले एकटे मध्वच तेवढे कन्नडिग होते अर्थातच केरळात उदयास आलेल्या शकराचार्यांहून आणि तमिळनाडूत जन्मलेल्या रामानुजांहून त्यांच्याविषयी आपणांस अधिक माहिती असणे स्वाभाविक आहे शृगेरी महाविद्यालयाच्या पहिल्या प्राचार्यांनी शकराचार्यांच्या शृगेरीतील धर्मप्रचाराविषयी निरनिराळ्या महत्त्वाच्या सत्य घटना एकत्रित केल्या आहेत त्याच्या सशोधनाचा सारांश खाली दिला आहे.

तुगभद्रेच्या पश्चिम तीरावर वसलेली शृगेरी चिक्कमगळूर जिल्ह्यात मोडते शकराचार्यांच्या उदयाच्या दीर्घ काळ आधीपासूनच हे स्थळ 'आश्रम' किंवा 'तपोभूमी' म्हणून विख्यात होते ऋष्यशृगाचा पिता विभाडक यांच्यासारख्या ऋषींच्या हिंडण्याफिरण्याने ती भूमी पावन झालेली होती जैनानाही तिला आध्यात्मिक साधनेसाठी आदर्श ठिकाण म्हणून मान्यता दिली होती पडझड झालेल्या अवस्थेत का होईना परतु जैनाच्या कित्येक वसत्या शृगेरीच्या सभोवार आढळून येतात खरे सांगायचे तर शृगेरी हा जैन धर्माचा भक्कम बालेकिल्लाच होता तेथेच अद्वैत तत्त्वज्ञानाचे केंद्र काढण्याची प्रेरणा शकराचार्यांना झाली ती या वस्तुस्थिती-मुळेच आपल्या प्रदीर्घ भ्रमतीत प्राचीन ऋषींनी पावन करून ठेविलेल्या अनेक ठिकाणाची माहिती शकराचार्यांना निश्चितच मिळाली असेल तीर्थ मट्टूर, तीर्थ हळ्ळी आणि शिव मोग्ग यासारख्या पुण्यक्षेत्राची तुगेच्या तीरी रेलचेल आहे या दृष्टीने तिचे स्थान एकट्या गगेच्याच तेवढे खाली आहे स्वत चे पहिले आध्यात्मिक केंद्र जैनाचे प्रबळ आश्रयस्थान बनलेल्या ठिकाणीच स्थापन व्हावे अशी शकराचार्यांची

इच्छा असण्याचा सपूर्णतया सभव आहे दक्षिणेवरील त्याच्या आध्यात्मिक आक्रमणातल्या धर्मविजयाचा रोख अशत जैन धर्माविरुद्धच होता शकराचार्यांच्या आध्यात्मिक स्वारीनतर जैन व बौद्ध पथाची पिछेहाटही झाली

श्री शारदा या विख्यात मदिराच्या चौकात जवळजवळ अठरा मीटर उचीचा एकसध पाषाणस्तभ आढळतो तो जैन परपरेचा मानस्तभ आहे त्या स्तभाच्या दक्षिणेकडील पृष्ठभागावर एक जैन मूर्ती कोरलेली आहे यावरून हेच सिद्ध होते की तो हिंदू मदिराच्या परपरागत मूर्तिकलेतला गरुडखाब किंवा ध्वजस्तभ नव्हेच

जैनाच्या या मुख्य ठाण्याच्या पाडावानतर जैनाची आश्रयस्थाने ओस पडून त्याची पडझड होऊ लागली पचवीस एक चौरस मैलाच्या क्षेत्रात अजूनही डझनभर जैन वसत्या आढळून येतात या भागातून गोळा केलेल्या निरनिराळ्या जैन मूर्ती महाविद्यालयातील वस्तुसग्रहालयाच्या प्रदर्शनात ठेवलेल्या आहेत

शकराचार्यांनी शृगेरीला दोनदा भेट दिली असणार त्यांचे गुरू गोविंद पूज्य भगवत्पाद याची नर्मदातीरी भेट होण्यापूर्वी त्यानी ती नगरी पहिल्यादा पाहिली, आणि उत्तरेतील धर्मविजयानतर शकराचार्यांनी शृगेरीला दुसऱ्यादा भेट दिली मधल्या सगळ्या अवधीत त्याची दृष्टी शृगेरीकडेच लागलेली असणार. जैन विरोधकांना पराभूत केल्यानतर त्यानी आपले पहिले पीठ शृगेरीतच स्थापन केले दोन महत्त्वाच्या स्थापनासमारभाचे मार्गदर्शन करण्यासाठी ते तेथे पाच एक वर्षे राहिलेही असणार एका खडकात कोरलेल्या 'श्रीचक्रा'वर श्रीशारदा देवीची प्राणप्रतिष्ठा आणि आपले आवडते शिष्य सुरेश्वराचार्य याची त्या आध्यात्मिक मठाच्या अध्यक्षपदी स्थापना चद्रमौळीश्वराच्या स्फटिक लिंगाची आणि स्फटिकशिलेत कोरलेल्या रत्नगर्भ (मध्यभागी माणिक बसविलेला) गणपतीची पूजाअर्चा त्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीतच चालू करण्यात आली

शकराचार्यांच्या काळाविषयीचा पुरावा इ स पू पाचवे शतक ते इ स चे आठवे शतक एवढी विस्तृत कालावधी सूचित करतो शृगेरी, कुडाळी, द्वारका व कामकोटी येथील पीठे प्राचीनतर काळास अनुकूल आहेत पण आधुनिक पडित मात्र अर्वाचीन काळ अधिक सभवनीय असल्याच्या मताचे आहेत शकराचार्यांच्या सूत्रभाष्यावरील वाचस्पती मिश्राची टीका अतर्गत पुराव्याच्या आधारे इ स च्या सातव्याआठव्या शतकातील कोणत्या तरी काळाकडे बोट दाखवते शकराचार्यांच्या उपलब्ध कुडलीवरून इ स ८०५ चे अनुमान निघते कारण, तीत असलेले सारे ग्रहयोग याच वर्षी सभवतात, दुसऱ्या जयवर्म्याच्या राजवटीतील (८७८–८८७ इ ) काबोजच्या शिलालेखात शकराचार्यांच्या पायाशी बसून समग्र शास्त्राचे

अध्ययन करणाऱ्या राजगुरू शिवसोमाचा उल्लेख केलेला आहे त्यामुळे कुडलीवरून निघणारा इ स ८०५ हा काळ सभवनीय दिसतो

मठ म्हणजे धार्मिक सिद्धातांचा प्रचार व प्रसार करणारे केद्र शकराचार्यांनी शृगेरीत एक मठ स्थापन केला असे म्हणणे सर्वस्वी बिनचूक नाही अद्वैत साधनांचा आश्रम किंवा सनातन धर्माविषयी आस्था बाळगणाऱ्यांचे निवाऱ्याचे ठिकाण असेच त्याचे स्वरूप अधिक प्रमाणात होते त्याला मठाची प्रतिष्ठा लाभली ती पुढे चौदाव्या शतकातले ख्यातनाम जगद्गुरू विद्यारण्य याच्या काळात असख्य यात्रेकरूना आकृष्ट करणारे आध्यात्मिक केद्र म्हणून शृगेरीची प्रतिष्ठा आजही अबाधित राहिली आहे

**बसवकल्याण व बसवेश्वर**

पुरदरदासाची चतु शताब्दी, बसवण्णाची अष्टशताब्दी आणि कन्नड साहित्य अँकेडेमीचा रौप्य महोत्सव अशा राष्ट्रीय महत्त्व लाभलेल्या निरनिराळ्या प्रसगाच्या निमित्ताने काढलेल्या अलीकडच्या काही थोड्या ग्रथात समाविष्ट करण्यात आलेले सशोधनजन्य निष्कर्ष सामान्य वाचकाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न येथे करावयाचा आहे परिषदेच्या महोत्सवात कन्नड सस्कृतीच्या चाहात्याचा खूपच मोठा आणि प्रातिनिधिक स्वरूपाचा मेळावा आकृष्ट झाला होता नवी कविता, नवी नाटके व नवा इतिहास याविषयी सामान्य माणसाला बरीच आस्था आहे हे यावरून स्पष्टच दिसते वास्तविक अशा भुकेल्या मुखात शब्दश आणि लाक्षणिक दोन्ही अर्थांनी घास भरविण्याची निकड असतेच गेल्या पाच दशकातील आमच्या विद्वानानी केलेले प्रयासच या सर्वसाधारण जागृतीला कारणीभूत झालेले आहेत अद्यावत व प्रमाणभूत असा साहित्याचा इतिहास आणि समाजोपयोगी स्वरूपाचा राजकीय इतिहास लिहिण्याचे आव्हानही तिने जणू आमच्या विद्वानाना देऊन ठेवले आहे आपल्या अगदी अलीकडच्या साहित्यिक इतिहासात डॉ एम व्ही कृष्णराव यानी हरिदासाच्या गीतांचा व शिवशरणाच्या वचनांचा उद्बोधक आढावा घेतला आहे त्यातली कित्येक गीते आणि वचने कोणाही सुसस्कृत कन्नडिगाला मुखोद्गत असावी अशी स्वाभाविक अपेक्षा असते पुष्कळाच्या तर ती ओठावरच खेळत असतात ती सुरावटीद्वारा सगीतनिबद्ध करून गायिलीही जातात ती म्हणजे उभ्या जगातल्या भक्तिपर साहित्याचा अजरामर अशच होत

श्रीकणठींनी वचनाच्या एका वैशिष्टपूर्ण गुणधर्माकडे लक्ष वेधले आहे सहजसिद्ध आवेश आणि प्रगाढ चिंतन याच्याशी गद्यात आढळणाऱ्या अन्य प्रकारच्या सुमवादाचा मेळ घालून देणारा वचनाशी तुलना करण्याजोगा साहित्यप्रकार जगातल्या दुसऱ्या कोणत्याही वाङ्मयात नाही वचनांना गद्यकाव्य किंवा लयबद्ध

गद्य मानणे बुद्धिभेद करणारे ठरेल ती एक स्वयसिद्ध प्रणाली असून कन्नड साहित्याच्या अवाढव्य प्रासादात तिच्याही वाट्याला एक स्वतत्र कोनाडा आलेला आहे. साहित्यिक अभिव्यक्तीत जिवत भाषेला तिच्या केंद्रावर्ती स्थानावर फिरून सुप्रतिष्ठित करून बसवानी जी क्राती साधली तिनेच जडजबाल काव्यशैलीच्या शृखलांतून स्वत ची मोकळीक करून घेण्याची शक्ती नतरच्या कवीना दिली आता ते बोलभाषेतील शब्द पेरून भाषेला बहुप्रसवा बनवू शकले

एका वचनाचा प्रा अर्मांडो मेनेझिसनी पुढीलप्रमाणे अनुवाद केला आहे

' करून टाका, तात, मला दृष्टिहीन मानव
भटकणार नाहीत सैरावैरा दृक्पात ज्यांचे ।"

ख्रिश्चन सत मॅथ्यू आणि वरील साक्षात्कारी वीरशैव सत यांनी अनन्यमनस्कता व अविचल श्रद्धा लाभावी म्हणून समानरूप शब्दात प्रार्थना कशी केलेली आहे हे दाखविण्यासाठी त्यानी मॅथ्यूच्याही दोन कविता उद्धृत केल्या आहेत तसेच त्यांना एक आधुनिक उदाहरणही उद्धृत करता आले असते

हॉपकिन्सची ' हॅबिट ऑफ परफेक्शन '
" चढवा कवच नेत्रांनो, दुहेरी अधाराचे
घ्या आणिक दर्शन स्वयसिद्ध तेजाचे । '

स्थलकालदृष्टचा इतक्या अतरावर असलेल्या दोन ईश्वरनिष्ठ पुरुषातले एवढे निकट साधर्म्य म्हणजे आध्यात्मिक अनुभूती खऱ्याखुऱ्या आणि विश्वव्यापी असल्याचे सिद्ध करणारा पुरावाच होय अभिजात साहित्यातील आधुनिकता म्हणजे निरतर स्फूर्तीचा मूलस्रोतच होय हरिदास व शिवशरण दोघेही आपापल्या कृतीना अत्यत उन्नायक आणि त्याबरोबरच मनोरजकही स्वरूप देऊ शकले हे कन्नडिगांचे महान सौभाग्यच होय त्या कृती म्हणजे तर या जीवनानतरच्या पारलौकिक जीवनासाठी धन म्हणून जतन करण्याजोगे अक्षयी हिरेच बनून गेल्या आहेत

विश्वकष मानव म्हणून मान्यता पावण्याचा बसवेश्वराचा अधिकार प्रा गोकाक यानी वर्णिला आहे " कोणाविषयीही भय वा द्वेष न बाळगता बसवेश्वरानी आपले जीवन ईश्वरभक्तीत वेचले जाती आणि पथ याच्या बधनामुळे अश्मीभूत झालेल्या समाजात ऐक्याचा व समानतेचा प्रचार करणारे आणि ब्राह्मण व चाडाळ, राजा व परिचारक याना एकाच मापाने मोजणारे बसवेश्वर एक महान दास्यविमोचक म्हणूनच अवतीर्ण झाले होते देवाच्या दृष्टीसमोर सारेच समान असून सापेक्ष थोरवी ईश्वरसान्निध्यातच सामावलेली असते जन्म व जात या आगतुक उपाधींवर मोठेपणा मुळीच अवलबून नसतो ते मानवी समाजाला सर्वांविषयी जन्मसिद्ध आदर व प्रेम

बाळगून असणारे लोकसत्ताक राज्य मानीत त्याचे आत्मनिरीक्षण म्हणजे जणू साऱ्या उणिवा आणि सगळा मूर्खपणा खाक करून टाकणारा सूर्याचा दृष्टिपातच त्याचा अंतरात्मा आणि ह्याचा बाह्य मानवी देह अगदी एकरूप झाले होते ज्याचा आत्मा, चित्त व इच्छाशक्ती एकाच ध्रुवताऱ्यावर केंद्रित होतात असा एकसंध पुरुषच विश्वरूप मानव होऊ शकतो '

**बसव कल्याण**

बसवाच्या कल्याण येथील धर्मोपदेशपर कार्याच्या अवशेषांत एक टाकेही आहे असे सांगतात की त्यांच्या अनुयायातला माचय्या नावाचा एक परीट त्यात शरणाचे कपडे धूत असे ही आख्यायिका म्हणजे आपल्या अल्पकालीन प्रचारकार्याद्वारा बसवेश्वरानी घडवून आणलेल्या महान धार्मिक व सामाजिक सुधारणाचा बोलका पुरावाच होय (जन्माने धीवर असलेल्या) सेंट पीटरनी ज्यावर रोमन चर्च बांधले तो खडक, ज्यात माचय्याने कपडे धुतले ते कल्याणचे टाके आणि भगवान श्रीकृष्णानी आपल्या लाडक्या भक्ताला (कनक नावाच्या धनगराला) जेथून दर्शन दिले ती उडिपी येथल्या देवळाच्या भिंतीतली फट या साऱ्यातच सखोल असा प्रतीकात्मक आशय सामावलेला आहे कपडे धुण्याचा विधी अंत करणाने विशुद्ध असतील त्यानाच तेवढा स्वर्गाच्या राज्यात प्रवेश लाभतो याचा निदर्शक ठरतो अल्लम प्रभू ज्याचे मठाधिपती होते त्या आध्यात्मिक पीठाच्या (अनुभव मण्टप) बहुतेक साऱ्या खुणा इतिहासातल्या घडामोडीनी पुसून टाकल्या आहेत परंतु अल्लमानी केलेला उपदेश मात्र त्यांच्या वचनात सुरक्षित राहिला आहे या थोर वीरशैव सुधारकाने दूरच्या व जवळच्या भागातून शिष्यांचे घोळकेच्या घोळके ज्या काळात आकर्षित करून घेतले, त्या धूसर भूतकाळाचे दर्शन कल्पनाचक्षूना घडविणारा पुरेसा पुरावा मात्र चिंतनगुंफा आणि उपासनामंदिरे यांच्या रूपात उपलब्ध आहे

बसवप्पांचा जन्म, शिक्षण आणि धर्मप्रचार याच्याशी निगडित झालेल्या स्थळांविषयी शिलालेखातून मिळणारा पुरावा पी बी देसाई यानी जमविला आहे बागेवाडी (आणि तिचा परिसर), कुडल संगम आणि कल्याण अशा तीनच स्थळाचा उल्लेख बसवपुराणात येतो (आता महाराष्ट्रात गेलेल्या) मंगळवेढ्याचाही समावेश बसवाच्या संस्कारकाळाचे यथातथ्य चित्र देण्याच्या दृष्टीने व्हावयास हवा पौर्वात्य चालुक्यांची राजधानी कल्याणास होती आणि पुढे त्याचे सिंहासन बळकावणाऱ्या कलचुरींची राजधानी मंगळवेढ्यासच असे बसवेश्वराच्या प्रारंभकालीन जीवनाचा हरिहरानी लिहिलेला वृत्तांत निरपवादपणे ऐतिहासिक आहे संगमाहून बसवेश्वर बिज्जलाच्या स्वामित्वाखालील मंगळवेढ्यास गेल्याचे निवेदन करणारे ते एकमेव लेखक आहेत ११५३ इ स च्या आसपास बसवेश्वरानी कल्याणला

जाण्यासाठी मगळवेढे सोडले असे दिसते ११५३–११६७ हा आपल्या आयुष्याचा सर्वांत जास्त कार्यव्यापृततेचा काळ कल्याणास नव्या पथाचा प्रचार करण्यात बसवेश्वरानी व्यतीत केला बसवेश्वरांच्या वाढत्या लोकप्रियतेपायी त्यांचा बिज्जलाशी सघर्ष उद्भवला ११६७ च्या डिसेंबरमध्ये बसवेश्वर कल्याण सोडून सगमला गेले आणि ईश्वरस्वरूपी विलीन झाले तीन-एक महिन्यांनंतर बिज्जलाचा वध करण्यात आला

वीरशैव पथाच्या उदयाचा हा काहीसा लाबलचक आढावा घेणे एकाहून अधिक कारणासाठी न्याय्य ठरते कर्नाटकातील बहुसख्य लोक याच पथाचे अनुयायी असून तो दक्षिण भारतातल्या इतरही सर्व राज्यात प्रसृत झालेला आहे वीरशैव मठाचे अधिपती विद्येला सतत आश्रय देत आलेले आहेत शिक्षणक्षेत्रात या मठानी उचललेल्या वाटयाची पुरेपूर साक्ष उभ्या देशभर पसरलेली जयदेव मुरुघराजेंद्र छात्रालये देत असतात अलीकडे तर वीरशैवाच्या प्राचीन परपरेच्या ग्रथातले धडे इतर पथाचे मठाधिपतीही गिरवू लागले आहेत उदाहरणे म्हणून, उडिपीचे 'पूर्णप्रज्ञ महाविद्यालय', 'शृगेरी महाविद्यालय', आणि 'मुडबिद्री व श्रवणबेळगोळा येथील महाविद्यालये' याचा निर्देश करता येईल सिद्गग मठाने चालविलेल्या महाविद्यालयाचा वृत्तात मागाहून द्यायचा आहे वीरशैव मठाच्या आश्रयाखाली चालविल्या जाणाऱ्या कित्येक शिक्षणसस्था साऱ्या राज्यभर आहेत ऐतिहासिक दृष्टचा महत्त्व पावलेल्या या स्थळी उपलब्ध असलेले शिलालेख व आख्यायिका, प्राचीन वैभवाचे अवशेष, इत्यादींच्या अभ्यासाला उत्तेजन देऊन विद्यापीठे इतिहासाच्या पुनर्रचनेला मोठाच हातभार लावतील अशी आशा बाळगू या

## मेळुकोटे व रामानुज

मेळुकोटे येथे कित्येक वर्षे वास्तव्य करण्यापूर्वी रामानुजानी मैसूर जिल्ह्यातल्या अनेक स्थळाना भेटी दिल्याचे सागतात रामनाथपूर, शाळिग्राम व थोंडनूर याचा येथे उल्लेख करता येईल योगायोगाने थोंडनूर हे होयसाळ बल्लाळ राजाचे एक महत्त्वाचे सीमावर्ती ठाणे होते आणि हे राजे तर जैन होते ते दोरसमुद्रहून किंवा हळेबीडहून राज्य चालवीत रामानुजाची राजा बिट्टिदेवाला इतकी काही ओढ लागली की तो त्याचा अनुयायीच बनला रामानुजांनीही त्याचा शिष्य म्हणून स्वीकार करून त्याला (बिट्टिदेव शब्दाचे सस्कृत रूप असलेले) विष्णुवर्धन हे नाव दिले तेव्हापासून तमिळ नाडूमधील कांची किंवा श्रीरगम या वैष्णव पथाच्या उगमस्थानाइतकेच पावित्र्य लाभून मेळुकोटे हेही तीर्थयात्रेचे केंद्र बनून गेले

या पथाला श्रीवैष्णव पथ असे नाव मिळाले ते त्यात विष्णुपत्नी लक्ष्मीला दिल्या जाणाऱ्या महत्त्वामुळे याच्या गुरुपरपरेतली श्री हीच मानव जातीची अगदी पहिली

गुरू होय श्री हे दैवी दयेचे प्रतीक असून तिच्याच द्वारा तेवढी मानवाला आपल्या पापाची झाडणी करण्याची आशा बाळगता येते श्री म्हणजे मानव आणि देव याच्यामधील सौम्य व क्षमाशील मध्यस्थच जणू हरिजनाना तिरुकुलुत्तर (ईश्वराचा आशीर्वाद लाभलेले) अशी पदवी देऊन रामानुजानी जणू गाधींच्या कार्याचे भाकितच केले होते अशा प्रकारे जखमेवर अपमानाचे मीठ चोळणारी घृणास्पद जातिनामे रामानुजानी वर्ज्य केली वैरमुडीच्या मोठ्या जत्रेत तिरुनारायणाचे मदिर तीन दिवस हरिजनासाठी खुले ठेवण्याचीही पुरातन परपरा आहेच

रामानुजाच्या कर्नाटकातील पर्यटनाचा आपल्या केवळ धार्मिक वृत्तीवरच नव्हे तर समाजरचनेवरदेखील डोळ्यात भरण्याजोगा परिणाम झालेला आहे असे म्हणतात की धर्मनिष्ठा आणि विद्वत्ता यामुळे विख्यात झालेले ब्राह्मणातले भट्ट, हेब्बर, हेम्पिगेयार, कडडै, चक्रवर्ती आणि ताताचार्य, तसेच अब्राह्मणवर्गातलेसुद्धा कित्येक जण रामानुजानी मिळविलेल्या आध्यात्मिक विजयाच्याच अनुषगाने कर्नाटकात येऊन स्थायिक झालेले आहेत

प्रपत्तीच्या वैशिष्टचपूर्ण सिद्धाताविषयी थोडे स्पष्टीकरण द्यायला हवे गीतेतल्या 'सर्वधर्मान्परित्यज्य' या श्लोकाला श्रीवैष्णव लोक चरम श्लोक मानतात त्यात सर्वतोपरी निरपवाद अशी शरणागती किंवा आत्मनिवेदन उपदेशिलेले आहे जीवात्म्याच्या मुक्तीचा भार ईश्वर स्वत वरच घेत असल्याचेही त्यात आश्वासन दिलेले आहे हा सिद्धात पहिल्याप्रथम रामानुजानीच प्रतिपादन केला आणि पुढे त्याच्यामागून उदयास आलेल्या 'पिळ्ळै लोकाचार्य' आणि 'वेदात देशिक' या दोन तत्त्वज्ञानी त्याचे सविस्तर विवरण केले 'रामानुजस्य दिव्याज्ञा वर्धतामभिवर्धताम् ' (रामानुजांची ही धर्माज्ञा उत्तरोत्तर वृद्धिगत होत जावो) हीच प्रार्थना प्रत्येक श्रीवैष्णवाच्या ओठावर नाचत असते, मग तो कर्नाटकात असो वा इतर कुठेही

भक्तिपथाला रामानुजानी दिलेल्या चालनेचे पडसाद उत्तर भारतातही उमटले या वैशिष्टचपूर्ण विष्णुभक्तीचे श्रेय स्वामी रामानदाचे गुरू स्वामी राघवानद यानाच द्यायला हवे राघवानद हे रामानुजाचे थोर शिष्य काशीतील पचगगा घाटाजवळ रहात आणि अगदी अलीकडच्या काळापर्यंत या विख्यात शिष्याचे नाव दिलेला मठ तेथे आढळत असे रामानदाच्या 'रामार्चनापद्धती' या ग्रथात त्याच्या गुरुपरपरेची माहिती दिलेली आहे तीत आपण राघवानदांचे उत्तराधिकारी असल्याचे त्यांनी सांगितले आहे वैष्णवाची आचारसहिता, उपासनापद्धती आणि कीर्तनप्रणाली (दक्षिणेत हिला 'कथाकालक्षेप' म्हणतात) याचा स्वीकार करून उत्तरेकडे प्रसृत झालेल्या श्रीवैष्णव पथाच्या परपरेची शृखला अव्याहत असल्याचे रामानदांनी दाखवून दिले

मैसूरचे चिक्कदेवराय वोडियार यानी 'विशिष्टाद्वैतावर' 'चिक्कदेवराज बिण्णप्पा' नावाची टीका लिहिली ती म्हणजे त्याचा कुलस्वामी, मेळुकोटेचे चेलुव्वनारायण स्वामी, याचे स्तुतिस्तोत्रच आहे जुन्या कन्नड महाकाव्याच्याच शैलीतले ते एक चपूकाव्य आहे जी पी राजरत्नमनी त्याची आधुनिक आवृत्ती प्रकाशित केली आहे उत्सवाच्या दिवशी नारायण प्रभूला मिरवत नेतात 'वैरमुडी' (चा उत्सव) हे एक प्रमुख वार्षिक आकर्षणच असते प्रभूचे दर्शन घेऊन मिरवणूक पाहण्यासाठी राज्यातले, तसेच तमिळनाडूतलेही असख्य यात्रेकरू येत असतात 'वैरमुडी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या किरीटाला पुराणोक्त इतिहासही आहे तसेच मैसूरच्या वोडियारांनी भेट म्हणून दिलेले आणखीही दोन किरीट आहेत मूल्यवान रत्ने जडविलेले हे तीनही मुकुट मैसूरच्या राजवाड्यात कडेकोट सरक्षणाखाली ठेवलेले असतात (मार्च-एप्रिलमध्ये) 'वैरमुडी'साठी ते यथोचित सन्मानपूर्वक आणले जातात रामानुजानी स्थापन केलेल्या मठाव्यतिरिक्त इतरही अनेक मठ आहेत मैसूरमधील परकल मठाच्या एका शाखेचा निर्देश आवर्जून करायला हवा, कारण या मठाचे अधिपती वोडियार राजांचे राजगुरूही असत इतर सर्व धार्मिक केद्रांसारखेच मेळुकोटे नगरही विद्येचे केद्र आहे १८५४ मध्ये येथे एक सस्कृत महाविद्यालय स्थापन करण्यात आले हातमाग व्यवसायामुळेही मेळुकोटे विख्यात झाले आहे तांबड्या काठाची धोतरे हा या कापड विणणाऱ्या केंद्राचा आगळा वाण होय मेळुकोटे विकास समितीने येथे प्रवाश्यासाठी एक विश्रामगृह बाधण्याचाही निर्णय घेतला आहे

## उडुपी व मध्वाचार्य

उडुपी परशुरामक्षेत्राच्या मध्यभागी वसलेली आहे ही पुण्यभूमी अरबी समुद्र व सह्याद्री पर्वत याच्या मध्यावर असून ती कन्याकुमारीपासून उत्तर कानडातील गोकर्णापर्यंत पसरलेली आहे मगळूरपासून उडुपी ५९ किलोमीटर अतरावर असून ती मालपे या प्राचीन बंदराच्या अगदी लगत आहे 'उडुपी' म्हणजे मस्तकी चद्र धारण करणारा (चद्रशेखर) तात्पर्य, या नगरीला हे नाव पडले ते चद्रमौळीश्वरावरून वैष्णव सस्कृतीचे उगमस्थान असलेल्या उडुपीला शिवाचे नाव दिलेले असावे ही वस्तुस्थिती कुतूहलजनक आहे त्यातली चद्रमौळीश्वर व अनतेश्वर याची मदिरे सर्वांत प्रसिद्ध आहेत अनतेश्वराला चांदीच्या सिंहासनाचा स्वामी म्हणतात यामुळेच सस्कृतात ही नगरी 'रजत पीठ पुरी' आणि कन्नडमध्ये 'शिवाली' म्हणून ओळखली जाऊ लागली चादीच्या सिंहासनावर शिवाची प्राणप्रतिष्ठा रामभोज राजाने केल्याचे सागतात या भागात रहाणाऱ्या एका ब्राह्मण पथाचेही नाव 'शिवाली' हेच आहे

सास्कृतिक सहजीवन हा या पुण्यप्रदेशाचा परवलीचा शब्द आहे हिंदू दैवत-समूहातल्या किती तरी देवाच्या उपासनेची मदिरे परशुरामक्षेत्रात आहेत मदिराच्या या नगरातली उडुपी व गोकर्ण यासकट सात नगरे आज विख्यात यात्राकेंद्रे बनली आहेत दुर्गा व सुब्रह्मण्यम याच्या नावे उभारलेली देवळे उडुपीच्या सभोवार सर्वत्र आढळतात त्यांपैकी विशेष उल्लेखनीय असलेल्या सातांत कुभसी व क्रोडा या नगरीची गणना होते कारण तेथे हरिहरांच्या नावाने बाधलेली मदिरे आढळून येतात शिव व विष्णू याच्या भक्तांत ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न अगदी प्राचीन काळापासून होत असल्याचे यावरून स्पष्ट दिसते या पुण्यप्रदेशात जन्माला आलेल्या द्रष्टया तत्त्वज्ञांनी तत्त्वज्ञानाच्या शाखा प्रसृत केलेल्या असून तेथल्या सत पुरुषानी उच्च आदर्श उचलून धरले आहेत खेडेगावच्या लोकांत मात्र अजूनही भूताची पूजा आणि पिशाचाची शांती चालूच आहे ईश्वर अनेक प्रकारे साफल्य साधीत असतो 'सर्वदेवनमस्कार केशवप्रति गच्छति '

कन्नडिगाच्या सस्कृतीत जे जे म्हणून उत्कृष्ट अश आहेत त्या साऱ्याचे सारभूत प्रतीक असे धर्मस्थळांचे वर्णन करता येईल त्यातले मदिर मजुनाथेश्वराच्या (शिवाच्या) उपासनेचे ठिकाण आहे पण त्याचे पुजारी मात्र मध्वाचार्यांचे अनुयायी आणि म्हणूनच वैष्णव आहेत त्याचे विश्वस्त जैन आहेत देवळाच्या अतर्भागात तर त्या स्थानाची सरक्षक देवता असलेल्या अण्णप्पाचेही पूजास्थान आहे ज्या सांस्कृतिक सहजीवनामुळे परशुरामक्षेत्र युगानुयुगे ख्याती पावले आहे, त्याभागच्या खऱ्याखुऱ्या भावनेचे हे यात्राकेंद्र मूर्तिमत प्रतीक ठरते

अगदी आजपर्यंत जैन सस्कृतीची जिवत केंद्रे बनून राहिलेल्या मुडबिद्रे, करकल व वेनुरु या नगरीही उडुपीच्या सभोवार आढळतात

या विख्यात उडुपी क्षेत्रात १२३८ साली एका लोकोत्तर पुरुषाचा जन्म झाला पाजक क्षेत्र हे त्याचे जन्मस्थान उडुपीपासून दहा एक किलोमीटर अतरावर आहे त्याचे मातापिता धर्मनिष्ठ ब्राह्मण असून ते त्या गावाच्या मध्यभागी रहात असत यामुळेच त्याला 'नड्वनाथ इल्ल्या' हे नाव पितृपरपरेने लाभले त्याच्या आईला वेदवती म्हणत असत मुलाचे नाव ठेवले होते वासुदेव द्वैत तत्त्वज्ञानाचे प्रवर्तक या नावाने ख्याती पावल्यानतर त्याचे प्रमुख नाव 'मध्वाचार्य' असे रूढ होऊन 'पूर्ण-प्रज्ञ' व 'आनदतीर्थ' या दुसऱ्याही उपाधी त्याना लाभल्या

वासुदेवाने तत्त्वज्ञानाच्या अध्ययनाचा प्रारभ अच्युत प्रेक्षाजवळ केला धर्मग्रथाचे विवरण ते अद्वैत सिद्धाताच्या अनुरोधाने करीत असत पण या विवरणापासून समाधान न लाभल्याने शिष्याने स्वतत्रपणे धर्मग्रथाचे अध्ययन आरभले इतिहास, पुराणे, प्राचीन व्याकरणग्रथ, तर्कशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र आणि पुरातन भाष्यकारानी

घालून दिलेली मूलतत्त्वे यात सामावलेल्या परंपरागत ज्ञानाचा आधार त्याने त्यांच्या अध्ययनाखाली घेतला त्या सान्यातली उद्धरणे आपल्या ग्रंथात देऊन आपल्या अखंडित विवरणप्रणालीतल्या शृंखला ते दाखवून देतात तसेच आपले सिद्धांत धर्मग्रंथातूनच कसे निष्पन्न होतात हेही ते निदर्शनास आणून देतात ते नुसत्या 'प्रस्थान त्रयी'वरच विसंबून राहात नाहीत वेदांतल्या कर्मकांडातूनदेखील दार्शनिक सिद्धांत निष्पन्न होत असल्याचे ते सिद्ध करतात रामायण-महाभारत ही महाकाव्ये आणि भागवत पुराण यातूनही त्यानी दार्शनिक सिद्धांत काढून दाखविले आहेत त्यानी सदतीस ग्रंथ लिहिले आहेत त्यात ते ज्यामुळे आचार्य म्हणून ओळखले जाऊ लागले त्या प्रस्थानत्रयीवरील भाष्याचाही समावेश आहे त्यानी सिद्ध केलेले महाभारत व भागवत या ग्रंथाचे भाष्यरूप सारसंग्रह म्हणजे त्या विषयावरील साहित्यात घातलेली मौलिक स्वरूपाची भरच होय त्यानी धार्मिक आचाराची संहिता सिद्ध केली आणि तत्त्वज्ञानावर आणि धर्ममीमांसेवर ग्रंथही लिहिले ते नुसते एका धर्मपंथाचे संस्थापकच नव्हते तर एका अभिनव तत्त्वज्ञानशाखेचे प्रवर्तकही आहेत वरील दोन्ही मिळून एक पृथगात्म सांस्कृतिक घटक सिद्ध झालेला असून तो हिंदू संस्कृतीच्या प्रचंड वृक्षाची अविभाज्य शाखाच बनून राहिला आहे ज्या सनातन धर्माने आज सहस्रावधी वर्षे संस्कृतीचे असंख्य धागेदोरे सामावून घेऊन त्याच्यात सुसंवादही प्रस्थापित केला, त्याच्या आधारस्तंभातला एक या नात्याने मान्यता पावण्याचा आपला अधिकार मध्वमुनींनी अशा प्रकारे प्रस्थापित करून ठेवला आहे

मध्वाचार्यांनी दक्षिण भारतात दूरवर पर्यटन केले आणि उत्तरेकडेही दोनदा धर्मविजय पटकाविले अनेक थोर समकालीन तत्त्वज्ञांनी त्यांच्याशी पारमार्थिक सिद्धांतावर चर्चा केल्या आणि शेवटी त्यांच्याच विचारप्रणालीचा स्वीकारही केला पद्मनाभतीर्थ, नरहरितीर्थ, मध्वतीर्थ आणि अक्षोभ्यतीर्थ हे त्यांच्या शिष्यातले प्रमुख होत त्यांनी चार द्वैत मठाचीही स्थापना केली उत्कल राज्यात नरहरितिर्थ काही काळपर्यंत राजप्रतिनिधी म्हणून काम पहात असल्याचे श्रीकूर्म शिलालेखावरून ' सिद्ध होते मध्वाचार्यांच्या अध्यात्मनिष्ठ व्यक्तित्वाची छाप कित्येक समकालीन राज्यकर्त्यांवर पडली होती यादव घराण्यातल्या महादेव राजाला, जयसिंह राजाला आणि दिल्लीच्या गुलामवंशातील बल्बन सुलतानालादेखील मध्वाचार्याविषयी पराकाष्ठेचा आदरभाव असे (विद्याशंकर, पद्मतीर्थ व पुण्डरीकपुरी) या समकालीन अद्वैती पंडितांनी द्वैतवादाच्या प्रसाराला पायबंद घालण्याचा आणि मध्वाचार्यांनी केलेले अद्वैताचे खंडन खोडून काढण्याचा प्रयत्न चालविला होता परंतु द्वैतवादाची विजयी घोडदौड चालूच राहिली आणि जसजशी वर्षे उलटत गेली तसतशी त्याची व्याप्ती व शक्तीही वाढतच गेली

विष्णू हेच परमोच्च सतत्त्व असल्याच्या सिद्धातावर मध्वाचार्यांच्या शिकवणीचा भर आहे 'श्रीमन्मध्वमते हरि परतर !' त्याच्या कृपाप्रसादाच्या प्राप्तीचा सर्वोत्तम उपाय भक्ती हाच होय स्वत चे कर्तव्य समर्पणभावाने पार पाडणे हा उपासनेचा सर्वांत स्वीकारार्ह प्रकार होय जग म्हणजे माया या सिद्धाताशी किंवा जीवात्मा व परमात्मा याच्यातील अद्वैताच्या कल्पनेशी मध्वाचार्य सहमत नाहीत आध्यात्मिक जीवनाची वाटचाल त्यानी समाजाच्या कोणत्याही विवक्षित वर्गापुरती किंवा आयुष्यातील एखाद्या विशिष्ट अवस्थेपुरतीच (आश्रम) सीमित केलेली नाही धर्मग्रथाच्या अध्ययनाचा अधिकार नियत्रित केलेला असला तरीही, देवाची भक्ती, ईश्वराचे ज्ञान जोडण्याचे प्रयत्न आणि आपला स्वत चा परमार्थप्रवण स्वभाव या गोष्टींत साऱ्यानाच मुक्तद्वार आहे

आपल्या सिद्धाताचा प्रसार करण्यासाठी मध्वाचार्यांनी उडुपीत आठ मठ स्थापन केले या मठांतील धर्माध्यक्षच मध्वाचार्यांनी उभारलेल्या श्रीकृष्णमदिरातल्या कृष्णदेवाची पूजाअर्चा करतात या आठी आध्यात्मिक अधिपतींना समान अधिकार दिलेले असल्याकारणाने त्यातला प्रत्येकजण 'पर्याय' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या दोनदोन वर्षांच्या कालावधीत पाळीपाळीने ही पूजाअर्चा चालवितो तो एक महोत्सवच असून त्यासाठी उभ्या भारतातले असख्य यात्रेकरू मोठ्या ओढीने येतात

या आठ मठांद्वारा सस्कृत महाविद्यालये आणि इतर शिक्षणसस्थादेखील चालविल्या जातात गेल्या आठशे वर्षांच्या अवधीत द्वैत तत्त्वज्ञानाचा कसकसा विकास होत गेला याची मीमासा करणाऱ्या सस्कृत साहित्याचा सग्रह असलेले एक मोठे ग्रथालयही आहे जयतीर्थ, व्यासराय, विद्याधीश, राघवेद्र यासारख्या थोर पडितानी विस्तृत ग्रथ लिहिले आहेत विजयनगर सम्राटाच्या काळात, व्यासरायाच्या मार्गदर्शनाखाली, हरिदास साहित्य या नावाने प्रसिद्ध असलेला एक अभिनव गेय व भक्तिपर साहित्यप्रकार कन्नडमध्ये योगायोगाने विकसित झाला ही गीते भक्ताच्या मनात भक्तिपथाचे सिद्धात व भगवान विष्णूचे सर्वश्रेष्ठत्व ठरवून देतात इतर पथाच्या साहित्यावरदेखील या भक्तिपर साहित्याची मोठीच छाप पडलेली आहे तसेच हेही लक्षात ठेवायला हवे की कर्नाटक सगीतातली पुरदरदास, कनकदास आणि जगन्नाथदास याची नावे मत्रमुग्ध करून टाकणारी आहेत

भक्तीची ही चळवळ सर्वसाधारणपणे भारताच्या साऱ्याच भागात आणि विशेषेकरून बगालमध्ये प्रसृत झाली गीतगोविंद काव्याच्या विख्यात रचयित्याला—जयदेवाला स्वत श्रीमध्व भेटले होते असे सागतात मध्वाच्या विचारप्रणालीतून भक्तीच्या चैतन्य सप्रदायालाही बरीच प्रेरणा प्राप्त झाली होती

श्रीमध्वाचार्यांनी बदरीनाथची यात्रा दोनदा केली १३१९ मध्ये ते अदृश्य झाले हाही एक प्रकारचा चमत्कारच म्हणावयाचा उडुपीतील अनतेश्वराच्या मदिरात ऐतरेय उपनिषदावर ते प्रवचन करीत असताना ही अद्‌भुत घटना घडली मध्वमुनी भगवान विष्णूचा दूत वायू याचेच अवतार होते असे मानले जाते

**स्थापत्यशास्त्र आणि शिल्पकला**

कर्नाटकावर राज्य करणाऱ्या साऱ्याच घराण्याना मदिरे बाधण्याविषयी फार आस्था असे त्यांपैकी होयसाळ हे सर्वांत विख्यात होत कारण, त्यानी या कलाचे आकृतिबध परिपूर्णतेला पोहोचविले आणि आजही उत्तम अवस्थेत टिकाव धरून असलेल्या त्यांच्या मदिरांची सख्या बरीच मोठी आहे घराणी उदयास येत असतील व लयासही जात असतील, पण ही मदिरे मात्र सतत उभीच आहेत मौर्यांना धर्म-विजय साधण्यात यश लाभले पल्लवांनी व चोलानी कर्नाटकाच्या अनेक भागावर आक्रमण केले गुप्तांच्या सुवर्णयुगाचे गोदावरीच्या दक्षिणेसही असख्य प्रशसकानी कौतुक केले असेल प्राचीन ग्रीसशी आणि मध्यपूर्वेतील देशाशी असलेले व्यापारी सबध, तसेच अलीकडच्या शतकात पाश्चात्त्य सत्तानी मिळविलेले विजय यांचा अविनाशी ठसा आमच्या कलेवर उमटलेला आहे बौद्ध विहार, जैन बसत्या, हिंदू मंदिरे, ख्रिस्ती चर्च आणि इस्लामी मशिदी व दर्गे याचे आज अस्तित्वात असलेले नमुने सारे एकमुखाने एकच एक कथा सागत असतात. कर्नाटकच्या लोकाची प्रतिभा, त्याची सहिष्णू वृत्ती, नवीन कल्पनाविषयी त्याची तत्पर ग्रहणक्षमता आणि परकी अशाचा देशी घटकांशी मेळ घालून देण्याची त्याची सुप्रसिद्ध क्षमता याचे ठळक प्रतिबिब त्यात उमटलेले आढळते

आमच्या ललितकलांत व स्थापत्यकलेत जे जे म्हणून चागले आहे त्या साऱ्याचेच श्रेय गुप्त राजाना देण्याची आवश्यकता नसल्याचे अलीकडच्या सशोधनाने दाखवून दिले आहे "अगदी सातव्या शतकाइतक्या पुरातन काळी वेरूळची भव्य मदिरे चालुक्यांना खोदविता आली त्या अर्थी पल्लवांचे किंवा गुप्तांचे कसलेच ऋण घेण्याची त्याना आवश्यकता नव्हती हे उघडच आहे भारताच्या सास्कृतिक इतिहासात चालुक्यानी मोठाच वाटा उचललेला आहे त्यांची प्रमुख ठिकाणे ऐहोळे, बदामी व पट्टदकळ येथे होती त्या ठिकाणी स्थापत्यकला व शिल्पकला यांची भव्य स्मारके आढळतात सर्वोत्कृष्ट शिल्पे कोरलेल्या शिलापट्टकातल्या काही कला-कृतींनी तेथील भिंती सुशोभित झालेल्या आहेत हिंदू धाटणीच्या मदिराचा अभ्यास करणाऱ्यांच्या दृष्टीने ऐहोळे येथील सकीर्ण मदिरसमूह अत्यत मनोवेधक आहे कारण, हिंदूच्या जुन्यातल्या जुन्या मदिरापैकी काही ऐहोळलाच, मलप्रभेच्या तीरावर, मेगुती डोंगराच्या स्फूर्तिदायक शिखराच्या तळाशी बाधलेली आहेत देवळे उभार-

ण्याचे हे कार्य सपूर्णतया समन्वित असून सर्वस्वी एतद्देशीय आणि स्वतत्रही होते भारतीय मदिराच्या स्थापत्यकलेला आधारभूत असलेल्या धाटण्या निर्माण करण्यात ते यशस्वीही ठरले ऐहोळ हे भारतीय कला व शिल्प याचे महत्त्वाचे केंद्र होय (आर एस गुप्ता) ।"

आज अस्तित्वात असलेले शिल्पकलेचे सर्वांत जुने नमुने मात्र बौद्धांचे आहेत मगळूरच्या काद्री मदिरातली लोकेश्वराची मूर्ती म्हणजे बोधिसत्त्व अवलोकितेश्वराचीच प्रतिमा होय शिलालेखात या मदिराचा निर्देश 'महाविहार' म्हणून केलेला असून हा शब्द निरपवादपणे बौद्धांचाच आहे अकराव्या शतकापर्यंत बौद्धाचे केंद्र असलेल्या बनवासीलाही 'तारा भगवती' या महायान दैवताच्या नावे बाधलेला आणखी एक विहार होता

कर्नाटकातल्या जैन धर्माचा इतिहास अशोकपूर्व काळाइतका प्राचीन आहे प्रारभीची जैन मदिरे लाकडी बाधणीची असत, पण पुढे ती जाऊन दगडी देवळे आली पहिली जैन बसदी इ स च्या पाचव्या शतकात एका कदब राजाने हळसी (पलाशिका) येथे उभारली श्रवणबेळगोळातील चद्रगिरीच्या बसदी आठव्या शतकातल्या आहेत शिल्पशास्त्रदृष्ट्या सताचे किंवा तीर्थंकराचे प्रचड पुतळे जैन बसदीचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य होय श्रवणबेळगोळा येथील 'गोम्मटविग्रह' तर जगातल्या आश्चर्यांतच मोडतो कथा व गीते यांतून त्या मानाने कमी प्रसिद्धी लाभलेले आणखी काही एकसध पुतळे करकल (१४३२) आणि वेनूर (१६०४) या ठिकाणी आढळतात हे पुतळे आणि मुडबिद्रीची बसदी सारीच दक्षिण कानडात आढळून येतात आजही मुडबिद्री हे जैन धर्माचे व सस्कृतीचे भरभराटलेले केंद्र आहे

'मैसूर जिल्ह्यातल्या शालिग्रामाजवळ हुणसोगे येथे आदिनाथ तीर्थंकराच्या नावे उभारलेली, 'त्रिकूटन चैत्यालय' नावाची प्राचीन तीन चौकी जैन बसदी आहे या भव्य जैन स्मारकाची अत्यत हेळसाड झाली आहे पण त्यात अतिशय उत्कृष्ट शिल्पकृती आहेत हुणसोगे हे एके काळी दाक्षिणात्य जैन पथातील एका महत्त्वाच्या धर्मपीठाचे प्रमुख ठाणे होते हुणसोगे पीठाचे धर्माध्यक्ष ललितकीर्ती भट्टारक यानी १४५७ मध्ये करकलच्या मदिराची स्थापना केली ' (एस के आर राव)

इ स च्या पाचव्या व सातव्या शतकांमधील काळात राजसत्ता ज्याच्या हाती होती त्या कदब राजाची नावे तळगुडा शिलालेखात निर्देशिलेली आहेत ते वैदिक धर्माचे अनुयायी होते कदब राजवटीतील 'प्रणवेश्वर' मदिराच्या वास्तूवरून दोन गोष्टी सिद्ध होतात जैन व बौद्ध पथावर ब्राह्मणाचे वर्चस्व प्रस्थापित होण्यास आरभ झाला होता आणि चालुक्यांपूर्वीही मदिराच्या स्थापत्यकलेची विशिष्ट धाटणी अस्तित्वात होती

कर्नाटकातील मंदिरबांधणीमध्ये स्थापत्यकलेच्या पाच अवस्था पाहता येतात

१ चालुक्यपूर्व काळ जवळजवळ इ स च्या पाचव्या शतकापर्यंत,

२ चालुक्य युग–सहाव्यापासून दहाव्या शतकापर्यंत (यातच राष्ट्रकूटांचाही अंतर्भाव होतो),

३ होयसाळ युग–अकराव्यापासून तेराव्या शतकापर्यंत,

४ विजयनगर युग–चौदाव्या शतकापासून आजपर्यंत,

५ विजयनगर स्थापत्यशास्त्राच्या जोडीने अस्तित्वात असलेली मुस्लिम स्थापत्यकला

बदामीची कोरीव लेणी नुसत्या शिल्पांमुळेच नव्हे तर त्यातील भित्ति-चित्रामुळेही ख्याती पावली आहेत इथून पुढे मंदिरे केवळ जैन व बौद्ध यांच्यासाठीच फक्त बांधली जाईनाशी झाली बदामीच्या चालुक्यांनी शिवाच्या व विष्णूच्या उपासनेसाठीदेखील तशीच मंदिरे उभारली तीच परंपरा राष्ट्रकूटांनी पुढे चालविली वेरूळ येथील कैलास लेण्याने या प्रकारच्या स्थापत्यकलेतला परमोच्च बिंदू गाठला ईश्वराचा अधिकाधिक गौरव करण्याच्या दृष्टीने हे मंदिर पहिल्या कृष्णाने बांधले त्यासाठी अफाट पैसा ओतावा लागला आणि आराखडा करणे, त्यानुसार काम पार पाडणे, खोदकाम करणे आणि शिल्प निर्माण करणे अशा नानाविध कामात निष्णात असलेल्या कारागिरांचे प्रचंड सैन्यही लागले

"सर्वांगीण विचार करता कैलास लेणे स्थापत्यकलेचा भव्योत्कृष्ट आविष्कार ठरतो ते राष्ट्रकूटांनी संपादन केलेल्या महान सुयशाचे प्रतीक असून ते अनंतकाळ-पर्यंत साऱ्याच लोकांच्या कौतुकाचा विषय बनून राहीलच राहील आराखड्याचे सौंदर्य आणि तो प्रत्यक्षात उतरविण्याचे कौशल्य यात या कोरीव लेण्यांहून वरचढ ठरेल असे एकही लेणे उभ्या भारतात नाही आतील प्रांगणात उभे राहून त्याच्या उत्तुंग आणि गुंतागुंतीच्या कोरीव कामाने नटलेल्या कळसाचे निरीक्षण करणाऱ्या प्रेक्षकाला वाटते की जणू सारा स्वर्गच त्याच्या दृष्टीसमोर आणून ठेवला आहे एका बाजूला आकाशोन्मुख उत्तुंग उत्सेध आणि दुसऱ्या हाताला परमेश्वराच्या या भुवनात प्रवेश करण्यासाठी पाचारण करणारे भव्य प्रवेशद्वार यांच्या सापटीत सापडल्यासारखे त्याला वाटते नदी, कैलास उचलू पहाणारा रावण, इत्यादी पुरा-णातल्या मूर्तींचेही विपुल वैभव त्यात आहे उदारहृदयी शिव रावणाकडे पाहून स्मित करीत आहे तांडवनृत्य करणारी नटराजाची भव्यभीषण मूर्तीही तिथे आहे आपल्या सभोवार सर्वत्र आविष्कृत झालेल्या ईश्वराच्या भव्य साक्षात्काराला मानवी मन किती उत्कृष्टपणे पात्र ठरते याचे प्रत्यक्ष अवलोकन करताना आनंदोत्कर्षाचा रोमहर्षक अनुभव आल्याने प्रेक्षकाला आपल्या साऱ्या बारीकसारीक चिंतांचा विसर

पडतो तात्पर्य, मनाच्या आकाक्षा व शिल्पकाराची खटपट आणि कुशलता साऱ्याचेच सार्थक होते मानवी व्यक्तित्वाची मन, हृदय व हात ही तीनही अगे परस्पर सुसवाद साधून एखादी अतियशस्वी कलाकृती निर्माण करण्यासाठी कार्यरत होतात तेव्हा जे सौदर्य निष्पन्न होते त्याचा परिपूर्ण आस्वाद घ्यायचा असेल तर माणसाने काही वेळ कैलास मदिरासमोर उभे राहावे ज्या पराक्रमी राजाने आणि ज्या निष्णात कारागिरांनी हे मदिर बांधले त्याना ईश्वराचे वरदानच लाभलेले असणार अशा गौरवशाली परपरेच्या सपदेचा लाभ व्हायला कन्नडिग खरोखरीच भाग्यशाली असले पाहिजेत ।" (डॉ एच टी स्वामी)

चालुक्याचे राज्य अफाट पसरले होते राष्ट्रकूट सम्राट हे थोर विजेते होते या काळातल्या शिल्पकारानी मदिरउभारणीच्या नानाविध धाटणीचे प्रयोग करून पाहावे यात नवल नाही पट्टदकळला आपणास द्राविडी धाटणीची गगनभेदी गोपुरे आणि उत्तरेकडील धर्तीचे धनुष्याकृती उत्सेध दोन्ही आढळून येतात त्याची अत्युत्कृष्ट उदाहरणे इतकी अधिक आहेत की त्याचा येथे उल्लेख करणे शक्य नाही प्रत्यक्ष पहाणे हेच विश्वासार्ह प्रमाण होय

मदिराच्या स्थापत्यकलेवर कन्नड भाषेत ग्रथ लिहिणारे पहिले लेखक बी वेकोबा राव याना होयसाळ धाटणीला कर्नाटक धाटणी म्हणणे अधिक आवडते तिची अनेक वैशिष्ट्यपूर्ण अगे आहेत कित्येक गोष्टींत ती द्राविडी धाटणीहून भिन्न आहे तीत तळाच्या भूमीचा आराखडा चौकोनी नसून बहुकोनी असतो उच्च ओटचावर उभारलेला ताऱ्याच्या आकाराचा चौथरा कर्नाटक शैलीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे गगनचुबी उत्सेधाच्या ठिकाणी गोपुरे असून ती तळाच्याच आकाराची परतु प्रत्येक टप्प्यावर निरुद होत जाणारी असतात त्यासाठी टणक कणाश्म नव्हे तर ठिसूळ शखजिरा दगड वापरतात बारकाव्याच्या कोरीव कामासाठी तो सोयीचा असतो खरे सागायचे तर होयसाळ मदिरातल्या शिल्पकृतींचे वैभव आणि उत्कृष्ट बनावट यामुळे ती अत्यत लोकप्रिय होऊन राहिली आहेत बेलूर, हळेबीड व सोमनाथपूर येथील मदिरे तर प्रवाश्यांना ओढ लावणारी केंद्रेच बनली आहेत ही सारी स्थळे परस्पराना जोडणारे चांगले रस्तेही आहेत मोटरने प्रवास करणाऱ्या प्रवाश्याला ती सारी एकाच दिवसाच्या अवधीत पाहून घेता येतात त्याला घाई नसेल तर तो भरीला भोगनदीश्वर व श्रवणबेळगोळादेखील पाहू शकतो कारण, ही सारीच मदिरे बगलोरहून अवध्या १५० किलोमीटर त्रिज्येच्या वर्तुळातच वसलेली आहेत

बगलोरहून पन्नास किलोमीटरावर असलेल्या 'नदी टेकडी'च्या पायथ्याशी उभ्या असलेल्या भोगनदीश्वर मदिराच्या इतिहासाविषयी बी वेकोबा रावानी एक कुतूहलजनक पुरवणी जोडली आहे "द्राविड धर्तीच्या सर्व मदिरात हे अत्यत

विस्तृत आणि फार आकर्षकही आहे इ स च्या नवव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत या मंदिराचा कसकसा विस्तार होत गेला हे आपल्या स्पष्टपणे दृष्टोत्पत्तीस येते ते ८०१ इ मध्ये राणी रत्नावतीच्या आज्ञेवरून बांधले गेले त्याचा उत्सेध नवव्या शतकाच्या शेवटी बांधला गेला दहाव्या शतकात आणखी एका मंदिराची जोड दिली गेली मंदिरापुढचा ' नंदी मंडप ' अकराव्या शतकातला आहे बाकीची उभारणी विजयनगर सम्राटांनी पुरी केली निरनिराळ्या कालखंडातले असूनदेखील त्याच्या स्थापत्यकलेतील समरूपत्व आणि सौंदर्य मात्र अबाधित राहिलेले आहे हे मान्य करायलाच हवे "

हंपीच्या विरूपाक्ष मंदिराचा विकासही याच क्रमाने घडून आला कर्नाटकातील जुन्या मंदिरांपैकी हे एक विजयनगरच्या सम्राटांनी त्यात काही थोडी भर तेवढी घातली आणि उत्तुंग गोपुरासारख्या आकर्षक घटकांच्या सहाय्याने त्याची शोभा वृद्धिंगत केली या सम्राटांनी आपले वर्चस्व दक्षिणेस कांची व मदुरा इतक्या दूरवर विस्तारून ठेवले होते ते राज्यकर्ते मंदिरांचे थोर निर्माणकर्ते होते हिंदू धर्माचे पाठीराखे या नात्याने त्यांनी अवलंबिलेल्या धोरणाचाच हा एक भाग होता त्यामुळेच कांची, मदुराई व चिदंबरम् येथील मंदिरांना विजयनगरच्या राज्यकर्त्यांनी पुरवण्या जोडल्याचे अथवा त्यांची शोभा वृद्धिंगत केल्याचे आपल्याला आढळून येते

स्थापत्यकलेच्या द्राविडी व कर्नाटकी धाटणीचा एकमेळ साधल्याचे अत्युत्तम उदाहरण शृंगेरीस आढळते विद्याशंकराचे मंदिर पावन तुंगा नदीच्या एका वळणावर उभे आहे त्यामुळे या मंदिराला पुढच्या अंगाने आकर्षक अशी चढण लाभली आहे नदीला सन्मुख असलेल्या अंगाचे जोते गोलाकार असून बाकीचा आराखडा नेहेमीच्या चौकोनाकृती धर्तीचाच आहे त्यामुळे तळाचा आकार लंबवर्तुळ आहे द्वारमंडप व उत्तुंग गोपुरे यांचा अभाव आणि शिल्पित भित्तिपट्टाचे अस्तित्व यामुळे होयसाळ धाटणीची आठवण येते पण प्रदक्षिणेचा मार्ग, उजाळा दिलेले स्तंभ, त्यांची अत्यलंकृत शिखरे, दोरासारखे भासणारे छताचे ढाळ या साऱ्या गोष्टी म्हणजे द्राविड शैलीचेच पृथगात्म विशेष होत या दोन शैलींचा सुसंवादी एकमेळ या मंदिराला सुंदर कलाकृतीचे रूप देऊन जातो

मुस्लिम स्थापत्यकला ही सर्वतोपरी न विदेशी आदर्शांतूनच स्फुरलेली आहे खाणेपिणे, वेषभूषा, रीतीभाती व भाषा या जीवनाच्या इतर अंगांप्रमाणे याही बाजूने मुस्लिमांनी परकी गुणधर्म घुसडून दिले श्रीरंगपट्टण, विजापूर, गुलबर्गा व बेदर यासारख्या ठिकाणी ' दाक्षिणात्य शैली ' म्हणून ख्याती पावलेली एक वैशिष्ट्यपूर्ण धाटणीही मुस्लिमांनी विकसित केली आहे

मुस्लिमांचे राज्य विजापूर व कर्नाटकातले निजामी जिल्हे एवढ्यापुरतेच सीमित असले तरीदेखील टिपू सुलतान आणि सावनूर व शिरा येथील नबाब यांसारखे मुस्लिम प्रशासक इतरत्रही होतेच त्यामुळे उभ्या राज्यभर असंख्य मशिदी व दर्गे आढळून येतात श्रीरंगपट्टण व बंगलोर येथील राजवाड्यातल्या काही डौलदार कमानी आणि आकर्षक भित्तिचित्रे आजही टिकाव धरून आहेत विजापुरात मुस्लिम स्थापत्यकलेचे कित्येक अवशेष असून त्या साऱ्यात गोलघुमट अत्यंत प्रसिद्ध आहे हे महमद अदिलशहाचे (१६५७) थडगे होय वर्तुळाकृती घुमटाच्या सभोवतालच्या कुजबुजही निनादित करणाऱ्या दालनामुळे आणि अन्य आगळ्यावेगळ्या वैशिष्ट्या-मुळे ही वास्तू जगातल्या आश्चर्यांत गणली जाते

गुलबर्ग्याची 'जामी मशीद दक्षिणेतली त्या प्रकारची सर्वांत विख्यात मशीद होय प्रार्थना करणाऱ्या भक्तांच्या मस्तकावर छत देण्याची कलाकाराने निवडलेली टूम अपवादात्मकच आहे, नेहमीची पद्धत उघड्या चौकाचीच असते तोरणे, उत्सेध व सौध यांच्या रूपाने काही रोमन (बॅसिलिका) व पर्शियन विशेषांचीही उसनवारी शिल्पकाराने केली आहे (विजापूरचा) इब्राहीम रोझा, (श्रीरंग-पट्टणमधील) दर्या दौलत व लालबाग (एकेकाळचे राजेराजवाड्याचे उद्यान) यांच्या सभोवार असलेल्या उपवनांवरून स्पष्टच दिसून येते की उद्यानाचीही आखणी करण्याविषयी मुस्लिम राज्यकर्त्यांना मोठी आस्था असे

ब्रिटिशांच्या काळात निरनिराळ्या पाश्चात्त्य धाटणीची कित्येक प्रार्थनामंदिरे, नगरसभागृहे, महाविद्यालये आणि प्रासादही बांधण्यात आले बंगलोरचे सेंट्रल महाविद्यालय गॉथिक शैलीचे आहे मंगळूरमधील सेंट ॲलोसियस महाविद्यालयाचे भव्य सभागृह त्या धाटणीचे कर्नाटकातले पहिलेच आहे मानस गंगोत्री येथील प्रसरांग एका भव्य भवनात थाटलेले आहे कर्नाटक विद्यापीठाचे शासकीय भवन म्हणजे आधुनिक कर्नाटकातली त्या धर्तीची सर्वांत डोळ्यांत भरणारी वास्तू होय या वास्तूसाठी डी सी पावट्यांनी दोड्डबल्लापूरहून कणाश्म आणविले होते सर्व-साधारणपणे सार्वजनिक वास्तूसाठी त्या त्या स्थळी उपलब्ध असलेले कणाश्म, जांभे दगड किंवा दाक्षिणात्य सोपानाश्म वापरतात बेळगावचे लिंगराज कला महाविद्यालय व शिमोगा येथील सह्याद्री महाविद्यालय ही यांचीच उदाहरणे होत बंगलोरचा राजप्रासाद पहिल्या एलिझाबेथच्या एका राजवाड्याच्या धर्तीवर बांधलेला आहे मैसूरचा राजवाडा हिंद-सारसेनी धाटणीचा आहे सर मिर्झा इस्माईल दिवाण असताना निरनिराळ्या भव्य वास्तू उभारल्या गेल्या मंड्याचे जिल्हा कार्यालय, आणि बंगलोरचे सर के पी पुट्टण्णा चेट्टी नगरसभागृह या वास्तूत उपलब्ध स्थानिक कणाश्मांचाच मुक्तहस्ताने उपयोग केलेला आहे सामान्यत साऱ्या राज्य-

भरातली नगरसभागृहे अथेन्सच्या ॲक्रोपोलिसचे स्मरण करून देतात त्यांच्या पडव्यांत डॉरिक धाटणीचे खाब असून त्यावर समोरच्या बाजूस त्रिकोणाकृती शकू असतात बगलोरचे मत्रालय आणि मैसूरची जिल्हा कार्यालये याच्या वास्तूचे आराखडे ब्रिटिश स्थापत्यशास्त्रज्ञानी आखलेले आहेत बगलोरचे व मैसूरचेही महापालिका कार्यालय हिंद-सारसेनी धाटणीच्या भवनात आहे विधानसभा म्हणजे तर कन्नडिगाचे स्थापत्यकलेतले सर्वांत अलीकडचे कर्तृत्वच त्यात ब्रिटिश, भारतीय आणि सारसेनी या तीनही शैलीतील घटकाचा समन्वय साधलेला आहे या वास्तूत व्यवहार्य व कलात्मक अशा दोन्ही अगाचा एकमेळ साधलेला आहे काशाचे व सगमरवरी असख्य पुतळे साऱ्या राज्यातली सार्वजनिक उपवने आणि शासकीय भवने याना सुशोभित करताना दिसतात अगदी अलीकडेच उभारलेला पुतळा म्हणजे श्री कृष्णराज रौप्य महोत्सव ऑक्युपेशनल थेरॅपी (व्यावसायिक चिकित्सा) इन्स्टि-टयूशनच्या समोरचा सर एम विश्वेश्वरय्या याचा काशाचा पुतळा होय राष्ट्रीय व व्यक्तिगत साधनसामग्रीची काटकसरीने जोपासना कशी करावयाची हे दाखवून देणाऱ्या थोर भारतीयाच्या स्मृतीला साजेशीच ती आदराजली म्हणावयाची !

**कर्नाटक सगीत**

सगीत ही एक विश्वव्यापी कला असून तिची प्रवृत्ती राष्ट्रीय सीमाचे उल्लघन करण्याची असते उदाहरणार्थ, आपल्या नृत्यनाटचाला अनुरूप ठरणारे सगीत टागो-रांनी विकसित केले ते इग्लडमध्ये आयरिश सुरावटी ऐकूनच अलीकडेच कर्नाटक सगीताचा उत्कृष्ट आविष्कार दाखवून हिगिन्स भगवतार यानी बगलोरच्या सगीत-प्रेमी लोकांना थरारून सोडले अलीकडे तर आधुनिकतावादी दृष्टिकोन बाळगणारे अधिकाधिक लोक जाझचे व सगीताच्या इतरही प्रकाराचे एकनिष्ठ चाहते बनू लागले आहेत चित्रपटसगीतावर याचा डोळचावर येण्याइतका परिणाम आधीच होऊन चुकला आहे भारतीय सगीतात भर घातल्याचा अभिमान बाळगण्याचा कर्नाटकला चागलाच अधिकार आहे

गोपाळ नायकानी दक्षिणेकडून वाटचाल करून थेट अल्लाउद्दिन खिलजीच्या राजसभेतील गायकाची पदवी पटकावली (१२९५–१३१५) त्यानी अमीर खुश्रु या पर्शियन सगीतकाराचा स्नेहही सपादन केला आणि त्यांच्या चर्चांमधून नवेनवे राग विकसित झाले त्या साऱ्यांचे सकलन सोळाव्या शतकातल्या पुडरीक विठ्ठल या दक्षिण भारतीय सगीतकाराने आपल्या सगीतावरील प्रबधात करून ठेवले या दोन सस्कृतींच्या सरमिसळीतून ‘उत्तरदी’ व ‘दक्षिणदी’ अशा गायनाच्या दोन पद्धती उदयास आल्या

काळाच्या ओघात हे अतर अधिकाधिक रुदावत गेले सामान्य माणसाच्या अनुभवाला येते ते इतकेच की हिंदुस्थानी सगीताचे स्वर अधिक विशुद्ध असून त्याचे भावनिक आवाहनही अधिक शीघ्रगती असते त्याचा आनद सर्वसाधारण समाजात अत्यत दूरवर पसरू शकतो कर्नाटक सगीतातली स्वरमूल्याची व स्वराच्या परस्पर-सबधाचीही जाण अधिक सखोल असून ते सबध गमकाच्या माध्यमातून प्रकट केले जातात त्यामुळे कर्नाटक सगीताची अभिरुची बुद्धिपूर्वक विकसित करून घ्यावी लागते, पण हिंदुस्थानी सगीताचे सूर व नाद मात्र अगदी असस्कृत श्रोत्याच्याही कानांना मोहिनी घालू शकतात हेही लक्षात ठेवायला हवे की हिंदुस्थानी सगीताचा प्रसार कर्नाटक सगीताहून अधिक विस्तृत क्षेत्रात झालेला आहे

सगीताने दीर्घ कालपर्यंत उपासनेचे अविभाज्य अग राहिलेले आहे 'सगीत अवधारय 'शिवदास' असोत किंवा 'हरिदास' असोत, त्याच्या भक्तियोगापासून संगीत अलग करताच येत नाही 'शिवशरणाची वचने' म्हणजे काही सगीतपर साहित्यात घातलेली गभीर भर नव्हत, तरी पण त्यांची रचना गाण्यासाठीच केलेली असे त्यात जणू अमर काव्याचे सगीताशी लग्नच लावून दिले आहे

'दासकूट' प्रथा सुरू करण्याचे श्रेय मूळबगळच्या श्रीपादराय स्वामीकडे जाते साऱ्या देशभर, अगदी महाराष्ट्र व बृहत् कर्नाटक इतक्या दूरवर कन्नड सगीतास त्यानी लोकप्रियता मिळवून दिली 'अक्कनी केळे चिक्कण माता' इत्यादी तीन कन्नड गीताचा समावेश ज्ञानेश्वरानी आपल्या एका अभगात केला आहे असे म्हणतात सोसाळचाच्या श्रीव्यासराय स्वामीनी ही प्रथा पुढे चालवली पुरदर-दासाच्या रचनानी त्याच्या पद्धतीवर वैभवाचा कळसच चढवून दिला 'उगभोग' व 'मुळदी' या नावानी ओळखल्या जाणाऱ्या पृथगात्म घाटणीच्या शेकडो वैशिष्टय-पूर्ण कन्नड गीतांच्या भरीला त्यांनी चार लाख पचवीस कीर्तनेही रचली आहेत १५६४ मध्ये त्याना मुक्ती लाभली त्यानी स्थापन केलेली ही थोर वैभवशाली परपरा मात्र आजही त्यांच्या चाहत्यानी व शिष्यानी चालू ठेविली आहे

कन्नड सगीताच्या रचयित्यांत त्यागराज हे सर्वांत लोकप्रिय होते 'त्यागराज गान', 'वाल्मीकीय कवन' आणि 'अगुबेय अष्टमय' याची मानवी मनाला हर्षोत्फुल्ल करण्याची शक्ती अभूतपूर्व आहे असे म्हणतात "त्यागराज म्हणजे संगीतप्रेमी लोकांचा ध्रुवतारा, नवशिक्याचे दैवत आणि सगीत सचालकाचा आदर्शच होत" (एस के आर –आमचे सगीत व सगीतकार पृ १२) कर्नाटक सगीताचे एक महान रचनाकार म्हणून पुरदरदासाचा उल्लेख त्यागराजानी मोठ्या आदराने केला आहे

लोकगीताचे, यक्षगानाचे व उघड्यावरील नाट्यप्रयोगाचे सगीत, लोकप्रिय

असूनही त्या मानाने आवाहनात कमीच पडते परंतु या भूमीच्या लोकगीतांनी संगीतात घातलेल्या भरीला सांस्कृतिक दृष्टया मात्र आगळेच महत्त्व लाभलेले आहे

महान संगीत रचयित्याला किंवा संगीत मीमांसकाला थोर भारतीय या पदवीवर अधिकार सांगता येतो रचनाकार व मीमांसक दोहोंचीही अबाधित परंपरा निर्माण करण्यास समर्थ ठरल्याचा अद्वितीय मान कर्नाटकच्या वाट्याला आला आहे त्यांची नावे अनंत आहेत अगदी अलीअलीकडेपर्यंत विद्यमान असलेल्यांचा निर्देश करण्यास मात्र प्रत्यवाय नाही शेषण्णा (वीणा), कृष्णप्पा (गायन), वासुदेवाचार्य (संगीत रचना) आणि चौदय्या (व्हायोलिन)

वर उल्लेखिलेले सारेच थोर कलावंत 'आस्थान विद्वान' होते ही वस्तुस्थिती संगीताचे आश्रयदाते या नात्याने मैसूरच्या राजांनी बजाविलेल्या कामगिरीवर ठळक प्रकाशझोत टाकते हैदराबाद व उत्तर कर्नाटक प्रदेशात अव्याहत परंपरेची वाण दिसते ती मुख्यत अशा राजाश्रयाच्या अभावीच या विभागात हिंदुस्तानी संगीताला लोकप्रियता लाभलेली आहे याला ऐतिहासिक व भौगोलिक दोन्ही प्रकारची कारणे आहेत तरीसुद्धा बसवराज राजगुरू, मल्लिकार्जुन मन्सूर, भीमसेन जोशी, गंगूबाई हन्गळ इत्यादी संगीतकारांनी अखिल भारतीय प्रसिद्धी पटकावली आहे ही अभिमानाचीच गोष्ट आहे

## प्राथमिक शिक्षण

एकीकरणापूर्वी प्राथमिक शिक्षणाचा कालावधी व अभ्यासक्रम यात किती तरी स्थानिक भेद दिसून येत असत के हनुमंतय्या यांच्या अध्यक्षतेखालील 'शिक्षण सुधार समितीने' सात वर्षांचा एकसंध अभ्यासक्रम सुचविला होता १९५९ पासून १९६३ पर्यंत ही प्रणाली उभ्या राज्याला क्रमाक्रमाने लागू करण्यात आली

विद्यार्थ्यांची मातृभाषा च शिक्षणाचे माध्यम आहे परंतु भाषिक अल्पसंख्याकांच्या मुलांच्याही शिक्षणासाठी सान्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातात मग त्यांची मातृभाषा कोणतीही असो कमीत कमी पधरा विद्यार्थी असतील तर त्यांच्यासाठी स्वतंत्र तुकडी उघडण्याचीही व्यवस्था आहे शाळांच्या वास्तू उभारण्यावर आणि नीट करण्यावर १९५६ मध्ये शासनाला बारा लाख एकोणनव्वद रुपये खर्च करावे लागले होते, १९७० मध्ये हा आकडा सत्याहत्तर लाख वीस हजारांवर पोहोचला

अजूनही ज्या समस्या सोडवावयाच्या आहेत त्यांचा संबंध पुढील कार्यांशी आहे अनिवार्य प्राथमिक शिक्षण योजनेखाली पटावर घेतलेल्या विद्यार्थ्यांना पहिल्या चार इयत्ता पूर्ण होईतो टिकवून ठेवणे, अपव्यय आणि अवरुद्धता टाळणे, दिल्या गेलेल्या सर्व सोयींचा संपूर्ण व यथायोग्य उपयोग करून घेणे आणि ग्रामीण विभा-

गातील पटसख्या वृद्धिंगत व्हावी अशा रीतीने या सोयी उच्च प्राथमिक स्तरापर्यंत प्रसृत करणे नागरी विभागात तर अशी समस्या उरलेलीच नाही

**माध्यमिक शिक्षण**

शिक्षण समितीने सुचविलेल्या आराखड्याच्या अनुरोधाने विकल्पविरहित पद्धतीच उभ्या राज्यात लागू केलेली आहे विशेष अध्ययनासाठी विषयाची निवड विद्यार्थी अकराव्या इयत्तेतच फक्त करतात हिंदी भाषा आवश्यक विषय म्हणून शिकविली जाते पायाभूत विषय व हस्तव्यवसाय याच्याही शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाचाही लाभ घेता येतो

बहुसख्य शाळातून कन्नडच शिक्षणाचे माध्यम आहे पण जिथे म्हणून तशी मागणी असेल तिथे तिथे अल्पसख्याकाचे हितसबध अबाधित राखण्यासाठी, इंग्लिश, हिंदी, तमिळ, तेलगू, मराठी व उर्दू या भाषातूनही शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे

१९६६–६७ पासून दुय्यम शिक्षण विनामूल्य दिले जात आहे विद्यार्थ्यांना वर्षाला केवळ दहाच रुपये सुधारणेचे मोल म्हणून द्यावे लागतात १९५५–५६ मध्ये शिक्षणावरील एकूण अनुमानित व्यय एक कोटी चव्वेचाळीस लाख एकोणचाळीस सहस्र होता, तोच १९६८–६९ त सहा कोटी एकोणचाळीस लाख अठ्ठेचाळीस सहस्रापर्यंत गेला आहे

अकराव्या इयत्तेचा समावेश असलेल्या विद्यालयाना उच्च माध्यमिक विद्यालये म्हणतात १९६४–६५ मध्ये पन्नास विद्यार्थ्यांना बढती देऊन ती उच्चतर माध्यमिक विद्यालये बनविण्यात आली १९६८–६९ मध्ये अशा उच्चतर माध्यमिक विद्यालयाची सख्या २७२ वर चढून विद्यार्थ्यांची पटसख्या जवळजवळ १७५५० मुले आणि ५४४७ मुली इतकी झाली

दहाव्या इयत्तेच्या शेवटी परीक्षा घेण्याची नवीन योजना लागू केल्यामुळे परीक्षाफलिताचे मूल्यमापन आणि प्रश्नपत्रिका सिद्ध करणाऱ्या निष्णात परीक्षकांचे प्रशिक्षण याची निकड अतिशय तीव्रपणे जाणवू लागली तीनुसार १९६३–६४ मध्ये राज्याचे परीक्षा मूल्यमापन कार्यालयही स्थापले गेले

माध्यमिक विद्यालयाच्या सख्येत पूर्वी कधी नव्हती इतकी वाढ झाली पण तीपायी माध्यमिक शिक्षणाची पातळी मात्र घसरली गुणवत्तेत सुधारणा घडवून आणण्यापूर्वी किती तरी प्रश्न सोडवावे लागणार आहेत त्यातला एक म्हणजे प्रशिक्षित शिक्षकाची पुरेशी सख्या उपलब्ध होण्याचा आहे मैसूरचे रीजनल कॉलिज ऑफ एज्युकेशन, धारवाडचे पोस्ट–ग्रॅज्युएट बेसिक ट्रेनिंग कॉलेज आणि बगलोरची

रीजनल इन्स्टिट्यूट ऑफ इंग्लिश यासकट राज्यात एकोणीस शिक्षक प्रशिक्षण संस्था आहेत त्यांतली सहा शासकीय महाविद्यालये असून बाकीची शासनेतर व्यवस्थापनाखाली आहेत

शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवरील प्रगतीविषयी शिक्षणतज्ज्ञ आणि उदारधी दानशूर यांनी प्रकट केलेली कळकळ हा नव्या कर्नाटक राज्याचा विशेष अत्यंत इष्ट होय सार्वजनिक समृद्धीला वाहिलेल्या शिक्षणसंस्था चालू करण्यात आला जुनें मैसूरही संयुक्त राज्यातील इतर प्रदेशांच्या पंक्तीला पोहोचू लागले आहे

प्रौढांच्या शिक्षणासाठी सुव्यवस्थित स्वरूपाचा विभाग असलेल्या भारतातील मोजक्या राज्यांत कर्नाटकाचीही गणना होते १९६९–७० मध्ये मानाची ढाल जिंकणाऱ्या राज्य प्रौढ शिक्षण मंडळाविषयी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी गौरवाचे उद्‌गार काढले होते

१९३० मध्ये डॉ एम व्ही गोपाल स्वामी यांनी चालू केलेले शिशुविद्यालय या राज्यातले त्या धर्तीचे पहिलेवहिलेच होते तेव्हापासून मात्र हे कार्य खूपच लोकप्रिय बनले आहे बहुतेक नगरे आपल्या स्वतःच्या शिशू विद्यालयाचा अभिमान मिरवीत आहेत पूर्वशालेय शिक्षण मात्र शासनेतर व्यवस्थापनाखालीच आहे

### विद्यापीठीय शिक्षण

उच्च शिक्षणाच्या सोयीच्या संदर्भात अगदी अलीकडेपर्यंत कर्नाटक अतिशयच मागासलेले होते विद्यापीठांची विपुल वाढ हा स्वातंत्र्योत्तर काळातलाच चमत्कार होय तोपर्यंत एकुलते एक विद्यापीठ होते मैसूरचे अशासकीय क्षेत्रातली महाविद्यालये मोजकीच आणि तीही दूरदूर असत अशासकीय क्षेत्राची शिक्षणात पैसे गुंतविण्याची फारशी तयारी नसे वैद्यक, यंत्रशास्त्र, कायदेशास्त्र, जंगलशास्त्र आणि शेतकी यांच्या उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना इलाख्यातल्या विद्यापीठात किंवा पुणे, डेहराडून आणि कोइमतूर या ठिकाणी पाठवावे लागे दुसऱ्या जागतिक युद्धाने उभ्या भारतातील उच्च शिक्षणाला चालना दिली अंशतः बुद्धिवंत व्यक्तींची वाण आणि पैशाची चणचण यामुळे ऑक्सफर्ड व केंब्रिज येथील पुरातन विद्यापीठांच्या आकर्षणाला ओहोटी लागली होती मॉस्को, टोकियो व स्टॅनफर्ड या ठिकाणची नवी विद्यापीठे मात्र झपाट्याने आंतरराष्ट्रीय शिक्षणकेंद्रे बनू लागली होती पीठ अनुदान मंडळाने (यू जी सी ने) उपलब्ध करून दिलेल्या निधीमुळे आपापले पंख पसरून विद्येच्या वृद्धीसाठी भव्य योजना आखण्याची क्षमता भारतीय विद्यापीठांनाही लाभली होती भारतीयांना आत्मविश्वास वाटू लागला होता पदव्युत्तर शिक्षणाची आणि संशोधनाची केंद्रे उभ्या देशभर उघडली गेली वैज्ञानिक संशोधनाचा

वेग वृद्धिंगत करण्याची खटपट जवाहरलाल नेहरूंनी सर्व सामर्थ्यानिशी केली आहार-संशोधन संस्था (फूड रिसर्च इन्स्टिटयूट, मैसूर), भारतीय उच्च शिक्षण संस्था (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ अॅडव्हान्स स्टडीज, सिमला) आणि त्याच्या जोडीला नव्या राष्ट्रीय प्रयोगशाळाही उघडण्यात आल्या आध्यात्मिक गोष्टीत तर भारत निरंतर स्वयपूर्ण होताच, आता त्याने स्वतःला साऱ्या मानसिक गोष्टीतही स्वयपूर्ण बनविले या संतोषजनक प्रगतीत कर्नाटकालाही स्वतःचा वाटा लाभला गेल्या तीन दशकात विद्यापीठाची संख्या पाचपर्यंत वाढली असून, त्यातल्या तीन बंगलोरात आहेत (यातच शेतकी संशोधन विद्यापीठाचा व भारतीय विज्ञान संस्थेचाही समावेश आहे) आणि मैसूर व धारवाड येथे प्रत्येकी एक एक आहे मंगळूर व गुलबर्गा ही पदव्युत्तर शिक्षणाची व संशोधनाची केंद्रे बनली आहेत विद्यापीठीय केंद्रे म्हणून मान्यता पावण्यावर अधिकार सांगणारे शिक्षणसंस्थांचे आणखी निदान तीन तरी गट आहेत

ए जी ई (मणिपाल)च्या रौप्य महोत्सवप्रसंगी एस एस वोडियार यांनी धोरणाची गुरुकिल्ली वर्णन करणाऱ्या भाषणात म्हटले आहे त्याप्रमाणे, "शिक्षण देणाऱ्या विभागाचा एक गाभा अजून जिच्या अगदी निकटवर्ती अशी तीस-एक महाविद्यालये असतात आणि जिची विद्यार्थिपटसंख्या जवळजवळ २५००० असते अशी संस्था म्हणजे उत्कृष्ट विद्यापीठीय संघटना होय" अशी व्याख्या शिक्षण आयोगाने केली आहे मैसूर विद्यापीठाची या आकारमानापलीकडे वाढ आधीच होऊन चुकली असून, दक्षिण कानडातील महाविद्यालये मैसूरला अगदी निकटवर्ती आहेत असेही म्हणता येत नाही या दोन्ही कारणांमुळे स्वतंत्र विद्यापीठाची मागणी चांगलीच न्याय्य ठरते टी एम ए पैंचे त्यांच्या सत्तराव्या जन्मदिनी अभिनंदन करताना, ते मणिपाल विद्यापीठाचे उपकुलगुरू बनून त्यांनी स्वतः काढलेल्या व्यापारी, औद्योगिक, सहकारी व सामाजिक संस्था जितक्या उत्तम प्रकारे संघटित केल्या तितक्याच उत्तम प्रकारे ते विद्यापीठही सुसंघटित करावे अशी इच्छा डी व्ही जी नी आणि इतर शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे

याच संदर्भात आणखी काही शिक्षणतज्ज्ञांचीही नावे उल्लेखनीय ठरतात दिनकर डी देसाई, कानडा समाजकल्याण विश्वस्त निधीचे अध्यक्ष (अंकोला) पी जी हळकट्टी (विजापूर), एस सी नंदीमठ (बेळगाव), के एल ई आणि के ई संस्थांचे सध्याचे पदाधिकारी, राजेनहळ्ळीचे सदस्य, बी टी व चिंगतेरी कुटुंबातली मंडळी (दावणगिरी) आणि हैदराबाद कर्नाटकातील शिक्षणसंस्थांचे संस्थापक शिक्षणसंस्था स्थापन करणे हे सर्वोच्च आध्यात्मिक पुण्यकृत्य आहे याविषयी भारतातील साऱ्या पंथांचे एकमत आहे उदाहरणार्थ, शाळा व महाविद्यालये काढून

आणि ती अत्यत तत्परतेने चालवून ख्रिस्ती मिशनरींनी जनतेचे प्रेम सपादन केले आहे आजही त्यानी अत्यत उच्च मानदड टिकवून ठेवलेले आहेत अलीकडे अलीकडे उदयाला आलेले इतरही लोक उत्कृष्ट सेवा बजावीत आहेत पण त्याची संख्या इतको अफाट आहे की त्या सर्वांचा येथे नामोल्लेख करणे शक्यच नाही दानशूर-पणाच्या भव्य कृतींनी त्या सान्यानीच जनतेची कृतज्ञता जोडली आहे मग ती बेळगावच्या लिंगराज महाविद्यालयातील २०० खोल्याच्या विद्यार्थिगृहाच्या रूपातली असो किंवा मैसूरचे डी बनुमैया आणि एस वेकटकृष्णैया यानी स्थापना केलेल्या एकाकी माध्यमिक विद्यालयाच्या रूपातली असो

बंगलोरच्या राष्ट्रीय शिक्षणसस्थेचा या ठिकाणी आवर्जून निर्देश करणे योग्य होईल कर्नाटक व महाराष्ट्र यामधला हा आणखी एक सास्कृतिक साधा होय कारण, या सस्थेला प्रेरणा लाभली पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडून के सपतगिरी रावानी आणि शिक्षणतज्ज्ञाच्या एका उदारधी गटाने मिळून उच्च शिक्षणाच्या कल्पनेला अशा प्रकारे एका नव्या परिमितीची जोड दिली अलीकडेच राष्ट्रीय महाविद्यालयाने आपला रौप्यमहोत्सव साजरा केला आघाडीवरील कार्य-कर्त्यांनी बजाविलेल्या समर्पणशील सेवेच्या अभावी इतके नाव आणि यश कमावणे सस्थेला शक्यच झाले नसते सध्याच्या प्राचार्यांनी तिची गौरवशाली परपरा चालू ठविली असून नैतिक शिक्षण आणि पर्यवेक्षणरहित परीक्षा अशा काही अभिनव प्रथाही रूढ केल्या आहेत

आधुनिक जगातल्या शिक्षणक्षेत्रात व्यापारी अशाचाही शिरकाव झाला आहे प्राचीन कर्नाटकातले शिक्षण या कलकातून मुक्त होते विद्यार्थ्यागणिक शुल्क आकारण्याची प्रथा सर्वस्वी नवीन आहे प्राचीन काळी शासन शिक्षणसस्थाना सपूर्ण स्वायत्तता देत असे यथोचित भूमी तेवढी शासन दान देत असे, पण शिक्षणसस्थाचे सचालकत्व मात्र मठातील बसदीतील किंवा विहारातील अधिपतीच्याच हाती असे खेडेगावातील लोक मगल प्रसगाच्या निमित्ताने आपण होऊन वर्गण्या देत एके काळी शिक्षणाचे सर्वाधिकार ब्राह्मणाकडेच होते हे महाविद्यालयाला दिलेल्या 'ब्राह्मणपुरी' या अभिधानावरून स्पष्ट दिसून येते उच्च शिक्षणाचा लाभ घेण्यास शूद्राना व स्त्रियाना मज्जावच असे परतु बौद्ध, जैन व वीरशैव यानी हा एकाधिकार मोडून काढला समाजात फारसे 'अडाणी ज्यूड' व 'मूक मिल्टन' राहू नयेत याची काळजी वाहिली ऐहिक व धार्मिक दोन्ही प्रकारचे शिक्षण दिले जाई अगदी अली-कडेपर्यंत सस्कृत हीच सास्कृतिक भाषा या नात्याने अव्याहतपणे उपयोगात आणली जात असे ही वस्तुस्थिती आपल्या शिक्षणसस्थाकडे उभ्या भारतातील विद्यार्थी आकृष्ट होण्याच्या दृष्टीने उपकारक ठरली बेळगाव आणि तळगुडा (स्थानकुण्डुर)

वेग वृद्धिंगत करण्याची खटपट जवाहरलाल नेहरूनी सर्व सामर्थ्यानिशी केली आहार-संशोधन संस्था (फूड रिसर्च इन्स्टिटयूट, मैसूर), भारतीय उच्च शिक्षण संस्था (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ अँडव्हान्स्‌ स्टडीज, सिमला) आणि त्याच्या जोडीला नव्या राष्ट्रीय प्रयोगशाळाही उघडण्यात आल्या आध्यात्मिक गोष्टीत तर भारत निरंतर स्वयपूर्ण होताच, आता त्याने स्वत ला साऱ्या मानसिक गोष्टीतही स्वयपूर्ण बनविले या संतोषजनक प्रगतीत कर्नाटकालाही स्वत चा वाटा लाभला गेल्या तीन दशकात विद्यापीठाची सख्या पाचपर्यंत वाढली असून, त्यातल्या तीन बंगलोरात आहेत (यातच शेतकी संशोधन विद्यापीठाचा व भारतीय विज्ञान संस्थेचाही समावेश आहे) आणि मैसूर व धारवाड येथे प्रत्येकी एक एक आहे मंगळूर व गुलबर्गा ही पदव्युत्तर शिक्षणाची व संशोधनाची केंद्रे बनली आहेत विद्यापीठीय केंद्रे म्हणून मान्यता पावण्यावर अधिकार सांगणारे शिक्षणसंस्थाचे आणखी निदान तीन तरी गट आहेत

ए जी ई (मणिपाल)च्या रौप्य महोत्सवप्रसंगी एस एस वोडियार यांनी धोरणाची गुरुकिल्ली वर्णन करणाऱ्या भाषणात म्हटले आहे त्याप्रमाणे, "शिक्षण देणाऱ्या विभागांचा एक गाभा अजून जिच्या अगदी निकटवर्ती अशी तीस-एक महाविद्यालये असतात आणि जिची विद्यार्थिपटसख्या जवळजवळ २५००० असते अशी संस्था म्हणजे उत्कृष्ट विद्यापीठीय संघटना होय" अशी व्याख्या शिक्षण आयोगाने केली आहे मैसूर विद्यापीठाची या आकारमानापलीकडे वाढ आधीच होऊन चुकली असून, दक्षिण कानडातील महाविद्यालये मैसूरला अगदी निकटवर्ती आहेत असेही म्हणता येत नाही या दोन्ही कारणामुळे स्वतंत्र विद्यापीठाची मागणी चांगलीच न्याय्य ठरते टी एम ए पैंचे त्याच्या सत्तराव्या जन्मदिनी अभिनंदन करताना, ते मणिपाल विद्यापीठाचे उपकुलगुरू बनून त्यांनी स्वत काढलेल्या व्यापारी, औद्योगिक, सहकारी व सामाजिक संस्था जितक्या उत्तम प्रकारे संघटित केल्या तितक्याच उत्तम प्रकारे ते विद्यापीठही सुसंघटित करावे अशी इच्छा डी व्ही जी नी आणि इतर शिक्षणतज्ज्ञानी व्यक्त केली आहे

याच संदर्भात आणखी काही शिक्षणतज्ज्ञाचीही नावे उल्लेखनीय ठरतात दिनकर डी देसाई, कानडा समाजकल्याण विश्वस्त निधीचे अध्यक्ष (अंकोला), पी जी हळकट्टी (विजापूर), एस सी नंदीमठ (बेळगाव), के एल ई आणि के ई संस्थाचे सध्याचे पदाधिकारी, राजेनहळ्ळीचे सदस्य, वी टी व चिगतेरी कुटुंबातली मंडळी (दावणगिरी) आणि हैदराबाद कर्नाटकातील शिक्षणसंस्थाचे संस्थापक शिक्षणसंस्था स्थापन करणे हे सर्वोच्च आध्यात्मिक पुण्यकृत्य आहे याविषयी भारतातील साऱ्या पंथांचे एकमत आहे उदाहरणार्थ, शाळा व महाविद्यालये काढून

आणि ती अत्यत तत्परतेने चालवून ख्रिस्ती मिशनरींनी जनतेचे प्रेम सपादन केले आहे आजही त्यानी अत्यत उच्च मानदड टिकवून ठेवलेले आहेत अलीकडे अलीकडे उदयाला आलेले इतरही लोक उत्कृष्ट सेवा बजावीत आहेत पण त्याची सख्या इतकी अफाट आहे की त्या सर्वांचा येथे नामोल्लेख करणे शक्यच नाही दानशूर-पणाच्या भव्य कृतीनी त्या साऱ्यानीच जनतेची कृतज्ञता जोडली आहे मग ती बेळगावच्या लिंगराज महाविद्यालयातील २०० खोल्याच्या विद्यार्थिगृहाच्या रूपातली असो किंवा मैसूरचे डी बनुमैया आणि एस वेकटकृष्णैया यानी स्थापना केलेल्या एकाकी माध्यमिक विद्यालयाच्या रूपातली असो

बगलोरच्या राष्ट्रीय शिक्षणसस्थेचा या ठिकाणी आवर्जून निर्देश करणे योग्य होईल कर्नाटक व महाराष्ट्र यांमधला हा आणखी एक सास्कृतिक साधा होय कारण, या सस्थेला प्रेरणा लाभली पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडून के सपतगिरी रावानी आणि शिक्षणतज्ज्ञाच्या एका उदारधी गटाने मिळून उच्च शिक्षणाच्या कल्पनेला अशा प्रकारे एका नव्या परिमितीची जोड दिली अलीकडेच राष्ट्रीय महाविद्यालयाने आपला रौप्यमहोत्सव साजरा केला आघाडीवरील कार्य-कर्त्यांनी बजाविलेल्या समर्पणशील सेवेच्या अभावी इतके नाव आणि यश कमावणे सस्थेला शक्यच झाले नसते सध्याच्या प्राचार्यांनी तिची गौरवशाली परपरा चालू ठविली असून नैतिक शिक्षण आणि पर्यवेक्षणरहित परीक्षा अशा काही अभिनव प्रथाही रूढ केल्या आहेत

आधुनिक जगातल्या शिक्षणक्षेत्रात व्यापारी अशाचाही शिरकाव झाला आहे प्राचीन कर्नाटकातले शिक्षण या कलकातून मुक्त होते विद्यार्थ्यागणिक शुल्क आकारण्याची प्रथा सर्वस्वी नवीन आहे प्राचीन काळी शासन शिक्षणसस्थाना सपूर्ण स्वायत्तता देत असे यथोचित भूमी तेवढी शासन दान देत असे, पण शिक्षणसस्थाचे सचालकत्व मात्र मठातील बसदीतील किंवा विहारांतील अधिपतीच्याच हाती असे खेडेगावातील लोक मगल प्रसगांच्या निमित्ताने आपण होऊन वर्गण्या देत एके काळी शिक्षणाचे सर्वाधिकार ब्राह्मणाकडेच होते हे महाविद्यालयाला दिलेल्या ' ब्राह्मणपुरी ' या अभिधानावरून स्पष्ट दिसून येते उच्च शिक्षणाचा लाभ घेण्यास शूद्रांना व स्त्रियाना मज्जावच असे परतु बौद्ध, जैन व वीरशैव यानी हा एकाधिकार मोडून काढला समाजात फारसे ' अडाणी ज्यूड ' व ' मूक मिल्टन ' राहू नयेत याची काळजी वाहिली ऐहिक व धार्मिक दोन्ही प्रकारचे शिक्षण दिले जाई अगदी अली-कडेपर्यंत सस्कृत हीच सांस्कृतिक भाषा या नात्याने अव्याहतपणे उपयोगात आणली जात असे ही वस्तुस्थिती आपल्या शिक्षणसस्थांकडे उभ्या भारतातील विद्यार्थी आकृष्ट होण्याच्या दृष्टीने उपकारक ठरली बेळगाव आणि तळगुडा (स्थानकुण्डुर)

श्रवणबेळगोळा, शृंगेरी, सळोटगी, कोडी मठ, इत्यादी विद्येची अनेक विख्यात केंद्रे प्राचीन कर्नाटकात असल्याचा पुरावा शिलालेखाच्या रूपाने उपलब्ध आहे लेखन, वाचन व अंकगणित शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची गर्दी देवळाच्या पडव्यातून दिवसा जमत असे सायंकाळी त्याच पडव्या विद्वज्जनांना बोधिसत्त्व, तीर्थंकर आणि हरि-हराचे अवतार याविषयी प्रवचने करण्याची व्यासपीठे म्हणून उपयोगी पडत रामा-यणावरील, महाभारतावरील आणि वचनशास्त्रांवरील प्रवचने आजदेखील लोकांना अत्यंत आवडतात आज आपण इहवादाने अत्यंत ग्रासले असलो तरी सांस्कृतिक परंपरा मात्र अव्याहत असल्याचेच यावरून निदर्शनास येते परिस्थितीच्या मूळ स्वभावाला धरून शिक्षणालाही नैतिक व धार्मिक आशय आपोआप प्राप्त झाला होता धार्मिक व इहवादी असा भेदभाव अजून लोकसाहित्यात मानू लागले नव्हते अभ्यासक्रमात पदार्थविज्ञानापेक्षा अधिक महत्त्वाचे स्थान अध्यात्मशास्त्रालाच होते पण शास्त्राच्या (कला व हस्तव्यवसाय) शिक्षणाचीही हेळसांड केली जात नसे बेळगाव हे शिल्पकार व मूर्तिकार यांना प्रशिक्षण देण्याचे केंद्र असे संगीत, चित्रकला आणि नृत्यकला यांचेही उच्च शिक्षण देणारी अशाच प्रकारची केंद्रेदेखील निश्चित असणार.

व्यक्तिमत्त्व एकात्म बनविण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण द्यायचे सोडून आजची शिक्षणपद्धती मानसिक फुटीरपणालाच उत्तेजन देत आहे नैतिक शिक्षण तर जवळजवळ पूर्णतया अदृश्यच झाले आहे भौतिकवादच आजचा आचारधर्म बनून गेला आहे शिक्षणक्षेत्रातील आजच्या दृश्याचे वर्णन आपल्या शिक्षणतज्ज्ञाच्याच शब्दात करता येईल पुन्हा एकदा एस एस वोडियाराचेच उद्धरण द्यायचे तर, "प्रत्यक्ष समाजच उत्क्रांत होत होत, उच्च नैतिक व न्याय्य मूल्यांची जोपासना करणारा नीतिनिष्ठ समाज न बनेल तर निरामय विद्यार्थिवर्गही आपल्याला लाभू शकणार नाही अलीकडच्या काही वर्षांत शिक्षणक्षेत्रात दिल्या जाणाऱ्या भराचे फार आणि अनर्थकारी स्थलांतर घडून आले आहे तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, भाषा, इत्यादींसारख्या नैतिक व न्याय्य मूल्यांचे पोषण करणाऱ्या विषयांकडे दुर्लक्ष करून वैज्ञानिक शिक्षणावरच पराकाष्ठेचा भर दिला जात आहे" (१९६८)

१९३१ मधील जनगणनेच्या इतिवृत्तात मस्तींनी पुढील उद्‌गार काढले होते

"भारतातील मोठी अडचण हीच की देहभरणास आवश्यक असलेल्या विद्या आणि आत्मोन्नतीसाठी लागणाऱ्या विद्या निरनिराळ्या भाषांत आहेत देशी भाषांतील ग्रंथांची पुस्ती जोडली गेलेली संस्कृत हीच भारतीय संस्कृतीची प्रमुख खाण आहे त्यामुळे इंग्रजी शिकलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या आध्यात्मिक निकडी भागविण्या-साठी दुसऱ्याच मूलस्रोताकडे वळावे लागते मानवाच्या भौतिक अवस्थेत सुधारणा

घडवून आणण्याची आणि त्याच्या धार्मिक, आध्यात्मिक निकडी भागविण्याची साधनें ज्यात एकत्रित झालेली असतील तेच खरे आदर्श शिक्षण पण अशी पद्धती अजून तरी उत्क्रांत झालेली नाही "

अलीकडेच बंगलोरास भरविलेल्या एका चर्चासत्रात, सांस्कृतिक संघर्षाचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी वस्तुस्थिती व आकडे यांचा पुरावा देण्यात आला होता नव्वद टक्के विद्यार्थ्यांनी पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या विषयांच्याच अध्ययनाला आणि शिक्षणाचे माध्यम म्हणूनही इंग्रजीला अनुकूल मत दिले होते इतर विद्याविषयांसंबंधी ते अज्ञानात होते आणि भावी घटनांच्या स्वरूपाची त्यांना मुळीच कल्पना नव्हती हे यावरून स्पष्ट दिसून येते

मागणी तसा पुरवठा या नियमाला शैक्षणिक दृष्टया अगदीच थोडी किंमत आहे लोकतंत्रात्मक समाजरचनेत योग्य निवड करून विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देणे अशक्यच असल्याचे प्रतिपादन केले जाते उलटपक्षी महाविद्यालयांची पटसंख्या भरमसाट वाढणे अपरिहार्य होऊन बसते मद्रासमधील इंग्लिश शिक्षकांच्या एका परिषदेत भाषण करताना ब्रिटिश कौंसिलमधल्या एका तज्ज्ञाने म्हटले, " आधुनिक शिक्षणातली एक विशेष गोष्ट स्वागतार्ह आहे–दूध वाढत्या श्रेणीने पातळ होत चालले असले, तरी साय मात्र अधिकाधिक दाट होऊ लागली आहे " करीन ती पूर्वं या धोरणातून शिक्षणाच्या क्षेत्रात काहीच चांगले निष्पन्न होऊ शकत नाही हे सी पी शोंनी निदर्शनास आणलेच आहे भारतातील बेकार आणि कामावर घेण्यास अपात्र असलेल्या यंत्रशास्त्रीय पदवीधरांचे अलीकडचे आकडे म्हणजे या वस्तुस्थितीचा प्रत्ययकारी पुरावाच होय अमेरिकन संयुक्त संस्थानात व रशियामध्ये या गोष्टीची व्यवस्था किती तरी अधिक चांगल्या प्रकारे ठेविली जाते सी पी शोंनी म्हटले आहे, " भारतात वैज्ञानिक क्रांती साध्य करणे तात्त्विक दृष्टया अगदी शक्य आहे कारण, त्यासाठी वैज्ञानिक व भाषातज्ज्ञ दोन्ही प्रकारच्या व्यक्तींचे अमाप भांडवल ओतावे लागते आणि त्या तर पाश्चात्त्य देशात बव्हंशी नाहीतच या दृष्टीने रशियन लोकांची स्थिती अधिक चांगली आहे त्यांच्या शैक्षणिक धोरणापासून प्रचंड लाभ केव्हाच घडून आला आहे तो नेमका याच क्षेत्रात ।'

सुदैवाने आमचे शिक्षणतज्ज्ञ निर्भेळ इहवादी म्हणजेच निरीश्वरवादी शिक्षणातली अरिष्टे चांगलीच ओळखून आहेत आपल्या वैभवशाली परंपरेकडे डोळेझाक करण्यात काहीच अर्थ नाही म्हणून आपले शिक्षणतज्ज्ञ आता जुन्या बाटल्यात नवे मद्य भरू पहात आहेत मणिपाल येथील अकादमी ऑफ जनरल एज्युकेशनने शृंगेरीस एक महाविद्यालय चालू केले आहे "हे एक अखिल भारतीय सांस्कृतिक केंद्र असल्यामुळे विज्ञान व वाणिज्य यांचे विशेष अध्ययन करण्यासाठी भरपूर सोयी उपलब्ध करून

देऊन त्याच्या जोडीला भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञान याच्या उच्च शिक्षणाचे केंद्र म्हणूनही हे महाविद्यालय विकास पावत आहे भारतीय संस्कृतीच्या सर्वांगीण अध्ययनावर भर देणारे मैसूर विद्यापीठातले कदाचित हे एकुलते एक महाविद्यालय असेल स्वतःच्या ग्रामीण वातावरणातच राहू इच्छिणाऱ्या पण महाविद्यालयीन उच्चतर शिक्षण घेण्याची संधी मिळण्याची आशा बाळगून असलेल्या विद्यार्थ्यांची सोय शृंगेरी लावू शकेल "

स्वतःच्या पुरातन संस्कृतीपासून तुटून निघून दूर वाहवत जाण्यात आपण अजून पूर्णतया यशस्वी न झाल्याचे सिद्ध करणारे आणखीही एक उज्ज्वल उदाहरण आहे कर्नाटकाच्या सर्व भागातून निवडलेल्या आणि सर्व जातींच्या चार सहस्र विद्यार्थ्यांना अन्न व निवारा पुरविण्याचे कार्य सिद्दगगा मठाने चालविले आहे ते एका संततुल्य व्यक्तीच्या अतिनिकट सान्निध्यात राहातात आणि पवित्र पावन झालेल्या भूमीवर हिंडतात फिरतात तिथे संस्कृतच्या अभ्यासाची विशेष व्यवस्था केलेली आहे तुमकुर नगर आणि पवित्र टेकडी याच्या मधील भूमीवर वसलेल्या निरनिराळ्या शिक्षण-संस्थातून विद्यार्थ्यांची येजा चाललेली असते या मठाने चालविलेल्या शिक्षण-संस्थाचे आगळेवेगळे वैशिष्टच म्हणजे त्या शासकीय अनुदानावरही विसबून नाहीत किंवा विद्यार्थ्यांगणिक मिळणाऱ्या शुल्कावरही अवलंबून नाहीत आपल्या पुरातन परंपरेला जागून त्या बव्हंशी सहकाराच्या तत्त्वावरच चालविल्या जातात तसेच मठाचे भक्त आणि श्रीशिवकुमार स्वामी या मठाधिपतीचे चाहते प्रतिनिधी रोख पैसे अथवा पदार्थ दान देत असतात

के डब्ल्यू टी ने जंगलातील प्रदेशात शिक्षण देण्याचे कार्य अंगावर घेतले आहे परंतु जंगलसंपदेवर तर राज्याचेच स्वामित्व् असते अर्थातच या प्रदेशात राहाणारे बहुतेक लोक मैदानी प्रदेशातल्या रहिवाश्याहून अधिक मागासलेले आहेत के डब्ल्यू टी ने चालविलेल्या (अकोल्याच्या महाविद्यालयासकट) वीस संस्थातल्या एकूण ४०९७ विद्यार्थ्यांतले २५४२ विद्यार्थी मागास जातीचे असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते हरिजन व शिद्दी याच्याही कल्याणाची व्यवस्था करण्याचा विश्वस्तनिधीचा कार्यक्रम वाखाणण्याजोगा आहे यातले शिद्दी विजेत्या पोर्तुगिजांनी भारतात आणलेल्या निग्रो दासाचे वंशज होत त्याच्यासाठी समाजसेवेची केंद्रे उघडून विश्वस्त निधीने जोडीला सुतारकाम व शिंपीकाम याचे प्रशिक्षण देण्याचीही व्यवस्था केली आहे

एकत्रीकरणानंतर हैदराबाद-कर्नाटकाने शीघ्रगतीने साधलेली प्रगती स्वतंत्रपणे उल्लेखनीय ठरते गुलबर्गा आणि बेदर जिल्हे नैसर्गिक साधनसामग्रीच्या दृष्टीने समृद्ध आहेत पण शैक्षणिक दृष्ट्या मात्र ते फारच मागास होते १९६१ च्या जन-

गणनेनुसार बेदरमधील साक्षरतेचे प्रमाण समग्र राज्याच्या एकचतुर्थांशच होते. ज्या ठिकाणी पूर्वी अगदी मोजक्याच शिक्षणसस्था होत्या किंवा मुळीच नव्हत्या त्याच ठिकाणी महादेवप्पा रामपुरे आणि दोड्डप्पा अप्पा याच्यासारख्या शिक्षण-तज्ज्ञाच्या खटपटीमुळे आता तशा सस्थांचे गटच निर्माण होत आहेत

बेदर बहामनी राज्याची राजधानी तिथला थोर मत्री महमद गवान हा विद्येचा मोठा आश्रयदाता होता त्याने स्थापन केलेल्या 'मदरसा'कडे सुसस्कृत जगातल्या सर्वच भागातून विद्यार्थी आकृष्ट होत असत ३००० हस्तलिखिताचे एक विशाल ग्रथालयही त्यात सामावलेले होते त्याच्या आराखड्यात प्रार्थनागृहाची आणि प्राध्यापकाच्या निवासस्थानाचीही व्यवस्था केलेली होती दुर्दैवाने त्या वास्तूचा एक पाखा वीज पडून उद्ध्वस्त झाला परतु जेवढे अवशिष्ट आहे त्यावरूनदेखील जीवनाचा शोकपूर्ण अत झालेल्या बहुश्रुत प्रज्ञावताच्या उत्तुग आदर्शाची साक्ष पटते ही वास्तू म्हणजे 'हिंदसारसेनी' किंवा 'बहामनी' धाटणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वास्तुशिल्पाचे उत्कृष्ट उदाहरण होय पर्शियन, तुर्की आणि भारतीय शिल्पकार, मूर्तिकार व चित्रकार यांच्या जिव्हाळ्याच्या सहकार्याचेच ते फलित होय जगातल्या सर्व भागातून कारागीर गोळा करण्यात यशस्वी झालेल्या महमद गवान याची प्रशसाच ते करतात त्यामुळे बेदर हे इस्लामी सस्कृतीच्या आणि धर्माच्या शिक्षणाचे उत्कृष्ट केंद्र बनू शकेल

बसवकल्याण हे महान तीर्थस्थान बेदर व गुलबर्गा याच्या मधोमध वसलेले आहे ते आता तालुक्याचे मुक्य ठाणे बनले आहे 'शरण बसवेश्वर विद्या-वर्धक' सघाने उघडलेल्या विज्ञानेतर विद्याच्या महाविद्यालयातले एक विद्यालय याच ठिकाणी आहे कला व विज्ञान याचे एस एस के बी महाविद्यालय १९६७ मध्ये उघडण्यात आले तिथे सध्या मानव्यविद्या शिकणारे १७० विद्यार्थी असून, ११० नी विज्ञानाचा विकल्प स्वीकारला आहे तुंगभद्रेच्या दक्षिणेत सर्रास आढळणाऱ्या गुणोत्तराशी हे प्रमाण विलक्षण विसगत आहे त्याचे स्पष्टीकरण नोंदून ठेवण्याजोगे आहे ग्रामीण वातावरणातले विद्यार्थी विज्ञानाहून कलाविषय अधिक इष्ट मानतात असे दिसते कलाशिक्षण कमी खर्चाचे असून त्यात स्वत चा परपरागत व्यवसाय, व्यापार अथवा शेतकी करण्यास विद्यार्थ्याला वावही अधिक असतो खरे सांगायचे तर बसवकल्याणच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी एक प्रकारे भाजी-भाकरीचाच अभ्यासक्रम पटकावला आहे ते एकाच वेळी शिक्षण व पैसेही मिळवू शकतात राज्याच्या इतर भागातल्या विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकासाठी त्यानी हा एक धडाच घालून दिला आहे

विजापूर तर शिक्षण-प्रसाररूप भरतीच्या लाटेवरच आरूढ झाल्याचे आढळून

येते चौथ्या दशकात त्याला एकाही महाविद्यालयाचा अभिमान मिरवता येत नसे. पण आता स्थानिक नागरिकाच्या यथोचित निकडी भागविण्याइतकी अनेक महाविद्यालये तिथे आहेत हे सारे काही, तसेच प्रगतीची इतरही अनेक गमके हे ‘ वचन-पितामहाच्या ’ समर्पणशील सेवेचेच फलित होय प्रा हण्डी यांनी सपादित केलेला पी जी हळ्कट्टी याचा गौरवग्रथ चालू दशकात प्रसिद्ध झालेल्या त्या प्रकारच्या ग्रथात सर्वोत्कृष्ट ठरतो

मैसूर व कर्नाटक येथील विद्यापीठात एक प्रकारची निरामय चढाओढ चालते दोन्ही विद्यापीठानी कन्नड अध्ययनाच्या सस्था स्थापन केल्या आहेत पण मैसूर कर्नाटकला काहीसे वरचढ ठरते कारण, त्याला पन्नास वर्षांची अव्याहत परपरा लाभलेली आहे लोकप्रिय लोकगीते, शाहिरी काव्ये आणि प्राचीन हस्तलिखिते गोळा करून त्यांचे अध्ययन करण्यात ते विशेष प्रावीण्य मिळवीत आहे धारवाडची सस्था वचनशास्त्राचे विशेष अध्ययन करीत आहे दोन्ही प्रसरागे मिळून ग्रथप्रकाशकाच्या कामी उज्ज्वल कर्तृत्व गाजवीत आहेत तसे हे अपेक्षितच आहे म्हणा, कारण दोहोंचे सचालक कन्नड पडितांत व कवींत प्रथितयश झालेले आहेत

राज्याचा सध्याचा शैक्षणिक दृश्यपट थोडक्यात पुढीलप्रमाणे रेखाटता येईल प्रत्येक जिल्ह्यात निदान एक तरी पहिल्या प्रतीचे महाविद्यालय आहे प्रत्येक तालुक्याच्या मुख्य ठाण्यात एक एक माध्यमिक अथवा उच्चतर माध्यमिक विद्यालय आहे कलेकलेने वाढत जाणाऱ्या एका योजनेनुसार अनिवार्य प्राथमिक शिक्षण लागू करण्याची खटपटही चालू आहे

## नावांची यथार्थता

व्यक्तींच्या व स्थळांच्या नावाना फार मोठा ऐतिहासिक आशय लाभलेला असतो कर्नाटकाबाहेरील एखाद्या ठिकाणचे नाव कन्नड असेल तर ते कर्नाटकच्या पुरातन सीमेचे निदर्शक ठरते येथे आपण विशेषनामाच्या सास्कृतिक आशयाचाच तेवढा विचार करणार आहो ‘ अप्पा ’ व ‘ अम्मा ’ हे मानवतेच्या इतिहासातील सर्वांत प्राचीन शब्दातलेच दोन शब्द असून, ते बहुतेक भाषात आढळणारे आहेत पोप (पेप) हा इटॅलियन शब्द ‘ पिता ’ या अर्थाच्या ग्रीक शब्दापासूनच सिद्ध झालेला आहे अण्णा ’ व अय्या ’ हे दोन्ही प्रत्ययही फार प्राचीन आहेत उदा हरिहर बसवाना पुढीलप्रमाणे आवाहन करतात ‘ बसवण्णा ’, ‘ बसवय्या ’, ‘ बसवदेव ’ आणि ‘ बसवराज ’ आपल्या एका वचनात ‘ अय्या ’ शब्दाचा अर्थपूर्ण उपयोग करून बसवानी स्वत च त्याला अमरत्व प्रदान केले आहे “ अय्या ऍंदरे स्वर्ग ’ (दाक्षिण्य म्हणजेच स्वर्ग, त्याचा अभाव हाच नरक) ‘ अय्या शब्द आर्य ’ या

सन्मानवाचक संस्कृत शब्दापासून व्युत्पन्न झालेला आहे 'अय्यगार' (श्रीवैष्णव) आणि 'अय्यर (स्मार्त) हे त्याच व्युत्पत्तीचे शब्द आहेत

'राजा' व राय' याचाही अर्थ तोच उदा चामुण्डांनी 'राय' पदवी मिळविल्याने ते 'चामुडराय' म्हणून ओळखले जाऊ लागले 'विश्वेश्वरराय' या विख्यात दिवाणाच्या नावातही तोच प्रत्यय आढळून येतो

अलीकडच्या काळात 'राव' रूढ झाल्यावर 'अय्या', 'अप्पा व 'अण्णा' याना काही काळ आपापली तोंडे लपवावी लागली होती याचे अंशत कारण असे की दिवाणांची एक मालिकाच 'राव' नावाची होती त्याना तो प्रत्यय वापरण्याचा अधिकारच होता, कारण, ते मराठीभाषिक मध्व ब्राह्मण होते पण मातृभाषा कन्नड असलेल्यानीही 'राव' ही उपाधी वापरणे म्हणजे शुद्ध कृत्रिमताच होय अलीकडची प्रवृत्ती मात्र जुन्याच उपाधी वापरण्याची किंवा त्याना पूर्णपणे फाटाच देण्याची आहे 'पाटील', 'कुळकर्णी', 'देसाई', 'शानभाग' आणि 'गावुड' ही खेडेगावातील अधिकाऱ्यांची नावे होत

प्रा मरिअप्पा भट यानी तुळू नावातील आशयाकडे लक्ष वेधून घेतले आहे मुलाना ग्रहांची पण नावे देतात उदा आयित्ता, चोमा, मगळा, बुधा, गुरुवा, बेल्ली, थानिया ही नावे दक्षिण कानडात लोकप्रिय असल्याचे आढळून येते ग्रहाच्या संस्कृत नावातच तुळूभाषिक लोकाच्या बोलण्याच्या सवयीला सोयीचा असा पालट केलेला आहे डॉ जावरे गौडांनी पुढील उद्‌गार काढले आहेत "मूल ज्या वारी जन्माला आले असेल त्याचेच नाव मुलाला ठेवण्याची प्रथा जुन्या मैसूरमध्येही रूढ आहे

कूर्ग व दक्षिण कानडा या जिल्ह्यातली पितृपरपरागत नावे लोकाच्या विवक्षित वर्गांची वशपरपरा शोधून काढण्याच्या दृष्टीने उपकारक ठरतात उदा 'पेरगडे किंवा 'हेगडे' या प्रभावशाली व्यक्ती असल्या पाहिजेत बल्लाळ जाणते लोक असत कन्नडने काही जुने द्राविडी शब्द टाकून संस्कृत शब्द उचलले असले तरी तुळूत मात्र ते टिकून आहेत उदा 'घर' या अर्थी 'इल' हा द्राविडी शब्द फार प्राचीन आहे तो तमिळमध्ये रूढही आहे तुळूत 'मुद्‌लु-इल-अया'चा अर्थ 'ज्याचे घर नगराच्या पूर्व भागात आहे तो' असा होतो तसेच 'मुडुबिद्रे' व 'पडुबिद्रे' म्हणजे देशाच्या 'पूर्व' वा 'पश्चिम' भागातील 'बिद्रे' मध्वाचार्य 'नड्‌थया,' घराण्यातले, म्हणजेच 'ज्याचे परपरागत घर नगराच्या मध्यभागी ठळकपणे वसलेले होते अशा व्यक्तींपैकी होते" ही माहिती कुतूहलजनक ठरते

कूर्ग व उत्तर कानडा जिल्ह्यातील लोकानी काही कन्नड शब्दाचे जुन्या धर्तीचे प्रयोग चालूच ठेवले आहेत सहस्र वर्षांपूर्वी 'अम्मा'चा अर्थ 'पिता' असून आईसाठी 'अव्वे' किंवा 'अब्बे' हे शब्द असत आधुनिक कन्नडमध्ये मात्र 'अम्मा'

बायकापुरताच सीमित झाला आहे पण कूर्गमध्ये तर पुरुषही स्वतःस 'सुबम्मा' म्हणवू शकतो

विंध्याच्या दक्षिणेकडील साऱ्याच नावांत एक प्रकारचे कुलपरंपरागत साधर्म्य आढळते उदा सगळ्याच द्राविड भाषात पुढील प्रत्यय स्थळनिर्देशक नावाचे द्योतक आहेत 'ऊरू, कडू, मलै, पाडी, कोडू, कुजू व कल्लू '

आडनावांवरून जन्मस्थळ, व्यापार वा व्यवसाय सूचित होतो 'ब्याळी', 'उप्पिना' व 'अडके' ही पितृपरंपरागत नावे त्या त्या लोकांचे पूर्वज निरनिराळ्या वस्तूंचा व्यापार वा व्यवसाय करीत असल्याचे सूचितक रतात 'शास्त्री', 'भट', 'आचार्य', 'अवधानी' यांवरून ब्राह्मणाचा उपाध्यायकीचा व्यवसाय निदर्शनास येतो 'आराध्य' व 'मठ' हे वीरशैव उपाध्याय होत उदा 'नदीमठ' म्हणजे नदी गावातले लिंगायत उपाध्याय तुंगभद्रेच्या उत्तरेकडील लोक आडनावांना प्राधान्य देतात दक्षिणेतही पैतृक आडनावे केवळ आद्याक्षराच्या रूपानेच तेवढी उरलेली आहेत उदा 'एस एस वोडियार म्हणजे 'सदा शिव वोडियार.' त्याचे पूर्वज समाजातील प्रमुख स्थानी विराजमान झालेले असणार हे उघड आहे हेच गृहस्थ तुंगभद्रेच्या दक्षिणेस जन्माला आले असते तर ते 'डब्ल्यू सदाशिव' म्हणून ओळखले जाते

मैसूरचे प्रा डी एल एन आचार धारवाडात प्रा दोडबेळे (महामोलीचे) म्हणून प्रसिद्ध झाले असते असा व्यंगानुयुक्त कोटिक्रम प्रा माळवाडांनी आपल्या उक्तीत केला होता दोडबेळे हे डी एल एन चे जन्मस्थळ आहे तुंगभद्रेच्या उत्तरेस जन्मस्थनाचेच प्रदर्शन करतात 'धारवाडकर', 'करमरकर', 'गोकाक' जुन्या मैसूरात यातल्या शेवटच्या नावाने 'जी जी कृष्ण' असे रूप धारण केले असते तात्पर्य आपण तुंगभद्रा ओलांडली की शब्दाच्या अनुक्रमाची उलटापालट होते

हिंदू दैवत समूहातील देव व देवी यांनी कन्नडिगाना व्यक्तीची नावे पुरविली आहेत या नावात वेळोवेळी विवक्षित ध्येयांचे प्रतीकच बनून गेलेल्या ऐतिहासिक व्यक्तीच्या नावांचीही भर लोक घालीत असतात बसव, रामकृष्ण, शिवाजी, रवींद्र, मोहन व इंदिरा 'सात पर्वतांवरचा परमेश्वर' (तिरुपती) तर अगदी स्मृत्यतीत काला-पासूनच कन्नडिगाचा संरक्षक प्रभू बनून राहिलेला आहे तो 'वेंकटेश', 'श्रीनिवास', 'तिरुमल' या नावांनी ओळखला जात असून त्याला इतरही निरनिराळी टोपण-नावे आहेतच 'तिरुमाळ' चे कन्नडमध्ये तिम्मा होते त्यामुळेच 'तिम्मप्पा,' 'तिम्मगौडा' अशी नावे आढळून येतात

काळा, गोरा, ठेंगणा, उंच यांसारख्या वैयक्तिक गुणधर्मांवरूनही त्याच्याशी मिळतीजुळती नावे निर्माण होतात उदा 'करिया', 'केंपा', 'गिड्डा', 'डोड्डा'

थोडक्यात सांगायचे तर व्यक्तिगत आणि स्थळाचीही नावे कन्नडिगांच्या संस्कृतीवर मोठाच प्रकाशझोत टाकताना दिसतात

## सामाजिक परिवर्तन

मैसूर आपल्या पागोट्यांमुळे विख्यात झाले आहे व्ही सी नी तर पागोट्याच्या विविधतेचे वर्णन करणारा एक निबंधच लिहिला आहे पण सुधारणेच्या आक्रमणा-मुळे मृतवत् साचेबदपणा प्रस्थापित होऊन बसला आहे पागोटे, टोपी किंवा लुंगी यांच्या संदर्भातले व्यक्तिवैशिष्ट्य इतिहासजमा झाले आहे महोत्सवाच्या प्रसंगी उच्च कुलीन कूर्गी लोक वापरतात त्या रेशमी गळपट्ट्याचा अपवाद वगळता शिरोवस्त्र तर नाहीसेच होऊन गेले आहे

वेशभूषेच्या संदर्भात पाश्चात्यीकरणाची टूम अधिकाधिक लोकप्रिय होत आहे आपल्या वस्त्रप्रावरणाच्या जागडीतली एकटी साडीच तेवढी परिवर्तनाच्या वादळाला तोंड देताना दिसते यांत्रिक नांगराचा वापर चालू झाल्याने इथून पुढे भाताच्या शेतातला शेतकरीही अनवाणी व अर्धनग्न दिसणार नाही परंतु हे विशिष्ट सामाजिक परिवर्तन पुढल्या शतकापर्यंत सर्रास रूढ मात्र होणार नाही आपल्या-कडील खेड्यातून काही थोड्या स्थानिक चालीरीती अजूनही रेंगाळत आहेत

आपण तुंगभद्रा ओलांडली की लागलीच आहार, वस्त्रप्रावरणे व उच्चार यात स्पष्टपणे पालट घडून आल्याचे दृष्टोत्पत्तीस येते समुद्रतीरावरील पट्ट्यातल्या लोकांनी मात्र कसलीच वैशिष्ट्यपूर्ण शैली साध्य केलेली नाही जुन्या मैसूरातले रागी हेच मुख्य खाद्य आहे रागीचे पीठ उकळत्या पाण्यात वैरतात आणि नंतर त्याचे गोळे वळतात ते न चावताच गिळता येतात त्यांना मसाला जवळजवळ लागतच नाही शिजवून खायला हे पक्वान्न सर्वांत सोपे असून ते आरोग्यकारकही आहे तुंगभद्रेच्या उत्तरेला ज्वारी हा प्रमुख खाद्यपदार्थ आहे पण भाकरी करायला कौशल्यही बरेच लागते आणि खाताना ती चावावी पण फार लागते कडधान्ये व डाळी, हिरव्या भाज्या आणि नाना प्रकारचे दुधाचे पदार्थ या जाडजूड भाकरीशी खप-तात शाकाहारी व्यक्तीच्या दृष्टीने हा आहार चांगलाच समतोलही ठरतो जुन्या मैसूरातल्या किंवा आंध्र प्रदेश व तमिळनाडू यातील काही भागातल्यासारखे भरपूर भात आणि पातळ रसम् जेवणारे लोक ढेरपोटे बनण्याचा फारच संभव असतो सागरी पट्ट्यातील स्त्री तर आपल्या आहाराच्या सवयीपायी मेदोवृद्धी झाल्याने गलितगात्र होण्याची फारच शक्यता असते उत्तर कर्नाटकातील लोक मात्र कुपो-षणाच्या दुष्परिणामातून मुक्त असतात आहाराच्या प्राचीन सवयीचे वर्णन करणारी

सर्वज्ञ कवीची एक त्रिपदी आहे "जोळदा बोना, बेलेया तोगे आणि बेण्णे" भरपूर कडधान्ये आणि लोणी याबरोबर ज्वारीची भाकरी खाल्ल्याने माणूस निरोगी व बळकट होतो

परतु हे स्थानिक भेद झपाट्याने अदृश्य होत चालले आहेत आजचा कल अधिकाधिक एकरूपतेकडे आहे खरे सागायचे तर शिधापद्धतीच्या दोन सत्रापायी अलीकडच्या काही वर्षांत महाराष्ट्रीयाचे अथवा उत्तर भारतीयांचे वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थ सिद्ध करण्याची सवय जुन्या मैसूरच्या लोकाच्या अगवळणी पडून गेली आहे परस्पर देवाणघेवाणीची परिणती उभ्या भारतभर एक प्रकारची समानाहारता निष्पन्न होण्यात झाली आहे अशा प्रकारच्या समानतेला आधुनिक दळणवळणाच्या साधनाची शीघ्रगती आणि सुलभता यानीही मोठाच हातभार लावला आहे 'इडली आणि 'दोसा' हे उभ्या भारतात न्याहारीतले आवडते पदार्थ होऊन बसले आहेत 'उप्पुमाही' सार्वत्रिक झाला आहे उलट दक्षिणेकडचे लोकही 'पुऱ्या' आणि 'चपात्या' खाऊ लागले आहेत गव्हाच्या आहाराला आक्षेप घेणारे केरळ हे एकटे एकच दाक्षिणात्य राज्य आहे म्हणतात कन्नडिगाच्या आहारपद्धतीहून अधिक चागल्या प्रकारे कर्नाटकच्या उदारमतवादाचे दर्शन दुसऱ्या कुठेच घडण्या सारखे नाही

भाजलेल्या पावाशी अड्याचे धिरडे हीही निखळ शाकाहारी न्याहारी मानली जाते दक्षिणेत 'कॉफी' आणि उत्तरेकडे 'चहा' ही पेये आजही आवडती पेये म्हणून मिळालेली मान्यता टिकवून आहेत 'गिरीची कॉफी' ही जगातली सर्वोत्कृष्ट कॉफी म्हटली जाते चहापानाची टूम दक्षिणेत अधिकाधिक रूढ होऊ लागली आहे याचे अशत कारण हेच की चहात भेसळ करणे कठीण जाते पण तो पुरवण्यासाठी अवश्य ते कौशल्य अजूनही लोकानी सपादन करायचे राहिलेच आहे तसेच कॉफीवर अटी-तटीच्या आतरराष्ट्रीय स्पर्धेचे दडपण आहे तिच्या भरीला कॉफीच्या वाढत्या मागणीच्या वेगाशी दुधाचा पुरवठा टक्कर देऊ शकलेला नाही अशा कारणापायी आपल्या आहाराच्या सवयी आपल्या अपेक्षेहूनही अधिक लवकर पालटून जातील असे दिसते

अगदी अलीकडेपर्यंत कन्नडिग काहीसे कूपमडूक वृत्तीचे होते पण चौथ्य-दशकातल्या राजकीय परिस्थितीने बऱ्याचशा चागल्या बुद्धिमान तरुणाना इग्लडला जाण्याची स्फूर्ती दिली आय सी एस चे सदस्य बनण्याची आशा त्याना असे' पण एतद्देशीय लोकांच्या देशाबाहेर जाणाऱ्या या प्रवाहाला महापुराचे स्वरूप आले ते दुसऱ्या महायुद्धानतरच यत्रशास्त्रज्ञ, डॉक्टर, भाषाशास्त्रज्ञ आणि युनेस्कोचे तज्ज्ञ या नात्याने हजारो कन्नडिगाना भरपूर लाभदायक चाकऱ्या मिळाल्या आहेत

परकी देशात दीर्घकाळ वास्तव्य आणि भरीला धर्मातीत राष्ट्रात प्रस्थापित झालेला मोकळीक देणारा समाज यांमुळे अतर्जातीय विवाहाना उत्तेजन मिळाले अशा सबधावर आता रूढी डोळे वटारीत नाही इग्लिशच्या जोडीला जपानी, जर्मन, रशियन व फ्रेंच भाषांचाही परिचय करून घेणे उपयुक्त असल्याचे आपल्या बुद्धिमान तरुणाना आढळून आले आहे परिस्थिती इतकी अनुकूल असताना आपल्याकडील बुद्धिमान तरुण मुलामुलीना परत यावेसे वाटलेच तर तो विदेशी बायका व नवरे करून परत आल्याचे दिसल्यास आश्चर्य नाही याचा परिणाम असा होतो की जवळजवळ प्रत्येक घरात मिक्सर, ट्रान्झिस्टर, क्लीनर्स व टेपरेकॉर्डर्स भरलेले आढळतात जीवनाच्या वाढत्या यात्रिकीकरणाचेच हे चिन्ह होय पूर्वी जे हातानी करावे लागत होते ते आता यत्र करू शकते आणि हे फारच छान झाले कारण, सामाजिक परिवर्तनाचे एक महत्त्वाचे अग म्हणजे घरकामाला हातभार लावणाऱ्याची वाण ही एक जागतिक परिस्थिती आहे । चालू शतकातील सामाजिक परिवर्तनावर डी व्ही जीं नी एक निबध लिहिला आहे त्यानी निदर्शनास आणलेल्या गोष्टींचा अनुवाद करून हा विभाग सपवता येईल

"जीवनाचे वाढते यांत्रिकीकरणच मळी सांस्कृतिक आराखडा पालटत चालल्याचे एक उदाहरण होय आता स्वत च्या शारीरिक कष्टातून निर्माण झालेल्या वस्तूचा अभिमान लोक बाळगीत नाहीत कारण, मोठ्या प्रमाणावर बनविलेल्या वस्तू पुष्कळदा हस्तस्पर्शविरहित असतात या वैयक्तिक छटेला मुकल्याकारणाने आता त्या पूर्वीप्रमाणे भावनेला आवाहनही करू शकत नाहीत"

चालू शतकाच्या प्रारभी पन्नास ते शभर माणसाची कुटुबे दृष्टीस पडणे ही सर्वसामान्य घटना होती अशा प्रकारचे सहकारी जीवन आता अतर्धानच पावले आहे लोकसत्ताक पद्धती स्वतत्र व्यक्तित्वाला विशेष महत्त्व देते आता लोक कौटुबिक पाश अथवा स्थानिक निष्ठा मुळीच जाणत नाहीत सकुचित कौटुबिक भितीचे हे उल्लंघन म्हणजे जगाच्या भावी नागरिकाच्या दृष्टीने एक मगल घटना ठरेलही परतु आज मात्र ते भूतकाळाचे भावबध तटकन् तोडून टाकल्याचे निदर्शक ठरते "

आणखीही एक महत्त्वाची गोष्ट विचारार्ह आहे तिचा सबध जीवनाच्या अतिम उद्दिष्टाशी आहे पूर्वीच्या काळी लोकाना विवक्षित ध्येये असत यात्रेला जाणे, कुलदैवतांचा उत्सव साजरा करणे, जनतेच्या सुखसोयीसाठी सदावर्त उघडणे (चौल्ट्री), मदिर बांधणे किंवा एखादे धार्मिक प्रवचन आयोजित करणे, यासारख्या काही चांगल्या आणि महान गोष्टी साध्य करण्यासाठी ते आटोकाट प्रयत्न करीत असत एखाद्या व्यक्तीला जनतेने आपल्याला देशाच्या सन्माननीय व्यक्तींत गणावे अशी

इच्छा असेल तर असे काही तरी गौरवास्पद कार्य त्याने केलेले असावेच लागे आता माणूस केवळ स्वत साठीच जगतोसे दिसते पुढे किंवा मागे दृष्टी टाकण्याची तळमळच त्याला उरलेली नाही वर्तमानकाळच त्याचे मन पूर्णतया भरून टाकतो सास्कृतिक आणीबाणीची ही अवस्था प्रथम ध्यानात आली ती मॅथ्यू आर्नाल्डच्या "भूतकाळ मरून गेलेला आहे आणि भविष्य काळात तर जन्माला येण्याइतकी शक्तीच नाही" कारखान्यातल्या कामगाराला आध्यात्मिक समाधान मिळविण्याइतकी सवडच नाही वस्तुत मन, हृदय व आत्मा ही सर्वस्वी पणाला लावून यत्रांची चाकरी करण्याची आवश्यकता नसतेच "या दिवसापर्यंत भोगले ते दु ख भरपूर झाले आता जे मिळविता येईल ते हिसकून घ्या, खा, प्या आणि आनद लुटा कारण उद्या नाही तरी तुम्ही मरणारच आहात ।"

आधुनिक सुधारणेचे आपण काहीसे निराशाजनक चित्र रेखाटीत असल्याचे प्रस्तुत लेखकाला मान्य आहे त्याचे स्वत चे जीवन दीर्घायुष्य व सन्मान यानी खचलेले आहे परोपकार हेच जीवनाचे तत्त्व मानणारे त्याच्यासारखे शेकडो लोक आहेतही डी व्ही जी. व आर आर डी यासारखे टीकाचार्य, कुवेंपु, बेंद्रे आणि वचन-पितामह यासारखे ज्ञानयोगी, दिनकर देसाई आणि टी एम ए पै यासारखे समाजकार्यकर्ते आणि विश्वेश्वरायासारखे कर्मयोगी कर्नाटकात जन्मास येत राहातील तोपर्यंत आपल्या सांस्कृतिक परपरेच्याही अखडितत्वाविषयी आपणास निश्चिती बाळगता येईल कारण, बाह्य आकार पालटत राहातो पण आत्मा अविकारीच असतो

सिरिगण्णद गेळगे

# ७ उपसहार

**सिहावलोकन**

'भूमीचे पुत्र' ही शब्दसहती भूमी व तेथील जनता यांच्यातील जिव्हाळचाच्या सबधाची द्योतक आहे कर्नाटक तर याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे या राज्याच्या बहुतेक भागाना सुपीक भूमी आणि समधात ऋतुमान लाभले आहे क्षेत्रफळ आणि लोकसख्या याच्या दृष्टीने ते भारतीय सघराज्यातील प्रातात मध्यम क्रमाचे आहे कन्नडिग अगदी कगाल दरिद्रीही नाहीत किंवा कुबेराइतके धनाढचही नाहीत बहुसख्य जनता कन्नड–भाषिक असली तरी इतर भाषा बोलणाऱ्याचीही सख्या बरीच मोठी असून तेही त्या भूमीचे औरस पुत्रच आहेत अतिरेकाची प्रवृत्ती ते उत्स्फूर्तपणे टाळीत आले आहेत या देशातील साऱ्या प्रदेशापैकी एकटचा कर्नाटकातच कर्नाटकी व हिंदुस्तानी या दोन्ही सगीतपद्धती भरभराट पावत आहेत उत्तरेकडील व दक्षिणात्य सास्कृतिक धाग्यादोऱ्यांची अशी एकत्र गुफण केवळ काव्यात व सगीतातच नव्हे तर चित्रकला व शिल्पकला यांसारख्या इतर कलातही प्रतिबिंबित झालेली आढळते ज्याची ज्याची म्हणून कर्नाटकावर छाप पडते त्या साऱ्यालाच आपापल्या विभिन्न धाग्याची गुंफण कर्नाटक सस्कृती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एकात्मतेतच करून देण्याची हातोटी साधलेली आहे सहिष्णुतेची ही भावना बेलूरच्या विख्यात शिलालेखातही आविष्कृत झाली आहे (इ स १३९७)

आधुनिक काळात तर ही उदारमनस्क सहिष्णुता उद्योगधद्याच्या शीघ्रगती वाढीला अत्यत उपकारक ठरली आहे व्यापारीकरणाच्या अतिरेकाचे कठोर व घृणास्पद परिणाम टाळण्यासही तिचे सहाय्य झाले आहे या राज्याची अधिक प्रगती तर अगदी डोळ्यात भरण्याजोगी होत आहे

**नैसर्गिक साधनसामग्री**

औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेल्या नाना प्रकारच्या खनिजाचे वरदान निसर्गाने कर्नाटकाला दिले आहे उद्योगधद्यात हे राज्य आघाडीवर आहे यासाठी तर सर एम विश्वेश्वरायाच्या दूरदृष्टीलाच धन्यवाद द्यायला हवेत सोन्याच्या जगातील सर्वांत खोल व प्रचड अशा खाणीचा अभिमान ते मिरवू शकते लोह व मगल (मॅंगेनीज) यांच्या मिश्रणाचे विपुल साठे तेथे असून क्रोमाइटचेही मोठाले थर आहेत.

*

बॉक्साइट, अॅस्बेस्टॉस, चिनी माती, चुनखडी, डोलोमाइट, मॅग्नेटाइट, गेरू, गोपीचदन, क्वार्टझ व सिलिकॉन ही खनिजेही पुरेशा प्रमाणात आढळतात (चित्रदुर्ग जिल्ह्यातील) इगळदहाळ आणि (हस्सन जिल्ह्यातील) कल्यादी या ठिकाणच्या तांब्याच्या साठ्याचे सस्करण करून मौलिक धातूची आजची वाणही भविष्यकाळात लवकरच भरून काढता येईल

## खनिजाधिष्ठित उद्योगधदे

भद्रावतीचा मैसूर लोह व पोलाद कारखाना भारतातील सर्वांत जुन्या पोलाद कारखान्यात मोडतो या कारखान्यात पिग लोह आणि विशेष जातींचे समिश्र पोलादाचे प्रकार या दोहोचीही निर्मिती होत असते (चिक्कमगळूर जिल्ह्यात) तानिगेब्याळेस एक सिटरिंग कारखाना आहे, भद्रावतीस लोहमगल, फेरोसिलिकन आणि फेरोक्रोम बनविणारा कारखाना आहे आणि लोहमगलचा एक कारखाना दडेलीतही आहे बेल्लारी जिल्ह्यात व्यासकेरे येथे सांडूर लोह व मगल ओर्स लिमिटेड यानी एक लोहमगलचा कारखाना अलीकडेच उभारला आहे

राज्यातील भद्रावती सीमेट कारखान्याव्यतिरिक्त अम्मासद्रा, बागलकोट, शहाबाद आणि वाडी या चार ठिकाणीही सीमेंटचे कारखाने आहेत त्याची एकूण उत्पादनक्षमता वर्षाला बावीस लाख टनांची आहे (बेळगाव जिल्ह्यात दोन लाख टनाचा) नागरगळीस आणि (गुलबर्गा जिल्ह्यात चार लाख टनांचा) सेडम येथे असे आणखीही दोन कारखाने उभारण्यास अनुमती मिळाली आहे

बगलोरात एक इलेक्ट्रोपोर्सलेन कारखाना, वाटल्या व हॉलोवेअर बनविणारे दोन कारखाने आणि काचसामान व अॅल्युमिनियम भाडी बनविणारेही दोन कारखाने चालू आहेत बगलोर जिल्ह्यात येळहका, यशवतपूर व चिकबनवर या ठिकाणी भट्टीच्या विटा निर्माण करणारे तीन कारखाने उभारले आहेत

इडियन अॅल्युमिनियम कपनीने धातू गाळण्याचा एक कारखाना बेळगावजवळ उभारला असून त्याची सपूर्ण उत्पादनक्षमता तीस सहस्र टनाची आहे

## खनिजांचे उत्पन्न

१९६९ मधील खनिजाच्या एकूण उत्पादनातले ४७ टक्के सान्यापासून, १७ टक्के लोहापासून आणि १२ टक्के मगलपासून प्राप्त झालेले आहे १९६९ त निर्माण झालेल्या खनिजाच्या एकूण मूल्यापैकी ६० टक्के मूल्य सोन्याचेच आहे

## हरित क्रांती

पिकांच्या कित्येक विविध जातींचे उत्पादन करण्याला अनुकूल अशी माती व

ऋतुमान कर्नाटकाला लाभले आहे आलेखावरून काढलेल्या अटकळीनुसार १९७४ मध्ये राज्याची लोकसख्या २९९३१ हजार व्हावी अशी अपेक्षा आहे लागवडीखाली आणण्याजोग्या भूमीचे प्रमाण दरडोई जवळजवळ एक एकर पडते क्षेत्रफळात असलेली तूट सधन शेतीच्या आणि अन्य मार्गांनी भरून काढता येईल या राज्याने हरित क्राती साध्य केल्याचे खाद्य पिकाविषयीच्या पुढील वस्तुस्थितीवरून आणि आकडयावरून दिसून येते

**अन्नधान्ये**

७० लाख एकरावर क्षेत्र व्यापणारे ज्वारी हेच आजवरचे सर्वांत महत्त्वाचे पीक होय त्याखालोखाल क्रम लागतो प्रत्येकी चोवीस लाख एकर व्यापणाऱ्या रागीचा आणि भाताचा उत्पादनाच्या दृष्टीने भाताचा अनुक्रम पहिला असून त्याचे वर्षाला अठरा एक लाख टन उत्पादन होत असते उसाची लागवड वर्षागणिक वाढतच चालली आहे साखरेचा भरपूर उतारा देणारा ऊस राज्याच्या अनेक भागांत पिकविला जातो त्याखालील भूमीचे क्षेत्रफळ १ २५ लाख एकरावरून २ ३ लाख एकरावर चढले आहे आणि उत्पादन ३१ लाखावरून ९१ लाख टनापर्यंत पोहोचले आहे सध्या साखरेचे दहा कारखाने आहेत भुईमूग हे सर्वांत महत्त्वाचे तेलबियाचे पीक होय, त्याखालोखाल येतात एरडचा व जवस भुईमुगाच्या तेलाचे वार्षिक उत्पादन जवळजवळ पाच लाख टन होते

अन्नधान्याचे पुरेसे उत्पादन होत असले तरी डाळीच्या पुरवठ्यात मात्र तुटच पडते १९६९ व १९७३ साली या दोहोंची मिळून एकूण मागणी अनुक्रमे पन्नास लाख व ५४ २९ लाख टनाची असेल असा अदाज आहे पहिल्या तीन पचवार्षिक योजनांच्या कालावधीत हाती घेतलेल्या विविध योजना आणि चौथ्या योजनेत त्यावर दिलेला वाढता भर यामुळे अन्नधान्याचे उत्पादन ५८ लाख टन व्हावे अशी अटकळ बांधली गेली आहे

सकरित बियाण्याच्या उत्पादनात या राज्याने भरघोस प्रगती केली असून ते वर्षाला ११००० क्विटलांवर गेले आहे १९६६ पासून हा एक लाभदायक व्यवसाय होऊन बसला असून सकरित बियाण्यांच्या दृष्टीने इतर राज्याना सहाय्य करणे कर्नाटकाला शक्य होत आहे

**व्यापारी पिके**

कपाशीचे महत्त्वपूर्ण व्यापारी पीक २८ लाख एकरांचे क्षेत्रफळ व्यापून आहे. (पाटबधाऱ्याखालच्या आणि पावसाखालच्या अशा दोन्ही प्रकारच्या परिस्थितीत येणाऱ्या) लाब धाग्याच्या आणि सागर-द्वीपी (सी आयलड) या दोन्ही जातीचे

महत्त्व वाढत चालले आहे आज घडीला मात्र कापडधंद्याची निकड भागविण्यासाठी राज्याला लांब धाग्याचा कापूस पी एल ४८० योजनेनुसार आयातच करावा लागत आहे

व्हर्जीनिया ब्ल्यू क्यूअर्ड जातीच्या तबाखूचेही पीक या राज्यात काढले जाते चार एक सहस्र एकर भूमी तिच्या लागवडीखाली आणलेली आहे

## आगरी पिके

आगरी पिकाच्या दृष्टीने कर्नाटक एक अग्रगण्य राज्य आहे कॉफीचा तर या राज्याला जवळजवळ एकाधिकार लाभलेला आहे नारळ, सुपारी, काजू, वेलदोडे व मिरी ही इतर आगरी पिके होत कोको, जायफळ व लवंगा यांसारख्या पिकाची नव्याने लागवड करण्यातही बरेच यश आले आहे कॉफीला व चहाला निर्यातीसाठी बाजारपेठही उपलब्ध झाली आहे

## प्राणिजन्य व्यवसाय

आपल्याकडचा दुधाचा व प्राणिज प्रथिनाचा व्यवसाय विकसित करून घेण्याची खटपट कर्नाटकाने सर्वतोपरीनी चालविली आहे बंगलोरच्या आसमंतातल्या आणि इतर प्रदेशातल्या सकरजात गायींनी या कार्यातला महत्त्वाचा वाटा उचलला आहे धारवाड आणि मैदानमधील हस्सन व शिमोगा हे तालुके यांसारख्या निवडक क्षेत्रातील दुधाचे उत्पादन वाढल्यामुळे आणखी विकास करण्याची पायाभरणी होऊन चुकली आहे कुक्कुटपालन व्यवसायाचेही महत्त्व वाढीस लागले आहे राज्यातच उत्पादन वाढू लागल्याने केरळमधील आयात बंद करण्यात आली आहे

सागरी व अतर्भागातील मच्छीमार व्यवसायही आहारात समतोल प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने हातभार लावीत आहे खोल समुद्रात मासे पकडण्यासाठी यांत्रिक नावा आणि विक्रीसाठी वाढत्या सोयी या गोष्टी या महत्त्वपूर्ण व्यवसायाच्या वाढीस उपकारक ठरल्या आहेत

## विद्युच्छक्तिक्षमता

जलविद्युच्छक्तीची बरीच उत्तम क्षमता लाभल्यामुळे कर्नाटक भाग्यशाली ठरले आहे ही क्षमता जवळजवळ ५५ लाख किलोवॅट इतकी आहे येत्या दोन किंवा तीन दशकांत ही समग्र क्षमता उपयोगात आणण्याची योजनाही सिद्ध आहे

या राज्यातील नद्यांच्या जाळयाचे वैशिष्ट्य असे की पूर्ववाहिनी नद्या मुख्यत ओलितासाठी वेठीस धरता येतात तर पश्चिमवाहिनी नद्या जलविद्युच्छक्तीच्या

निर्मितीसाठी उत्कृष्ट ठिकाणे पुरवतात राज्यातील जलविद्युच्छक्तीतली जवळजवळ ७० टक्के वीज पुरविण्यासाठी या नद्या राबविण्यात येत आहेत

**शरावती प्रकल्प**

मोठ्या प्रमाणावर जलविद्युच्छक्ती निर्माण करण्याच्या दृष्टीने अडविण्यात आलेली शरावती ही पहिलीच नदी होय जवळजवळ १२०००० किलोवॅट क्षमतेची यंत्रसामग्री असलेले एक ठाणे उभारण्याची योजना १९४० त आखली जाऊन कामाला प्रारंभही करण्यात आला ती १९५२ मध्ये पुरी झाली हे ठाणे 'महात्मा गांधी जलविद्युत्स्थानक' म्हणून प्रसिद्ध आहे (MGHES)

जोग धबधब्यात उपलब्ध असलेल्या पाण्याच्या राशीतले अवघ्या १५ टक्क्यांहूनही कमी पाणी 'एमजीएचईएस' प्रकल्पासाठी वापरावे लागते पाण्याचा उरलेला आलोट उपयोगात आणण्यासाठी 'एमजीएचइएस' च्या खाली ८८३ किलोमीटर्सवरही एक स्थानक उभारले आहे त्यासाठी स्थापत्यशास्त्रीय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने विशेष कुतूहलजनक ठरणारे 'लिंगनमक्की धरण' बांधावे लागले प्रत्येकी ८९१०० किलोवॅटच्या दहा संकल्पित यांत्रिक घटकातले सात घटक यापूर्वीच कार्यान्वित झाले आहेत आणखी एक लवकरच सेवा बजावू लागेल उरलेल्या दोन घटकावरचे काम १९७३ पर्यंत पूर्ण होईल शरावती ठाण्यावरची विद्युच्छक्ती शिमोगा, हुबळी व बंगलोर येथील विद्युद्ग्राहक ठाण्यापर्यंत प्रवाहित केली जाते

**तुंगभद्रा प्रकल्प**

राज्यातील मोठमोठ्या विविधोद्देशी प्रकल्पातलाच हा एक खालच्या पातळीवरील कालवा कर्नाटकातील ३७३६० हेक्टर भूमी भिजवितो तर आंध्र प्रदेशातली ८७००० हेक्टर. जवळजवळ ७२००० किलोवॅट क्षमतेची यंत्रसामग्री असलेली तीन ठाणी उभारलेली आहेत पण कर्नाटक तर केवळ १४४०० किलोवॅटच वापरतो

डाव्या काठावरचा कालवा रायचूर जिल्ह्यातली जवळजवळ २३४००० हेक्टर जमीन ओलिताखाली आणतो २७००० किलोवॅट क्षमतेची यंत्रसामग्री असलेले स्थानक बांधलेले आहेच ९००० किलोवॅटच्या आणखीही एका घटकाची व्यवस्था झालेली आहे हे सारे प्रकल्प तडीस नेण्यासाठी उच्च प्रतीच्या स्थापत्यशास्त्रीय व वैज्ञानिक कौशल्याची निवड भासली कर्नाटकमधील स्थापत्य-विशारदाच्या यशोमंदिरावरचा हा आणखी एक तुरा होय

**कालिंदी प्रकल्प**

वर्षाला जवळजवळ ५२००० लाख युनिटचा आजचा पुरवठा पुढल्या काही

वर्षांतील मागणीला पुरा पडू शकणार नाही कोणताही मोठा जलविद्युत्प्रकल्प पूर्ण व्हायला सहा एक वर्षे लागतातच आणि एखाद्या महान प्रकल्पाला आरंभ करण्याची निकड राज्याला जाणवलेलीही आहे पण कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढती विद्युच्छक्ती निर्माण करण्यासाठी राबविण्याजोगी कालिंदी ही एकच नदी उरली आहे

काळी पश्चिमवाहिनी नदी अवघे १६१ किलो मीटर लांब असून ती संपूर्णतया याच राज्यातून वाहात जाते तिची विद्युन्निर्माणक्षमता १३ लाख किलोवॅट व्हावी अशी अटकळ आहे तिच्या समग्र खोऱ्याची बारकाईने पाहाणीही होऊन चुकली आहे हा प्रकल्प शीघ्र गतीने पार पडावा म्हणून मैसूर पॉवर कॉर्पोरेशनही स्थापन करण्यात आले आहे

तिच्या जोडीला बेडथी, अघनाशिनी व वारापोळे या नद्याही मोठाल्या जलविद्युत्प्रकल्पासाठी अडवता येतील

## दळणवळण

संयुक्त कर्नाटकाच्या निर्मितीमुळे या राज्याला कित्येक बंदरे लाभली आहेत आणि विशेषत नद्यांतील वाहतुकीचा संपूर्णतया अभावच असल्याकारणाने हा लाभ स्वागतार्ह ठरला पण त्याने समस्याही निर्माण करून ठेवल्या माल व प्रवासी यांच्या वाहतुकीतील वाढीच्या प्रमाणात लोहमार्ग व वायुमार्ग यात मात्र वाढ होऊ शकली नाही उदा रस्त्यावरील वाहतूक जवळजवळ वर्षाला १० टक्के या प्रमाणात वाढत आहे पण १९५६–१९६८ या काळात रस्त्याची लांबी मात्र अवघ्या ३० टक्क्यानीच वाढली आहे डांबरी रस्त्याची लांबी तेवढी ४०० हून अधिक टक्क्यानी वाढली आहे रस्त्याच्या एकूण लांबीतले जवळजवळ ८० टक्के अधिक श्रेष्ठ प्रतीचे केले आहेत द मैसूर स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन (MSRTC) राज्यातील सर्व मोठ्या मार्गांवरून प्रवाश्यासाठी बसगाड्या चालविते आणि त्याच्या जोडीला राजधानीपासून हैदराबाद, पणजी, मद्रास व तिरुपती यांसारख्या महत्त्वाच्या नगरापर्यंत न थांबणाऱ्या, आरामदायी आणि शीघ्रगती बसगाड्याही चालवते

### राष्ट्रीय राजमार्ग

बंगलोर-पुणे, चित्रदुर्ग-सोलापूर, बेदरवरून जाणारा हैदराबाद-सोलापूर आणि बंगलोर-हैदराबाद असे एकूण चार राष्ट्रीय राजमार्ग आहेत लोकसंख्या देशाच्या ६ ३ टक्के असूनही कर्नाटकच्या वाट्याला राजमार्ग मात्र एकूण राष्ट्रीय राजमार्गांच्या ५ ९ टक्केच आले आहेत स्थलमार्ग व लोहमार्ग विकसित करण्यासाठी केंद्राची एक टप्प्या टप्प्यांची योजना आहे या संदर्भात कामाच्या दोन वर्गांचा उल्लेख

करता येईल अशुद्ध धातू व खनिजे खाणीक्षेत्रापासून पश्चिम समुद्रतीरावरील बंदराकडे नेणे सुलभ व्हावे म्हणून स्थलमार्गांची सुधारणा, व कन्याकुमारीपासून मुंबईपर्यंत पश्चिम तीरावरील राजमार्गांची रचना

**लोहमार्ग**

लोहमार्गांची लांबी २६७९ किलोमीटर आहे सालेम-बंगलोर मार्ग नुकताच पुरा झाला आहे हस्सन–मंगळूर लोहमार्ग घालून देणे आणि हॉस्पेट व गुंटकळ यामधील एमजीचे (मीटर गेजचे) बीजीत (ब्रॉड गेजमध्ये) रूपांतर करणे ही नव्याने हाती घेतलेली कामे होत

**वायुमार्ग**

राज्याच्या राजधानीपासून भारतीय गणराज्यातील सर्व महत्त्वाच्या नगरांपर्यंत वायुमार्गाने वाहतूक करण्याची व्यवस्था आहे राज्यातल्या राज्यात बेळगाव व मंगळूर, बंगलोरला वायुमार्गाने जोडलेली आहेत हुबळीला विमानतळ बांधण्यास संमती देण्यात आली आहे

**राज्यांतर्गत प्रवाश्यांची सोय**

शीघ्र गती व सुखद परिवहनव्यवस्थेमुळे विचार आणि माल दोहोंच्याही देवाणघेवाणीला सहाय्य झाले आहे दोन नवीन लोहमार्गाव्यतिरिक्त शासकीय आणि खाजगी दोन्ही क्षेत्रातील स्थलमार्गांवरच्या दळणवळणव्यवस्थेनेही मोठीच प्रगती साध्य केली आहे त्यामुळे अपूर्व स्वरूपाची सामाजिक क्रांतीही घडून आली आहे प्रवाश्यांची राज्यांतर्गत येजा आणि सुखपर्यटने इतक्या वेगाने वृद्धिंगत होत आहेत की नवे मार्ग व नवीन सेवा उपलब्ध करून देण्याच्या मागणीला तोंड देणे 'एमएसआरटीसी'ला कठीण जात आहे या देखाव्याला दुसरीही बाजू आहेच पाहण्यासारखी स्थळे पाहाण्यासाठी कर्नाटकातील लोक राज्यातल्या राज्यात आजच्याइतके कधीच हिंडत नसत कर्नाटकला लाभलेले पूर्वपरंपरेचे समृद्ध निधान आज सामान्य नागरिकांच्याही आटोक्यात आले आहे (एन एस सीताराम शास्त्री मैसूर राज्य वार्षिक ग्रंथ, १९६७–६८)

**भूमिसुधार**

प्रागतिक आणि समान स्वरूपाचा भूमिसुधार कायदा संमत करून घेणारे कर्नाटक हे भारतीय राज्यातले आघाडीवरचे राज्य होय (१९६२ चा कायदा) इतर सुधारणाच्या जोडीला पुढील सुधारणा घडवून आणणे हे या कायद्याचे लक्ष्य आहे

कुळाना शेतातील कुळवाडीची शाश्वती, कुळाना शेतातून आणि शेती कामागरांना निवासस्थानातून हुसकून लावले जाण्याविरुद्ध सरक्षण, शेती न करणाऱ्यांना शेतीची भूमी देण्याविरुद्ध नियत्रण, भूमीच्या स्वामित्वावर वरच्या पातळीची मर्यादा आणि सहकारी शेताची स्थापना

तुकडेबदी आणि आर्थिक दृष्टया लाभदायी नसलेल्या वैयक्तिक शेताचे एकत्रीकरण या कार्यांत त्या वेळी मुबई राज्यात समाविष्ट असलेल्या भागांनी सयुक्त कर्नाटकाच्या स्थापनेपूर्वीच खूप प्रगती केली होती आता ही प्रगती उभ्या राज्यालाच लागू केलेली आहे या सदर्भात कर्नाटक इतर दाक्षिणात्य राज्यांच्या पुढे गेले आहे

**एकात्मतेची स्थापना**

राजकीय एकात्मतेच्या खालोखाल भावनिक एकात्मताही गभीर समस्या होऊन बसली आहे वैविध्यातली एकता नव्या कर्नाटक राज्याइतकी दुसरीकडे कुठेच उत्तम प्रकारे दृग्गोचर होत नसेल या समस्या योजनाबद्ध प्रगती साधण्याच्या आड आल्या नाहीत गेल्या दशकात साध्य करता आले आहे ते समाधानकारकच आहे अनिवार्य प्राथमिक शिक्षण, विनामूल्य माध्यमिक शिक्षण आणि उच्चतर शिक्षणासाठी व सशोधनासाठी उत्कृष्ट सोयी, भूमिसुधार कायदे व राज्यस्वशासनासाठी समान रूपरेषा, सुधारलेले रस्ते आणि दळणवळण, हरित क्राती व पुरेशा आरोग्यसेवा (१९६७–६८ च्या) मैसूर राज्य वार्षिक ग्रथासाठी एन एस सीताराम शास्त्री यानी लिहिलेल्या लेखातले एक उद्धरण या विभागात समाविष्ट करणे उचित होईल

"निरनिराळ्या प्रदेशांत आढळून येणाऱ्या विभिन्न पारपरिक आराखड्यांनिशी घडून येणारी स्वागतार्ह ओळखदेख हेच कदाचित भावनिक एकात्मतेच्या विधायक बाजूचे उत्कृष्ट उदाहरण ठरू शकेल नानाविध सास्कृतिक धाटणींविषयी उत्कट कौतुकभाव निर्माण होत आहे अभिजात व लोककलेच्या विविध पद्धती दोहो प्रकारच्या नृत्य, नाट्य व सगीत याच्या द्वारा मूलभूत सास्कृतिक ऐक्याचा आविष्कार घडत आहे ग्रहणशील गुणग्राहकता आणि नैसर्गिक अत प्रसार या प्रक्रियाच्या द्वारा साहित्याची व वृत्तपत्रवाङ्मयाची सर्वसाधारण प्रमाणभाषा उत्क्रात होऊ लागली आहे वेशभूषा, बोलभाषा आणि चालीरीती यांतले स्थानिक भेद आता परके मानले जात नाहीत या अनोळखी रीतीविषयी आणि रूढीविषयी मोकळीक देण्यास लोक आता शिकले आहेत ही ओळखदेख आणि जिव्हाळ्याची भावना निर्माण करण्यास आकाशवाणीने एक प्रभावी घटक म्हणून हातभार लावला आहे

## भविष्याविषयी अपेक्षा (भवितव्यता)

योजनाबद्ध अर्थव्यवहाराच्या कोणत्याही आराखडयाच्या भविष्यकालाकडे न्याय्य अभिमानाच्या आणि आशावादाच्या भूमिकेवरून दृष्टिक्षेप करण्याचा अधिकार कर्नाटकाला पोहोचतो या राज्याच्या अफाट नैसर्गिक सपदेतली अगदी थोडीशीच अजूनपर्यंत कामाला जुपली गेली असेल राजेराजवाड्यांचे मैसूर तेवढे आदर्श सस्थान मानले जात असे कारण, तेथली साधनसामग्री काळजीपूर्वक जोपासली गेली ती परपरानिष्ठ परतु प्रायोगिक स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेच्या भक्कम धोरणानुसार दुसऱ्या जागतिक महायुद्धाने तिलाही धडक दिली आणि मागोमाग उद्‌भवलेल्या फाळणी व स्वातत्र्यलाभ, विलीनीकरण व एकत्रीकरण, राज्यपुनर्रचना आणि केंद्रीकरण याच्या गदारोळात राज्याला कुठे फिरून पाय रोवण्याची सधी आताशीच कुठे मिळत आहे विषम व स्वतत्र अशा वीस शासनयत्रणांखाली विभिन्न कालावधीपर्यंत विभागून डाबले गेलेले कर्नाटकचे लोक एकत्र केले गेले त्याला एक दशक उलटून गेल्यानंतर आता हळूहळू कर्नाटकच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्थूल रूपरेषा साकार स्वरूपात प्रकट होऊ लागल्या आहेत जनतेच्या आकाक्षाना दिशा व गती देऊ शकेल असाच हा सश्लेषक घटक आहे दळणवळणाचे आधुनिक जाळे, अफाट नैसर्गिक साधनसामग्री आणि विद्युच्छक्तिक्षमता याच्या बळावर आज कर्नाटक अनेकागी विकासाच्या आणि सर्वांगीण प्रगतीच्या उबरठ्यावर उभा आहे

REFBK-0021859